# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२४-२०२५

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**(पुस्तक क्रमांक १)**

**(प्राथमिक शिक्षण)**

# अनुक्रमणिका

## प्राथमिक शिक्षण


| क्रमांक | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना .. .. .. .. | १ |
| २ | शैक्षणिक स्तर .. .. .. .. | २ |
| ३ | वित्तीय आवश्यकता .. .. .. .. | ४ |
| ४ | अर्थसंकल्पीय अंदाज, २०२४-२०२५ मधील (अर्थसहाय्याव्यतिरिक्त) सहायक अनुदान .. .. | १६ |
| ५ | सर्वसाधारण शिक्षण (प्राथमिक)—महत्त्वाचे उपक्रम .. .. .. .. | २० |
| ६ | सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना .. .. .. .. | २० |
| ७ | मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण .. .. .. .. | २० |
| ८ | शिक्षण सेवक योजना .. .. .. .. | २० |
| ९ | महिलांचे सक्षमीकरण .. .. .. .. | २१ |
| १० | नगरपालिका प्रशासकीय अधिकारी .. .. .. .. | २१ |
| ११ | प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य—जिल्हा परिषदांना अनुदान .. .. | २२ |
| १२ | प्राधिकृत महानगरपालिका / नगरपालिका / कटक मंडळे यांच्या शाळांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमित वेतन व सेवानिवृत्ती वेतनासाठी अनुदान. .. | २३ |
| १३ | मुंबई महानगरपालिकेस प्राथमिक शिक्षणासाठी साहाय्य .. .. .. | २३ |
| १४ | मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना अनुदाने .. .. .. .. | २४ |
| १५ | प्राथमिक शाळेतील पुस्तकपेढी योजना .. .. .. .. | २५ |
| १६ | जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा (मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा). .. | २६ |
| १७ | राज्यातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या १०३ विकास गटांतील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता १ ली ते ४ थी मधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके. .. | २७ |
| १८ | राज्यातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या १०३ विकास गटांतील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता १ ली ते ४ थी मधील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखनसाहित्य पुरवठा करणे. .. | २८ |
| १९ | इयत्ता १ ली ते ४ थी मधील प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींना उपस्थिती भत्ता .. .. | २९ |
| २० | जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना जोडून बालवाड्या उघडणे .. .. .. | ३० |
| २१ | जिल्हा बालभवन योजना .. .. .. .. | ३१ |
| २२ | अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) .. .. .. .. | ३२ |
| २३ | प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना (पूर्वाश्रमीची शालेय पोषण आहार योजना) .. .. | ३४ |
| २४ | राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना .. .. .. | ३७ |
| २५ | सर्वशिक्षा अभियान .. .. .. .. | ३९ |
| २६ | समग्र शिक्षा .. .. .. .. | ३९ |
| २७ | पीएमश्री योजनेअंतर्गत सन २०२३-२०२४ अंमलबजावणीबाबत टिप्पणी .. .. .. | ६१ |
| २८ | राज्यातील शिक्षण पद्धतीचे अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (STAR) .. .. | ६२ |
| २९ | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ .. .. .. | ६३ |
| ३० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना .. .. .. .. | ६४ |
| ३१ | संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद—विभागनिहाय संरचना .. .. | ६५ |
| ३२ | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे मुख्यालय पदांची संरचना .. | ६६ |
| ३३ | संकीर्ण विभाग वार्षिक कार्यक्रम अंदाजपत्रक सन २०२३-२४ .. .. .. | ६७ |

## अनुक्रमणिका—*चालू*

## संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे


| क्रमांक | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ३४ | अशासकीय अनुदानित अध्यापक विद्यालयांना जोडलेल्या सराव पाठशाळांना सहायक अनुदाने .. | ६८ |
| ३५ | अशासकीय अनुदानित अध्यापक विद्यालयांना सहायक अनुदाने .. .. .. | ६९ |
| ३६ | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (केंद्रपुरस्कृत योजना) .. .. .. | ७० |
| ३७ | मूल्यमापन विभाग .. .. .. .. | ७१ |
| ३८ | सन २०२२-२०२३ मधील कार्यक्रम .. .. .. .. | ७३ |
| ३९ | सन २०२३-२०२४ मधील कार्यक्रम .. .. .. .. | ७६ |
| ४० | संशोधन विभाग (अंदाजपत्रक २०२४-२०२५) .. .. .. .. | ७८ |
| ४१ | राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम (NPEP) .. .. .. .. | ८३ |
| ४२ | ग्रंथालय विभाग .. .. .. .. | ८४ |
| ४३ | राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर .. .. .. .. | ८४ |
| ४४ | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर (आंग्लभाषा तज्ज्ञत्व) .. .. .. | ८९ |
| ४५ | महाराष्ट्र राज्य दृक्श्रवण शिक्षण संस्था, पुणे .. .. .. | १०० |
| ४६ | महाराष्ट्र राज्य दृक्श्रवण शिक्षण संस्था, पुणे—शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर प्रशिक्षण .. .. | १०१ |
| ४७ | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, जीवन शिक्षण (प्रसार माध्यम) विभाग .. | १०२ |
| ४८ | संकीर्ण विभाग .. .. .. .. | १०३ |
| ४९ | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई (व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था) .. .. .. | १०४ |



## शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे


| | | |
|---|---|---|
| ५० | संरचना, शिक्षण संचालनालय (योजना)/शिक्षणाधिकारी (योजना) .. .. .. | ११४ |
| ५१ | नवभारत साक्षरता कार्यक्रम—प्रस्तावना .. .. .. .. | ११५ |
| ५२ | साक्षर भारत कार्यक्रम .. .. .. .. | ११८ |
| ५३ | अल्पसंख्याक योजना .. .. .. .. | ११९ |
| ५४ | अल्पसंख्याक कार्यालय, मंत्रालय, नवी दिल्ली व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई अंतर्गत अल्पसंख्याकांकरिता राज्यामध्ये शिक्षण संचालनालय (योजना), पुणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रपुरस्कृत योजना. .. .. | ११९ |
| ५५ | मंत्रालय —प्रस्तावना .. .. .. .. | १२४ |
| ५६ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग .. .. .. .. | १२४ |
| ५७ | ठेव संलग्न विमा योजना .. .. .. .. | १२४ |
| ५८ | शासकीय कर्मचाऱ्यांना कर्जे .. .. .. .. | १२४ |


## सांख्यिकी माहिती


| | | |
|---|---|---|
| ५९ | विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी .. .. .. .. | १२६ |

# संरचना (२०२३ - २०२४)
## प्राथमिक शिक्षण संचालनालय



# प्रस्तावना

शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यात विविध शैक्षणिक योजना ह्या प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण ६-१४ वयोगटाच्या सर्व मुलांना शिक्षण व्यवस्था पुरविण्याचे शासनाचे घटनात्मक दायित्व, केंद्र शासनाचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ व कृती कार्यक्रम १९९२ आणि राज्याचे धोरण ही मार्गदर्शके ठेवून आखण्यात आल्या आहेत. पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षणस्तराचा यामध्ये समावेश होतो. या प्रत्येक स्तरावर पायाभूत सोई उपलब्ध करणे, मानवी घटक अधिक सबळ करणे आणि त्याचा दर्जा वाढविणे यावर भर देण्यात आला आहे.

आर्थिक विकासात शिक्षणास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे, निरनिराळे विकास कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षित मनुष्यबळ वाढवून मानवी भांडवल निर्माण करण्याचे शिक्षण हे मुख्य साधन आहे. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील शिक्षणाची महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन शिक्षणविषयक कार्यक्रम राबविले जातात. शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊनच राज्य शासन आपल्या एकूण वित्तीय महसूल खर्चापैकी सुमारे $^1/_६$ भाग सर्वसाधारण शिक्षणावर खर्च करते.

राज्यातील निरनिराळे शैक्षणिक विकासाचे विविध कार्यक्रम, शिक्षणाच्या पुनर्रचनासंबंधीचे धोरणविषयक निवेदन, २० कलमी आर्थिक कार्यक्रम, राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरण, केंद्रीय शिक्षण सल्लामंडळाच्या धोरणावर आधारलेले असतात.

या प्रकाशनात शालेय शिक्षण या क्षेत्रात येणाऱ्या शालेय शिक्षण या विभागाने ज्या कार्यक्रमासाठी मागणी केली आहे, अशा सर्व कार्यक्रमाचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**संचालन व प्रशासन.**—प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत मुख्यालयाच्या ठिकाणी या विभागाच्या कामाची प्रशासन, शैक्षणिक व मूल्यमापन या तीन निरनिराळ्या स्तरावरून अंमलबजावणी होते. संचालक यांचेकडून प्रशासकीय कार्यक्रमांचे नियंत्रण व समन्वयन केले जाते. संचालकांना त्यांच्या कामात सहसंचालक, उपसंचालक, प्रशासन अधिकारी यांचे संपूर्ण सहकार्य असते. सहसंचालक व उपसंचालक, शिक्षण संचालकांना शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात मदत करतात. संचालकांना लेखाविषयक सर्व बाबींमध्ये लेखाधिकारी साहाय्य करतात.

प्राथमिक शिक्षण संचालनालयात एक स्वतंत्र सांख्यिकी विभाग आहे. त्याचे प्रमुख सांख्यिकी अधिकारी (वर्ग-ब) असून ते विविध मूल्यमापनांचा सखोल अभ्यास करून शिक्षणविषयक प्रगतीची सांख्यिकीय माहिती गोळा करून त्याचे संकलन करतात. शासनाने आदिवासी जमातीच्या शिक्षणावर विशेष भर देऊन त्या कार्याला गती देण्यासाठी प्रशासन अधिकारी (आदिवासी उपयोजना), महाराष्ट्र शिक्षण सेवा, वर्ग-अ चे पद शिक्षण संचालनालयात निर्माण केले असून, त्यांचेमार्फत आदिवासी जमातीच्या वेगवेगळ्या योजनांची अंमलबजावणी राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील १५ जिल्ह्यांमध्ये प्रभावीपणे केली आहे.

खात्याचे प्रमुख या नात्याने शिक्षण संचालकांची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत :—

१. राज्य शासनाला सर्वसाधारणपणे शैक्षणिक बाबींमध्ये सल्ला देणे.

२. आवश्यक असल्यास, नवीन शैक्षणिक संस्था स्थापन करणे व त्या चालविणे.

३. राज्य शासनाने स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थांचा कारभार पाहणे.

४. शासनाने शैक्षणिक कार्यक्रमासाठी दिलेल्या निधीचे योग्य वाटप करणे व सदर निधीवर योग्य ते नियंत्रण ठेवणे.

५. स्वेच्छा संघटना व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थांवर शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशाप्रमाणे निरनिराळ्या कायद्याप्रमाणे पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे.

६. स्थानिक अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या निरनिराळ्या शैक्षणिक प्रकल्पांच्या अंमलबजावणीसंबंधी तांत्रिक सल्ला देणे.

७. शालेय शिक्षणासाठी वार्षिक व पंचवार्षिक योजना तयार करणे.

८. जिल्हा नियोजन व विकास मंडळांना कार्यक्रमाबाबत सल्ला देणे.

९. शैक्षणिक बाबी व प्रशासन, पर्यवेक्षण, शिक्षक-प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यासाठी संशोधन व आवश्यकता वाटल्यास सुधारणा करणे.

## शैक्षणिक स्तर

राज्याच्या शैक्षणिक प्रशासनात राज्य स्तर, विभागीय स्तर, जिल्हा स्तर अशी त्रिस्तरीय पद्धत अवलंबली आहे. राज्यात शिक्षण उपसंचालक ज्यांचे प्रमुख अधिकारी आहेत असे ८ प्रशासकीय विभाग आहेत, ते खालीलप्रमाणे आहेत :--

| | **प्रशासकीय विभाग** | **जिल्हे** |
|---|---|---|
| १. | बृहन्मुंबई (५ जिल्हे) | (१) मुंबई शहर, (२) मुंबई उपनगर, (३) ठाणे, (४) रायगड, (५) पालघर. |
| २. | पुणे (३ जिल्हे) | (१) पुणे, (२) अहमदनगर, (३) सोलापूर. |
| ३. | कोल्हापूर (५ जिल्हे) | (१) कोल्हापूर, (२) सांगली, (३) सातारा, (४) रत्नागिरी, (५) सिंधुदुर्ग. |
| ४. | नाशिक (४ जिल्हे) | (१) नाशिक, (२) धुळे, (३) नंदुरबार, (४) जळगाव. |
| ५. | औरंगाबाद (५ जिल्हे) | (१) औरंगाबाद, (२) जालना, (३) बीड, (४) परभणी, (५) हिंगोली. |
| ६. | लातूर (३ जिल्हे) | (१) लातूर, (२) उस्मानाबाद, (३) नांदेड. |
| ७. | अमरावती (५ जिल्हे) | (१) अमरावती, (२) अकोला, (३) वाशिम, (४) बुलढाणा, (५) यवतमाळ. |
| ८. | नागपूर (६ जिल्हे) | (१) नागपूर, (२) भंडारा, (३) गोंदिया, (४) चंद्रपूर, (५) गडचिरोली, (६) वर्धा. |

विभागीय शिक्षण उपसंचालक हे त्यांच्या विभागातील शिक्षण निरीक्षक, जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) यांसारख्या अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवतात. संबंधित विभागातील शैक्षणिक कार्यक्रमातील समन्वय व प्रशासन या कामाशिवाय शिक्षण उपसंचालकांना शिक्षण संचालकांचे प्रतिनिधी म्हणूनही काम पहावे लागते. विभागीय शिक्षण उपसंचालकांना कार्यालयीन व प्रशासकीय कामकाजात मदत करण्यासाठी कनिष्ठ प्रशासन अधिकारी (वर्ग-ब) शिक्षण उपनिरीक्षक, शास्त्र सल्लागार ही पदे मंजूर आहेत.

जिल्हा स्तरावर प्राथमिक शिक्षणाचे काम वर्ग-अ मधील अधिकाऱ्यांकडे स्वतंत्रपणे देण्यात आले असून प्राथमिक शिक्षणासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेत शिक्षणाधिकाऱ्यांचे स्वतंत्र पद मंजूर आहे.

राज्यातील सर्वच जिल्ह्यात क्षेत्रीय पातळीवर गटशिक्षणाधिकारी (महाराष्ट्र शिक्षण सेवा, वर्ग-ब) ही पदे मंजूर आहेत.

## तक्ता १
## TABLE I

## (२) वित्तीय आवश्यकता

**तक्ता १**

| बाब | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ Actuals for 2022-2023 | अर्थसंकल्प २०२३-२०२४ Budget Estimates for 2023-2024 |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| **अ. कार्याचे वर्गीकरण—** | | |
| **प्राथमिक शिक्षण—** | | |
| (१) संचालन व प्रशासन .. | 39888 | 55545 |
| (२) अशासकीय प्राथमिक शाळांना साहाय्य .. | 436055 | 157752 |
| (३) प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य .. | 351418969 | 371332279 |
| (४) निरीक्षण .. | 144853 | 188636 |
| (५) शिक्षण प्रशिक्षण .. | 1034203 | 1250060 |
| (६) इतर खर्च .. | 2081104 | 2360001 |
| (७) अशासकीय संस्थांना साहाय्य .. | — | 400000 |
| (८) भूतपूर्व जिल्हा शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शिक्षकांच्या व कर्मचारीवर्गाच्या भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज. | — | — |
| (९) राज्य सहाय्यित मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांच्या कर्मचाऱ्यांना मिळणारे निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ, खा. प्रा. शा. भविष्यनिर्वाह निधी. | — | — |
| (१०) अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण | — | — |
| (११) शिक्षक आणि इतर सेवा | 9909830 | 24001728 |
| (१२) भूतपूर्व जिल्हा शाळा मंडळाच्या कर्मचाऱ्यांना ठेव संलग्न विमा योजना. | | |
| (१३) शासकीय प्राथमिक शाळा | — | 1 |
| एकूण-अ-स्थूल .. | 365064902 | 399746002 |
| वजा-वसुली .. | | |
| एकूण-अ-निव्वळ .. | 365064902 | 399746002 |
| **ब. उद्दिष्टवार वर्गीकरण—** | | |
| **संचालन व प्रशासन—** | | |
| (१) नगरपालिका शाळा मंडळाचे प्रशासकीय अधिकारी | | |
| (अ) ०१ वेतन .. | 39813 | 54924 |
| (ब) ११ देशांतर्गत प्रवास खर्च .. | 75 | 621 |
| (क) इतर उद्दिष्टांवरील खर्च .. | | |
| एकूण (१) .. | 39888 | 55545 |
| (२) अशासकीय प्राथमिक शाळांना सहायक (३१) .. | 299952 | 197 |
| (३६) | 136103 | 157555 |
| एकूण (२) .. | 436055 | 157752 |
| (३) प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य-- | | |
| (अ) जिल्हा परिषदांना अनुदान .. | 278953559 | 292732692 |
| (ब) मुंबई महानगरपालिकेस अनुदान .. | 342240 | 376464 |
| (क) इतर स्थानिक संस्थांना सहायक अनुदाने .. | 72123170 | 78223123 |
| एकूण (३) .. | 351418969 | 371332279 |
| (४) निरीक्षण-- | | |
| प्राथमिक शाळांची तपासणी .. | 144853 | 188636 |
| एकूण (४) .. | 144853 | 188636 |

## (ii) Financial Requirements

TABLE I

(रुपये हजारांत / Rs. in Thousands)

| सुधारित अंदाज २०२३-२०२४ Revised Estimates for 2023-2024 | अर्थसंकल्प २०२४-२०२५ Budget Estimates for 2024-2025 | Item |
|---|---|---|
| 4 | 5 | 1 |
| | | **A. Activitywise Classification–** |
| | | **Primary Education–** |
| 40341 | 55548 | (1) Direction and Administration |
| 151318 | 165083 | (2) Assistance to Non-Government Primary School |
| 425892362 | 410708473 | (3) Assistance to Local Bodies for Primary Education |
| 169557 | 196111 | (4) Inspection |
| 1177761 | 1344849 | (5) Teachers' Training |
| 2360001 | 3401000 | (6) Other Expenditure |
| 400000 | 398000 | (7) Assistance to Non-Government Institutions. |
| — | — | (8) Interest on Provident Fund of the Ex-District School Board Primary Teachers and Staffs. |
| — | — | (9) Interest on Provident Fund and Pensionery Charges |
| — | — | (10) Welfare of Scheduled Castes, Sub Plan |
| 24165422 | 27550000 | (11) Teachers and other Services |
| — | — | (12) Payment against Deposit Linked Scheme to the Staff of Ex-District School Board. |
| 1923983 | 2977300 | (13) Government Primary School |
| 456280745 | 446796364 | .. Total–(A) Gross |
| | | .. Deduct–Recoveries |
| 456280745 | 446796364 | .. Total–(A) Net |
| | | **B. Objectwise Classification–** |
| | | **Direction and Administration–** |
| | | (1) Administrative Officers of Municipal School Board |
| 39968 | 54924 | (a) 01 Salaries |
| 373 | 624 | (b) 11 Domestic Travel Expenses |
| — | — | (c) Expenditure on other Objects |
| 40341 | 55548 | .. Total (1) |
| 138 | 197 | (2) Assistance to Non-Government Primary School. |
| 151180 | 164886 | |
| 151318 | 165083 | .. Total (2) |
| | | (3) Assistance to Local Bodies for Primary Education |
| 340008145 | 324376988 | (a) Grants to Zilha Parishads |
| 376464 | 417875 | (b) Grants to Bombay Municipal Corporation |
| 85507753 | 85913610 | (c) Grants to Other Local Bodies |
| 425892362 | 410108473 | .. Total (3) |
| | | (4) Inspection |
| 169557 | 196111 | Inspection of Primary Schools |
| 169557 | 196111 | .. Total (4) |

**तक्ता १--चालू**

| बाब | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ Actuals for 2022-2023 | अर्थसंकल्प २०२३-२०२४ Budget Estimates for 2023-2024 |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| (५) शिक्षक प्रशिक्षण-- | | |
| (१) अध्यापक विद्यालये-- | | |
| (अ) ०१ वेतन .. | 133156 | 222073 |
| (ब) ४० विद्यावेतने व शिष्यवृत्त्या .. | — | — |
| (क) इतर उद्दिष्टांवरील खर्च .. | 2655 | 4699 |
| एकूण (५) (१) .. | 135811 | 226772 |
| (२) अशासकीय अध्यापक विद्यालयांना सहायक अनुदान-- | | |
| (अ) अशासकीय अध्यापक विद्यालयांना परिरक्षण अनुदान. | 897940 | 1002137 |
| (ब) पूर्वप्राथमिक शाळांना साहाय्य .. | — | 1 |
| (क) शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य | 452 | 21100 |
| एकूण (५) (२) .. | 898392 | 1023288 |
| एकूण (५) .. | 1034203 | 1250060 |
| (६) इतर-- | | |
| (अ) सर्व शिक्षण अभियान, पुणे यास अनुदान | — | — |
| (ब) इतर अनुदाने .. | 2081104 | 2360001 |
| एकूण (६) .. | 2081104 | 2360001 |
| (७) अशासकीय संस्थांना साहाय्य अल्पसंख्याक संस्था / शाळांकरिता पायाभूत विकास योजना-- | | |
| (अ) सहायक अनुदाने | — | 200000 |
| (ब) मदरशामध्ये दर्जात्मक शिक्षण | — | 200000 |
| एकूण (७) .. | — | 400000 |
| (८) भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज-- | — | — |
| भूतपूर्व जिल्हा शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शिक्षकांचा व कर्मचारीवर्गाचा भविष्य निर्वाह निधी. | | |
| एकूण (८) .. | — | — |
| (९) खाजगी प्राथमिक शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज भारीत ४५, व्याज .. | — | — |
| | — | — |
| एकूण (९) .. | — | — |
| (१०) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण जनजातीच्या बोलीभाषेतील पुस्तकांची निर्मिती. | — | — |
| एकूण (१०) .. | — | — |
| (११) शिक्षक आणि इतर सेवा | 9909830 | 24001728 |
| एकूण (११) .. | 9909830 | 24001728 |
| (१२) भूतपूर्व जिल्हा-शाळा मंडळाच्या कर्मचाऱ्यांना ठेव संलग्न विमा योजना | — | — |
| | — | — |
| एकूण (१२) .. | — | — |
| (१३) शासकीय प्राथमिक शाळा | — | 1 |
| एकूण (१३) .. | — | 1 |
| एकूण (ब) स्थूल .. | — | — |
| वजा - वसुली .. | | |
| एकूण (ब) निव्वळ .. | — | — |

* वित्त विभागाखाली दर्शविण्यात आलेल्या आहेत.

TABLE I–*contd.* (रुपये हजारांत / Rs. in Thousands)

| सुधारित अंदाज २०२३-२०२४<br>Revised Estimates for 2023-2024<br>4 | अर्थसंकल्प २०२४-२०२५<br>Budget Estimates for 2024-2025<br>5 | Item<br>1 |
|---|---|---|
| | | **(5) Teachers Training–** |
| | | (1) Jr. Colleges of Education– |
| 153204 | 202073 | (a) 01 Salaries |
| — | — | (b) 40 Stipend and Scholarship |
| 4099 | 4801 | (c) Expenditure on other objcets |
| 157303 | 206874 | .. Total (5) (1) |
| | | (2) Assistance to Non-Govt. Jr. Colleges of Education– |
| 960312 | 1111874 | (a) Maintenance Grant to Non-Government Junior Colleges of Education. |
| 1 | 1 | (b) Assistance to Pre-Primary Schools |
| 60145 | 26100 | (c) Assistance to Local Bodies for Teachers Training (Grant-in-aid). |
| 1020458 | 1137975 | .. Total (5) (2) |
| 1177761 | 1344849 | .. Total (5) |
| | | (6) Other Expenditure– |
| — | — | (a) Grant to Indian Institute of Education, Pune |
| 2360001 | 3401000 | (b) Other Grants |
| 2360001 | 3401000 | .. Total (6) |
| | | (7) Assistance to Non Govt. Institutions Infrastructure Development for Minority Institutes / Schools. |
| 200000 | 200000 | (a) Providing Quality in Madarsa |
| 200000 | 198000 | (b) Grants-in-Aid |
| 400000 | 398000 | .. Total (7) |
| — | — | (8) Interest on Provident Funds– |
| | | Provident Funds of Ex-District School Board, Primary Teachers and Staff. |
| — | — | .. Total (8) |
| | | (9) Interest on the Provident Fund of Aided Non-Govt. Secondary and Special School Staff Provident |
| — | — | |
| — | — | Fund. |
| — | — | .. Total (9) |
| — | — | (10) Production of Books in the Tribal Dialectis |
| — | — | .. Total (10) |
| 24165422 | 27550000 | (11) Teacher and other Service |
| 24165422 | 27550000 | .. Total (11) |
| — | — | (12) Payment against Deposit linked Insurance Scheme to the Staff of Ex-District School Board. |
| — | — | |
| — | — | .. Total (12) |
| 1923983 | 2977300 | (13) Government Primary School |
| 1923983 | 2977300 | .. Total (13) |
| — | — | .. Total–(B) Gross |
| — | — | .. *Deduct*–Recoveries |
| | | .. Total–(B) Net |

* Shown under Finance Department.

**(२) वित्तीय आवश्यकता**

**तक्ता ३७**

| बाब | | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ Actuals for 2022-2023 | अर्थसंकल्प २०२३-२०२४ Budget Estimates for 2023-2024 |
|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 |
| **अ. कार्याचे वर्गीकरण—** | | | |
| **सर्वसाधारण शिक्षण—** | | | |
| (१) संचालन व प्रशासन | .. | 842295 | 1042634 |
| (२) प्रशिक्षण व शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष | .. | 155037 | 196062 |
| (३) संशोधन | .. | — | — |
| (४) शिष्यवृत्त्या | .. | 1495 | 3301 |
| (५) परीक्षा | .. | 20650 | 29955 |
| (६) इतर उद्दिष्टांवरील खर्च | .. | 314926 | 2529011 |
| एकूण-अ-स्थूल | .. | 1334403 | 3800963 |
| वजा-वसुली | .. | — | — |
| एकूण-अ-निव्वळ | .. | 1334403 | 3800963 |
| **ब. उद्दिष्टवार वर्गीकरण—** | | | |
| **१. संचालन व प्रशासन—** | | | |
| **प्राथमिक शिक्षण संचालक--** | | | |
| ०१ वेतन | .. | 47120 | 55090 |
| ११ देशांतर्गत प्रवास खर्च | .. | 65 | 210 |
| १३ कार्यालयीन खर्च | .. | 890 | 1050 |
| २० इतर उद्दिष्टांवरील खर्च | .. | 542 | 653 |
| एकूण (१) | .. | 48617 | 57003 |
| **२. प्रशिक्षण--** | | | |
| **(i) शिक्षक प्रशिक्षण --** | | | |
| ०१ वेतन | .. | 147963 | 182259 |
| १३ कार्यालयीन खर्च | .. | 4183 | 7240 |
| ३१ साहाय्यक अनुदान | .. | 137 | 391 |
| २० इतर उद्दिष्टांवरील खर्च | .. | 2754 | 6165 |
| एकूण २ (i) | .. | 155037 | 196055 |
| **(ii) राज्य प्रशासन सेवा संस्था --** | | | |
| ०१ वेतन | .. | — | — |
| १३ कार्यालयीन खर्च | .. | — | — |
| २० इतर उद्दिष्टांवरील खर्च | .. | — | — |
| एकूण २ (ii) | .. | — | — |
| **(iii) शैक्षणिक तंत्र शाखा --** | | | |
| ०१ वेतन | .. | — | 1 |
| १३ कार्यालयीन खर्च | .. | — | 1 |
| २० इतर उद्दिष्टांवरील खर्च | .. | — | 3 |
| एकूण २ (iii) | .. | — | 5 |
| एकूण २ | .. | 155037 | 196060 |

## (ii) Financial Requirements

Table XXXVII (रुपये हजारांत / Rs. in Thousands)

| सुधारित अंदाज २०२३-२०२४ Revised Estimates for 2023-2024 | अर्थसंकल्प २०२४-२०२५ Budget Estimates for 2024-2025 | Item |
|---|---|---|
| 4 | 5 | 1 |
| | | **A. Activity Classification–** |
| | | **General Education–** |
| 1011839 | 1145798 | (1) Direction and Administration |
| 185249 | 813693 | (2) Training |
| — | — | (3) Research |
| 3301 | 4300 | (4) Scholarships |
| 21457 | 29955 | (5) Examinations |
| 1420826 | 1313118 | (6) Other Expenditure |
| 2642672 | 3306864 | .. Total–(A) Gross |
| — | — | .. Deduct–Recoveries |
| 2642672 | 3306864 | .. Total–(A) Net |
| | | **B. Objectwise Classification–** |
| | | **Direction and Administration–** |
| | | **1. Director of Primary Education–** |
| 47336 | 55090 | 01 Salaries |
| 147 | 221 | 11 Domestic Travel Expenses |
| 945 | 1103 | 13 Office Expenses |
| 450 | 696 | 20 Expenditure on other Objects |
| 48878 | 57110 | .. Total (1) |
| | | **2. Training–** |
| | | **(i) Training of Teachers–** |
| 173146 | 800000 | 01 Salaries |
| 6516 | 7602 | 13 Office Expenses |
| 274 | 391 | 35 Grant-in-aid |
| 5306 | 5693 | 20 Expenditure on other Objects |
| 185242 | 813686 | .. Total 2 (i) |
| | | **(ii) State Institute of Administrative Careers–** |
| — | — | 01 Salaries |
| — | — | 13 Office Expenses |
| — | — | 20 Expenditure on other Objects |
| — | — | .. Total 2 (ii) |
| | | **(iii) Educational Technology Cell–** |
| 1 | 1 | 01 Salaries |
| 1 | 1 | 13 Office Expenses |
| 3 | 3 | 20 Expenditure on other Objects |
| 5 | 5 | .. Total 2 (iii) |
| 185247 | 813691 | .. Total 2 |

**तक्ता ३७--**चालू

| बाब | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ Actuals for 2022-2023 | अर्थसंकल्प २०२३-२०२४ Budget Estimates for 2023-2024 |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| **३. संशोधन-** | | |
| संशोधन संस्थांना साहाय्य .. | — | — |
| एकूण – ३ .. | — | — |
| **४. शिष्यवृत्त्या–** | | |
| (१) सैनिकी शाळा व महाविद्यालये .. | 557 | 800 |
| (२) इतर विशेष शाळा .. | — | 1 |
| (३) राष्ट्रीय शिष्यवृत्ती, शिष्यवृत्त्या व विद्यावेतने .. | — | — |
| (४) प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना शिष्यवृत्ती. | — | — |
| सहायक अनुदान .. | — | — |
| (५) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती. | 938 | 2500 |
| एकूण – ४ .. | 1495 | 3301 |
| **५. महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ--** | | |
| ०१ वेतन .. | 20650 | 29955 |
| ०५ कार्यालयीन खर्च .. | — | — |
| १२ व्यावसायिक व विशेष सेवांसाठी प्रदाने इतर उद्दिष्टांवरील खर्च. .. | — | — |
| एकूण – ५ .. | 20650 | 29955 |
| **६. इतर खर्च--** | | |
| (१) शासकीय शिशू केंद्र-- | | |
| ०१ वेतन .. | 7566 | 8696 |
| ०५ कार्यालयीन खर्च .. | — | 122 |
| इतर उद्दिष्टांवरील खर्च .. | 147 | 701 |
| एकूण – ६ (१) .. | 7713 | 9519 |
| (४) संकीर्ण .. | — | 1 |

TABLE XXXVII–contd. (रुपये हजारांत / Rs. in Thousands)

| सुधारित अंदाज २०२३-२०२४ Revised Estimates for 2023-2024 | अर्थसंकल्प २०२४-२०२५ Budget Estimates for 2024-2025 | Item |
|---|---|---|
| 4 | 5 | 1 |
| | | **3. Research–** |
| — | — | Assistance to Research Institution Grant-in-aid |
| — | — | .. Total–3 |
| | | **4. Scholarships–** |
| 800 | 800 | (1) Military Schools and Colleges |
| 1 | 1000 | (2) Other Special Schools |
| — | — | (3) National Scholarship |
| — | — | (4) Scholarships to Children of Primary and Secondary Teachers. |
| — | — | Grant-in-aid |
| 2500 | 2500 | (5) Merit Scholarship to Economical Backward Class Students. |
| 3301 | 4300 | .. Total – 4 |
| | | **5. Bureau of Government Examination–** |
| 21457 | 29955 | 01 Salaries |
| — | — | 05 Office Expenses |
| — | — | 12 Payment for Professional and Special Services |
| | | Expenditure on other Objects |
| 21457 | 29955 | .. Total – 5 |
| | | **6. Other Expenditure–** |
| | | (1) Government Children Centre– |
| 8696 | 9653 | 01 Salaries |
| 110 | 122 | 05 Office Expenses |
| 561 | 702 | Expenditure on other Objects |
| 9367 | 10477 | .. Total – 6 (1) |
| 1 | 1 | (iv) Miscellaneous |

**तक्ता ३७--**चालू

| बाब | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ Actuals for 2022-2023 | अर्थसंकल्प २०२३-२०२४ Budget Estimates for 2023-2024 |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| **६. इतर खर्च--***चालू* | | |
| (५) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती | — | 1 |
| (६) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मोफत शिक्षण | 2491 | 5700 |
| (७) दहावीपूर्व शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती (केंद्रपुरस्कृत योजना). | — | 10000 |
| (८) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. १५,००० पेक्षा जास्त नाही अशा इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी माफी. | 4428 | 5000 |
| (९) इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण. | 76404 | 200000 |
| (१०) माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती .. | 258 | 500 |
| (११) इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण. | 16400 | 23000 |
| (१२) शिक्षक प्रतिष्ठानास अंशदान .. | — | 200 |
| (१३) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील अध्यापकांच्या व अध्यापिकेतर कर्मचारीवर्गाच्या मुलांना मोफत शिक्षण. | 1686 | 5000 |
| (१४) शाळा न्यायाधिकरणे-- | | |
| ०१ वेतन .. | 70480 | 70796 |
| ०३ इतर उद्दिष्टांवरील खर्च .. | 11070 | 6018 |
| एकूण – (१४) .. | 81550 | 76814 |
| (१५) अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी प्रतिपूर्ती करणे. | 5225 | 6000 |
| (१६) राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना | 15365 | 120000 |
| **७. समाजकल्याण--** | | |
| वृद्ध, अपंग व निराधारांचे कल्याण-- | | |
| अपंगांकरिता एकत्रिकृत शिक्षण (केंद्रपुरस्कृत योजना) | 21526 | 31630 |
| एकूण – ७ .. | 21526 | 31630 |
| एकूण बी-स्थूल .. | — | — |
| वजा वसुली .. | — | — |
| एकूण बी-निव्वळ .. | — | — |

TABLE XXXVII–contd. (रुपये हजारांत / Rs. in Thousands)

| सुधारित अंदाज २०२३-२०२४ Revised Estimates for 2023-2024 | अर्थसंकल्प २०२४-२०२५ Budget Estimates for 2024-2025 | Item |
|---|---|---|
| 4 | 5 | 1 |
| | | **6. Other Expenditure**–*contd.* |
| 1 | 1 | (5) Educational concessions to the children of Freedom Fighters. |
| 5700 | 5700 | (6) Free Education to the children of Primary Teachers. |
| 10000 | 10000 | (7) Pre-Matric Scholarship to Minority Students (Centrally Sponsored Scheme). |
| 5000 | 5000 | (8) Additional freeships upto Std. X to the students who or whose parents income does not exceed Rs. 15,000 p.a. |
| 140000 | 100000 | (9) Free Education to Students upto Standard X |
| 500 | 500 | (10) Education concessions to the Children of Ex-Servicemen. |
| 23000 | 20000 | (11) Free Education to Girls upto Standard XII |
| 140 | 200 | (12) Contribution to Teachers Foundation |
| 3500 | 5000 | (13) Free Education to the children of Teachers and Non-Teaching Staff. |
| | | (14) Schools Tribunals– |
| 124114 | 82042 | 01 Salaries |
| 33779 | 6138 | 03 Expenditure on other objects |
| 157893 | 88180 | .. Total (14) |
| 6000 | 6000 | (15) Exemption Reimbursement of examination fee to the students from scarcity attested villages. |
| 84000 | 100000 | (16) Accident Insurance Policy for the Student in the State. |
| | | **7. Social Welfare–** |
| 28442 | 31076 | Education and Welfare of Handicapped– Integrated Education for Disable of Secondary Stage (IEDSS). |
| 28442 | 31076 | .. Total – 7 |
| — | — | .. Total (B) Gross |
| — | — | .. Deduct – Recoveries |
| — | — | .. Total (B) Net |

**(२) वित्तीय आवश्यकता**

**तक्ता ३८**

| बाब | | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ Actuals for 2022-2023 | अर्थसंकल्प २०२३-२०२४ Budget Estimates for 2023-2024 |
|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 |
| **(अ) कार्यवार वर्गीकरण-** | | | |
| सचिवालय - शिक्षण विभाग | .. | — | |
| (२२५१) एकूण (अ) स्थूल | .. | 164694 | 223288 |
| वजा वसुली | .. | — | |
| एकूण (अ) निव्वळ | .. | 164694 | 223288 |
| **(ब) उद्दिष्टवार वर्गीकरण--** | | | |
| १ (१) शिक्षण विभाग-- | | | |
| वेतन | . | 157227 | 193412 |
| कार्यालयीन खर्च | .. | 2632 | 5019 |
| इतर उद्दिष्टांवरील खर्च | .. | 1811 | 4855 |
| एकूण १ (१) | .. | 161670 | 203286 |
| १. (२) विज्ञान व तंत्र शाखेतील समन्वय व संशोधन-- | | | |
| वेतन | . | — | — |
| कार्यालयीन खर्च | .. | — | — |
| इतर उद्दिष्टांवरील खर्च | .. | — | — |
| एकूण १ (२) | .. | — | — |
| १. (३) राष्ट्रसेवा योजना-- | .. | — | — |
| एकूण १ (३) | .. | — | — |
| २ ठेव संलग्न विमा योजना २२३५ A २२२ | .. | 479 | 1200 |
| ३ शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे | .. | 59773 | 117498 |
| एकूण-ब-स्थूल | .. | 221922 | 321984 |
| वजा वसुली | .. | — | — |
| एकूण-ब-निव्वळ | .. | 221922 | 321984 |

## (ii) Financial Requirements

**Table XXXVIII** (रुपये हजारांत / Rs. in Thousands)

| सुधारित अंदाज २०२३-२०२४ Revised Estimates for 2023-2024 | अर्थसंकल्प २०२४-२०२५ Budget Estimates for 2024-2025 | Item |
|---|---|---|
| 4 | 5 | 1 |
| | | **A. Activitywise Classification–** |
| — | | .. Secretariat-Education Department (2251) |
| 216137 | 231215 | .. Total–(A) Gross |
| — | — | .. Deduct–Recoveries |
| 216137 | 231215 | .. Total–(A) Net |
| | | **B. Objectwise Classification–** |
| | | 1 (i) Education Department— |
| 193412 | 211066 | .. Salaries |
| 4517 | 5270 | .. Office Expenses |
| 4207 | 4877 | .. Expenditure on other objects |
| 202136 | 221213 | .. Total 1(i) |
| | | 1 (ii) Co-ordinature and Research in Science and Technology– |
| — | — | .. Salaries |
| — | — | .. Office Expenses |
| — | — | .. Expenditure on other Objects |
| — | — | .. Total 1 (ii) |
| — | — | 1 (ii) National Service Scheme |
| — | — | .. Total 1 (iii) |
| 1200 | 7200 | .. 2 Deposit Linked Insurance Scheme |
| 117498 | 117498 | .. 3 Loans to Government Servants |
| 320834 | 345911 | .. Total 1 (1) |
| — | — | .. Deduct–Recoveries |
| 320834 | 345911 | .. Total–(B) Net |

## जोडपत्र क-पाच

## विभाग : शालेय शिक्षण

## विवरणपत्र दोन

## अर्थसंकल्पीय अंदाज, २०२४-२०२५ मधील (अर्थसाहाय्याव्यतिरिक्त) सहायक अनुदान

(रुपये हजारांत)

| अनु-क्रमांक | प्रधान/गौण/उपशीर्ष (अर्थसंकल्पीय अंदाज भाग दोनमधील पृष्ठक्रमांक) | योजनेचे नाव | अर्थसंकल्पीय अंदाज | | ठळक वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 |
| १ | **२२०२ सर्वसाधारण शिक्षण--** **०२ माध्यमिक शिक्षण-००१,** **संचालन व प्रशासन ००१,** (००) (०१), महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (इ-१९). | सहायक अनुदान | — | ५४५०० | पुढील आधारावर सहायक अनुदान देण्यात येते-- (१) माध्यमिक शाळा आणि उच्च माध्यमिक शाळांत वेतनाच्या १०० टक्के आणि अनावर्ती खर्चासाठी वेतनाच्या १२ टक्के. |
| २ | **११०, अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना साहाय्य.** (००) (०१) सर्वसाधारण माध्यमिक शाळांना सहायक अनुदान आणि | सहायक अनुदान | — | २५८८६८३५८ | प्रारंभापासून विनाअनुदान तत्त्वावर असलेल्या अशासकीय माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना यामध्ये आदिवासी विभागातील व स्त्रियांकरिता असलेल्या चौथ्या वर्षापासून १०० टक्के अनुदानपात्र माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय वगळता, पाचव्या वर्षापासून म्हणजेच पाचव्या, सहाव्या, सातव्या, आठव्या, नवव्या वर्षी व त्यापुढे अनुक्रमे २० टक्के, ४० टक्के, ६० टक्के, ८० टक्के व १०० टक्के इतके सहायक अनुदान देण्यात येते. |
| | (००) (०२) इतर खर्च (जिल्हा परिषदांना अभिकरण आकार). | | — | ५००० | |
| | (००) (०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान पंचवार्षिक योजनांतर्गत योजना. | | — | १३५९९०९ | |
| | (००) (०५) सर्वसाधारण माध्यमिक शाळांच्या विकासासाठी सहायक अनुदान. | | | | |
| | (००) (०९) सैनिकी शाळांना सहायक अनुदान. | | — | १०३०० | |
| | (एक) (सी) सर्वसाधारण माध्यमिक शाळांच्या विकासासाठी सहायक अनुदान-अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना (इ. २७). | | | | |
| ३ | **११०, अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना साहाय्य-** (००) (०४) अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना सहायक अनुदान आणि पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- | सहायक अनुदान | — | ४५०४९२८७ | |
| | (०७) अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना सहायक अनुदाने | | — | ४२६९९२८ | |
| ४ | **८०, सर्वसाधारण** **००३, प्रशिक्षण--** | सहायक अनुदान | — | — | |
| | (एक) (ए) शिक्षक प्रशिक्षण (इ-४३) | | — | ८१३६८८ | |
| | | एकूण ... | — | ३१०४३०९७० | |

## विवरणपत्र तीन

## अर्थसंकल्पीय अंदाज, २०२४-२०२५ मधील (सुस्पष्ट अर्थसाहाय्य आणि अनुदानाव्यतिरिक्त) अप्रकट अर्थसाहाय्यांचा तपशील

(रुपये हजारांत)

| अनु-क्रमांक | प्रधान/गौण/उपशीर्ष (अर्थसंकल्पीय अंदाज भाग दोनमधील पृष्ठक्रमांक) | योजनेचे नाव | परिमाणावरील अभिप्राय | परिगणित अर्थसाहाय्य |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| १ | **२२०२ सर्वसाधारण शिक्षण--** | | | |
| | **८०, सर्वसाधारण--** | | | |
| | **००३, शिक्षक प्रशिक्षण** | | | |
| | (एक) शिक्षक प्रशिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-- (एक) (बी) शिक्षक प्रशिक्षण (इ-४५) व (इ-४७). | प्रशिक्षण | स्तंभ (५) आणि (६) हे अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२५ मधील तरतूद दर्शवितात. एकूण खर्चामधून एकूण जमा रकमा वजा करून अप्रकट अर्थसाहाय्य मोजण्यात आले आहे. | १ |
| | | | | १ |
| २ | **८०, सर्वसाधारण--** | | | |
| | **१०७, शिष्यवृत्त्या--** | | | |
| | (००) (०१) सैनिकी शाळा व शिष्यवृत्त्या महाविद्यालये-- | शिष्यवृत्त्या | वरीलप्रमाणे | ८०० |
| | (००) (०२) इतर विशेष शाळा | --,,-- | --,,-- | १००० |
| | (००) (०७) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती. (इ-४९). | --,,-- | --,,-- | २५०० |
| ३ | **०२, माध्यमिक शिक्षण--** | | | |
| | **१०७, शिष्यवृत्त्या--** | | | |
| | (००) (०१) माध्यमिक शाळांमधील शिष्यवृत्त्या.(इ-२३). | शिष्यवृत्त्या | वरीलप्रमाणे | १००६०० |
| ४ | **०२, माध्यमिक शिक्षण--** | शासकीय माध्यमिक शाळांची स्थापना | वरीलप्रमाणे | – |

## विवरणपत्र तीन--चालू

(रुपये हजारांत)

| अनु-क्रमांक | प्रधान/गौण/उपशीर्ष (अर्थसंकल्पीय अंदाज भाग दोनमधील पृष्ठक्रमांक) | योजनेचे नाव | परिमाणावरील अभिप्राय | परिगणित अर्थसाहाय्य |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| ५ | **८००, इतर खर्च--** | | | |
| | **(दोन ते तेरा)** | | | |
| | ( सात ) ( बी ) ( एक ) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना द्यावयाचे मोफत शिक्षणाचे जादा संच. | | स्तंभ (५) आणि (६) हे अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२५ मधील तरतूद दर्शवितात, एकूण खर्चामधून एकूण जमा रकमा वजा करून अप्रकट अर्थसाहाय्य मोजण्यात आले आहे. | .... ५७०० |
| | (नऊ) (बी) (तीन) ज्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. १५,००० पेक्षा अधिक नाही, अशा इयत्ता १० वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना/मुलांना फी माफी. | | | .... ५००० |
| | (अकरा) (बी) माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती. | | | .... ५०० |
| | (बारा) (बी) इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण. | | | .... २०००० |
| | | | एकूण .. | ३१२०० |
| | | | खर्च .. | — |
| | | | (—) जमा .. | — |
| | | | निव्वळ अप्रकट अर्थसाहाय्य .. | ३१२०० |

## जोडपत्र ड - चार
## शालेय शिक्षण विभाग
## विवरणपत्र दोन
## अर्थसंकल्पीय अंदाज, २०२४-२०२५ मधील (अर्थसाहाय्याव्यतिरिक्त) सहायक अनुदान

(रुपये हजारांत)

| अनु-क्रमांक | प्रधान/गौण/उपशीर्ष (अर्थसंकल्पीय अंदाज भाग दोनमधील पृष्ठ क्रमांक) | योजनेचे नाव | अर्थसंकल्पीय अंदाज | | ठळक वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 |
| १ | **२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण** **०२, समाजकल्याण--** १०४, वृद्ध, अपंग व निराधारांचे कल्याण. १०४, अपंगांकरिता एकत्रीकृत शिक्षण सहायक अनुदाने (केंद्रपुरस्कृत योजना) (इ-८५). | | – | ६१७३६ | ६० : ४० |
| | | एकूण .. | – | ६१७३६ | |

# सर्वसाधारण शिक्षण (प्राथमिक)

## महत्त्वाचे उपक्रम

### दर्जेदार प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी योजना

१. शाळा नसलेल्या खेड्यात नवीन प्राथमिक शाळा उघडण्याकरिता जिल्हा परिषदांना अनुदान देणे.

२. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी साखरशाळा सुरू करणे.

३. प्राथमिक शिक्षणाच्या नैसर्गिक वाढीमुळे निर्माण होणाऱ्या जादा पदांसाठी जिल्हा परिषदांना अनुदान देणे.

४. प्राथमिक शाळा इमारतींचे बांधकाम पूर्ण करणे.

### ऊसतोड कामागारांच्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणात खंड पडू नये यासाठी विशेष योजना

राज्यामधील ६ ते १४ वयोगटांतील सर्व मुले प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत दाखल व्हावीत, ती किमान इयत्ता ८ वी पर्यंत टिकवावीत हे उद्दिष्ट आहे. ऊसतोड कामागारांच्या मुलांची संख्या महाराष्ट्रात फार मोठी आहे, कारण २५ तालुक्यांतून साधारणत: ५ लाख कुटुंबे स्थलांतरित होतात. राज्यातील साखर कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर ऊसतोडणीसाठी हंगामी कामगार लागतात. त्यांच्या मुलांच्या शिक्षणात या काळात खंड पडून ती शाळा सोडतात. यासाठी ऊसतोड व अन्य हंगामी कामागारांसाठी साखर कारखान्यांच्या परिसरात साखरशाळा जिल्हा परिषदांमार्फत सुरू केल्या आहेत. अशा प्रकारची शाळा सप्टेंबर महिन्यात सुरू होते. सध्या महाराष्ट्र राज्यात पुणे-६, अहमदनगर-२, सोलापूर-३, सातारा-५ अशा साखरशाळा सुरू आहेत. तसेच ऊसतोड कामागारांच्या मुलांसाठी बीड जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर १ वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. तसेच सर्व सर्वशिक्षा अभियान योजनेंतर्गत महात्मा फुले शिक्षण हमी केंद्रे सुरू केली आहेत. या व्यतिरिक्त सदर मुलांचे स्थलांतर रोखण्यासाठी वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत.

### सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना

महात्मा फुले स्त्री शिक्षणाच्या कल्पनेने भारावून या कामात अग्रणी होणाऱ्या सावित्रीबाईंच्या नावाने ही योजना सुरू करण्यात आली. एप्रिल १९९३ मध्ये सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, जिल्हा सातारा येथे या योजनेची सुरुवात झाली. मुलींच्या गळतीचे प्रमाण मोठे आहे. कुटुंबाची अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती हेच या मुलींचे शाळेत न येण्याचे प्रमुख कारण आहे. सावित्रीबाई फुले योजनेत शिक्षक अशा कुटुंबाच्या भेटी घेऊन गरिबीमुळे व कोणत्या कारणांमुळे शिक्षण व्यवस्थेतून गळण्याची शक्यता आहे, ते निश्चित करतात आणि अशा मुलींच्या शिक्षणासाठी समाजातील सुखवस्तू, दानशूर आणि सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या व्यक्तींना दरमहा ३० (रुपये तीस फक्त) रोख किंवा वार्षिक रुपये ३०० किंवा रुपये ३,००० एकदाच आठ वर्षांसाठी देण्याची विनंती करतात. अशा प्रकारे दत्तक मुलीला आठवीपर्यंचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले जाते.

राज्यात जिल्हास्तरीय निधींच्या आर्थिक व्यवहारासाठी सभापती, शिक्षण सामिती, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली समिती कार्यान्वित आहे. देणगीरूपाने गोळा झालेली रक्कम जिल्हा सहकारी बँक/बँक ऑफ महाराष्ट्र यामध्ये मुदतठेवीत ठेवली जाते व या रकमेवर मिळणाऱ्या व्याजातून लाभार्थ्यांना मदत केली जाते.

### मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण

अल्पसंख्याक संचालनालयाची निर्मिती झाल्यामुळे, दिनांक १३ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयान्वये ही योजना त्या संचालनालयाकडे सोपवण्यात आलेली आहे.

### शिक्षणसेवक योजना

प्राथमिक शिक्षणाचा विस्तार, गुणात्मक वाढ व प्राथमिक शिक्षणासाठी सुरू करण्यात आलेल्या विविध योजना यामुळे प्राथमिक शिक्षणावरील खर्चामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे व होत आहे. प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे ही राज्याची प्रमुख जबाबदारी आहे व त्यासाठी प्राथमिक शिक्षकांची रिक्त होणारी पदे वेळेवर भरली जाणे आवश्यक आहे. त्यामुळे उपलब्ध निधीतून अधिक प्राथमिक शिक्षकांची पदे भरणे शक्य व्हावे, यासाठी एखादी योजना कार्यान्वित करण्याच्या गरजेतून शासनाने दिनांक २७ फेब्रुवारी २००३ च्या शासन निर्णयान्वये शिक्षणसेवक योजना सुरू केली.

राज्यातील जिल्हा परिषदा, नगरपालिका, कटकमंडळे, महानगरपालिका, मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेत सदर शिक्षणसेवक योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेद्वारे संबंधित आस्थापनेवर मंजूर असलेली पदे व पटनोंदणीनुसार अनुज्ञेय ठरणारी पदे, यापैकी जी कमी असतील, त्या मर्यादेपर्यंत शिक्षणसेवक पदांच्या नियुक्तीस मंजुरी आहे.

शिक्षणसेवकांची भरती करताना रिक्त पदांवर संवर्गनिहाय मान्यता ही डी. एड्. परीक्षेतील लेखी गुणांकाआधारे तयार होणाऱ्या गुणवत्ताक्रमाने निवड करून, ३ वर्षांसाठी मानधनावर शिक्षणसेवकांची नेमणूक केली जाते. शासन निर्णय क्रमांक पीआरई-२००८/८२७५/०७/प्रा. क्रि. १, दिनांक १२ जून २००८ अन्वये सन २००८-०९ या वर्षापासून प्राथमिक शिक्षणसेवक भरती प्रक्रिया भरतीपूर्व केंद्रीय परीक्षेद्वारा करण्यात आली व शासन निर्णय क्रमांक पीआरई-२००६/४७६७/प्राशि-१, दिनांक १६ डिसेंबर २००९ अन्वये केंद्रीय भरतीपूर्व निवड परीक्षा पद्धत सुधारण्यात आली. आता राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसह खाजगी शैक्षणिक संस्थांच्या

अनुदानित, अंशत: अनुदानित व अनुदानास पात्र घोषित केलेल्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षण सेवक भरती अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे " पवित्र " या संगणकीय प्रणालीद्वारे करण्याचा निर्णय दिनांक २३ जून २०१७ रोजी पारित करण्यात आला आहे. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र. २६०/टीएनटी-१, शासन निर्णय, दिनांक ७ फेब्रुवारी २०२३ अन्वये शिक्षण सेवकांचे मानधन सुधारित करण्यात आले आहे.

## महिलांचे सक्षमीकरण

महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागामार्फत खालील योजना राबविल्या जातात :–

१. मुलींची पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांना व शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिके.

२. दुर्बल घटकांतील मुलींना नियमित येण्यासाठी उपस्थित भत्ता देणे.

३. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या भागात प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती/जमातींच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा, मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा.

४. शैक्षणिकदृष्ट्या मागास १०३ विकास गटांतील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील इयत्ता १ ली ते ४ थीच्या सर्व विद्यार्थ्यांना विशेष सुविधा.

५. प्राथमिक शाळांमध्ये मुलींच्या स्वच्छतागृहांची सोय करणे.

---

## नगरपालिका प्रशासकीय अधिकारी

१. योजनेचे नाव .. नगरपालिका प्रशासकीय अधिकारी.

२. योजनेचा उद्देश व तपशील .. नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातील शाळांचे प्रशासन शासनामार्फत योग्य तऱ्हेने करणे.

पश्चिम महाराष्ट्रातील प्राधिकृत नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळांचे नियंत्रण/प्रशासन करण्यासाठी एका प्रशासन अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येते. नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिकेच्या दर्जानुसार प्रशासन अधिकाऱ्याचा दर्जा ठरविण्यात येतो. त्यानुसार सदर वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ अशा दर्जाची पदे राज्यामध्ये कार्यरत आहेत.

३. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. प्रशासन अधिकारी यांच्या सहयोगातून प्राथमिक शिक्षणाची योजना कार्यान्वित करणे.

४. योजनेची व्याप्ती .. पश्चिम महाराष्ट्रातील प्राधिकृत नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळांवर नियंत्रण ठेवणे. प्राथमिक शिक्षण योजना कार्यान्वित करण्याबाबत प्रशासन करणे. या योजनेअंतर्गत पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील नगरपालिका, महानगरपालिकांमधील प्रशासन अधिकारी यांचे वेतन व भत्ते दिले जातात.

५. राज्याची एकूण आकडेवारी ..

| वर्ष | एकूण प्रशासन अधिकारी | योजनेवरील खर्च (रुपये हजारात) |
|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष .. | ४७** | ५६,५६९ |
| २०२०-२१ प्रत्यक्ष .. | ५०** | ४८,९०४ |
| २०२१-२२ प्रत्यक्ष .. | ४३** | ४४,४४४ |
| २०२२-२३ प्रत्यक्ष .. | ३०* | ३९,८८८ |
| २०२३-२४ अपेक्षित .. | २५* | ५५,५०५@ |
| २०२४-२५ अंदाजित .. | २५* | ६०,५३४ |

६. कमी खर्चाची कारणे .. नाही.

अडचणी/सूचना. .. काहीही नाही.

७. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. नाही.

*** कार्यरत पदे चारमाही अंदाजपत्रकानुसार, ** कार्यरत पदे आठमाही अंदाजपत्रकानुसार, *** अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकानुसार, अपेक्षित खर्च @ चारमाही सुधारित अंदाजपत्रकानुसार अपेक्षित खर्च.**

---

# प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य
# जिल्हा परिषदांना अनुदान

१. योजनेचे नाव .. प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य/जिल्हा परिषदांना अनुदाने

२. योजनेचा उद्देश व तपशील .. प्राथमिक शिक्षणासाठी मान्य बाबींवरील खर्चास १०० टक्के अनुदान देण्यात येते. यामध्ये शासनाने विहित केलेल्या नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या प्राथमिक शिक्षकांचे वेतन, सेवानिवृत्ती वेतन व भत्ते, तसेच इतर खर्च, सादिल खर्च अनुदानास पात्र धरण्यात येतो. त्यानुसार राज्यामधील मान्यताप्राप्त स्थानिक संस्थांमधील शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांची संख्या पटसंख्येवर निश्चित केली जाते. प्राथमिक शाळांच्या नैसर्गिक वाढीमुळे होणाऱ्या जादा पदांसाठी जिल्हा परिषदांना अनुदान दिले जाते.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम ९ नुसार राज्यातील प्राथमिक शाळा सुरू ठेवण्यासाठी पुरेशी तरतूद करणे आणि आवश्यक तेथे प्राथमिक शाळा उघडणे, ही जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना/जिल्हा परिषदांना अनुदान दिले जाते.

३. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. शिक्षकांना नियमित वेतन वेळेवर देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. शासनामार्फत सदर वेतनासाठी अनुदान संचालनालयास उपलब्ध करून दिले जाते व संचालनालयामार्फत वेतनाकरिता सदर अनुदान क्षेत्रीय कार्यालयांना वितरित केले जाते.

४. योजनेची व्याप्ती .. सदर योजना संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये राबविण्यात येते. तसेच ही योजना महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक शाळांमध्येही राबविली जाते. त्यामुळे प्राथमिक शिक्षकांची रिक्त होणारी पदे तातडीने शिक्षणसेवक म्हणून भरली जातात.

५. राज्याची एकूण आकडेवारी ..

| वर्ष | | एकूण शाळांची संख्या | एकूण शिक्षक संख्या | एकूण खर्च (२२०२०१७३) (रुपये हजारात) |
|---|---|---|---|---|
| २०१९-२० | प्रत्यक्ष .. | ६२,१०५ | २,३६,२८८ | २२,४९,१५,४१४ |
| २०२०-२१ | प्रत्यक्ष .. | ६२,१०५ | २,३६,२८८ | २२,०८,९१,४४० |
| २०२१-२२ | प्रत्यक्ष .. | ६२,१०५ | २,३६,२८८ | २३,१८,५९,९७६ |
| २०२२-२३ | प्रत्यक्ष .. | ६२,१०५ | २,३६,२८८ | २७,२२,३९,६०२ |
| २०२३-२४ | अपेक्षित .. | ६२,१०५ | २,३६,२८८ | ३७,७४,४२,८६० |
| २०२४-२५ | अंदाजित .. | ६२,१०५ | २,३६,२८८ | ३७,२५,४७,८३२ |

६. कमी खर्चाची कारणे अडचणी/सूचना .. प्राथमिक शिक्षणावर दरवर्षी वेतनावर कराव्या लागणाऱ्या खर्चामध्ये वाढ होत आहे. शिक्षणसेवक ही योजना सुरू झाल्यामुळे रुपये ३,००० मानधनावर शिक्षणसेवक नियुक्त करण्यात येतो. त्यामुळे खर्चात काटकसर होऊन निधीची बचत होते. दिनांक १७ सप्टेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये शिक्षणसेवकांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. ही वाढ दिनांक १ जानेवारी २०१२ पासून लागू करण्यात आली आहे.

७. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. प्राथमिक शिक्षणांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. शिक्षणावरील खर्चातही त्याप्रमाणात वाढ झाली आहे. प्राथमिक शिक्षकांची रिक्त होणारी पदे मानधनावर शिक्षणसेवकाची नियुक्ती करून भरली जात आहेत.

## प्राधिकृत महानगरपालिका/नगरपालिका/कटक मंडळे या शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमित वेतन व सेवानिवृत्ती वेतनासाठी अनुदान

१. योजनेचे नाव .. राज्यातील प्राधिकृत महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा/कटक मंडळे यांना प्राथमिक शिक्षणासाठी साहाय्य.

२. योजनेचा उद्देश व तपशील .. राज्यातील प्राधिकृत महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा/कटक मंडळे या शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमित व वेळेत वेतन मिळणे हा या योजनेचा उद्देश आहे. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र. क्र. १४२/एसएम-४, दिनांक ७ जुलै २०१५ अन्वये अनुदानाचे सूत्रे विहित करण्यात आले आहे.

३. योजनेची व्याप्ती .. राज्यभर.

४. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. सदर योजनेनुसार राज्यामधील शैक्षणिक संस्थांना व प्राधिकृत महानगरपालिका/नगरपालिका/कटक मंडळे यांना अनुदान देण्यात आलेले आहे. त्याची एकूण आकडेवारी खालीलप्रमाणे.

५. राज्याची एकूण आकडेवारी ..

| वर्ष | एकूण कर्मचारी | योजनेवरील खर्च (रुपये हजारात) |
|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष .. | २५,१५४ | १,०९,८२,४१६ |
| २०२०-२१ प्रत्यक्ष .. | २५,१५४ | १,२८,९१,२४९ |
| २०२१-२२ प्रत्यक्ष .. | २५,१५४ | १,३८,०३,८५७ |
| २०२२-२३ प्रत्यक्ष.. | २५,१५४ | १,४५,४८,९८२ |
| २०२३-२४ अपेक्षित .. | २५,१५४ | १,६५,०६,००२ |
| २०२४-२५ अंदाजित .. | २५,१५४ | १,९३,९९,६६३ |

६. कमी खर्चाची कारणे .. नाही.
अडचणी/सूचना. काहीही नाही.

७. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. योजनेच्या अंमलबजावणीत कोणताही बदल करण्याची गरज नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेस प्राथमिक शिक्षणासाठी साहाय्य

१. योजनेचे नाव .. मुंबई महानगरपालिकेस प्राथमिक शिक्षणासाठी साहाय्य

२. योजनेचा उद्देश व तपशील .. शासनाचे स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन देण्याचे धोरण असल्यामुळे 'सर्वच प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देणे ' ही योजना राबविण्यात येते. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र. क्र. १४२/एसएम-४, दिनांक ७ जुलै २०१५ अन्वये अनुदानाचे सूत्र विहित करण्यात आले आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस ५० टक्के दराने अनुदान दिले जाते.

३. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. मुंबई महानगरपालिका आपल्या अधिकारक्षेत्रात प्राथमिक शिक्षणावर नियंत्रण ठेवते. त्यामुळे प्राथमिक शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमित वेतन देणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे.

४. योजनेची व्याप्ती .. सदर योजना बृहन्मुंबई विभागापुरती मर्यादित आहे.

५. राज्याची एकूण आकडेवारी ..

| वर्ष | | एकूण शाळांची संख्या | शिक्षकांची संख्या | शासनाने दिलेले अनुदान (रुपये हजारांत) |
|---|---|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष | .. | १,३२१ | १४,४३१ | ० |
| २०२०-२१ प्रत्यक्ष | .. | १,३२१ | १४,१३१ | ० |
| २०२१-२२ प्रत्यक्ष | .. | १,३०१ | १३,०५८ | ० |
| २०२२-२३ प्रत्यक्ष.. | | १,२८८ | १२,४७० | ३,४२,२४० |
| २०२३-२४ अपेक्षित | .. | १,२८८ | १२,४७० | ३,७६,४६४ |
| २०२४-२५ अंदाजित | .. | १,२८८ | १२,४७० | २,५०,००० |

६. कमी खर्चाची कारणे अडचणी/सूचना. .. बृहन्मुंबई महानगरपालिकेला नियमितपणे अनुदान अदा करण्यात येते. तसेच अनुदानाचा शेवटचा तिसरा हप्ता विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचेकडून अनुदान निर्धारण अहवाल प्राप्त झाल्यानंतर अदा केला जातो. त्यामुळे खर्च कमी/जास्त होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. शासनाकडून अनुदान वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

७. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. बृहन्मुंबई विभागातील प्राथमिक शिक्षकांचे पगार नियमितपणे होतात, त्यामुळे नियमात बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन अनुदान वितरित करण्याबाबतची कार्यवाही वित्त विभागाच्या मान्यतेनुसार शासन स्तरावर सुरू आहे. शासनाकडून अनुदान वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

## मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना अनुदाने

१. योजनेचे नाव .. मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना अनुदाने.

२. योजनेचा उद्देश व तपशील .. राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद क्षेत्र व जिल्हा परिषद क्षेत्रातील १०० टक्के अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित व वेळेत वेतन मिळणे हा या योजनेचा उद्देश आहे. यासाठी वेतनपथक (प्राथमिक) ची स्थापना करण्यात आलेली असून, सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनपथकामार्फत अनुदान अदा करण्यात येते.

**अंशत: अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान :-** शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर २०१६ अन्वये १४ जून २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या तथापि, अद्याप अनुदान सुरू न झालेल्या १६२८ शाळा व २४५२ तुकड्यांवरील १९२४७ शिक्षक व शिक्षकेतर पदांना सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांचा समावेश आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १ व २ जुलै, २०१६ अन्वये पात्र १५८ प्राथमिक शाळा व ५०४ तुकड्यांवरील १४१७ शिक्षक पदांना शासन निर्णय दिनांक ९ मे, २०१८ अन्वये, दिनांक १ एप्रिल, २०१८ पासून २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

तर, शासन निर्णय दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये, १६७ प्राथमिक शाळा व ६२३ वर्गतुकड्यांवरील १६८८ शिक्षकांना २० टक्के अनुदान तर, २० टक्के अनुदान घेत असलेल्या ४५६ प्राथमिक शाळा व १३४० वर्ग/तुकड्यांवरील ४१३१ शिक्षक कर्मचाऱ्यांना दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून वाढीव २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

## मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना अनुदाने

शासन निर्णय, क्रमांक माशअ-२०२२/प्र.क्र.२७५/एसएम-४, दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ अन्वये (i) त्रुटी पूर्तता केलेल्या राज्यातील कायम विनाअनुदान तत्त्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक शाळा/तुकड्या/वर्ग यांना २० टक्के/४० टक्के अनुदानासाठी पात्र करण्यात करण्यात आले आहे. (ii) यापूर्वी २० टक्के/४० टक्के वेतन अनुदान घेत असलेल्या प्राथमिक शाळा/तुकड्यांना २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा मंजूर करण्यात आला आहे. (iii) तसेच, अनुदानासाठी पात्र परंतु अघोषित असलेल्या प्राथमिक शाळा/तुकड्या/वर्ग यांना अनुदानासाठी पात्र घोषित करून सरसकट २० टक्के अनुदान मंजूर करण्याचा निर्णय विहित अटी शर्तींच्या अधीन राहून घेण्यात आला आहे. सदर अनुदान पात्र शाळा/तुकड्यांवरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना दिनांक १ जानेवारी २०२३ पासून अनुज्ञेय करण्यात आले आहे.

३. योजनेची व्याप्ती .. राज्यभर

४. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. सदर योजनेनुसार राज्यामधील १०० टक्के अनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थांना/शाळांना अनुदान देण्यात आलेले आहे. त्याची एकूण आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :—

| वर्ष | शाळांची संख्या | एकूण शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी | दिलेले अनुदान (रुपये हजारात) |
|---|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष .. | ४,६९३ | ४१,९७१ | ३,०६,०५,३४९ |
| २०२०-२१ प्रत्यक्ष .. | ४,६९३ | ४१,९७१ | ३,५४,८९,६७६ |
| २०२१-२२ प्रत्यक्ष .. | ७,१२८ | ४८,८३५ | ३,४५,२६,०५९ |
| २०२२-२३ प्रत्यक्ष .. | ७,१२८ | ४८,८३५ | ३,८१,१७,३५२ |
| २०२३-२४ अपेक्षित .. | ७,१२८ | ४८,८३५ | ४,३२,९७,५१६ |
| २०२४-२५ अंदाजित .. | ७,१२८ | ४८,८३५ | ५,०९,९६,५३२ |

**अंशत: अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान**

| वर्ष | शाळांची संख्या | एकूण शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी | दिलेले अनुदान (रुपये हजारात) |
|---|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष .. | २,४३५ | ११,६४८ | ७,१५,४७० |
| २०२०-२१ प्रत्यक्ष .. | २,४३५ | ११,६४८ | ९,०४,२४३ |
| २०२१-२२ प्रत्यक्ष .. | १,२१७ | ७,०८० | १५,८२,४०६ |
| २०२२-२३ प्रत्यक्ष .. | १,२१७ | ७,०८० | २०,४४,६७८ |
| २०२३-२४ अपेक्षित .. | १,२१७ | ११,५६५ | २०,३६,४८८ |
| २०२४-२५ अंदाजित .. | १,२१७ | ११,५६५ | ३६,१२,७१२ |

५. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. १०० टक्के अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमितपणे व वेळेत वेतन अदा केले जात असल्यामुळे या योजनेचे उद्दिष्ट सफल होत आहे.

अंशत: अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतनही बँकेमार्फत करण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. त्यामुळे शासन अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन आता नियमित होत आहे.

---

## (१) प्राथमिक शाळेतील पुस्तकपेढी योजना

१. योजनेचे नाव .. प्राथमिक शाळांमधून पुस्तकपेढ्या उघडणे.

२. योजनेचा उद्देश व तपशील .. डोंगराळ, ग्रामीण, आदिवासी जाती व जमाती व दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते ४ थीमधील मुलामुलींना मोफत पाठ्यपुस्तके पुरविली जातात.

शासन निर्णयानुसार प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या इयत्ता १ ली ते ४ थीमधील मुलांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यात येतात. आर्थिक अडचणींमुळे मुलांना पुस्तके घेणे शक्य होत नाही, म्हणून पालकाने आपल्या पाल्यांना शाळेत न घालता घरी ठेवल्यामुळे, गळतीचे प्रमाण वाढते. ते प्रमाण कमी व्हावे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. या योजनेचा लाभ इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थीच्या सर्व विद्यार्थ्यांना (इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून) दिला जातो.

३. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधून अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती तसेच आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून दिली जातात.

४. योजनेची व्याप्ती .. राज्यामधील सर्वच विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा होतो. मान्यताप्राप्त अनुदानित शाळेतील इयत्ता १ ली ते ७ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना सन २००४-२००५ पासून मोफत पाठ्यपुस्तके देण्यात आली आहेत. सदर योजनेची व्याप्ती सर्व राज्यभर आहे.

५. राज्याची एकूण आकडेवारी ..

| वर्ष | एकूण लाभार्थी संख्या | योजनेवरील खर्च (रुपये हजारात) |
|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष .. | ० | ० |
| २०२०-२१ प्रत्यक्ष .. | ० | ० |
| २०२१-२२ प्रत्यक्ष .. | ० | ० |
| २०२२-२३ प्रत्यक्ष .. | ० | ० |
| २०२३-२४ अंदाजित .. | ० | ० |
| २०२४-२५ अंदाजित .. | ० | ० |

**टीप.**-- सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान (SSA) योजनेअंतर्गत लाभ देण्यात येत असल्याने या योजनेअंतर्गत तरतुदींची आवश्यकता नाही.

६. कमी खर्चाची कारणे, अडचणी/सूचना. .. सर्वशिक्षा अभियानअंतर्गत सर्व अनुसूचित जाती/जमातीचे विद्यार्थी यांना मोफत पुस्तके दिली असल्याने या योजनेत खर्च कमी होत आहे.

७. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. यामुळे गळतीचे प्रमाण कमी होऊन शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या कार्यक्रमाला मदत झाली आहे. सदर योजनेअंतर्गत राज्यामधील जिल्ह्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले आहे. तथापि, काही जिल्ह्यांमध्ये लाभार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे, त्या त्या प्रमाणामध्ये योजनेवरील खर्च वाढलेला आहे.

सर्वशिक्षा अभियान योजनेंतर्गत इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविली जातात.

---

## (२) जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा (मोफत गणवेश व लेखनसाहित्य पुरवठा)

१. योजनेचे नाव .. जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा (मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा).

२. योजनेचा उद्देश व तपशील .. इयत्ता १ ली ते ४ थीमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची गळती रोखून उपस्थिती वाढविण्यासाठी शासनाने दिनांक २० जून १९७९ पासून सदर योजना सुरू केली आहे. प्राथमिक शाळांत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जमातींच्या मुलांची, विशेषत: त्यांच्यापैकी मुलींची पटसंख्या व उपस्थिती फारच कमी आणि असमाधानकारक असते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींचे गळतीचे प्रमाण तुलनात्मकरित्या पाहता फार असल्याने परिणामत: माध्यमिक शिक्षण स्तरावर त्यांची गळती वाढते, म्हणून प्राथमिक शाळांतील या अनुसूचित जाती, जमातींच्या मुलांची पटसंख्या वाढविण्यासाठी उपाययोजना आवश्यक आहे. त्यासाठी प्राथमिक

शाळांत इयत्ता १ ली ते ४ थीमध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जमातींच्या दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांना/मुलांना गणवेशाचे संच आणि लेखनसाहित्य मोफत पुरविण्यात येते. या योजनेमध्ये प्रतिवर्षी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून लाभार्थी विद्यार्थ्यांना प्रत्येकी गणवेशाचा एक संच व लेखनसाहित्य देण्यात येते. ८० टक्के रकमेचे गणवेश व २० टक्के रकमेचे लेखनसाहित्य अशी त्यांची विभागणी आहे.

३. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. इयत्ता १ ली ते ४ थीमधील विद्यार्थ्यांची गळती कमी होऊन शाळेतील उपस्थिती वाढविणे. सदर योजना कार्यान्वित केल्यामुळे निश्चितच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये वाढ झाली आहे. याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :—

४. एकूण आकडेवारी ..

| वर्ष | लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या | योजनेवरील खर्च (रुपये हजारांत) |
|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष .. | १,३५,००० | ११,४२४ |
| २०२०-२१ प्रत्यक्ष .. | ० | ० |
| २०२१-२२ प्रत्यक्ष .. | ० | ० |
| २०२२-२३ प्रत्यक्ष .. | १,५५,००० | १७,००० |
| २०२३-२४ अपेक्षित .. | ० | ० |
| २०२४-२५ अंदाजित .. | ० | ० |

५. योजनेची व्याप्ती .. राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जमातींच्या इयत्ता १ ली ते ४ थीतील विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळतो.

६. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. या योजनेसाठी उपलब्ध होणारी तरतूद जिल्हा परिषदांना वितरित करण्यात येते. तरतुदींच्या अधीन राहून गणवेश व लेखनसाहित्याचे वाटप ग्रामशिक्षण समितीमार्फत करण्यात येते. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांना गणवेश मिळतील असे नियोजन केले जाते. ही योजना यशस्वी झाली आहे. सदर योजना कार्यान्वित झाल्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी होऊन, शाळेमधील उपस्थितीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सदर योजना गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीने लाभदायक आहे.

**टीप :—** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शा. नि. क्र. संकीर्ण-२०१३/(६७/१३)/प्राशि.-५, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१३ नुसार मोफत गणवेश वाटप योजना बंद करणेत आली आहे. तद्‌नंतर शा. नि., दि. २५ फेब्रुवारी २०१४, सन २०१३-१४ करिता सदर योजना सुरू ठेवण्यात आली. सदर शासन निर्णयान्वये सन २०१४-१५ पासून मोफत गणवेश वाटप योजना सर्वशिक्षा अभियान योजनेत समाविष्ट करण्यात आली.

---

## (३) राज्यातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या १०३ विकास गटांतील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता १ ली ते ४ थीमधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके

१. योजनेचे नाव .. राज्यातील १०३ विकास गटांतील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता १ ली ते ४ थी मधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके.

२. योजनेचा उद्देश व तपशील .. राज्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय स्त्री साक्षरतेच्या सरासरीपेक्षा, साक्षरतेचे प्रमाण कमी असलेल्या राज्यातील १०३ विकास गटांत सदर योजना सन १९९६-९७ पासून राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समित्यांनी उपलब्ध करून दिलेल्या नियतव्ययाच्या आधारे शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या तरतुदींमधून जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता १ ली ते ४ थीमधील सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचा लाभ देण्यात येतो.

योजनेनुसार संबंधित जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे संचालनालयाने दिलेल्या वेळापत्रकानुसार पाठ्यपुस्तक मंडळाकडून पुस्तकांचे संच प्राप्त करून शाळांना वितरित करतात. शाळांच्या मुख्याध्यापकांमार्फत सदर संच शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना वितरित केले जातात.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | योजनेचे उद्दिष्ट व साध्य | .. | इयत्ता १ ली ते ४ थीमधील सर्वच मुलांना (इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून) या योजनेचा लाभ दिला जातो. या योजनेमुळे विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. |
| ४. | योजनेची व्याप्ती | .. | राज्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय स्त्री साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा कमी असलेल्या जिल्ह्यांतील तालुके यामध्ये सदर योजनेची अंमलबजावणी केली जाते. |
| ५. | राज्याची एकूण आकडेवारी | .. | |

| वर्ष | | लाभार्थी संख्या | योजनेवरील खर्च (रुपये हजारांत) |
|---|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२०-२१ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२१-२२ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२२-२३ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२३-२४ अंदाजित | .. | ० | ० |
| २०२४-२५ अंदाजित | .. | ० | ० |

**टीप.**-- सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान (SSA) योजनेअंतर्गत लाभ देण्यात येत असल्याने या योजनेअंतर्गत तरतुदींची आवश्यकता नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | कमी खर्चाची कारणे, अडचणी/सूचना. | .. | या योजनेखाली उपलब्ध होणारी तरतूद जिल्हा परिषदांना वितरित करण्यात येते. तरतुदींच्या अधीन राहून बालभारती यांचेकडे पुस्तकांची मागणी नोंदवितात. त्याप्रमाणे बालभारतीकडून पुस्तक पुरवठा केला जातो. |
| ७. | निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती | .. | या योजनेमुळे विद्यार्थ्यांमधील गळतीचे प्रमाण कमी होऊन शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या कार्यक्रमाला मदत झाली आहे. |

## (४) राज्यातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या १०३ विकास गटांतील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता १ ली ते ४ थीमधील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखनसाहित्य पुरवठा करणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | .. | राज्यातील १०३ विकास गटांतील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता १ ली ते ४ थी मधील सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखनसाहित्य पुरवठा करणे. |
| २. | योजनेचा उद्देश व तपशील | .. | १०३ विकास गट योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते ४ थीमधील विद्यार्थ्यांची गळती रोखून उपस्थिती वाढविण्यासाठी शासनाने सन १९९६-९७ पासून सदर योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समित्यांनी उपलब्ध करून दिलेल्या नियतव्ययाच्या आधारे शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या तरतुदीतून ८० टक्के गणवेश व २० टक्के रकमेचे लेखन- साहित्य जिल्हा परिषद स्तरावर खरेदी करण्यात येते. प्रति लाभार्थी दोन गणवेश व २० टक्के रकमेचे लेखनसाहित्य असे लाभाचे स्वरूप होते. तथापि, शासनाने २००४ या सालापासून या योजनेमध्ये अंशत: बदल केला असून, प्रतिलाभार्थी एक गणवेश व २० टक्के रकमेचे लेखनसाहित्य देण्यात येते. |
| ३. | योजनेचे उद्दिष्ट व साध्य | .. | इयत्ता १ ली ते ४ थीमधील विद्यार्थ्यांची गळती कमी होऊन शाळेतील उपस्थिती वाढविणे.<br>सदर योजना कार्यान्वित केल्यामुळे निश्चितच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये वाढ झाली आहे. |
| ४. | योजनेची व्याप्ती | .. | राज्यातील १०३ विकास गटांतील इयत्ता १ ली ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळतो. |
| ५. | राज्याची एकूण आकडेवारी | .. | |

| वर्ष | | लाभार्थी संख्या | योजनेवरील खर्च (रुपये हजारांत) |
|---|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष | .. | १,२२,८१२ | ९,८२८ |
| २०२०-२१ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२१-२२ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२२-२३ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२३-२४ अपेक्षित | .. | ० | ० |
| २०२४-२५ अंदाजित | .. | ० | ० |

६. कमी खर्चाची कारणे अडचणी/सूचना. .. या योजनेखाली उपलब्ध होणारी तरतूद जिल्हा परिषदांना वितरित करण्यात येते. तरतुदींच्या अधीन राहून गणवेश व लेखनसाहित्याचे वाटप ग्रामशिक्षण समितीमार्फत करण्यात येते. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना गणवेश मिळतील असे नियोजन केले जाते. ही योजना यशस्वी झाली आहे.

काही अपवादात्मक परिस्थितीत लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे सदरचा खर्च कमी होतो.

७. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. सदर योजना कार्यान्वित झाल्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी होऊन शाळेमधील उपस्थितीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सदर योजना गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीने लाभदायक आहे.

**टीप :–** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शा. नि. क्र. संकीर्ण-२०१३/(६७/१३)/ प्राशि.-५, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१३ नुसार मोफत गणवेश वाटप योजना बंद करणेत आली आहे. तद्नंतर शा. नि., दि. २५ फेब्रुवारी २०१४ करिता सदर योजना सुरू ठेवण्यात आली. सदर शासन निर्णयान्वये सन २०१४-१५ पासून मोफत गणवेश वाटप योजना सर्वशिक्षा अभियान योजनेत समाविष्ट करण्यात आली. शासन निर्णय, दिनांक २८ जून २०१६ अन्वये राज्य शासनाची मोफत गणवेश व लेखन साहित्य वाटप योजना यापुढे राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार जुन्या पद्धतीने राबविण्यात आली.

## (५) इयत्ता १ ली ते ४ थी मधील प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींना उपस्थिती भत्ता

१. योजनेचे नाव .. इयत्ता १ ली ते ४ थीमधील प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींना उपस्थिती भत्ता.

२. योजनेचा उद्देश व तपशील .. प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व शाळेत उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी इयत्ता १ ली ते ४ थीमधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्र्यरेषेखालील सर्व मुली व आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती/जमातींच्या दारिद्र्य रेषेखालील मुलींना शाळेत नियमित उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिनी प्रत्येक मुलीमागे एक रुपया या दराने मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता वार्षिक रुपये २२० कमाल मर्यादेच्या अधीन राहून दिला जातो. सदर योजनेची अंमलबजावणी योग्य रीतीने होण्याकरिता विशिष्ट अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यानुसार दर दिवशी एक रुपया याप्रमाणे एकूण वर्षाच्या ७५ टक्के हजेरी असणाऱ्या मुलींना एकूण रुपये २२० उपस्थिती भत्ता लाभ मिळतो.

३. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करून शाळेतील मुलींच्या उपस्थितीचे प्रमाण वाढविणेसाठी सदर योजना राबविण्यात येत असल्यामुळे, शाळेतील मुलींच्या उपस्थितीच्या प्रमाणात निश्चितच वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

४. योजनेची व्याप्ती .. राज्यातील सर्व जिल्हे, तसेच जिल्ह्यातील सर्व तालुके यामध्ये सदर योजनेची अंमलबजावणी केली जाते.

५. राज्याची एकूण आकडेवारी ..

| वर्ष | | लाभार्थी संख्या | योजनेवरील खर्च (रुपये हजारांत) |
|---|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष | .. | १,४७,६९५ | १७,८०८ |
| २०२०-२१ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२१-२२ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२२-२३ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२३-२४ अपेक्षित | .. | ० | ० |
| २०२४-२५ अंदाजित | .. | ० | ० |

६. कमी खर्चाची कारणे, .. या योजनेअंतर्गत उपस्थिती भत्त्याचे वाटप तालुका स्तरावरील गट शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत सर्व पात्र विद्यार्थिनींना शाळेच्या माध्यमातून केले जाते.

काही अपवादात्मक परिस्थितीत लाभार्थी मुली कमी झाल्यामुळे योजनेवरील खर्च कमी होतो.

७. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. सदर योजना कार्यान्वित झाल्यामुळे प्राथमिक शाळेतील मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी होऊन शाळेमधील उपस्थितीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सदर योजना गरीब व होतकरू मुलींच्या शिक्षणाच्या दृष्टीने लाभदायक आहे.

---

## (६) जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना जोडून बालवाड्या उघडणे

१. योजनेचे नाव .. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना जोडून बालवाड्या उघडणे.

२. योजनेचा उद्देश व तपशील .. सदर योजना १९७८ सालापासून सुरू करण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या संदर्भात आणि दूरच्या खेड्यांमधील मुले मोठ्या प्रमाणात येण्यासाठी पाया तयार व्हावा असा या योजनेचा उद्देश आहे.

सदर योजनेनुसार जिल्ह्यामधील दुर्गम खेडे भागातील तसेच गलिच्छ वस्त्यांमधून शाळा तेथे बालवाडी सुरू करण्याचे शासनाचे धोरण आहे. या बालवाड्यांमध्ये ३ ते ५ वयोगटातील मुले दिवसातील २-३ तास या बालवाड्यांत येतील. त्याठिकाणी खेळ, गाणी आणि संवेदनात्मक शिक्षण हे मुख्य कार्यक्रम असतील. बालवाडी चालविण्याकरिता अंशकालिक बालवाडी ताईची नेमणूक करून तिला दरमहा रुपये ५०० प्रमाणे १० महिने मानधन देण्यात येते. प्रत्येक नवीन बालवाडीकरिता खेळणी, तक्ते वगैरे साहित्य खरेदीसाठी अनावर्ती रुपये ५,००० अनुदान देण्यात येते. तसेच प्रत्येक बालवाडीस साहित्य देखभाल व दुरुस्तीसाठी वार्षिक रुपये ५०० देण्यात येतात. शासनाच्या धोरणानुसार ज्याठिकाणी महिला व बालविकास विभाग, आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत अंगणवाड्या/बालवाड्या सुरू आहेत त्याठिकाणी शिक्षण विभागामार्फत बालवाड्या उघडण्यास परवानगी देण्यात येत नाही. बालवाडीतील सेविकांना भाऊबीज भेट देण्याचा निर्णय शासनाने शासन निर्णय क्रमांक पुप्राशा/१९९८/८५५०/९८/प्राशि-२, दिनांक १७ ऑक्टोबर १९९८ अन्वये घेतला असून, रुपये ५०० प्रमाणे प्रत्येक बालवाडीताईस भेट देण्यात येते.

३. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. मुलांना शाळेची गोडी लागावी.
मुलांना आरोग्याच्या चांगल्या सवयी लागाव्यात.
हसतखेळत व हलक्याफुलक्या पद्धतीचे मुलांना ज्ञानेंद्रियांचे शिक्षण द्यावे.
मुलांची अर्ध्यावर शिक्षण सोडून देण्याची वृत्ती कमी करून पैशाचा अपव्यय टाळावा.

४. योजनेची व्याप्ती .. सदर योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येते.

५. राज्याची एकूण आकडेवारी ..

| वर्ष | | बालवाड्यांची संख्या | योजनेवरील खर्च (रुपये हजारांत) |
|---|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष | .. | ३०० | १,१३२ |
| २०२०-२१ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२१-२२ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२२-२३ प्रत्यक्ष | .. | ० | ० |
| २०२३-२४ अपेक्षित | .. | ० | ० |
| २०२४-२५ अंदाजित | .. | ० | ० |

६. कमी खर्चाची कारणे, अडचणी/सूचना. .. महिला व बालविकास विभाग, तसेच आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या अंगणवाड्या/बालवाड्या यांच्या संख्येत वाढ होत असल्याने, पर्यायाने शिक्षण विभागाच्या बालवाड्या बाल विकास विभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

७. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलांची मानसिकता या बालवाड्यांमुळे तयार होते. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा हा एक प्रमुख भाग असल्याने सदर योजना यशस्वीपणे राबविणे अत्यावश्यक आहे.

---

## जिल्हा बालभवन योजना

१. योजनेचे नाव .. जिल्हा बालभवन योजना.

२. योजनेचा उद्देश व तपशील .. ६ ते १४ वयोगटातील सर्व धर्मातील, जातीतील, वर्गातील मुलांना एकत्र आणून त्यांच्यात सौहार्दाची भावना निर्माण करणे, तसेच या मुलांच्या अंगातील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे.

शासनाने १९७४-७५ सालापासून जिल्हा बालभवन योजना सुरू केली आहे. सदर योजना स्थानिक खाजगी संस्थेकडून राबविण्यात येते. ६ ते १४ वयोगटातील सर्व धर्मातील, जातीतील, वर्गातील मुलांना एकत्र आणून त्यांच्यात सौहार्दाची भावना निर्माण करणे, तसेच या वर्गातील मुलांच्या अंगातील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, वेगवेगळ्या खेळांतून सुप्त गुणांना वाव देणे, तसेच मुलांमध्ये सांधिक भावना, खेळाडू वृत्ती निर्माण करण्यात व व्यक्तिमत्त्वाचा विकास साधण्यात प्रयत्न करणे इत्यादी प्रकाराचे शिक्षण बालभवनातून दिले जाते.

३. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. ६ ते १४ वयोगटातील मुलांची विचारक्षमता विकसित करणे व कौशल्य, आत्मविश्वास, व्यक्तिमत्व इत्यादी विविध बाबींना स्पर्श करणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी या बालभवनाद्वारे मुलांना देण्यात येते. तसेच बालभवनातील या मुलांना कार्यानुभव, चित्रकला, संगीत, गोष्टी सांगणे इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जाते. सबब लहान मुलांची विचारक्षमता वाढावी हे उद्दिष्ट बऱ्याच अंशी बालभवनाद्वारे साध्य झालेले आहे.

४. योजनेची व्याप्ती .. राज्यातील जिल्हा परिषदा.

५. राज्याची एकूण आकडेवारी ..

| वर्ष | | बालभवनांची संख्या | विद्यार्थी संख्या | योजनेवरील खर्च (रुपये हजारांत) |
|---|---|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष | .. | ६९ | ३,२८७ | २४,३४४ |
| २०२०-२१ प्रत्यक्ष | .. | ६९ | ३,२८७ | ० |
| २०२१-२२ प्रत्यक्ष | .. | ६७ | ३,२८७ | ० |
| २०२२-२३ प्रत्यक्ष | .. | ० | ० | ० |
| २०२३-२४ अपेक्षित | .. | ० | ० | ० |
| २०२४-२५ अंदाजित | .. | ० | ० | ० |

६. कमी खर्चाची कारणे, अडचणी/सूचना. .. प्रत्येक बालभवनाला शासनामार्फत रुपये ५,००० अनुदान दरवर्षी दिले जाते. उर्वरित खर्च संबंधित संस्थेने करावयाचा असतो. रुपये ५,००० याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संचालकांचे मानधन | .. | रुपये १,२०० |
| २. | वाचनालय, खेळ | .. | रुपये १,६४० |
| ३. | शिपायांचे मानधन | .. | रुपये ३६० |
| ४. | स्थानिक तज्ज्ञ व्यक्तींचे कार्यक्रम | .. | रुपये १,२०० |
| ५. | सहली व सांस्कृतिक कार्यक्रम | .. | रुपये ६०० |
| | एकूण | .. | रुपये ५,००० |

सदर रुपये ५,००० हे वार्षिक मानधन अत्यंत अल्प असल्यामुळे, या बालभवनामध्ये काम करावयास कर्मचारी तयार नसतात. तसेच इतर बाबींवरील मानधनदेखील अत्यंत अल्प असल्यामुळे, आवश्यक ते उद्दिष्ट साधता येत नाही. तसेच इतर सांस्कृतिक कार्यक्रम हे देखील अपुऱ्या निधीमुळे आयोजित करता येत नाही. सबब बालभवनामधील विद्यार्थ्यांची संख्या अल्प आहे असे दिसून येते. या मानधनामध्ये वार्षिक वाढ करणे, तसेच बालभवनावरील देखभाल खर्चाच्या रकमेत वाढ करणे गरजेचे वाटते.

७. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. स्थानिक पातळीवरील बालभवनामधील मुलांचे व्यक्तिमत्त्व विकास साधण्यात बहुतांश यश येत आहे.

## अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर)

१. योजनेचे नाव .. अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर).

२. उद्दिष्ट .. १. सर्व अपंग मुले आणि युवक यांना माध्यमिक शिक्षणाची संधी सामान्य शिक्षण व्यवस्थेमध्ये उपलब्ध करून देणे.

२. त्यांच्या प्रवेशात वाढ व गळती कमी करणे.

३. अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ आणि राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९ अंतर्गत किंवा अधिक अपंगत्व निश्चित झालेल्या १४ वर्षांवरील प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या व माध्यमिक शिक्षणात समाविष्ट असणाऱ्या १४ वर्षांपेक्षा अधिक वयोगटातील विद्यार्थ्यांपासून १८ वर्षांपेक्षा अधिक वयोगटापर्यंत विशेष गरज असणाऱ्या विद्यार्थ्यांस इयत्ता १२ वीपर्यंतचे शिक्षण देणे.

३. योजनेचा तपशील .. या योजनेमध्ये अंध/मूकबधिर/कर्णबधिर/शिक्षणक्षम मतिमंद व विकलांग माध्यमिक स्तरावर शिक्षण घेत असलेल्या मुलांना सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर नवीन युनिटला मान्यता प्रदान करण्यात आली असून, युनिटसाठी विद्यार्थी संख्या एक शिक्षकास पाच याप्रमाणे राहणार आहे. युनिटमधील सदर विद्यार्थी संख्या वर्षभर कायम राहणे अनिवार्य आहे. ज्या शासनमान्य शाळेत अथवा शाळेच्या परिसरात एकाच प्रकारचे अपंगत्व असलेले ५ (पाच) विद्यार्थी उपलब्ध असतील, अशा शाळेत ज्या प्रकारची अपंग मुले असतात, त्यांच्यासाठी संबंधित अपंगत्व प्रशिक्षित विशेष शिक्षक देण्यात येतो व जेथे साधन खोलीची उपलब्धता असते तेथे सोय करून दिली जाते. शाळेत योजनेचे युनिट सुरू करण्यात येते. विहित दराने सेवासुविधांसाठी व शिक्षक वेतनासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली जाते. या योजनेअंतर्गत सध्या १,३५८ युनिट्स कार्यरत आहेत.

सदरची योजना शासन निर्णय, २ डिसेंबर २०१४ पासून राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांचेकडे वर्ग झालेली आहे. प्रतिवर्षी १४ + व १८ + वयोगटातील (माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर) प्रति अपंग विद्यार्थ्यासाठी रुपये ३,००० (तीन हजार फक्त) इतकी रक्कम जी शाळा आवश्यकतेप्रमाणे मुलांवर त्यांच्या गरजेनुसार खर्च करू शकेल, त्या शाळेला देण्यात येते. मात्र विद्यार्थीनिहाय खर्चाचे काटेकोर बंधन नाही. या अंतर्गत खालील प्रकारच्या सुविधा उपलब्ध राहतील.

(१) गणवेश भत्ता.

(२) पुस्तक व स्टेशनरी भत्ता.

(३) वाहतूक भत्ता.

(४) पाठ्यवाचक भत्ता.

(५) विद्यार्थी मूल्यांकन.

(६) अपंग विद्यार्थिनींसाठी स्टायपेंड.

(७) संरक्षक भत्ता.

(८) वैयक्तिक मदतीच्या उपकरणांची प्रत्यक्ष किंमत (उपकरणे, शैक्षणिक साहित्य, वैयक्तिक अध्ययन, अध्यापन साहित्य).

(९) एकास दहा या प्रमाणात तीव्र अस्थिव्यंगाच्या मुलांसाठी शाळेत मदतनीस याची नियुक्ती.

(१०) विद्यार्थी जेथे शिक्षण घेतात तेथील वसतिगृहात राहत असतील, तर निवास व्यवस्था.

(११) शाळेच्या वसतिगृहात राहणाऱ्या तीव्र अस्थिव्यंगाच्या मुलांसाठी आया/मदतनीस यांना अनुदान.

(१२) शारीरिक उपचार सेवा.

(१३) अंधांकरिता स्क्रीन रीडिंग सॉफ्टवेअर खरेदी (जावा आणि साफा) कर्णबधिर मुलांसाठी वाचा ओळख, संगणकीय शब्दसंग्रह विकास कार्यक्रम.

(१४) मार्गदर्शक साहित्याची खरेदी, निर्मिती.

केंद्र पुरस्कृत अपंग समावेशित शिक्षण योजना माध्यमिक स्तर (IEDSS) ही योजना २०१५-१६ पासून ६०:४० या प्रमाणात कार्यान्वित करण्यात आली आहे. कक्षावरील खर्च आणि योजनेमध्ये समाविष्ट सर्व अपंग विद्यार्थ्यांचा वेतनेतर बाबींवरील खर्च राज्य शासनाच्या योजनांतर्गत तरतुदीतून करण्यात येतो.

४. योजनेची उद्दिष्टे व साध्य ..

| वर्ष | उद्दिष्ट | साध्य |
|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष .. | २०० | १०० टक्के |
| २०२०-२१ प्रत्यक्ष .. | २०० | -- |
| २०२१-२२ प्रत्यक्ष .. | २०० | -- |
| २०२२-२३ प्रत्यक्ष .. | २०० | -- |
| २०२३-२४ अपेक्षित .. | २०० | -- |
| २०२४-२५ अंदाजित .. | २०० | -- |

५. योजनेची व्याप्ती .. संपूर्ण महाराष्ट्र राज्य (राज्यस्तरीय योजना).

६. राज्याची एकूण आकडेवारी ..

| वर्ष | युनिटची संख्या | झालेला खर्च (रुपये हजारांत) |
|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष .. | १,३५८ | १,९८,००० |
| २०२०-२१ प्रत्यक्ष .. | -- | ० |
| २०२१-२२ प्रत्यक्ष .. | -- | ० |
| २०२२-२३ प्रत्यक्ष .. | -- | ० |
| २०२३-२४ अपेक्षित .. | १,३२० | ९६,६०० |
| २०२४-२५ अंदाजित .. | १,३२० | ९६,६०० |

सद्य:स्थितीत विशेष शिक्षक संख्या १,३५८ व मदतनीस संख्या ७२ आहे.

७. कमी खर्चाची कारणे .. १. एप्रिल २०११ ते जून २०१२ या कालावधीमध्ये एकूण ७८० युनिट्स झालेली आहेत. सन २०११-१२ आणि २०१२-१३ मध्ये सदर योजनेचा प्रचार-प्रसार झाल्याने प्रस्तावांमध्ये वाढ झालेली आहे.

२. ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या गौण लेखाशीर्षाखाली मागणी केलेली रक्कम ३५-सहायक अनुदाने (वेतन) यामध्येच समाविष्ट केल्यामुळे ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) मधून देण्यात येणारा विद्यार्थी सेवासवलतींचा खर्च होऊ शकला नाही. तथापि, २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये शासनाकडून अनुदान प्राप्त होऊन वि.स.स. देण्यात आलेले आहे.

८. अडचणी/सूचना .. शहरी भागांमध्ये युनिट सुरू होण्यासारखी परिस्थिती महानगरपालिका व मोठ्या नगरपालिका क्षेत्रात पुरेसा प्रतिसाद मिळण्यासाठी संनियंत्रण कक्षाकडे पुरेसे कर्मचारी व साधनसामग्री (वाहन इत्यादी) उपलब्ध करून दिल्यास, प्रसार व प्रचार पुरेसा होईल.

९. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती .. शालेय शिक्षण विभागाबरोबरच समाजकल्याण, आदिवासी विकास, अपंग कल्याण, मत्स्यव्यवसाय, कृषी विभाग, वन विभाग अशा ज्या शासनाच्या अन्य विभागांनी सामान्य शाळा सुरू केल्या, त्यामध्ये युनिट सुरू करण्याबाबत पुरेशा तरतुदी व नियम करण्यात आले नाहीत. विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित तत्त्वावरील शाळांमध्ये युनिट्स सुरू करण्यासाठी नियमात तरतुदी झाल्या नाहीत. तथापि, स्थानिक पातळीवर योजनेचा प्रचार-प्रसार झाल्याने नवीन युनिट प्रस्तावामध्ये वाढ झाली आहे.

---

## प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना (पूर्वाश्रमीची शालेय पोषण आहार योजना)

१. योजनेचे स्वरूप .. प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत केंद्र आणि राज्य शासनाच्या शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, अनुदानित शाळा तसेच अंशत: अनुदानित वस्ती शाळा, अनुदानित अपंग व मूकबधिर शाळा इत्यादी शाळांतील इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सन १९९५-९६ पासून ८० टक्के उपस्थितीच्या आधारे ३ किलो तांदूळ मोफत देण्यात येत होता. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाकडील आदेशान्वये, जून २००२ पासून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना आणि जानेवारी २००३ पासून इतर सर्व शाळांमध्ये अन्न शिजवून देण्यात येत आहे.

२. योजनेचे उद्देश .. (अ) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याच्या दृष्टीने तसेच प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचे, उपस्थितीचे प्रमाण वाढविणे आणि गळतीचे प्रमाण कमी करणे, शैक्षणिक गुणवत्तेसाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना सुरू केली आहे.

(ब) मुलांना स्वच्छ वातावरणात गरम व ताजा पौष्टिक आहार देणे, त्यांच्यात शिस्त निर्माण करणे, विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारणे, भेदभाव नष्ट करणे व समानता वाढविणे इ.

३. अंमलबजावणी कार्यपद्धती .. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून सवलतीमध्ये तांदूळ पुरविला जातो आणि रुपये ०.९० पैसे प्रति किलोप्रमाणे, तसेच राज्य शासनाकडून रुपये ०.६० पैसे प्रति किलोप्रमाणे वाहतूक अनुदान उपलब्ध करून दिले जाते. ग्रामीण भागामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शालेय व्यवस्थापन समिती, शहरी भागामध्ये नगरपालिका, महानगरपालिका यांच्याकडे केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली स्थापन करून अन्न शिजवून देण्याची जबाबदारी सोपविली आहे.

(अ) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय शापोआ-२०२२/प्र.क्र.११८/एस.डी.३, दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ अन्वये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत प्राथमिक तसेच उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे सुधारित दराने आहाराचा पुरवठा देण्यात येतो.

| लाभार्थी गट | आहाराचे प्रमाण | प्रतिदिन प्रतिलाभार्थी आहार खर्च मर्यादा (रु.) |
|---|---|---|
| प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी) | ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार | ५.४५ |
| उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार | ८.१७ |

(ब) प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत ग्रामीण भागामध्ये तांदुळाबरोबरच इतर धान्यादी मालाचा पुरवठा शाळास्तरावर करण्यात येतो. ग्रामीण भागातील आहार खर्चाची विभागणी खालीलप्रमाणे-

| लाभार्थी | अनुज्ञेय आहार खर्च (रु.) | धान्यादी माल पुरविण्यासाठी खर्च (रु.) | इंधन आणि भाजीपाला यासाठी लागणारा खर्च (रु.) |
|---|---|---|---|
| प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी) | ५.४५ | ३.२७ | २.१८ |
| उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | ८.१७ | ४.९० | ३.२७ |

.. शहरी भागामध्ये महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी स्वयंपाकगृह उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत शाळांमध्ये शिजविलेल्या आहाराचा पुरवठा करण्यात येतो. शहरी भागांमध्ये केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीअंतर्गत शाळांना आहार पुरवठा करण्याकरिता प्रतिकिलो खालीलप्रमाणे अनुदान संस्थांना अनुज्ञेय आहे.

| लाभार्थी | अनुज्ञेय आहार खर्च (रु.) | तयार आहाराचा पुरवठा करणाऱ्या यंत्रणेस अदा करावयाचे अनुदान (रु.) |
|---|---|---|
| प्राथमिक (इयत्त १ ली ते ५ वी) | ५.४५ | ५.४५ |
| उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | ८.१७ | ८.१७ |

सन २०२३-२४ मध्ये प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेचा वार्षिक कार्यक्रम व अंदाजपत्रक (AWPB) नुसार इयत्ता १ ली ते ५ वी एकूण विद्यार्थी संख्या ६१,२८,००८ आणि इयत्ता ६ वी ते ८ वी एकूण विद्यार्थी संख्या ४०,२२,३९७ आहे.

योजनेंतर्गत सद्य:स्थितीत फोर्टिफाईड तांदूळ केंद्र शासनाच्या भारतीय अन्न महामंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात येतो. भारतीय अन्न महामंडळास तांदुळाची किंमत अदा करण्याकरिता केंद्र शासन राज्यास निधी उपलब्ध करून देते.

शासन निर्णय दिनांक २ फेब्रुवारी २०११ अन्वये विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने स्वयंपाकी तथा मदतनीस यांची नियुक्ती करण्यात येते. दिनांक ९ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार केंद्र शासन प्रतिस्वयंपाकी तथा मदतनीस यांना केंद्र हिस्सा दरमाह ६०० रुपये अनुदान देते, तर राज्य शासन १९०० रुपये असे एकूण २५०० रुपये एवढे अनुदान देते. हे अनुदान वर्षाला १० महिन्यांसाठी देण्यात येते.

४. आतापर्यंतची प्रगती

**अर्थसंकल्पीय अंदाज -- २०२४-२५**

**केंद्र हिस्सा** **प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना** ( रुपये हजारांत )

| अ. क्र. | खर्चाचा प्रकार | अर्थसंकल्पीय तरतूद २०२२-२३ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | सन २०२३-२४ करिता अंदाजे (चारमाही सुधारित अंदाजाप्रमाणे) | सन २०२४-२५ करिता अर्थसंकल्पीय अंदाजे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अन्न शिजवून देणे | ७०,१३,२०२ | ७०,८८,७९० | ७९,९१,७७७ | ६२,७०,५६१ |
| २ | व्यवस्थापन संनियंत्रण आणि मूल्यमापन (MME). | २,६४,९४० | २,४२,६०० | ३,०२,२२९ | २,४६,७९९ |
| ३ | तांदुळाची वाहतूक | २,९५,०५७ | १,९५,२०३ | २,३५,५२४ | १०,३४,०७६ |
| ४ | तांदुळाची किंमत | ७,०६,०२६ | ६,५०,६७७ | ७,३१,३१९ | ७,८४,८७१ |
| ५ | स्वयंपाकी / मदतनीस मानधन | १०,६२,११३ | १०,५१,२०६ | १२,९०,२५३ | १०,५१,२०६ |
| ६ | नावीन्यपूर्ण उपक्रम | ४,५२,९६४ | ५,२१,५२४ | ५,२१,५२४ | ४,६९,३७६ |
| | **एकूण** | **९७,९४,३०२** | **९,७५,०००** | **१,१०,७२,६२६** | **९८,५६,८८९** |

**राज्य हिस्सा**

| अ. क्र. | खर्चाचा प्रकार | अर्थसंकल्पीय तरतूद २०२२-२३ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | सन २०२३-२४ करिता अंदाजे (चारमाही सुधारित अंदाजाप्रमाणे) | सन २०२४-२५ करिता अर्थसंकल्पीय अंदाजे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अन्न शिजवून देणे | ३५,९४,०३६ | ३७,६१,६५३ | ४७,२८,२५१ | ४८,४१,९०५ |
| २ | तांदुळाची वाहतूक | ५,८८,७१५ | ६,१६,१७२ | ५,२६,६९२ | १,२६,२५२ |
| ३ | स्वयंपाकी / मदतनीस मानधन | १९,६२,९७५ | २०,५४,५२४ | ३३,२८,८१९ | १५,७६,८०९ |
| ४ | मुख्याध्यापक / शिक्षक मानधन | ० | ० | ० | ३,३१,१९० |
| ५ | नावीन्यपूर्ण उपक्रम | ६४,६३७ | ६७,६५२ | ३,३१,१९० | ३,४५,९८५ |
| | **एकूण** | **६२,१०,३६३** | **६५,००,००१** | **८९,१४,९५३** | **७२,२२,१४१** |

५. आतापर्यंतची प्रगती

| अ. क्र. | वर्ष | | इ. १ ली ते ५ वी लाभार्थी | इ. ६ वी ते ८ वी लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ |
| १ | २०२१-२२ प्रत्यक्ष | .. | ५९,९५,००० | ३९,२०,००० |
| २ | २०२२-२३ प्रत्यक्ष | .. | ६१,३६,८१८ | ४१,०१,९६० |
| ३ | २०२३-२४ अपेक्षित | .. | ६२,९५,१७६ | ४२,७१,४०८ |
| ४ | २०२४-२५ अंदाजित | .. | ६१,२८,००८ | ४०,२२,३९७ |

६. योजनेतील अडचणी

(१) राज्यामध्ये उद्‌भवलेली पूर परिस्थिती, चक्रीवादळे व इतर तत्सम नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त स्वयंपाकगृहांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करणे अथवा नवीन बांधकाम करणे.

(२) आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळांना अग्निशमन यंत्र, प्रथमोपचार पेटी व इतर सुरक्षेचे साहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक वाटते.

(३) अन्न शिजवून देण्यासाठी, पिण्यासाठी, स्वच्छतेसाठी पाण्याची आवश्यकता भासते. तथापि, बऱ्याचशा भागामध्ये पाणीपुरवठा नसल्यामुळे पाणी उपलब्ध होत नाही.

| | | |
|---|---|---|
| ७. | योजनेत कोणते बदल आवश्यक आहेत ? | शासन निर्णय क्रमांक शापोआ-२००९/प्र.क्र.१३६/प्रशि-४, दि. १८ जून २००९ अन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत.<br>(अ) स्वयंपाकी/मदतनीस मानधन वाढ.<br>(आ) विविध स्तरावरील समित्यांची पुनर्रचना करणे.<br>(इ) नागरी भागामध्ये राबविण्यात आलेली केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीच्या धर्तीवर ग्रामीण भागामध्ये क्लस्टर किचन राबविणे.<br>(ई) आदिवासी जिल्हे व कुपोषणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना नियमित आहाराबरोबरच अधिकचे पोषण.<br>(ह) शाळा व्यवस्थापन समितीबरोबरच माता व पालकांचा योजनेच्या दैनंदिन अंमलबजावणीमध्येसहभाग वाढविण्याकरिता धोरण ठरविणे. |
| ८. | पूरक आहार | योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना नियमित आहारासोबत आठवड्यातून एकदा अंडी/केळी देण्यात येत आहेत. |

---

## राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना

१. योजनेचे नाव .. राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना.

२. योजनेचा उद्देश व स्वरूप .. विद्यार्थ्यांना अपघातामुळे पोहोचलेल्या क्षतीची काही प्रमाणात नुकसान भरपाई देण्याचेदृष्टीने तसेच त्यांना सुरक्षा कवच देण्याकरिता राज्यातील इयत्ता १ ली पासून उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना राजीव गांधी अपघात योजना शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट २००३ पासून राज्यामध्ये लागू करण्यात आली. विद्यार्थ्यास अपघात झाल्यानंतर दाव्याची रक्कम अदा करावयाची कार्यपद्धती शासन परिपत्रक दिनांक १ ऑक्टोबर २००३ मध्ये विशद करण्यात आली आहे. तथापि, या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर दिनांक ११ जुलै २०११ च्या शासन निर्णयान्वये सदर योजना राज्यामध्ये सुधारित स्वरूपात राबविण्याबाबतचे शासन आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या योजनेअंतर्गत दिनांक २७ ऑगस्ट २०१० पासून २६ ऑगस्ट २०१२ पर्यंतच्या दाव्यांचा समावेश करण्यात आला होता.

शासनाने शासन निर्णय दिनांक १ ऑक्टोबर २०१३ अन्वये सदर योजना सन २०१२-२०१३ पासून नियमित स्वरूपात राबविण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. सदर शासन निर्णयान्वये इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या मुला-मुलींसाठी सदर योजना सन २०१३-१४ पासून नियमित राबविण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सुधारित योजनेअंतर्गत प्रस्ताव निकाली काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात खालीलप्रमाणे समिती गठित करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत.

**शासन निर्णय २१ जून २०२२ अन्वये जिल्हास्तरीय समिती --**

| | | |
|---|---|---|
| १. जिल्हाधिकारी | .. | अध्यक्ष |
| २. मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)/ महापालिका उपआयुक्त. | .. | सदस्य |
| ३. पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त | .. | सदस्य |
| ४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/प्रशासन अधिकारी (शिक्षण)/ शिक्षण निरीक्षक. | .. | सदस्य |
| ५. जिल्हा आरोग्य अधिकारी/सिव्हिल सर्जन/ सक्षम वैद्यकीय अधिकारी. | .. | सदस्य |
| ६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक)/ प्रशासन अधिकारी (शिक्षण). | .. | सदस्य |
| ७. शिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद/ शिक्षणाधिकारी (योजना), मुंबई. | .. | सदस्य सचिव |

वरील समितीसमोर इयत्ता १ ली ते ८ वी व ९ वी ते १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलां/मुलींकरिता प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी अनुक्रमे शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील. बृहन्मुंबईकरिता शिक्षण निरीक्षक यांनी प्रस्ताव समितीसमोर सादर करावेत. या योजनेअंतर्गत अनुदानाची रक्कम पुढील प्राधान्यक्रमानुसार अदा करण्याचे निर्देश आहेत.

१. विद्यार्थ्याची आई

२. विद्यार्थ्याची आई हयात नसल्यास वडील

३. विद्यार्थ्याचे आई/वडील हयात नसल्यास १८ वर्षांवरील भाऊ किंवा अविवाहित बहीण किंवा पालक.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.१५२/एस.डी.६, दि. २१ जून २०२२ नुसार सदर योजनेमध्ये विद्यार्थ्यांचा अपघात/जखमी झाल्यास अनुज्ञेय सानुग्रह अनुदान व त्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे खालीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | अपघाताची बाब | सानुग्रह अनुदानाची रक्कम रुपये | प्रस्तावासोबत ३ प्रतीत सादर करावयाची कागदपत्रे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | विद्यार्थ्याचा अपघाती मृत्यू | रु. १,५०,००० | १. प्रथम खबरी अहवाल<br>२. स्थळ पंचनामा<br>३. इन्क्वेस्ट पंचनामा<br>४. सिव्हिल सर्जन यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले मयत विद्यार्थ्यांच्या बाबतीत शवविच्छेदन अहवाल किंवा मृत्यू दाखला (सिव्हिल सर्जन यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले). |
| २ | अपघातामुळे कायमचे अपंगत्व (२ अवयव/दोन डोळे किंवा १ अवयव व १ डोळा निकामी). | रु. १,००,००० | अपंगत्वाच्या कारणाबाबतचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र सिव्हिल सर्जन यांच्या प्रतिस्वाक्षरीसह (कायम अपंगत्वाचे प्रमाणपत्र). |
| ३ | अपघातामुळे कायमचे अपंगत्व (१ अवयव किंवा १ डोळा कायम निकामी). | रु. ७५,००० | अपंगत्वाच्या कारणाबाबतचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र सिव्हिल सर्जन यांच्या प्रतिस्वाक्षरीसह (कायम अपंगत्वाचे प्रमाणपत्र). |
| ४ | विद्यार्थ्यास अपघातामुळे शस्त्रक्रिया करावी लागल्यास. | प्रत्यक्ष हॉस्पिटलचा खर्च किंवा जास्तीत जास्त रु. १,००,००० | शस्त्रक्रियेबाबतचे हॉस्पिटलचे प्रमाणपत्र सिव्हिल सर्जन यांच्या प्रतिस्वाक्षरीसह. |
| ५ | विद्यार्थी आजारी पडून सर्पदंशाने किंवा पोहताना मृत्यू झाल्यास. | रु. १,५०,००० | सिव्हिल सर्जन यांच्या प्रतिस्वाक्षरीत केलेले मयत विद्यार्थ्याच्या बाबतीत शवविच्छेदन अहवाल किंवा मृत्यू दाखला. |
| ६ | विद्यार्थी कोणत्या कारणाने जखमी झाल्यास (क्रीडा स्पर्धेत खेळताना, शाळेतील जड वस्तू पडून, आगीमुळे, विजेचा धक्का, वीज अंगावर पडून). | प्रत्यक्ष हॉस्पिटलचा खर्च किंवा जास्तीत जास्त रु. १,००,००० | हॉस्पिटलचे उपचाराबाबतचे प्रमाणपत्र सिव्हिल सर्जन यांच्या प्रतिस्वाक्षरीसह. |

३. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. सन २०२१-२०२२ साठी या योजनेअंतर्गत एकूण रुपये ५,००,००,००० (रुपये पाच कोटी फक्त) एवढी तरतूद प्राप्त झाली असून जिल्ह्यांकडील मागणीनुसार रुपये ५,००,००,००० तरतूद वितरीत करण्यात आली आहे.

४. योजनेची व्याप्ती .. राज्यभर.

| वर्ष | | सानुग्रह अनुदानाची रक्कम (रुपये हजारात) |
|---|---|---|
| २०१९-२० प्रत्यक्ष | .. | ३५,६१६ |
| २०२०-२१ प्रत्यक्ष | .. | ३५,८५० |
| २०२१-२२ प्रत्यक्ष | .. | ५०,००० |
| २०२२-२३ प्रत्यक्ष | .. | १५,३६५ |
| २०२३-२४ अपेक्षित | .. | १,२०,००० |
| २०२४-२५ अंदाजित | .. | १,२०,००० |

५. निष्कर्ष, विश्लेषण, फलनिश्चिती .. सदर योजना राज्यातील १ ली ते १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आहे.

---

## सर्वशिक्षा अभियान

वयोगट तीन ते अठरा वर्षे (पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक म्हणजेच इयत्ता १२ वी पर्यंतच्या मुलांच्या शिक्षणासाठी) असणाऱ्या मुलांना गुणवत्तापूर्ण व २१ व्या शतकातील कौशल्ये अंगीकृत करणारे शिक्षण प्राप्त होण्यासाठी सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या पूर्वाश्रमीच्या (Erstwhile) योजना एकत्र करून शालेय शिक्षणासाठी एकात्मिक योजना म्हणून समग्र शिक्षा ही केंद्रपुरस्कृत योजना सन २०२०-२१ पासून भारत सरकारने सुरू केली आहे.

## समग्र शिक्षा

सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या पूर्वाश्रमीच्या (Erstwhile) योजना एकत्र करून शालेय शिक्षणासाठी एकात्मिक योजना म्हणून समग्र शिक्षा ही केंद्रपुरस्कृत योजना सन २०२०-२१ पासून भारत सरकारने सुरू केली आहे.

भारत सरकारने समग्र शिक्षा ही योजना दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२६ कालावधीसाठी पुढे सुरु ठेवण्यास मान्यता दिली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील शिफारशींच्या अनुषंगाने समग्र शिक्षा योजनेची पुनर्रचना करण्यात आली असून यामध्ये नवीन उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे, तसेच पूर्वीच्या आर्थिक निकषांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**समग्र शिक्षा योजनेची उद्दिष्टे**

(१) गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि मुलांच्या अध्ययन फलनिष्पत्तीमध्ये वाढ करणे. (Provision of Quality Education and Enhancing Learning Outcomes of Students).

(२) शालेय शिक्षणातील सामाजिक व लिंग दरी कमी करणे. (Bridging Social and Gender Gaps in School Education).

(३) शालेय शिक्षणात सर्व स्तरावर समता व समावेशन राहील याची खात्री करणे. (Ensuring Equity and Inclusion at all levels of School Education).

(४) शालेय किमान मानकांची पूर्तता होईल याची खात्री करणे. (Ensuring Minimum Standards in Schooling Provisions)

(५) व्यावसायिक शिक्षणास प्रोत्साहन देणे. (Promoting Vocationalization of Education).

(६) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची अंमलबजावणी करणे. (Implementation of Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009).

(७) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या शिफारसींची अंमलबजावणी करणे. [Support States and UTs in implementing the recommendations of the National Education Policy, 2020 (NEP 2020)].

(८) पूर्वप्राथमिक शिक्षणावर भर [Focus on Early Childhood Care and Education].

(९) मुलभूत साक्षरता व संख्याज्ञानावर भर [Emphasis on Foundational Literacy and Numeracy].

(१०) विद्यार्थ्यांना २१ व्या शतकातील कौशल्ये प्राप्त होण्यासाठी समग्र, एकात्मिक, समावेशक आणि कृतीयुक्त अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रावर भर देणे [Thrust on Holistic, Integrated, Inclusive and activity based Curriculum and Pedagogy to impart 21st century skills among the students].

(११) शिक्षक प्रशिक्षणासाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) राज्य शैक्षणिक संस्था आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डीआयईटी) यांचे नोडल एजन्सी म्हणून सक्षमीकरण व उच्चीकरण करणे.

[Strengthening and up-gradation of State Councils for Educational Research and Training (SCERTs) / State Institutes of Education and District Institutes for Education and Training (DIET) as nodal agencies for Teacher Training].

**लाभार्थी घटक**

- समग्र शिक्षा ही योजना प्रामुख्याने शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा व त्यामधील मुलांसाठी लागू.
- तथापि, मोफत पाठ्यपुस्तके, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी बाबी खाजगी अनुदानित शाळांमधील मुले व शिक्षक यांचेसाठी लागू राहतील.
- तर शिक्षक हक्क कायद्यातील कलम १२ *(१) (C)* नुसार २५ टक्के आरक्षण या तरतुदीअंतर्गत खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेशित बालकांच्या शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल.
- सदर तरतुदीचे लाभ हे भारत सरकारकडून मंजूर होणाऱ्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक आणि निधीच्या उपलब्धतेच्या मर्यादेच्या अधीन राहून देण्यात येतील.

**योजनेची अंमलबजावणी**

- शैक्षणिकदृष्ट्या मागास गट, LWE Affected District, विशेष लक्ष केंद्रित जिल्हे आणि आकांक्षित जिल्ह्यांच्या शैक्षणिक विकास साधण्यावर भर.
- समग्र शिक्षा योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी भारत सरकारद्वारा अंमलबजावणी आराखडा व कार्यक्रम व वित्तीय निकष तयार.
- राज्याने तयार केलेल्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकास भारत सरकार पातळीवरून मूल्यांकन करून मंजुरी.
- समग्र शिक्षा योजनेच्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक निर्मिती, निधीची उपलब्धता, निधी वर्ग करणे, त्याचा विनियोग करणे, कार्यक्रमाची अंमलबजावणी, समन्वय व सनियंत्रणाची जबाबदारी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या स्वायत्त संस्थेची.

★ **योजनेस आर्थिक साहाय्य -** या योजनेकरिता केंद्र व राज्याच्या निधीच्या हिश्श्याचे प्रमाण ६०:४०.

समग्र शिक्षा योजनेच्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये खालीलप्रमाणे आर्थिक तरतूद करण्यात आली असून मंजूर तरतूद व खर्च तपशील खालीलप्रमाणे —

(रु. कोटी)

| क्र. | सन | मंजूर वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक | खर्च |
|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | २८२५.४६ | १३६०.४४ |
| २ | २०२०-२१ | १८०७.४९ | १०५९.२९ |
| ३ | २०२१-२२ | १८०६.३१ | ८३०.५६ |
| ४ | २०२२-२३ | २३८१.३१ | १६३७.८१ |
| ५ | २०२३-२४ | ३०७१.५९ | १०२६.७८* (नोव्हेंबर २०२३ अखेर). |

## समग्र शिक्षा सन २०२३-२४ संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे

### Elementary Education

(Rs. In Lakhs)

| Major Component | Intervention (Elementary Education) | Spillover | Fresh | | Total |
|---|---|---|---|---|---|
| | | | Recurring | Non Recurring | |
| Access and Retention | Opening of New / Upgraded Schools | 51.84 | 0.00 | 0.00 | 51.84 |
| | Netaji Subhash Chandra Bose Avasiya Vidyalay | 186.76 | 594.51 | 2125.50 | 2906.77 |
| | Netaji Subhash Chandra Bose Avasiya Vidyalay (Hostel) | 134.95 | 245.40 | 253.50 | 633.85 |
| | Strengthening of Existing Schools (upto Highest Class VIII)-NR. | 11886.84 | 0.00 | 5764.30 | 17651.14 |
| | Rejunevation of Basic Infrastructure and Overal Cleanliness of Government Schools (NR). | 44273.54 | 0.00 | 0.00 | 44273.54 |
| | Transport and Escort Facilities | 0.00 | 963.96 | 0.00 | 963.96 |
| RTE Entitlements | Free Uniforms | 0.00 | 22428.79 | 0.00 | 22428.79 |
| | Free Textbooks | 0.00 | 33410.62 | 0.00 | 33410.62 |
| | Reimbursement towards expenditure incurred for 25% of Admission under 12 (1) (c) RTE Act. | 0.00 | 7675.43 | 0.00 | 7675.43 |
| | Special Training of Out of School Children (OoSC) | 0.00 | 2500.11 | 0.00 | 2500.11 |
| | Community Mobilization | 0.00 | 954.53 | 0.00 | 954.53 |
| Quality Interventions | LEP | 0.00 | 1939.78 | 0.00 | 1939.78 |
| | Composite School Grant | 0.00 | 17276.70 | 0.00 | 17276.70 |
| | Library Grants | 0.00 | 995.77 | 0.00 | 955.77 |
| | Rashtriya Aavishkar Abhiyan | 0.00 | 299.00 | 0.00 | 299.00 |
| | ICT and Digital Initiatives-Digital Hardware and Software (upto Highest Class VIII)-NR | 10108.39 | 2146.46 | 396.80 | 12651.65 |
| | Provision for BRC/URC | 0.00 | 13739.92 | 0.00 | 13739.92 |
| | Provision for CRC | 0.00 | 925.50 | 0.00 | 925.50 |
| | Rangotsav | 0.00 | 5.00 | 0.00 | 5.00 |
| | Innovation Project-NR | 1030.00 | 0.00 | 5395.20 | 6425.20 |
| | Project Innovation-(Rec)-(State Specific) (Elementary) | 0.00 | 305.41 | 0.00 | 305.41 |
| | Innovation Project-Recurring | 0.00 | 263.06 | 0.00 | 263.06 |
| Early Childhood Care and Education (ECCE) | Pre Primary | 2928.00 | 1767.56 | 0.00 | 4695.56 |
| Nipun Bharat Mission | Foundational Literacy and Numeracy (NIPUN) | 0.00 | 20085.86 | 0.00 | 20085.86 |
| Teacher Training | In Service Training (Elementary) | 0.00 | 1253.25 | 0.00 | 1253.25 |
| Salary of Teachers | Financial Support for Teacher Salary | 0.00 | 7984.11 | 0.00 | 7784.11 |
| Gender and Equity | Kasturba Gandhi Balika Vidyalaya (KGBVs) | 192.97 | 3425.24 | 162.50 | 3780.71 |
| | Rani Laxmibai Atma Raksha Prashikshan (upto Class VIII) | 0.00 | 3063.15 | 0.00 | 3063.15 |
| | Special Project for Equity | 2534.70 | 0.00 | 1215.45 | 3750.15 |
| Inclusive Education | Provision for Children with Special Needs (CWSN) | 0.00 | 10952.95 | 0.00 | 10952.95 |
| Sports and Physical Education | Sports and Physical Education (upto Highest Class VIII) | 0.00 | 4212.80 | 0.00 | 4212.80 |
| Monitoring of the Scheme | Monitoring Information System (MIS) | 0.00 | 795.40 | 0.00 | 795.40 |
| Program Management | Program Management | 0.00 | 8403.33 | 0.00 | 8403.33 |
| | **Elementary Education - Grand Total** | **73327.99** | **168613.59** | **15313.25** | **257254.83** |

(Rs. In Lakhs)

| Major Component | Intervention (Secondary Education) | Spillover | Fresh Recurring | Fresh Non Recurring | Total |
|---|---|---|---|---|---|
| Access and Retention | Netaji Subhash Chandra Bose Avasiya Vidyalay | 3.77 | 73.41 | 0.00 | 77.18 |
| | Netaji Subhash Chandra Bose Avasiya Vidyalay (Hostel) | 0.00 | 25.62 | 250.00 | 275.62 |
| | Strengthening of Existing Schools - NR | 2762.71 | 0.00 | 1155.50 | 3918.21 |
| | Rejunevation of Basic Infracture and Overal Cleanliness of Government Schools (NR). | 1656.78 | 0.00 | 0.00 | 1656.78 |
| | Transport and Escort Facilities | 0.00 | 25.02 | 0.00 | 25.02 |
| RTE Entitlements | Community Mobilization | 0.00 | 27.89 | 0.00 | 27.89 |
| | Training of SMDC | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| Quality Interventions | LEP | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| | Composite School Grant | 0.00 | 1116.50 | 0.00 | 1116.50 |
| | Library Grants | 0.00 | 59.22 | 0.00 | 59.22 |
| | Rashtriya Aavishkar Abhiyan | 0.00 | 378.45 | 0.00 | 378.45 |
| | ICT and Digital Initiatives-Digital Hardware and Software (upto Highest Class XII)-NR | 7260.55 | 3798.74 | 2236.00 | 13295.29 |
| | Innovation Project - Recurring | 0.00 | 30.90 | 0.00 | 30.90 |
| | Project Innovation - (NR) - (State Specific) | 0.00 | 0.00 | 4910.00 | 4910.00 |
| | Project Kal Ustav | 0.00 | 12.00 | 0.00 | 12.00 |
| | Band Competition (Secondary and Sr. Secondary) | 0.00 | 5.00 | 0.00 | 5.00 |
| | In Service Training (IX-XII) | 0.00 | 1611.55 | 0.00 | 1611.55 |
| | School Leadership Training of Head Teachers/ Principals/RPs (Secondary). | 0.00 | 150.00 | 0.00 | 150.00 |
| Gender and Equity | Kasturba Gandhi Balika Vidyalaya (KGBVs) | 993.16 | 1667.09 | 0.00 | 2660.25 |
| | Rani Laxmibai Atma Raksha Prashikshan (upto Class X or XII). | 0.00 | 267.00 | 0.00 | 267.00 |
| | Special Project for Equity (Non Recurring) (Secondary) | 447.30 | 0.00 | 15.00 | 462.30 |
| Inclusive Eduacation | Provision for Children with Special Needs (CWSN) | 799.66 | 5057.91 | 0.00 | 5857.57 |
| Vocational Eduacation | Introduction of Vocational Education at Secondary and Higher Secondary. | 443.85 | 6869.33 | 266.63 | 7579.81 |
| Sports and Physical Education | Sports and Physical Education (upto Highest Class XII) | 0.00 | 464.75 | 0.00 | 464.75 |
| | **Secondary Education - Grand Total** | **14367.78** | **21640.38** | **8833.13** | **44841.29** |

(Rs. In Lakhs)

| Major Component | Intervention (Teacher Education) | Spillover | Fresh Recurring | Fresh Non Recurring | Total |
|---|---|---|---|---|---|
| Teacher Education | Civil Work : Strengthening of physical infrastructure in TEI (SCERTs/DIETs/BITEs) | 643.51 | 0.00 | 183.00 | 826.51 |
| | Financial Support for Teacher Educators (TEIs) | 0.00 | 2734.27 | 0.00 | 2734.27 |
| | Equipment's in Teacher Education Institutions | 172.37 | 0.00 | 0.00 | 172.37 |
| | Program and Activities including Faculty Development of Teachers Education. | 0.00 | 728.00 | 0.00 | 728.00 |
| | Technology Support to TEIs | 161.08 | 21.60 | 0.00 | 182.68 |
| | Annual Grant for TEIs | 0.00 | 695.00 | 0.00 | 695.00 |
| | **Teachers Education - Grand Total** | **976.96** | **4178.87** | **183.00** | **5338.83** |
| | **Grand Total (Ele + Sec + TE)** | **88672.73** | **194432.84** | **24329.38** | **307434.95** |

**शैक्षणिक सद्य:स्थिती**

| अ.क्र. | प्रकार | शाळा | विद्यार्थी संख्या | शिक्षक | विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| १ | शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था | ६५,४३१ (६०.३३%) | ५४,९१,१०० (१२.८८%) | २,३५,१४३ (३१.६७%) | २३.३५ |
| २ | खाजगी अनुदानित | २३,९४८ (२२.०८%) | ९७,६९,३४५ (४६.०४%) | २,८०,९६२ (३७.८४%) | ३४.७७ |
| ३ | खाजगी विनाअनुदानित | ४,३९३ (४.०५%) | ८,८६,०९१ (४.१८%) | ३४,८१६ (४.६९%) | २५.४५ |
| ४ | स्वयं अर्थसाहाय्यित | १४,६८० (१३.५४%) | ५०,७३,५६७ (२३.९१%) | १,९१,६१० (२५.८०%) | २६.४८ |
| | **एकूण** | **१,०८,४५२** | **२,१२,२०,१०३** | **७,४२,५३१** | **२८.५८** |

**कार्यक्षमता प्रतवारी दर्शके (PGI-Performance Grading Index) :** शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करणे, शाळांच्या दर्जाचे मूल्यमापन करणे, त्यानुसार शाळांना निधी उपलब्ध करणे आणि या सुधारणांची निधीच्या उपलब्धतेशी जोडणी करण्यासाठी भारत सरकारने PGI तयार केले असून यामधील दर्शकांवर (Indicators) आधारित देशातील सर्व ३६ राज्यांचे मूल्यांकन करण्यात येत आहे. भारत सरकारकडून राज्यनिहाय शैक्षणिक निर्देशांक काढण्याकरिता विकसित केलेली PGI ऑनलाईन प्रणाली राज्यात ७३ दर्शकांनुसार शैक्षणिक निर्देशांक ठरविण्यात येत असून याकरिता एकूण १००० गुण आहेत. जिल्ह्याच्या ८३ दर्शकांनुसार शैक्षणिक निर्देशांक ठरविण्यात येत असून, याकरिता एकूण ६०० गुण आहेत. शैक्षणिक निर्देशांकाच्या आधारे भारत सरकारकडून विविध योजनांकरिता निधी मंजूर करण्यात येतो. शैक्षणिक निर्देशांक पुढील माहितीच्या आधारे काढण्यात येतो.

1. NAS-National Achievement Survey
2. U-DISE Plus
3. SHAGUN Portal
4. MDM Portal
5. Samagra Shiksha A WP and B
6. FIT INDIA Program
7. Ek Bharat Shreshth Bharat
8. Shala Shidhi
9. PFMS
10. Secretary / SPD / EO / DIET / SCERT Post Information
11. PAVITRA Portal
12. Nagrik Kartavya Palan Abhiyan / Constitution day
13. Swachh Bharat and Jal Suraksha
14. School Safety and Child Protection
15. Digital Learning
16. Governance Processes
17. Attendance Monitoring System
18. School leadership Develoment

| Year | Categoray 1 | | | | Categoray 2 | | Total | Diff. (1000 State Score) | Rank |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Outcomes | | | | Governance and Management | | Weight (1000) | | |
| | Weight (640) | | | | Weight (360) | | | | |
| | Domain 1 | Domain 2 | Domain 3 | Domain 4 | Domain 5 | Domain 6 | | | |
| | Learning Outcomes and Quality | Access | Infrastructure and Facilities | Equity | Governance Processes | Teacher Education and Teaching | | | |
| | Weight (180) | Weight (80) | Weight (150) | Weight (230) | Weight (360) | | | | |
| | 180 | 80 | 150 | 230 | 360 | | 1000 | | |
| 2017-18 | 144 | 76 | 113 | 212 | 155 | | 700 | 300 | 19 |
| 2018-19 | 144 | 76 | 126 | 210 | 246 | | 802 | 198 | 5 |
| 2019-20 | 144 | 76 | 126 | 224 | 299 | | 869 | 131 | 9 |
| 2020-21 | 144 | 76 | 143 | 225 | 340 | | 928 | 72 | 1 |
| | Weight (240) | Weight (80) | Weight (190) | Weight (260) | Weight (130) | Weight (100) | 1000 | | |
| 2021-22 | 65.8 | 64.7 | 73.4 | 233.4 | 72.2 | 73.6 | 583.2 | 416.8 | 8 |
| Diff(2020-21 and 2021-22) | 78.2 | 11.3 | 69.6 | -8.4 | 194 | | | | |
| Diff(2019-20 and 2020-21) | 0 | 0 | 17 | 1 | 41 | | 59 | | |
| % of Weight 2017-18 | 80.00% | 95.00% | 75.33% | 92.17% | 43.06% | | 70.00% | | |
| % of Weight 2018-19 | 80.00% | 95.00% | 84.00% | 91.30% | 68.33% | | 80.20% | | |
| % of Weight 2019-20 | 80.00% | 95.00% | 84.00% | 97.39% | 83.06% | | 86.90% | | |
| % of Weight 2020-21 | 80.00% | 95.00% | 95.33% | 97.83% | 94.44% | | 92.80% | | |
| % of Weight 2021-22 | 27.00% | 80.87% | 38.63% | 89.76% | 55.53% | 73.60% | 58.32% | | |

**समग्र शिक्षा योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये मंजूर उपक्रम**

**✶ शालेय सुविधा व टिकवणूक**

**(१) नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळा**

- **लाभार्थी :** विखुरलेल्या वाड्या, वस्त्या, बेघर, अनाथ, माता-पित्याचे संरक्षण नसलेली बालके, रस्त्यावर / प्लॅटफॉर्मवर /रेल्वेस्थानकामध्ये राहणारी तसेच दुर्बल घटक व वंचित गटातील विशेषत: शहरी भागातील शाळाबाह्य बालकांसाठी निवासी शाळा सुरू करण्याची तरतूद.
- सन २०२३-२४ पासून निवासी शाळा नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळा या नावाने कार्यान्वित आहेत.
- नंदुरबार हा राज्यातील विशेष लक्षवेधी जिल्हा. तोरणमाळ या ग्रामपंचायतीमधील गावे विखुरलेल्या वाड्यावस्त्यांमध्ये असल्याने शाळेचे वस्तीपासूनचे अंतर अधिक. शाळेचे अंतर, डोंगराळ भाग, अपुरी परिवहन सुविधा, बांधकाम साहित्याच्या दळणवळणासाठी सुविधा उपलब्ध नसल्याने या भागातील २९ शाळांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास अडचणी.
- नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील 'तोरणमाळ केंद्रा'करिता सन २०१८-१९ मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण १,६०० विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध करण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळा मंजूर.
- पहिला टप्पा ३०० विद्यार्थी (सन २०१७-१८), दुसऱ्या टप्पा ५०० विद्यार्थी, (सन २०१९-२० व तिसरा टप्पा ८०० विद्यार्थी (सन २०१९-२०).
- डावी कडवी विचारसरणीमध्ये (LWE) गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्याकरिता नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळा बांधकाम पूर्ण होऊन सन २०२३-२४ साठी १०० मुलांसाठी तरतूद मंजूर.
- नंदुरबार व गडचिरोली या दोन जिल्ह्यांकरिता नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळेस अनावर्ती व आवर्ती तरतूद मंजूर.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये नमूद केल्यानुसार माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे व वय वर्षे १४ ते १८ मधील सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षण पूर्ण मिळणे अभिप्रेत आहे. सन २०२३-२४ करिता नंदुरबार येथील नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळेमध्ये इयत्ता ९ वी ते १० चे वर्ग सुरू करण्याच्या अनुषंगाने १७६ विद्यार्थ्यांकरिता अनावर्ती व आवर्ती तरतूद मंजूर.

- **निधीची उपलब्धता :** राज्यस्तरावरून नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळेस.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** जिल्हा स्तर.

**(२) नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतिगृह**

- **लाभार्थी :** विखुरलेल्या वाड्या, वस्त्या, बेघर, अनाथ, माता-पित्याचे संरक्षण नसलेली बालके, रस्त्यावर / प्लॅटफॉर्मवर /रेल्वेस्थानकामध्ये राहणारी तसेच दुर्बल घटक व वंचित गटातील विशेषत: शहरी भागातील शाळाबाह्य बालकांसाठी निवासी वसतिगृह सुरू करण्याची तरतूद सन २०२३-२४ पासून निवासी वसतिगृह नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतिगृह या नावाने कार्यान्वित आहेत.
- सन २०१२-१३ मध्ये ७ नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतिगृह राज्यास मंजूर. यामध्ये ४ जिल्हा परिषदा गडचिरोली (भामरागड), बुलढाणा, गोंदिया व नांदेड व ३ महानगरपालिकांसाठी (नाशिक, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली) आवर्ती व अनावर्ती मंजुरी.
- डावी कडवी विचारसरणीमध्ये (LWE) गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्याकरिता एका नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतिगृहाकरिता आवर्ती व अनावर्ती तरतूद १०० मुलांसाठी मंजूर.
- ७ नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतिगृहाकरिता आवर्ती व अनावर्ती तसेच एटापल्ली येथील एका नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतिगृहाकरिता अनावर्ती याप्रमाणे ८ नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी वसतिगृहाकरिता तरतूद मंजूर.
- **प्रत्येक वसतिगृहाची क्षमता** ५० बालकांसाठी.
- **निधीची उपलब्धता :** राज्यस्तरावरून जिल्हास्तर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** जिल्हास्तर.

**(३) शाळांचे सक्षमीकरण करणे (बांधकाम)**

- नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळा
- शाळांना अतिरिक्त वर्ग खोली
- शाळांना मुलांचे व मुलींचे स्वच्छतागृह
- सोलार पॅनल.
- उच्च प्राथमिक जीर्ण इमारत दुरुस्ती.
- मोठ्या प्रमाणातील दुरुस्ती.
- विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय कक्ष, संगणक कक्ष, भौतिकशास्त्र प्रयोगशाळा, रसायनशास्त्र व जीवशास्त्र प्रयोगशाळा, कला/शिल्पकला कक्ष, दिव्यांग बालकांकरिता स्वच्छतागृह.
- **निधीची उपलब्धता :** राज्यस्तरावरून जिल्हास्तर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** शाळा व्यवस्थापन समिती.

**(४) परिवहन / मदतनीस सुविधा**

- **लाभार्थी :** दुर्गम भागातील विखुरलेल्या वाड्या-वस्त्यांमध्ये नवीन शाळा सुरू करण्यास अडचणी येत असेल, तसेच ज्या ठिकाणी नवीन शाळा उघडण्यास जागा उपलब्ध होत नाही (शाळा सुविधा उपलब्ध नाही) अशा ठिकाणची तसेच शहरी वंचित मुले / अनाथ मुले यांना नियमित शाळेत जाण्यासाठी सुविधा.
- शिक्षण हक्क कायदा, २००९, भाग-३, कलम ६ (३) *(१)* नुसार नजीकच्या शाळेच्या क्षेत्रामध्ये किंवा हद्दीच्या आत शाळा उपलब्ध नाही अशा वस्त्यांमधील प्राथमिक (६ ते १४ वर्षे) व माध्यमिक (१४ ते १८ वर्षे) वयोगटातील मुलांना मोफत परिवहन सुविधा.
- नजीकच्या प्राथमिक / उच्च प्राथमिक शाळेत जाण्या-येण्यासाठी एस. टी. बसची सोय अथवा मासिक एस. टी. पासची सोय ज्या ठिकाणी उपलब्ध नसेल तेथे अधिकृत खाजगी वाहनाची सुविधा पुरविण्यासाठी प्रती विद्यार्थी रुपये ६०० प्रमाणे १० महिन्यांकरिता प्रती विद्यार्थी रुपये ६,००० प्रमाणे तरतूद.
- १६,०६६ प्राथमिक व ४१७ माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांकरिता तरतूद मंजूर.
- **निधीची उपलब्धता :** राज्यस्तरावरून जिल्हा व महानगरपालिका स्तर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** शाळा व्यवस्थापन समिती.

## बांधकाम - प्राथमिक स्तर

(Rs. in Lakhs)

| Sr. No. | Activity | Spillover Total | | Fresh work | | Total Works | | Total Progress | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | No. of Works | Amount | No. of Works | Amount | No. of Works | Amount | Complete | In Progress | Not Started | Exp. |
| | **Elementry (I-VIII)** | Phy. | Fin. | Phy. | Fin. | Phy. | Fin. | Phy. | Phy. | Phy. | Fin. |
| 1 | Opening of New / Upgraded Schools | 108 | 51.84 | 0 | 0.00 | 108 | 51.84 | 108 | 0 | 0 | 0.00 |
| 2 | Additional Class room | 944 | 2275.67 | 55 | 742.5 | 999 | 3018.17 | 878 | 81 | 40 | 91.97 |
| 3 | Building less | 0 | 0.00 | 19 | 779.00 | 19 | 779.00 | 0 | 0 | 19 | 0.00 |
| 4 | Dilapidated | 0 | 0.00 | 19 | 256.50 | 19 | 256.50 | 0 | 0 | 19 | 0.00 |
| 5 | Boundary Wall | 1554 | 19297.31 | 0 | 0.00 | 1554 | 19297.31 | 0 | 0 | 1554 | 0.00 |
| 6 | Boys Toilet | 2086 | 10982.59 | 413 | 1858.50 | 2499 | 12841.09 | 9 | 318 | 2172 | 348.62 |
| 7 | Girls Toilet | 2196 | 9693.16 | 358 | 1611.00 | 2554 | 11304.16 | 545 | 608 | 1492 | 816.56 |
| 8 | Major Repair | 3133 | 1359.46 | 64 | 320.00 | 3197 | 13679.46 | 2562 | 540 | 95 | 6817.73 |
| 9 | Netaji Subhash Chandra Avasiya Vidyalaya (Resi. School) | 2 | 144.27 | 1 | 2100.00 | 3 | 2244.27 | 2 | 0 | 1 | 118.86 |
| 10 | Netaji Subhash Chandra Avasiya Vidyalaya (Resi. Hostel) | 1 | 127.95 | 0 | 0.00 | 1 | 127.95 | 1 | 0 | 0 | 96.35 |
| 11 | Electrification (Upto Class VIII) | 2372 | 1248.53 | 0 | 0.00 | 2372 | 1248.53 | 2234 | 1 | 137 | 99.36 |
| 12 | Staff Quarter | 7 | 238.43 | 2 | 322.00 | 9 | 560.43 | 0 | 7 | 0 | 0.00 |
| 13 | Solar Panel | 394 | 731.60 | 82 | 196.80 | 476 | 928.40 | 0 | 0 | 394 | 0.00 |
| 14 | KGBV Type-I | 9 | 185.04 | 0 | 0.00 | 9 | 185.04 | 8 | 1 | 0 | 98.61 |
| | **Total ..** | **12806** | **46335.85** | **1013** | **8186.30** | **13819** | **66522.15** | **6347** | **1556** | **5923** | **8488.06** |

## बांधकाम - माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर

| Sr. No. | Activity | Spillover Total | | Fresh work | | Total Works | | Total Progress | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | No. of Works | Amount | No. of Works | Amount | No. of Works | Amount | Complete | In Progress | Not Started | Exp. |
| | **Secondary (IX-X)** | | | | | | | | | | |
| 1 | Computer Room | 8 | 185.33 | 0 | 0 | 8 | 185 | 0 | 6 | 2 | 75.75 |
| 2 | Boys Toilets | 24 | 77.42 | 0 | 0 | 24 | 77 | 3 | 15 | 6 | 6.96 |
| 3 | Library Room | 20 | 470.24 | 0 | 0 | 20 | 470 | 0 | 15 | 5 | 50.44 |
| 4 | Lab Equipment (Sci. Lab) | 18 | 18.00 | 0 | 0 | 18 | 18 | 0 | 0 | 18 | 0.00 |
| 5 | Science Lab | 18 | 294.60 | 0 | 0 | 18 | 295 | 0 | 12 | 6 | 91.30 |
| 6 | Art Craft Room | 19 | 433.31 | 0 | 0 | 19 | 433 | 0 | 15 | 4 | 75.22 |
| 7 | Additional Classroom | 1 | 204.23 | 0 | 0 | 1 | 204 | 0 | 0 | 1 | 61.10 |
| 8 | Girls Total | 19 | 18.06 | 0 | 0 | 19 | 18 | 2 | 15 | 5 | 14.85 |
| | **Higher Secondary (XI-XII)** | | | | | | | | | | |
| 1 | Library Room | 7 | 164.36 | 4 | 110 | 11 | 274 | 0 | 6 | 1 | 45.04 |
| 2 | Science Lab | 23 | 430.10 | 14 | 301 | 37 | 731 | 0 | 17 | 6 | 61.02 |
| 3 | Additional Classroom | 15 | 266.96 | 11 | 236.5 | 26 | 503 | 0 | 12 | 3 | 58.10 |
| 4 | Art Craft Room | 8 | 150.10 | 7 | 150.5 | 15 | 301 | 0 | 7 | 1 | 65.45 |
| 5 | Lab Equipment | 15 | 15.00 | 14 | 14 | 29 | 29 | 0 | 0 | 15 | 0.00 |
| 6 | Computer Room | 0 | 0.00 | 1 | 21.5 | 1 | 22 | 0 | 1 | 0 | 0.00 |
| 7 | KGBV Type (New) | 4 | 993.16 | 0 | 0 | 4 | 993 | 1 | 1 | 2 | 0.00 |
| | **Total ..** | **199** | **3720.87** | **51** | **833.50** | | | **6** | **122** | **75** | **605.23** |
| **Total ..** | | **13005** | **50056.72** | | | | | **6353** | **1678** | **5998** | **9093.29** |

✶ **शिक्षण हक्क कायद्यानुसार मुलांना लाभ**

**(१) मोफत गणवेश :**

- **लाभार्थी :** इयत्ता १ ली ते ८ वीच्या शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील सर्व मुली, अनुसूचित जातीची मुले, अनुसूचित जमातीची मुले, दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले.
- रुपये ३०० प्रमाणे २ गणवेशांकरिता रुपये ६०० प्रमाणे तरतूद मंजूर.
- दिनांक ४ जून २०१९ रोजीच्या शासनाच्या नियोजन विभागाकडून निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार थेट लाभ हस्तांतरणाची (DBT) अट कायमस्वरूपी वगळून पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समिती (SMC) मार्फत गणवेश खरेदी करून विद्यार्थ्यांना देण्याबाबत मार्गदर्शन.
- **लाभार्थी :** ३७,३८,१३१.
- **निधीची उपलब्धता :** राज्यस्तरावरून जिल्हा व महानगरपालिका स्तर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** शाळा व्यवस्थापन समिती.

**(२) मोफत पाठ्यपुस्तक :**

- **लाभार्थी :** इयत्ता १ली ते ८ वीच्या शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व शासन अनुदानित शाळांतील सर्व विद्यार्थी.
- इयत्ता १ली ते ८ वीकरिता मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तेलगू, सिंधी-अरेबी, तामीळ व बंगाली माध्यमातील पाठ्यपुस्तकांची छपाई.
- पाठ्यपुस्तकांचा व लार्ज प्रिंटचा पुरवठा बालभारती, पुणे यांचेमार्फत तर ब्रेल पुस्तकांचा पुरवठा नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइन्ड इंडिया, मुंबई यांचेमार्फत.
- बालभारती गोडाऊन ते केंद्रस्तरापर्यंत पाठ्यपुस्तकांची वाहतूक शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत.
- शाळेच्या पहिल्या दिवशी लाभार्थी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वितरण शाळास्तरावरून करण्यात आले आहे.
- **लाभार्थी :** १,०७,५२,११४.
- **निधीची उपलब्धता :** प्रत्यक्ष पुरवठा देयकानुसार बालभारती, पुणे यांना राज्यस्तरावरून निधीची उपलब्धता.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(३) २५ टक्के प्रवेश सुविधा**

- **लाभार्थी :** शिक्षण हक्क कायद्यातील कलम १२ *(१) (C)* नुसार दुर्बल घटक (ज्या कुटुंबाचे वार्षिक एकत्रित उत्पन्न रुपये एक लाखापर्यंत आहे अशा पालकांची बालके) व वंचित गटातील मुलांना (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि सर्व जाती धर्मांतील दिव्यांग बालके) राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार खाजगी विनाअनुदानित व खाजगी कायम विनाअनुदानित शाळांमध्ये (अल्पसंख्याक वगळून) २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश.
- **पात्र शाळा :** सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळा (राज्यमंडळ, सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई. व आय.बी. सह) विना- अनुदानित, कायम विनाअनुदानित, स्वयं अर्थसाहाय्यित) (मदरसा, मक्तबा, धार्मिक पाठशाळा, अल्पसंख्यांक शाळा वगळून).
- राज्य शासनाकडून शाळांना प्रथम शुल्क प्रतिपूर्ती.
- केंद्र शासन सदर शुल्क प्रतिपूर्तीची तरतूद समग्र शिक्षा अंतर्गत राज्यास करते.
- **निधीची उपलब्धता :** समग्र शिक्षांतर्गत मंजूर तरतूद शासनास प्रतिपूर्ती करण्यात येते.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**'आरटीई' अंतर्गत २५ टक्के प्रवेशितांच्या फी प्रतिपूर्ती झालेल्या खर्चाचा तपशील**

| अ.क्र. | वर्ष | प्रती वर्षी प्रतिपूर्ती दर प्रती विद्यार्थी (रक्कम रुपयात) | राज्य शासनाने प्रतिपूर्तीपोटी वितरित केलेली व प्रत्यक्षात खर्च झालेली रक्कम (रु. कोटीत) | राज्य शासनास समग्र शिक्षा अंतर्गत करण्यात आलेली प्रतिपूर्ती (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१२-१३ | १२,३१५ | १९.५० | |
| २ | २०१३-१४ | १४,६२१ | | |
| ३ | २०१४-१५ | १३,४७४ | १४.७० | |
| ४ | २०१५-१६ | १७,३२९ | | |
| ५ | २०१६-१७ | १७,६७० | ५०.०० | २४.७० |
| ६ | २०१७-१८ | १७,६७० | २१८.२८ | १४.०० |
| ७ | २०१८-१९ | १७,६७० | १२०.०० | १५०.०० |
| ८ | २०१९-२० | १७,६७० | ८५.०१ | ३७.०० |
| ९ | २०२०-२१ | ८,००० | ५०.०० | ८२.०६ |
| १० | २०२१-२२ | ८,००० | १५०.०० | ५०.०० |
| ११ | २०२२-२३ | १७,६७० | १२०.०० | ४२.९१ |
| १२ | २०२३-२४ | १७,६७० | -- | ७६.७५ |

**(४) शाळाबाह्य मुलांकरिता विशेष प्रशिक्षण**

- शाळाबाह्य बालकांमध्ये कधीही शाळेत न आलेली, मध्येच शाळा सोडलेली, तसेच Home Based Education घेणाऱ्या दिव्यांग बालकांचा समावेश.
- शाळाबाह्य बालकांना नियमित शाळेत दाखल करून त्यांची उपस्थिती टिकवून सदर मुलांना वयानुरूप वर्गासाठी निर्धारित संपादणूक पातळी गाठण्यासाठी नियमित शिक्षकांद्वारे विशेष प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येते. त्यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्याची उपलब्धता. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत करण्यात येते.
- शाळाबाह्य बालकांची शाळाबाह्य असण्याची कारणे वेगवेगळी. या शाळाबाह्य बालकांच्या गळतीची कारणे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामध्ये --
  - **कौटुंबिक -** लहान भावंडांचा सांभाळ, कौटुंबिक कलह, पालकांची मानसिकता, पालकांची अनास्था, आर्थिक दारिद्र्य इ.
  - **बालक -** आजारपण, बालमजुरी, अनाथ, बेघर, संरक्षण नसलेली, रस्ता, रेल्वे प्लॅटफॉर्मवरील भीक मागणारी, दिव्यांग, वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांची बालके, कुमारी मातांची बालके, बालविवाह, घरातून पळून गेलेली, अल्पवयीन बालके, बोलीभाषा इ.
  - **स्थलांतरण -** ऊसतोड, वीटभट्टी, दगडखाण, पाषाण, बांधकाम, तमाशा कलावंत, डोंबारी, पारधी, तेंदूपत्ता / कचरा गोळा करणारे, भटक्या/विमुक्त जमाती, आदिवासी कोलाम/माडिया जमाती, कोळसा खाण कामगार, नदीपात्रात वाळू गाळणारा, मांग /गारुडी समाज, मच्छीमार समाज, गुऱ्हाळ घरातील कामगार, शहरी भागात सततचे स्थलांतर इ.
  - **शिक्षकांची भीती व अनास्था -** वरील कारणांमुळे गळती होते हे या माध्यमातून पुढे आले आहे. या सर्व कारणांपैकी गळतीचे मुख्य कारण आर्थिक दारिद्र्य व अन्य कारणे नसून बालकांना शाळेत रस नसणे, अभ्यासाचे दडपण असणे, अध्ययनात अडचणी येणे इत्यादी आहेत. त्यामुळे ही बालके गावात/परिसरात राहतात पण शाळेत येत नाहीत. इतर सवंगड्यांसोबत ते फिरताना दिसून येतात. अशा मुलांच्या शिक्षणाच्या समस्या समजावून घेऊन त्या

सोडविण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. शाळाबाह्य बालकांना त्यांच्या वयोगटास अनुरूप वर्गामध्ये समवयस्क बालकांसोबत शिक्षण घेण्यासाठी दाखल करणे हा नैसर्गिक नियम आहे. वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल केलेल्या बालकांना नियमित वर्गातील बालकांच्या अध्ययन पातळीपर्यंत आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची शिक्षकास गरज आहे. यासाठी कोणतेही अतिरिक्त पूरक मार्गदर्शन अथवा जादा तास घेण्याची आवश्यकता भासणार नाही. शाळाबाह्य मुलेसुद्धा वर्गातील इतर मुलांसोबत नियमित वेळेतच शिकू शकतात, हा आत्मविश्वास शिक्षकांमध्ये निर्माण होण्याची गरज आहे. या बालकांना शाळेच्या नियमित वेळेतच विशेष प्रशिक्षण देण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम वर्गशिक्षकाने आखणे आवश्यक आहे.

- **बालरक्षक -** दिनांक ९ जानेवारी २०१७ च्या जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत शाळाबाह्य बालकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी साहाय्य करणारे व्यक्तींनी (शिक्षक) बालरक्षक म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वेबपोर्टलवर नोंदणी केली आहे. शिक्षकांनी शाळाबाह्य बालकांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वत:स बालरक्षक घोषित केले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेमार्फत बालरक्षकांना प्रशिक्षण देण्यात येते.

- सन २०२३-२४ साठी ५९२७ शाळाबाह्य बालकांकरिता विशेष प्रशिक्षणासाठी तरतूद मंजूर.
- NCF-२०२० मध्ये नमूद केल्यानुसार पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानाबाबत विशेष मोहीम देशभर सुरू असून सन २०२६-२७ पर्यंत इयत्ता ३ री पर्यंतच्या प्रत्येक मुलाला भाषा व गणितातील मूलभूत क्षमता प्राप्त होणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने वयानुरूप प्रवेशित बालकांच्या अध्ययनातील प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेण्याचे निर्देश.
- **निधीची उपलब्धता :** राज्यस्तर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** शाळा व्यवस्थापन समिती.

**(५) स्थलांतरित मुलांचे शिक्षण / हंगामी वसतिगृह**

- प्रत्येक वर्षी दसरा वा दिवाळीनंतर वीटभट्टी कामगार, ऊसतोडणी कामगार व इतर कामगारांची कुटुंबे व त्यांची मुले मोठ्या प्रमाणात विविध कारणांसाठी विविध जिल्ह्यातून जिल्हांतर्गत किंवा जिल्हाबाह्य परिसरामध्ये स्थलांतरित होतात.
- स्थलांतरित मुलांचे शिक्षण नियमित शाळेमध्ये त्यांच्या मूळ ठिकाणी व्हावे यासाठी हंगामी वसतिगृह, नातेवाईकाकडे राहणाऱ्या मुलांना सकाळच्या नाष्ट्याची व रात्रीच्या जेवणाची सोय.
- बालक महत्त्वाचे असल्याने ते कोणत्या व्यवस्थापनाच्या शाळेत शिकत आहे हे महत्त्वाचे नाही. त्यामुळे खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधून स्थलांतरित होणाऱ्या बालकांनाही त्या गावातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमार्फत लाभ उपलब्ध करून देण्याची सुविधा आहे.
- हंगामी वसतिगृह योजनेच्या लाभासाठी बायोमॅट्रिक प्रणालीमध्ये बालकांच्या उपस्थितीची नोंद अनिवार्य.
- मुलांचे स्थलांतर रोखण्यासाठी बालरक्षक चळवळीचे व्यापक काम.
- काही अपरिहार्य कारणाने एखादे मूल स्थलांतरित झाल्यास शिक्षण हमी कार्डद्वारे मुलाच्या शिक्षणाचा हक्क अबाधित.
- स्थलांतरण कालावधी संपल्यानंतर पालक बालकांसह मूळ गावी आल्यानंतर शेवटचे स्थलांतर झालेल्या कार्यक्षेत्रातील शाळेकडून प्राप्त झालेल्या शिक्षण हमी पत्रकानुसार बालकास मूळ गावातील शाळेत प्रवेश देण्यात येतो.
- **लाभार्थी :** ३८७०५ बालकांकरिता ६ महिन्यांसाठी सन २०२३-२४ साठी हंगामी वसतिगृह मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** शाळा व्यवस्थापन समिती.

**(६) लोकजागृती**

- मुलाला योग्यरीत्या शिकण्यात आणि अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यात मदत करण्यासाठी समाज आणि पालकांच्या सहभागावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भर दिला आहे.
- समाजाच्या शाळेप्रती वाढता सहभाग निश्चित करून शाळेचा शैक्षणिक विकास घडविणे व शाळा प्रगत करणे.
- शिक्षणाशी निगडित विविध प्रकारच्या जाहिराती, वार्षिक अहवाल, लेखापरीक्षण अहवाल, यशोगाथांचे संकलन, महत्त्वाच्या माहितीचे संकलन पुस्तिका, इत्यादींचे विकसन, छपाई व पुरवठा.

- शैक्षणिक जिंगल्स, क्लिप्स, भित्तिपत्रके, पोस्टर्स, व्हिडिओ संदेश, पथनाट्य, इत्यादीचे रेडिओ, दूरध्वनी, इंटरनेटच्या माध्यमातून प्रसार.
- नवोपक्रमशील, प्रयोगशील शिक्षक, पथदर्शक शाळांमधील शिक्षक, तंत्रस्नेही शिक्षक इत्यादींनी केलेल्या चांगल्या कामाचे शिक्षणाच्या वारीद्वारे सादरीकरण.
- प्राथमिक स्तरावरील ६३,६३५ शाळांकरिता रुपये १५०० प्रमाणे व माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील १८५९ शाळांकरिता रुपये १५०० प्रमाणे तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्य व जिल्हा स्तर.

✶ **गुणवत्तेशी संबंधित उपक्रम**

**(१) गट साधन केंद्राकरिता ICT ची सुविधा :**

- अध्ययन अध्यापन प्रक्रियेची गुणवत्ता व कार्यक्षमता सुधारण्यासाठी शिक्षकांना ऑनलाईनद्वारे अध्ययनातील नवीन तंत्रज्ञान अवगत होण्याकरिता गट साधन केंद्रामध्ये ICT चा सुविधा उपलब्ध करून देणे. ज्यायोगे शिक्षकांचे क्षमता संवर्धन होण्यास मदत व दैनंदिन नवीन ई-साहित्याची उपलब्धता.
- **लाभार्थी :** ३४३ गट साधन केंद्रांकरिता सन २०२३-२४ साठी तरतूद मंजूर
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर

**(२) Teacher Resource Package :**

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये ऑनलाईन संसाधने आणि सहयोगाने शिक्षण शिकण्याची प्रक्रिया समृद्ध करण्यासाठी डिजिटल अध्यापनशास्त्राच्या वापरासाठी स्मार्ट क्लासरूम विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, डिजिटल इंडिया मोहिमेचा उद्देश संपूर्ण राष्ट्राला डिजिटली सशक्त करणे आहे.
- सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांना टप्प्याटप्प्याने लॅपटॉप उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आकडेवारीनुसार ७.५ लाख शिक्षक कर्मचारी UDISE+ अंतर्गत नोंदणीकृत आहेत. अध्यापन प्रक्रिया सुलभतेने आणि शैक्षणिक आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना लॅपटॉप देण्यात येणार आहे. यामुळे शिक्षकांना विविध डिजिटल पोर्टल्स जसे की, DIKSHA, IOT इत्यादींवरील साहित्य वापरण्यास आणि विद्यार्थ्यांना दाखविता येईल. यामुळे दर्जेदार ई-सामग्री प्राथमिक शाळेपर्यंत सहज पोहोचेल.
- **लाभार्थी :** ६१७४ शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ३२००० शिक्षकांकरिता रुपये १०,००० प्रमाणे सन २०२३-२४ साठी तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

✶ **नावीन्यपूर्ण उपक्रम**

**(१) ICT Lab to BRCs (Recurring) :**

- सन २०२२-२३ मध्ये ६५ गटसाधन केंद्रांमध्ये ICT Lab स्थापित करण्यात आल्या आहेत. या ICT Lab च्या व्यवस्थापनासाठी व त्याच्या नियमित उपयोगितेकरिता प्रत्येक ICT Lab साठी रुपये २.४० लाख आवर्ती तरतूद मंजूर.
- यामधून E-Content and Digital Resources, Charges for Electricity, Interned connectivity, Instructional expenses, Training of teachers, Monitoring and supervision expenses for tracking usage of hardware and software/content यासाठी निधी विनियोगात आणण्यात येणार.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(२) अध्ययन समृद्धी कार्यक्रम (Learning Enhancement Programme) / उपचारात्मक शिक्षण (Remedial Teaching)**

- गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि मुलांच्या अध्ययन फलनिष्पत्तीमध्ये वाढ करणे हे समग्र शिक्षा योजनेच्या इतर उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट आहे.

- भारत सरकारने कार्यक्षमता प्रतवारी दर्शके (PGI-Performance Grading Index) तयार केली असून ७३ दर्शकांनुसार शैक्षणिक निर्देशांक ठरविण्यात येत असून याकरिता एकूण १००० गुण आहेत. जिल्ह्याच्या ८३ दर्शकांनुसार शैक्षणिक निर्देशांक ठरविण्यात येत असून याकरिता एकूण ६०० गुण आहेत. शैक्षणिक निर्देशकांच्या आधारे भारत सरकारकडून विविध योजनांकरिता निधी मंजूर करण्यात येतो.
- प्राथमिक स्तरावरील इयत्ता ६ वी ते ८ वीच्या ३,८७,९५५ विद्यार्थ्यांकरिता अध्ययन समृद्धी कार्यक्रम/उपचारात्मक शिक्षण याकरिता तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(३) शाळांसाठी सर्वांगीण प्रगती कार्ड : (Holistic Report Card for School)**

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये शिफारस केल्यानुसार, शाळाआधारित मूल्यांकनासाठी सर्व विद्यार्थ्यांचे प्रगती कार्ड, जे शाळांद्वारे पालकांना कळविले जाईल. सर्वांगीण, ३६० डिग्री, संज्ञात्मक, भावनिक आणि सायकोमोटर डोमेनमधील प्रत्येक विद्यार्थ्यांची प्रगती आणि वेगळेपणा/विशिष्टता दर्शविणारा बहुआयामी अहवाल होलिस्टिक प्रोग्रेस कार्ड (HPC) स्वरूपात सादर करण्याबाबत नमूद आहे. सर्वांगीण प्रगती कार्ड घर आणि शाळा यांच्यातील महत्त्वाचा दुवा स्थापित करण्यास मदत करेल. पालकांना त्यांच्या मुलांच्या सर्वांगीण शिक्षण आणि विकासामध्ये सक्रियपणे सहभागी करून घेण्यासाठी आणि प्रत्येक विद्यार्थ्याला वर्गात आणि बाहेर कसे समर्थन द्यावे याबद्दल त्यांना मौल्यवान माहिती प्रदान करण्यासाठी वारंवार पालक-शिक्षक बैठका आयोजित करणे.
- प्रगती अहवालामध्ये स्वयंमूल्यांकन, समवयस्क मूल्यांकन आणि शिक्षक मूल्यांकन समाविष्ट असेल.
- **लाभार्थी :** इयत्ता १ ली ते ८ वी मधील ५३,५२,९६५ विद्यार्थ्यांकरिता प्रती कार्ड रुपये २ प्रमाणे सन २०२३-२४ साठी तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(४) Tinkering Lab :**

- राज्यात ४९१ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये टिंकरिंग लॅब स्थापित करण्यासाठी तरतूद मंजूर, Electronics, Electricals, Mechanical, Chemistry, Robotics, Biotech, Aerospace, Mobiles, 3 D Printing, Rapid Prototyping Tools, Agritech, Water Sanitation, Automobiles, Drone etc. घटकांतील विविध तंत्रज्ञानावरील सुमारे ४०० साहित्यांचा समावेश. ४९१ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकरिता प्रतिशाळा रुपये १०,०० लाखप्रमाणे तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(५) Exposure to Vocational Education (वर्ग ६-८) :**

- विद्यार्थ्यांना विविध व्यवसायांसाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आणि उच्च वर्गात त्यांचे विषय निवडताना माहितीपूर्ण निवड करण्यासाठी, त्यांना सुसज्ज करण्यासाठी इयत्ता ६ वी ते ८ वीमध्ये व्यवसाय शिक्षणाची संधी प्रदान करणे.
- जवळपासचे उद्योग/युनिट, परस्परसंवादी सत्र/व्याख्याने आणि कार्यशाळा, स्थानिक कारागीर, स्थानिक कौशल्ये/स्थानिक हस्तकलेवरील कारागीर, शिक्षक प्रशिक्षण याकरिता २४४ शाळांसाठी उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांच्या भेटीसाठी रुपये १५,००० प्रमाणे सन २०२२-२३ करिता तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(६) Personality Development Programme for Nurturing Talents :**

- शालेय जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये अंतर्भूत असलेली सर्जनशीलता ओळखून त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे.
- शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ६५,४९४ (६३,६३५ प्राथमिक व १,८५९ माध्यमिक व उच्च माध्यमिक) शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी तसेच विविध कलागुणांचे संवर्धन करण्यासाठी डिजिटल इंटरएक्टिव्ह प्लॅटफॉर्मद्वारे प्रख्यात कलाकारांद्वारे त्यांच्या संबंधित विषयांमध्ये नैपुण्य असलेल्या कौशल्यांचे अभ्यासक्रम शिकविण्यात येणार.
- ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची कलात्मक आवड जोपासण्यासाठी व जीवनावश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी त्यांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल व विद्यार्थ्यांना कला क्षेत्रात करिअर करण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य प्राप्त होईल.
- या प्रशिक्षणाकरिता विद्यार्थ्यांसाठी कोणतेही अभ्यासक्रम शुल्क असणार नाही.

- सन २०२३-२४ मध्ये ६५,४९४ शाळांकरिता रुपये ०.००३०६ लाख या एकक दरानुसार आवर्ती तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(७) निपुणोत्सव :**

- गेल्या दोन वर्षांपासून राज्यात "निपुण भारत मिशन" राबविण्यात येत होते. शाळा, शिक्षक आणि क्षेत्रीय अधिकारी नावीन्यपूर्ण धोरणे आणि तंत्रांचा अवलंब करून "निपुण भारत मिशन" प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी त्यांच्या स्तरावर सर्वोत्तम प्रयत्न करत आहेत. ही नावीन्यपूर्ण धोरणे आणि तंत्रे यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याने इतर शिक्षक आणि शाळांना ही मदत होईल.
- निपुण गट, केंद्र आणि जिल्हा यांना प्रोत्साहनात्मक बक्षीस देण्याकरिता तरतूद मंजूर. याव्यतिरिक्त, IEC साहित्य (व्हिडिओ, पॅम्प्लेट, पॉडकास्ट, जाहिरात इत्यादी) विकसित करण्यात येतील आणि सर्वोत्तम पद्धतीचे दस्तऐवजीकरण करण्यात येईल.
- सन २०२३-२४ मध्ये ३५ जिल्ह्यांकरिता रुपये ३.०० लाख या एकक दरानुसार आवर्ती तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** जिल्हास्तर.

**(८) बँड कॉम्पिटिशन (Band Competition)**

- विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती व राष्ट्रीय एकात्मिकता जागविण्यासाठी सन २०१७ पासून भारत सरकारतर्फे बँड कॉम्पिटिशनचे आयोजन व याकरिता तरतूद मंजूर.
- **स्पर्धेचा स्तर :** राज्यस्तर, राष्ट्रीय विभागीय स्तर, राष्ट्रीय अंतिम स्तर.
- **सहभाग :--**
  - सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील १ मुलींचा व १ मुलांचा संघ.
  - प्रत्येक संघात १ बँड लिडर, २४ विद्यार्थी व १ शिक्षक तसेच १ बँड मास्टर अशी एकूण २७ संख्या.
  - प्रत्येक संघात सादरीकरणासाठी ७ मिनिटांचा अवधी.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(९) कला उत्सव (Kala Utsav)**

- विद्यार्थ्यांमध्ये असलेली प्रतिभा ओळखून त्यामधील कलागुणांना वाव देण्यासाठी केंद्रीय शिक्षा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत सन २०१५-१६ पासून कला उत्सवाचे आयोजन करण्यासाठी माध्यमिक स्तराकरिता तरतूद मंजूर.
- विद्यार्थ्यांमध्ये असलेली सुप्त प्रतिभा ओळखून शाळा स्तरावर निवडलेल्या कला प्रकारनिहाय विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरावर व जिल्हास्तरावरून निवडलेल्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर स्पर्धा आयोजित करून राज्यातून निवडलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्वाची संधी देणे.
- सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी समाविष्ट.
- जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कला उत्सवाकरिता तरतूद मंजूर.
- **कला प्रकार :--**
  - संगीत (गायन) - शास्त्रीय (Vocal Music - Classical).
  - संगीत (गायन) - पारंपरिक लोक संगीत (Vocal Music - Traditional Folk).
  - संगीत (वादन) - परक्युसिव्ह (Instrumental Music - Percussive).
  - संगीत (वादन) - मधुर (Instrumental Music - Melodic)
  - नृत्य - शास्त्रीय (Dance - Classical).
  - नृत्य - (लोक नृत्य) (Dance Folk).
  - दृश्यकला (व्दिमिती) - (Visual Arts - 2 dimensional).
  - दृश्यकला (त्रिमिती) - (Visual Arts - 3 dimensional).
  - स्थानिक खेळ व खेळणे (Indigenous Toyes and Games).
  - नाटक (एकल अभिनय)-Drama (Solo Acting).
  - **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(१०) Foundational Numeracy and Literacy**

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२० नुसार, प्राथमिक स्तरावर सन २०२६-२७ पर्यंत मूलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. यात प्राथमिक पातळीवरील अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप मूलभूत साक्षरता व संख्या ज्ञान प्राप्त केले नाही, असे ठळकपणे नमूद आहे. वय वर्षे ३ ते ९ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्या ज्ञान प्राप्त करण्यासाठी भारत सरकारने "समग्र शिक्षा" मध्ये निपुण भारत (National Initiative For Proficiency In Reading With Understanding and Numeracy) अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता ३ रीपर्यंत मूलभूत साक्षरता व संख्या ज्ञान सन २०२६-२७ पर्यंत प्राप्त करण्याचे लक्ष निर्धारित केले आहे. त्यानुसार राज्यात सन २०२६-२७ पर्यंत इयत्ता ३ री पर्यंतच्या १०० टक्के विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्या ज्ञान प्राप्त करण्यासाठी तसेच इयत्ता ३ री पुढे गेलेल्या; परंतु अपेक्षित क्षमता प्राप्त न करू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी "निपुण भारत" अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
- शासकीय शाळांतील वय वर्षे ३ ते ९ वयोगटातील विद्यार्थ्यांना मूलभूत भाषिक व गणितीय कौशल्ये व वर्गनिहाय संपादणूक पातळी प्राप्त होण्यासाठी विद्यार्थ्यांकरिता (१) अध्ययन साहित्य (Learning Materials-Worksheet/Workbook/वाचन कार्ड/अध्ययनपूरक साहित्य), (२) शिक्षक हस्तपुस्तिका (३) शासकीय व अनुदानित शाळेतील शिक्षकांकरिता Foundational Litercay and Numeracy निष्ठा प्रशिक्षण, (४) राज्य व जिल्हास्तरासाठी Project Monitoring Unit (PMU) करिता तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्य व जिल्हास्तर.

**(११) शिक्षक प्रशिक्षण**

- मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली व राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्यामार्फत देशातील सर्व राज्यांमधील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था तसेच अनुदानित माध्यमिक शाळांमधील इयत्ता ६ वी ते ८ वी व इयत्ता ९ वी ते १२ वीला शिकविणारे शिक्षक व अशा शाळांचे मुख्याध्यापक यांच्यासाठी NISHTHA (National Initiative for School Heads' and Teachers' Holistic Advancement) या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली असून याचा प्रमुख हेतू शालेय शिक्षणामधील गुणवत्ता वाढविणे हा आहे.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी**

  राज्यस्तर - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

  **जिल्हा / तालुका स्तर - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था.**

**(१२) संयुक्त शाळा अनुदान**

- सदर अनुदान हे शासकीय आदिवासी विकास विभागाकडून चालविलेल्या आश्रमशाळा, समाज कल्याण विभागाकडून चालविलेल्या शाळा, विद्यानिकेतन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा (जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका, कटक मंडळे इत्यादी) साठी मंजूर आहे.
- शाळा व्यवस्थापन समितीने शाळांची गरज लक्षात घेऊन या अनुदानाचा उपयोग करावा.
- या अनुदानाचा विनियोग हा शाळेतील नादुरुस्त असलेल्या लाईट, पंखे, खिडक्या, खेळाचे मैदान दुरुस्त करणे तसेच आवर्ती खर्च उदा. खेळाचे साहित्य दुरुस्ती, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य खरेदी, शाळेचे वीज बिल, इंटरनेट, पाण्याची सुविधा, वार्षिक देखभाल-शाळा इमारत दुरुस्ती, शौचालये दुरुस्ती आणि इतर भौतिक सुविधा सुस्थितीत ठेवण्यासाठी करता येईल.
- शालेय स्वच्छतागृह स्वच्छता याकामी मंजूर असलेल्या एकूण निधीच्या १० टक्के निधी हा स्वच्छ कार्य योजना या उपक्रमावर करण्यास मंजुरी.
- प्राथमिक स्तरावरील ६३,६३५ तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील १,८५९ शाळांकरिता विद्यार्थी पटसंख्येनुसार संयुक्त शाळा अनुदान मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** शाळा व्यवस्थापन समिती.

**(१३) ग्रंथालय**

- विद्यार्थ्यांची वाचन क्षमता सुधारणे, वाचनाची आवड लागणे यासाठी शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता ८ वीपर्यंतचे वर्ग असलेल्या ४३,०१४ प्राथमिक, २०,६२१ उच्च प्राथमिक व इयत्ता १२ वीपर्यंत वर्ग असलेल्या १४९९ माध्यमिक व ३६० उच्च माध्यमिक शाळांसाठी तरतूद मंजूर.

- ग्रंथालयाकरिता मंजूर तरतुदीचा विनियोग भारत सरकारच्या दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या सुधारित मार्गदर्शनानुसार करण्याबाबतचे निर्देश.
- ग्रंथालयाच्या ५० टक्के अनुदानामध्ये 'एनबीटी'ची पुस्तके व ५० टक्के अनुदानामध्ये स्थानिक स्तरावरील प्रकाशकांकडून पुस्तके खरेदी करून शाळांमध्ये उपलब्ध करून देण्याचे नियोजन.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(१४) राष्ट्रीय आविष्कार अभियान**

- विद्यार्थ्यांच्या विज्ञान व गणिताच्या शैक्षणिक प्रगतीचा स्तर उंचावण्याकरिता तसेच मुलांमध्ये विज्ञान विषयाची गोडी व विज्ञानविषयक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय आविष्कार अभियान अंतर्गत पुढील उपक्रमांची अंमलबजावणी करण्यास भारत सरकारने मंजुरी दिली आहे.
- **विज्ञान व गणित ऑलिम्पियाडमध्ये सहभाग (Participation in Science and Maths Olympiads) :** विज्ञान व गणित ऑलिम्पियाडमध्ये सहभाग घेण्याकरिता राज्यातील प्राथमिक स्तरावरील ४७१६६ विद्यार्थ्यांकरिता व माध्यमिक स्तरावरील ५३२३४ विद्यार्थ्यांकरिता तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.
- School Mentioned by Higher Education Institutes - विज्ञान, गणित आणि तंत्रज्ञानाबद्दल शालेय मुलांमध्ये विज्ञान संस्थात्मक भेटींद्वारे उत्सुकता, उत्साह आणि शोध वृध्दिंगत होण्याकरिता राज्यातील प्राथमिक स्तरावरील ५२५० विद्यार्थ्यांकरिता व माध्यमिक स्तरावरील ५२५० विद्यार्थ्यांकरिता प्रती विद्यार्थी रुपये ५०० प्रमाणे तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.
- **विज्ञान प्रदर्शन/पुस्तक जत्रा (Science Exhibition/Book Fair) :** विविध शाळांमधील विद्यार्थी व शिक्षकांना विज्ञान प्रदर्शनाचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात उपयोग होण्यासाठी विज्ञान प्रदर्शन आयोजनासाठी ३५ जिल्ह्यांकरिता प्रती जिल्हा रुपये २५,००० प्रमाणे तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.
- **प्रश्नमंजुषा (Quiz Competition) :** प्रश्नमंजुषेमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह वाढतो, वैचारिक दृष्टिकोन उंचावतो आणि त्यांना सद्य: परिस्थितीविषयक जागृती निर्माण करते. ही स्पर्धा मुलांना प्रोत्साहन देण्यास आणि त्यांना स्पर्धात्मक कार्यक्रमांमध्ये सर्वोत्कृष्ट घडविण्यास मदत करते. प्रश्नमंजुषा स्पर्धेकरिता ३५ जिल्ह्यांकरिता प्रती जिल्हा रुपये २५,००० प्रमाणे तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(१५) ICT and Digital Initiatives :**

- **प्राथमिक स्तर** - डिजिटल शाळा योजनेचा उद्देश संबंधित शाळांमध्ये अत्याधुनिक ICT (माहिती व दळणवळण तंत्रज्ञान) सुविधा उपलब्ध करून देणे आहे. डिजिटल शाळा उपक्रमांतर्गत, दुर्गम ठिकाणी असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचा अनुभव प्रदान करणे, विद्यार्थ्यांची शैक्षणिक पातळी वाढविणे आणि शिक्षकांची क्षमता वाढवणे, शिक्षण पद्धतीत तंत्रज्ञानाचा वापर करणे, परस्परसंवादी आणि अनुकूलन करणारी शिकण्याची पद्धत सक्षम करणे. गरजा आणि आवडींवर आधारित विद्यार्थ्यांसाठी मुक्त शिक्षणाचे वातावरण तयार करणे हे उद्दिष्ट आहे. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये दर्जेदार शिक्षणासाठी प्रत्येक शाळेला डिजिटल पायाभूत सुविधांनी सुसज्ज करण्यात येत आहे. आयसीटीद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे. सन २०२०-२१ या वर्षामध्ये ७०८ उच्च प्राथमिक शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा निर्मितीसाठी सन २०२२-२३ मध्ये स्पिल ओव्हरमध्ये तरतूद मंजूर करण्यात आली आहे. तसेच सन २०२२-२३ मध्ये ६६३ शाळांमध्ये Smart Classroom स्थापन करण्याची तरतूद मंजूर आहे.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.
- **माध्यमिक स्तर :** माध्यमिक स्तरावर ICT ही योजना टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे. आत्तापर्यंत ५०० शाळांकरिता (टप्पा-I), २,५०० शाळांकरिता (टप्पा-II) व ४,६१८ शाळांकरिता (टप्पा-III) याप्रमाणे केंद्र शासनाने मंजूर केलेला आहे. टप्पा-I व टप्पा-II मधील ICT अंतर्गतच्या प्रयोगशाळांना ५ वर्षांचा कालावधी पूर्ण केल्यानंतर शाळांना हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. टप्पा-III मधील ICT अंतर्गतच्या प्रयोगशाळांची हस्तांतरण प्रक्रिया सुरू आहे. टप्पा-IV अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये १,००० शाळा व टप्पा-V अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ५०० शाळांना मंजुरी देण्यात आली आहे. माध्यमिक स्तरावर टप्पा-I ते टप्पा-V अंतर्गत ICT करिता ९,११८

शाळा मंजूर आहेत. भारत सरकारकडून सन २०२१-२२ मध्ये १५०० शाळांना स्पिल ओव्हरमध्ये तरतूद मंजूर करण्यात आलेली आहेत. माध्यमिक स्तरावर टप्पा - I ते टप्पा V अंतर्गत ICT करिता ९११८ शाळा मंजूर आहेत. तसेच सन २०२१-२२ मध्ये २२४ शाळांमध्ये स्मार्ट क्लासरूम स्थापन करण्यासाठी तरतूद मंजूर आहे.

- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** जिल्हा / राज्यस्तर.

**(१६) पूर्व प्राथमिक स्तरावर साहाय्य**

- राज्य शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणावर भर देण्यात आला असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० अंतर्गत पुनर्रचित शिक्षण राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा पूर्व प्राथमिक शिक्षणासंबंधी केंद्र शासनाकडून विकसित करण्यात येत आहे. सदरील पूर्व प्राथमिक शिक्षण हे आनंददायी पद्धतीने होण्याकरिता Toy Based Pedagogy ही NCERT, नवी दिल्ली यांनी तयार केली आहे. त्याअंतर्गत ज्या शासकीय शाळांशी संलग्न बालवाड्या व ज्या शाळांशी संलग्न आंगणवाड्या आहेत, त्यांच्यामध्ये सन २०२३-२४ मध्ये समग्र शिक्षांतर्गत पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या सक्षमीकरणासाठी तरतूद मंजूर.
- १,५१६ शाळेशी संलग्न अंगणवाड्यांमध्ये Child Friendly Furniture, BALA Features, Out door Play Material व ९७६ पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या बालवाड्यांतील ८३,८५३ मुलांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यास तरतूद मंजूर.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

**(१७) गट / शहर / समूह साधन केंद्रांद्वारे शैक्षणिक आधार**

- ४०८ गट / शहर साधन केंद्रांतर्गत कार्यरत पदांच्या वेतनासाठी तरतूद.
- ४०८ गट / शहर साधन केंद्रांना अध्यापन साहित्य (शैक्षणिक साहित्य), सादील अनुदान (कार्यालयीन व्यवस्थापन खर्च, आकस्मिक खर्च), बैठक, प्रवास भत्ते, इत्यादी बाबींवर खर्च करण्यासाठी तरतूद मंजूर.
- ६,१७० समूहसाधन केंद्रांना अध्यापन साहित्य (शैक्षणिक साहित्य), सादील अनुदान (कार्यालयीन व्यवस्थापन खर्च, आकस्मिक खर्च), बैठक, प्रवास भत्ते इत्यादी बाबींवर खर्च करण्यासाठी तरतूद मंजूर.
- **अंमलबजावणीची जबाबदारी :** जिल्हा परिषद व महानगरपालिका.

**✶ क्रीडा व शारीरिक शिक्षण**

- राष्ट्रीय क्रीडा धोरण, १९८४ नुसार शारीरिक शिक्षण व क्रीडा या बाबी शैक्षणिक अभ्यासक्रमाचा अविभाज्य घटक असण्यावर भर देण्यात आलेला आहे. याचा पुनरूच्चार १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये तसेच राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००५ मध्ये करण्यात आलेला आहे. शारीरिक व बौद्धिक विकास या बाबी एकमेकांशी निगडित असून शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील कलम २९ नुसार विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व एकूणच सर्वांगीण विकासावर भर देण्याबाबत नमूद आहे. त्या अनुषंगाने ४३,०१४ प्राथमिक शाळांना प्रत्येकी रुपये ५,०००/- प्रमाणे तर २०,६२१ उच्च प्राथमिक शाळांना प्रत्येकी रुपये १०,०००/- प्रमाणे व १,४९९ माध्यमिक व ३६० उच्च माध्यमिक शाळांना प्रत्येकी रुपये २५,०००/- प्रमाणे शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना क्रीडा साहित्य घेण्यासाठी तरतूद मंजूर करण्यात आली आहे.
- **प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्य / जिल्हास्तर, शाळा व्यवस्थापन समिती.

**✶ शिक्षक शिक्षण**

**१) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमधील शिक्षकांचे वेतन**

- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमधील शैक्षणिक कर्मचाऱ्यांचे पदावरील (Academic Post) कार्यरत व्यक्तींचे वेतन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमधील वेतनाकरिता १०० टक्के भार राज्य शासनाने दिनांक २८ डिसेंबर २०२३ अन्वये उचलला असून सन २०२४-२०२५ करिता रुपये ७२.०० कोटी (अंदाजित) तरतूद मंजूर.
- **अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**२) विद्या शाखेच्या विकासाकरिता कार्यक्रम**

- संशोधन, पर्यवेक्षण इत्यादी बाबींसाठी तरतूद मंजूर.
- **अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**३) विद्या शाखेकरिता तांत्रिक साहाय्य**

- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांना तंत्रज्ञान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हार्डवेअर व सॉफ्टवेअर घेण्यासाठी तरतूद.
- **अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**४) विद्या शाखेकरिता वार्षिक अनुदान**

- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व ३३ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांना दूरध्वनी देयक, विद्युत देयक, कार्यालयीन खर्च, आकस्मिक खर्च, व्यवस्थापन खर्च, मानधन, प्रवास व दैनिक भत्ते, फर्निचर, ग्रंथालयाकरिता पुस्तके, विद्युत उपकरणांची देखभाल, शिक्षक प्रशिक्षणासाठी तज्ज्ञ व्यक्तींसाठी मानधन, वाहन, तंत्रज्ञान साहित्य, स्टेशनरी, स्थानिक कर, इत्यादी बाबींवर खर्च याकामी तरतूद मंजूर.
- **अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

✶ **शिक्षक वेतन**

- शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थी व शिक्षक प्रमाण राखण्यासाठी सन २०२२-२३ मध्ये भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाने (PAB) Single Head अंतर्गत रुपये ८५८०.६० लाख एकत्रित तरतूद मंजूर करण्यात आली. सन २०२२-२३ मध्ये ५ टक्के कपात करून रुपये ८१५१.५७ लाख. तथापि, देय होते. शिक्षकांच्या रिक्त पदसंख्येत ३.१ टक्के वाढ. त्यामुळे सन २०२२-२३ मध्ये रुपये ७८९८.९८२ लाख तरतूद मंजूर.
- सन २०२१-२२ च्या तुलनेत सन २०२३-२४ मध्ये प्राधमिक स्तरावर एकूण रिक्त पदांच्या पातळीत ३.०७ टक्के घट झाली आहे. सन २०२३-२४ मध्ये राज्यात प्राथमिक स्तरावर शिक्षकांच्या रिक्त जागा "शून्य" असल्याची नोंद असल्याने सन २०२१-२२ मध्ये मंजूर तरतूद ८५८०.६० लाखांमध्ये १० टक्के कपात करून भारत सरकारने सन २०२३-२४ करिता रुपये ७,७२२.५४ लाख तरतूद मंजूर केले.
- **अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.
- **अंशकालीन निदेशक :** कला, आरोग्य व शारीरिक शिक्षण आणि कार्यानुभव या विषयांसाठी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता ६ वी ते ८ वीच्या वर्गाच्या १०० पेक्षा जास्त पटसंख्या असणाऱ्या पात्र २११७ शाळांमधील कला, आरोग्य व शारीरिक शिक्षण कार्यानुभव या ३ विषयांच्या ६३५१ अंशकालीन निदेशकांच्या पदांसाठी मानधनाकरिता शिक्षक वेतन या मुख्य लेखाशिर्षांतर्गत (Single Head) सन २०२३-२४ मध्ये मंजूर रुपये ७७२२.५४ लाख या तरतुदीत अंशकालीन निदेशकांच्या मानधनाचा समावेश. तथापि, अंशकालीन निदेशकांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ-औरंगाबाद व नागपूर येथील दाखल केलेल्या याचिकांच्या अनुषंगाने कायम संवर्ग निर्माण करणे, पूर्ण वेळ शिक्षकांच्या वेतनाच्या अर्धे वेतन (Half Pay) मिळणेबाबत तसेच शिक्षण हक्क कायद्यातील इयत्ता ६ वी ते ८ वीच्या वर्गाचा नमूद कार्यभार (Work load) ऐवजी इयत्ता १ ली ते ८ वी चा कार्यभार (Work load) मिळणेबाबत याचिका दाखल आहेत. तथापि, दिनांक २१ ऑक्टोबर २०२० रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार शासन स्तरावरून अंशकालीन निदेशकांच्या नियुक्ती संदर्भातील शासन निर्णयाचा मसुदा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दाखल. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट.
- **अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

✶ **लैंगिक व समता**

**१) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय**

- **प्रकार (Type)-I व प्रकार (Type)-III** - राज्यातील १० जिल्ह्यांतील (बीड, गडचिरोली, हिंगोली, जालना, कोल्हापूर, नंदुरबार, नाशिक, नांदेड, परभणी व पालघर) शैक्षणिकदृष्ट्या अप्रगत ४३ गटातील दुर्बल घटक, वंचित गट, विशेष गरजाधिष्ठित व अल्पसंख्यांक समाजातील शाळाबाह्य मुलींच्या शिक्षणाकरिता कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ही योजना सन २००६-०७ पासून भारत सरकारने शैक्षणिकदृष्ट्या अप्रगत गटासाठी सुरू केली आहे. सदर कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांमध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी च्या मुलींकरिता प्रवेश देण्यात येतो. कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा गटाकरिता मॉडेल-III (१५० मुलींची क्षमता) आणि उर्वरित ४२ गटांकरिता मॉडेल-I (१०० मुलींची क्षमता) याप्रमाणे आवर्ती व अनावर्ती अनुदान मंजूर. राज्यात ४३ शैक्षणिकदृष्ट्या अप्रगत गटात प्रत्येकी एक याप्रमाणे ४३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV प्रकार-I) २९ जिल्हा परिषद व १४ खाजगी संस्थांद्वारे कार्यरत आहेत.
- **प्रकार (Type)-IV** - इयत्ता ९ वी ते इयत्ता १२ वी मध्ये शिकत असलेल्या १४ ते १८ वर्षे वयोगटातील एकूण १० जिल्ह्यांतील ४३ शैक्षणिकदृष्ट्या अप्रगत गटातील १०० मुलींकरिता एक यानुसार एकूण ४३ वसतिगृहांना मंजुरी दिली आहे. सन २०१९-२० पासून मुलींचे वसतिगृह ही योजना KGBV Type-IV या नावाने कार्यरत आहे. पालकांची आर्थिक परिस्थिती, घरापासून शाळेचे अंतर व इतर सामाजिक कारणांमुळे मुली माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहू नयेत तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सुविधा मिळावी याकरिता ४३ गटांपैकी ४२ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (प्रकार-IV) कार्यरत आहेत.
- **अंमलबजावणीची जबाबदारी :** जिल्हा परिषद व महानगरपालिका.

✶ **राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा कार्यक्रम :**

- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची एप्रिल २०१० पासून राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील प्रत्येक ६ ते १४ वयोगटातील मुलांस सुरक्षित वातावरणात गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे.

- राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण (प्राथमिक आणि माध्यमिक) अंतर्गत २०,४२१ उच्च प्राथमिक शाळा आणि १७८० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये मुलींसाठी ३ महिन्यांचे स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्यासाठी समग्र शिक्षा अंतर्गत तरतूद मंजूर आहे.

- स्वसंरक्षण प्रशिक्षणाद्वारे, मुलींना मानसिक, बौद्धिक आणि शारीरिकदृष्ट्या पुरेसे सक्षम बनवण्याची गरज आहे. जेणेकरून त्या संकटाच्या आणि असुरक्षिततेच्यावेळी स्वत:चे संरक्षण करू शकतील. हिंसाचार करणाऱ्यांना संदेश देण्यासाठी मुली मुकाबला करण्यासाठी तयार आहेत आणि या संदर्भात मुलींना सर्व पैलूंमध्ये सक्षम करणे, कोणत्याही प्रकारच्या कठीण परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी मुलींना स्वयं-कौशल्यात पारंगत करणे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व जागरुकता विकसित करणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे.

- विद्यार्थिनींना गुन्हेगारीविरुद्ध लढण्यासाठी सक्षम करणे हे या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. या आधुनिक युगातही विद्यार्थिनींवरील अत्याचार सर्रास घडत आहेत. त्यामुळे विद्यार्थिनींनी स्वसंरक्षणाच्या तंत्राचा सराव केला पाहिजे. अनुभवी आणि अनुकूल मार्शल आर्टस् प्रशिक्षकांकडून मुलींनी सुरक्षित वातावरणात व्यावहारिक संरक्षण तंत्र शिकणे आवश्यक आहे. विद्यार्थिनींसाठी हा व्यावहारिक संरक्षण तंत्र कार्यक्रम तणाव कमी करण्यासाठी त्यांनी स्वसंरक्षण कौशल्ये शिकण्याचा उत्तम मार्ग असेल. सहावी ते बारावीत शिकणाऱ्या मुलींना स्वसंरक्षणाचे तीन महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येईल. एक प्रशिक्षक, मार्शल आर्टच्या किमान एक शैली/प्रकारात विशेष/कुशल (तायक्वांदो, वुशू, कराटे, ज्युडो, वेस्टर्न बॉक्सिंग, किक बॉक्सिंग, मुए थाई, जिउ-जित्सू (किंवा जुजुत्सु), क्राव मागा, एकिडो, जी कुने Doforand आणि भारतीय मार्शल आर्टचे कोणतेही स्वरूप) पात्रतेमध्ये वर नमूद केल्याप्रमाणे स्वसंरक्षण विशिष्ट कौशल्याचे प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

- शालेय अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून भविष्यातील सरावासाठी प्रत्येक शाळेतील शारीरिक शिक्षण शिक्षकांना या कौशल्यांचे उद्बोधन करण्यात येईल. शारीरिक शिक्षण शिक्षक किंवा जेथे शारीरिक शिक्षण शिक्षक नाही तेथे नियमित शिक्षक हे शालेय स्तरावरील या उपक्रमासाठी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक असतील आणि प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशिक्षणात सहभागी होतील. ऑनलाईन प्रणाली, एमआयएस टूल आणि नॉलेज रिपॉझिटरी प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात येईल. स्वसंरक्षण प्रशिक्षण, जीवन कौशल्ये, मुलांच्या संरक्षणाबाबत समस्या, आत्म-जाकरूकता, स्वसंरक्षण आणि स्वयं-विकास यावर लक्ष केंद्रित करून जीवन कौशल्ये २०,४२१ उच्च प्राथमिक आणि १,७८० माध्यमिक शाळांमधील मुलींमध्ये राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा कार्यक्रमांतर्गत स्वसंरक्षण प्रशिक्षण, जीवन कौशल्य देण्यासाठी तरतूद मंजूर.

- **अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

✶ **Sanitary Pad Vending and Incinerator Machines :**

- मुलींना सुरक्षित आणि प्रभावी मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापनाच्या विविध कारणांमुळे मर्यादा येतात. हे लक्षात घेता, निरोगी मासिक पाळी आणि मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन हे अनेक शाश्वत विकास उद्दिष्टांशी (SDG) जोडलेले आहे. त्यामुळे राज्यात विशेषत: शालेय किशोरवयीन मुलांसाठी सुरक्षित मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्याची अधिक गरज आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) परिच्छेद ४.२८ मध्ये नमूद केल्यानुसार आरोग्यविषयक मूलभूत प्रशिक्षण, प्रतिबंधात्मक आरोग्य, मानसिक आरोग्य, चांगले पोषण, वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छता, आपत्ती प्रतिसाद आणि प्रथमोपचार यांचाही अभ्यासक्रमात समावेश असणे गरजेचे आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना मासिक पाळी आरोग्य आणि स्वच्छता व्यवस्थापनाशी संबंधित समस्यांचे महत्त्व समजेल आणि शाळेत सुरक्षित आणि सुरक्षित वातावरण मिळेल. तसेच शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि समुपदेशन, संवेदनशीलता, मासिक पाळी आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करतील.

- ८,१०३ उच्च प्राथमिक व १०० माध्यमिक शाळांमधील मुलींना Sanitary pad vending and incinerator machine उपलब्ध करून देण्याचा आणि वापरलेल्या सॅनिटरी नॅपकिनची सुरक्षित विल्हेवाट लावण्यासाठीची यंत्रणा निर्माण करण्यासाठी सन २०२३-२४ करिता तरतूद मंजूर

- राज्यस्तरावरून उपलब्ध करून देण्यास इन्सिनरेटर्ससह सॅनिटरी नॅपकीन व्हेंडिंग मशीन तरतूद मंजूर.

- **अंमलबजावणीची जबाबदारी :** राज्यस्तर.

### ✶ विशेष गरजाधिष्ठित बालकांसाठी समावेशित शिक्षण

दिनांक २८ डिसेंबर २०१६ रोजी केंद्र शासनाने Right of Person With Disability (RPWD) Act, २०१६ अधिसूचना निर्गमित केली आहे. या अधिनियमातील प्रकरण-३, कलम १६ व १७ तसेच प्रकरण-६, कलम ३१ (१ व २) मध्ये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ चा संदर्भ नमूद करून विशेष गरजा असणाऱ्या बालकांमध्ये कोणताही भेदभाव न करता समावेशित शिक्षणाद्वारे पुढील नमूद करण्यात आलेल्या २१ प्रकारातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत नमूद केले आहे.

विशेष गरजा असणाऱ्या अंशत: अंध, पूर्णत: अंध, कर्णबधीर, मतिमंद, अस्थिव्यंग, वाचादोष, बहुविकलांग, सेरेब्रल पाल्सी, अध्ययन अक्षमता, स्वमग्न इत्यादी प्रवर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार गरजा विचारात घेऊन त्यांना शिक्षणाच्या नियमित प्रवाहात समावेशित करण्यासाठी येणाऱ्या आव्हानांवर उपाययोजना करावयाची आहे. त्या अनुषंगाने RPWD Act 2016 मधील कलम 2(zc) मध्ये नमूद केल्याप्रमाणे २१ प्रवर्गातील विशेष गरजा असणाऱ्या बालकांना नजिकच्या सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या मान्यताप्राप्त शाळांमध्ये वयाच्या १८ वर्षांपर्यंत सुयोग्य व संचारमुक्त वातावरणात शिक्षण पूर्ण करण्यासाठी नियमित शाळेत प्रवेश व शैक्षणिक सहाय्यभूत सेवा उपलब्ध करून देऊन शाळेत टिकवून ठेवण्याची जबाबदारी राज्यातील प्रत्येक घटकाची आहे.

विशेष गरजा असलेल्या बालकांना अपंग किंवा विकलांग या अर्थाने न संबोधता इतर विद्यार्थी ज्याप्रमाणे येणाऱ्या आव्हानांनुसार दृश्य शैली, श्रवण शैली, स्पर्श शैली, श्रवण व दृश्य शैली व बहु अध्ययन शैली (Visual Learning, Audio Learning, Tectile Learning, Audio and Visual Learning, Multi Sensory Learning) या संवेदन शैलीचा उपयोग करून वर्गात किंवा परिसरात अध्ययन करतात. त्याच धर्तीवर प्रत्येक वर्ग शिक्षक या बालकांची अध्ययन अध्यापन प्रक्रिया वर्गातच त्यांच्या नावाने संबोधन करणे व सर्व मुले शिकू शकतात अशी धारणा पक्की करून सर्वांसाठी शिक्षण ही संकल्पना सर्व समावेशक करणे.

| Medical Approach | | Learner Approach |
|---|---|---|
| Blindness | .. | Audio Learner and Tectile Learner |
| Low Vision | .. | Multi Sensory Learner |
| Hearing Impairment (deaf and hard of hearing) | .. | Audio and Visual Learner |
| Speech and Language Disability | .. | Multi Sensory Learner |
| Locomotor Disability | .. | Multi Sensory Learner |
| Mental Illness | .. | Multi Sensory Learner |
| Specific Learning Disability | .. | Multi Sensory Learner |
| Cerebral Palsy | .. | Multi Sensory Learner |
| Autisum Spectrum Disorder | .. | Multi Sensory Learner |
| Multiple Disability including deaf, blindness | .. | Multi Sensory Learner |
| Leprosy Cured Persons | .. | Multi Sensory Learner |
| Dwarfism | .. | Multi Sensory Learner |
| Intellectual Disability (MR) | .. | Multi Sensory Learner |
| Muscular Dystrophy | .. | Multi Sensory Learner |
| Chronic Neurological Conditions | .. | Multi Sensory Learner |
| Multiple Sclerosis | .. | Multi Sensory Learner |
| Thalassemia | .. | Multi Sensory Learner |
| Hemophilla | .. | Multi Sensory Learner |
| Sickle Cell Disease | .. | Multi Sensory Learner |
| Acid Attac Victim | .. | Multi Sensory Learner |
| Parkinson’s Disease | .. | Multi Sensory Learner |
| Normal Student | .. | Multi Sensory Learner |

विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्ययनार्थी दृष्टिकोनातून अध्ययन शैलीनुसार मूलभूत चाचण्यांमध्ये सहभागी करून घेणे. जेणेकरून पुढील कालावधीत अध्ययन अध्यापन व मूल्यमापन प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होईल. यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ८ जानेवारी, २०१६, दिनांक १५ फेब्रुवारी २०१६, दिनांक ११ जानेवारी २०१७ तसेच दिनांक १६ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयांच्या शैक्षणिक दृष्टिकोनातून यथोचित उपयोग करण्यात यावा.

शासन निर्णय दि. ३०-०७-२०१९ अन्वये जिल्हा व महानगरपालिका स्तरावर प्रकरण-३. कलम १६ व १७ व प्रकरण-६, कलम ३१ ची अंमलबजावणी करण्यासाठी नोडल ऑफिसर म्हणून शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) घोषित करण्यात आले आहे. समाजातील प्रत्येक घटकाला केंद्रबिंदू ठरवून विद्यार्थ्यांना लागणाऱ्या प्रत्येक शैक्षणिक व साहाय्यभूत सेवा-सुविधा (वैद्यकीय व शैक्षणिक मूल्यमापन, उपचारात्मक निदान शिबिरे आवश्यकतेनुसार शस्त्रक्रिया, साहित्य व साधने उपकरणे, ब्रेल बुक, मदतनीस भत्ता, परिवहन भत्ता, मुलींसाठी प्रोत्साहन भत्ता, शाळास्तरावर विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे व शैक्षणिक गरजा ओळखण्यासाठी मूल्यमापन करणे, शीघ्र हस्तक्षेप कार्यक्रम, School Readiness Programme, Home Based Educational Programme, मोजमाप शिबिरे, ठळक अक्षरातील पुस्तके, थेरेपी सेवा, शैक्षणिक व Therapeutic संसाधन कक्ष, अडथळा विरहित वातावरण, अध्ययन शैलीनुसार अभ्यासक्रम सुलभीकरण प्रशिक्षण कार्यशाळा, संवेदन शैलीनुसार विकासात्मक प्रशिक्षण कार्यशाळा, क्रीडा, क्षेत्रीय भेटी, ICT कार्यक्रम व विशेष शिक्षक मानधन इ.) प्रदान करण्यासाठी विशेष गरजा असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी तरतूद मंजूर आहे. प्राथमिक स्तरावरील १,९०,२३८ व माध्यमिक स्तरावरील ५०,५८६ अशा एकूण २,४०,८२४ विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत शैक्षणिक व साहाय्यभूत सेवांचा लाभ दिला जातो.

### व्यवस्थापननिहाय विशेष गरजाधिष्ठित बालके (सर्व)

| व्यवस्थापन | वर्ग १ ते ८ | | | वर्ग ९ ते १२ | | | वर्ग १ ते १२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था. | ५१,८२१ | ३७,८८८ | ८९,७०९ | १,७३७ | १,६७६ | ३,४१३ | ५३,५५८ | ३९,५६४ | ९३,१२२ |
| खाजगी अनुदानित | ४६,३८५ | ३१,२२२ | ७७,६०७ | २१,८५४ | १८,३९० | ४०,२४४ | ६८,२३९ | ४९,६१२ | १,१७,८५१ |
| खाजगी विना-अनुदानित | १४,८७९ | ८,०४३ | २२,९२२ | ४,१४० | २,७८९ | ६,९२९ | १९,०१९ | १०,८३२ | २९,८५१ |
| **एकूण..** | **१,१३,०८५** | **७७,१५३** | **१,९०,२३८** | **२७,७३१** | **२२,८५५** | **५०,५८६** | **१,४०,८१६** | **१,००,००८** | **२,४०,८२४** |

### २१ प्रकारानुसार प्राथमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विशेष गरजाधिष्ठित बालके (सर्व)

| Sr. No. | Disability Type | Class 1 to 8 | | | Class 9 to 12 | | | Class 1 to 12 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total |
| 1 | Blindness | 2686 | 2066 | 4752 | 1020 | 725 | 1745 | 3706 | 2791 | 6497 |
| 2 | Low-vision | 18535 | 17929 | 36464 | 7171 | 8875 | 16046 | 25706 | 26804 | 52510 |
| 3 | Hearing impairment | 12742 | 9522 | 22264 | 2667 | 2081 | 4748 | 15409 | 11603 | 27012 |
| 4 | Speech and Language disability | 12767 | 6571 | 19338 | 2028 | 1047 | 3075 | 14795 | 7618 | 22413 |
| 5 | Locomotor Disability | 14860 | 9623 | 24483 | 4549 | 3227 | 7776 | 19409 | 12850 | 32259 |
| 6 | Mental Illness | 2159 | 1322 | 3481 | 275 | 202 | 477 | 2434 | 1524 | 3958 |
| 7 | Specific Learning Disabilities | 9260 | 6380 | 15640 | 3579 | 2073 | 5652 | 12839 | 8453 | 21292 |
| 8 | Cerebral palsy | 2914 | 1764 | 4678 | 594 | 411 | 1005 | 3508 | 2175 | 5683 |
| 9 | Autism Spectrum Disorder | 1586 | 530 | 2116 | 136 | 39 | 175 | 1722 | 569 | 2291 |
| 10 | Multiple Disability including deaf, blindness | 4097 | 2672 | 6769 | 611 | 377 | 988 | 4708 | 3049 | 7757 |
| 11 | Leprosy Cured Persons | 57 | 47 | 104 | 22 | 23 | 55 | 79 | 80 | 159 |
| 12 | Dwarfism | 636 | 748 | 1384 | 228 | 221 | 449 | 864 | 969 | 1833 |
| 13 | Intellectual Disability | 27412 | 15809 | 43221 | 3854 | 2686 | 6540 | 31226 | 18495 | 49761 |
| 14 | Muscullar Dystrophy | 1335 | 615 | 1950 | 318 | 149 | 467 | 1653 | 764 | 2417 |
| 15 | Chronic Neurological Conditions | 255 | 185 | 440 | 64 | 56 | 120 | 319 | 241 | 560 |
| 16 | Multiple Sclerosis | 187 | 111 | 298 | 21 | 7 | 28 | 208 | 118 | 326 |
| 17 | Thalassemia | 429 | 338 | 767 | 93 | 72 | 165 | 522 | 410 | 932 |
| 18 | Hemophilia | 170 | 34 | 204 | 56 | 9 | 65 | 226 | 43 | 269 |
| 19 | Sickle Cell disease | 961 | 868 | 1829 | 434 | 556 | 990 | 1395 | 1424 | 2819 |
| 20 | Acid Attack victim | 14 | 8 | 22 | 5 | 3 | 8 | 19 | 11 | 30 |
| 21 | Parkinson's disease | 23 | 11 | 34 | 6 | 6 | 12 | 29 | 17 | 46 |
| | **Total...** | **113085** | **77153** | **190238** | **27731** | **22855** | **50586** | **140816** | **100008** | **240824** |

## ✶ व्यवसाय शिक्षण

इयत्ता ९ वी ते १२ वीतील शासकीय शाळांमधील मुलांना व्यावसायिक शिक्षणाची सुविधा आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला-गुणांचा विकास करून भावी जीवनात स्वबळावर व्यवसाय/उद्योग धंदा करण्यासाठी सक्षम करणे. दोन व्यवसाय शिक्षण विषय मुख्य विषय म्हणून शिकविण्यात येतात. (द्वितीय भाषा किंवा सामाजिक शास्त्र या विषयास पर्याय म्हणून) व्यवसाय शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर योजनेची अंमलबजावणी केंद्र सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाने मान्यता दिलेल्या ६४६ शाळांमध्ये NSDC नवी दिल्ली यांच्यामार्फत मान्यताप्राप्त व्यवसाय शिक्षण संस्थांतर्फे मुख्यत्वे शासकीय शाळांमध्ये राबविण्यात येत आहे. सदर योजना ही NVEQF / NSQF आराखड्याशी समरूप करण्यात आली आहे. या आराखड्याअंतर्गत व्यवसाय शिक्षण अंतर्गत पात्रता ही विविध पातळ्यानुसार ज्ञान व कौशल्यावर आधारित आहे. विविध क्षेत्रांशी संबंधित Job Role आणि त्या अंतर्गत आत्मसात करावयाची कौशल्ये यांची सुनियोजित संरचना करण्यात आल्यामुळे विद्यार्थी, प्रशिक्षण संस्था तसेच औद्योगिक क्षेत्र यांना व्यवसाय शिक्षणाशी संबंधित एक समान माहिती उपलब्ध होते. सदर योजनेची अंमलबजावणी National Skill Development Corporation, New Delhi (NSDC) यांच्याशी संलग्न व्यवसाय प्रशिक्षण संस्थांच्या सहकार्याने केली जाते. सदर व्यवसाय प्रशिक्षण संस्थांची निवड व त्यांच्याशी समन्वयाकरिता NSDC संस्था सहकार्य करते. सदर व्यवसाय प्रशिक्षण संस्थांमार्फत शाळांमध्ये व्यवसाय प्रशिक्षकांची नियुक्ती केली जाते. सन २०२३-२४ मध्ये ६४६ शाळांमध्ये १९ व्यवसाय प्रशिक्षण संस्थांद्वारे व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम राबविण्यात आले आहेत. व्यवसाय प्रशिक्षकांचे नियुक्तीनंतरचे प्रशिक्षण व दरवर्षी तीन दिवसांचे निवासी सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. कोविड-१९ च्या प्रादूर्भावामुळे सन २०२२-२३ मध्ये सदरचे प्रशिक्षण ऑनलाईनद्वारे घेण्यात आले. सदर प्रशिक्षणाकरिता NSDC, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने संबंधित विषयांच्या सेक्टर स्कील कौन्सिलतर्फे तज्ज्ञ प्रशिक्षक प्रशिक्षण देतात. व्यवसाय शिक्षण विषयाकरिता पंडित सुंदरलाल शर्मा केंद्रीय व्यवसाय शिक्षण संस्था, भोपाळ या संस्थेमार्फत संपूर्ण देशाकरिता व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाचे पाठ्यक्रम निश्चित करून NCERT द्वारे याबाबतची पुस्तके प्रकाशित होतात. सदर पाठ्यक्रम महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्य मंडळ),पुणे यांना कळवून लेखी परीक्षा शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येतात.

सन २०२३-२४ मध्ये Healthcare, Multi-Skill, Automobile, Retail, Beauty & Wellness, Agriculture, Electronics, Tourism and Hospitality, Physical Education & Sports, Plumbing, Power and Apparels असे १२ ट्रेड आहेत.

- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण १०० शाळांना प्रकल्प मान्यता मंडळाद्वारे मंजुरी देण्यात आलेली आहे.
- **अंमलबजावणी :** राज्यस्तर.

**योजनेचे संनियंत्रण**

- शासकीय व अनुदानित शाळांमध्ये पूर्व प्राथमिक ते इयत्ता १२ वी पर्यंत युडाईस प्लस प्रणालित नाव नोंदणीवर आधारित चाईल्ड-ट्रॅकिंग सिस्टिम करण्याकरिता १,५९,०८,०९० विद्यार्थ्यांकरिता प्रती मूल रुपये ३ प्रमाणे तरतूद.
- युडाईस प्लस प्रणालित विद्यार्थ्यांच्या माहितीचे अद्यावतीकरण करण्याकरिता १,५९,०८,०९० विद्यार्थ्यांकरिता प्रती मूल रुपये २ प्रमाणे तरतूद मंजूर.
- **अंमलबजावणी :** राज्यस्तर.

**कार्यक्रम व्यवस्थापन**

- गट / शहर साधन केंद्र, जिल्हा व राज्यस्तरावरील कार्यरत पदांचे वेतन कार्यालयीन व्यवस्थापन खर्च, आकस्मिक खर्च, मानधन, प्रवास व दैनिक भत्ते, मूल्यांकन इत्यादी बाबींकरिता तरतूद मंजूर.
- **अंमलबजावणी :** राज्य व जिल्हास्तर.

**PM SHRI योजने अंतर्गत सन २०२३-२४ अंमलबजावणीबाबत टिप्पणी**

PM SHRI या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील सर्व घटकांचा समावेश करण्याच्या उद्देशाने देशातील सुमारे १५,००० हून अधिक शाळा उत्कृष्ट भौतिक/पायाभूत सुविधा योग्य संसाधनांसह आनंददायी, उत्साहवर्धक व शैक्षणिकदृष्ट्या अनुकुल शालेय वातावरणात उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वसमावेशक उत्कृष्ट शाळा म्हणून विकसित केल्या जाणार आहेत.

(१) सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र राज्यातील ५१६ शाळांची निवड करण्यात आलेली आहे. सदर ५१६ शाळांसाठी सन २०२३-२४ च्या वार्षिक अंदाजपत्रक व कृती आराखड्यातील केंद्रशासनाच्या दिनांक १७ जुलै २०२३ रोजी झालेल्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीत रुपये २११.३५ कोटी मंजूर झालेले आहेत.

(२) PM SHRI प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता केंद्रीय हिस्सा रक्कम रुपये ३१,४४,२७,००० इतका निधी व त्यास समरूप राज्य हिस्सा रक्कम रुपये २१,१३,५१,३३३ इतका निधी असा एकूण रुपये ५२,५७,७८,३३३ इतका निधी पहिला हप्ता म्हणून उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. शासन निर्णय संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२१/एस.डी.६, मंत्रालय, दिनांक ५ सप्टेंबर २०२३ अन्वये रुपये २२,०८,९३,३३३ आवर्ती आणि रुपये ३०,४८,८५,००० अनावर्ती असा एकूण रुपये ५२,५७,७८,३३३ इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे.

(३) प्रकल्प मान्यता मंडळाने PM SHRI योजनेसाठी सन २०२३-२४ करिता मंजूर केलेल्या एकूण रुपये २११ कोटी वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकाच्या अंमलबजावणीस मा. उपकार्यकारी समितीने दिनांक ४ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे.

(४) त्यानुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्रमांक मप्राशिप/लेखा/PM SHRI/Rec/Non Rec/२०२३--२४/३०१४, दिनांक ८ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पत्रान्वये रुपये २२०२.५५ लक्ष आवर्ती अनुदान व रुपये ७८४.६१ लक्ष अनावर्ती अनुदान असे एकूण रक्कम रुपये २९८७.१६ लक्ष सर्व जिल्ह्यांना प्रपत्र अ मध्ये दिलेल्या उपक्रमासाठी वितरित केलेले आहे. सर्व जिल्हा व महानगरपालिका यांना उपक्रमनिहाय मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. शाळास्तरावर निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. शाळास्तरावर शाळा व्यवस्थापन समितीसोबत बैठक आयोजित करून उपलब्ध निधी खर्च करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

| PAB मंजूर | राज्य हिस्सा प्राप्त | | | केंद्र हिस्सा प्राप्त | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आवर्ती<br>१ | अनावर्ती<br>२ | एकूण<br>३ | आवर्ती<br>४ | अनावर्ती<br>५ | एकूण<br>६ |
| २१,१३,५१,३३३ | ८,९३,९७,३३३ | १२,१९,५४,००० | २१,१३,५१,३३३ | १३,१४,९६,००० | १८,२९,३१,००० | ३१,४४,२७,००० |

| एकूण प्राप्त निधी पहिला हिस्सा | | | जिल्हा वितरित निधी | | |
|---|---|---|---|---|---|
| आवर्ती<br>७ | अनावर्ती<br>८ | एकूण<br>९ | आवर्ती<br>१० | अनावर्ती<br>११ | एकूण<br>१२ |
| २२,०८,९३,३३३ | ३०,४८,८५,००० | ५२,५७,७८,३३३ | २२,०२,५५,००० | ७,८४,६१,००० | २९,८७,१६,००० |

## राज्यातील शिक्षण पद्धतीचे अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण
## (STARS-Strengthening Teaching-Learning and Results for States)

जागतिक बँकेद्वारे अर्थसाहाय्य केला जाणारा राज्यातील शिक्षण पद्धतीतील अध्यापन, अध्ययन व परिणाम यांचे बळकटीकरण (STARS-Strengthening Teaching-Learning and Results for States) या प्रकल्पासाठी हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, राजस्थान, मध्य प्रदेश व केरळ या सहा राज्यांची Performance Grading Index मधील कामगिरीच्या आधारे निवड करण्यात आली आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.४९/एसडी-६, दिनांक ११ फेब्रुवारी २०२१ अन्वये STARS हा प्रकल्प राज्यात राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत राज्यात STARS प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या प्रकल्पाकरिता केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० असा आहे.

**STARS प्रकल्पाची खालील ५ मुख्य उद्दिष्टये आहेत --**

(१) Strengthening Early Childhood Education (ECE) and Foundational Learning.

(२) Improving Learning Assesment Systems.

(३) Strengthening Classroom Instruction and Remediation through Teacher Development and School Leadership.

(४) Governance and Decentralized Management for Improved Service Delivery.

(५) School to Work / Higher Education Transition.

STARS प्रकल्पासाठी भारत सरकारने STATE INCENTIVE GRANT MANUAL विकसित केले आहे. या मॅन्युअलमध्ये खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार गुणांकन नमूद केले आहे.

| | Component | Score |
|---|---|---|
| 1. | Strengthened Early Years Education | 0-20 |
| 2. | Improved Learning Assesment Systems | 0-20 |
| 3. | Improved Teacher Performance and Classroom Practice | 0-20 |
| 4. | Strengthened Service Delivery * | 0-30 |
| 5. | Vocational Education and Training | 0-10 |

* Mandatory Component (अनिवार्य घटक)

STARS प्रकल्पाची अंमलबजावणी करताना General Financial Rules (GFR), समग्र शिक्षा Manual on Financial Management and Procurement, केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी नर्गमित केलेली मार्गदर्शक तत्त्वे / निर्णय / परिपत्रक यांमधील निकष / तरतुदी लागू राहतील अशा सूचना भारत सरकारने दिल्या आहेत.

STARS प्रकल्पाचे अंमलबजावणीकरिता भारत सरकारने सन २०२३-२४ करिता राज्यास खालीलप्रमाणे तरतूद मंजूर केली आहे--

| | Component | Spill Over | Fresh | | Total |
|---|---|---|---|---|---|
| | | | Rec. | Non Rec. | |
| SIG 1 : | Strengthened Early Years Education | 0.00 | 5548.18 | 8206.23 | 13754.41 |
| SIG 3 : | Improved Learning Assesment Systems | 0.00 | 6860.61 | 0.00 | 6860.61 |
| SIG 3 : | Improved Teacher Performance and Classroom Practice | 6936.65 | 6212.60 | 344.00 | 13493.25 |
| SIG 4 : | Strengthened Service Delivery | 890.00 | 820.12 | 4033.00 | 5743.12 |
| SIG 5 : | Vocational Education and Training | 0.00 | 1519.88 | 0.00 | 1519.88 |
| | **Total** | **7826.65** | **20961.39** | **12583.23** | **41371.27** |

## बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ ची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल २०१० पासून राज्यात सुरू झालेली आहे. शासनाने अधिसूचना क्रमांक पीआरई-२०१०/प्र. क्र. २१२ (बी)/पीई-१, दिनांक ११ ऑक्टोबर २०११ अन्वये महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ प्रसिद्ध केले आहेत.

त्यानुसार शाळेनजीकच्या आर्थिक दुर्बल घटकांतील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत अथवा प्रवेशाच्या स्तरावर त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देणे मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित शाळांना अनिवार्य केलेले आहे. (अल्पसंख्याक शाळा वगळून).

पालकांचे वार्षिक उत्पन्न किमान १ लक्ष रुपये असल्यास, त्यांच्या पाल्यांना दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना उत्पन्नाच्या अटीशिवाय समाविष्ट करण्यात आले आहे.

वर्ग १ ते ८ प्राथमिक स्तरावर शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये १,४६,०२,७६४ (२०२२-२३ नुसार) विद्यार्थी शिक्षण घेत असून सर्व शाळांना शाळा खोल्या, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, संरक्षण भिंत, शैक्षणिक साधने, अग्निशमन यंत्र इत्यादी आवश्यक सुविधा देण्याबाबत शासन सतत प्रयत्नशील आहे. प्रत्येक १ कि. मी. अंतरावर प्राथमिक व ३ कि. मी. अंतरावर उच्च प्राथमिक शाळांची सोय उपलब्ध करून द्यावी. यासाठी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, सर्वशिक्षा अभियान या अंतर्गत छोट्या वाड्या, वस्त्या, गावे या ठिकाणी शाळेची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषयाचे अध्यापन, इंग्रजी विषयाचे शिक्षकांना ब्रिटिश कौन्सिलमार्फत प्रशिक्षण देणे, गणिती कौशल्यविषयक शैक्षणिक साधने शाळांना पुरविणे असे निर्णय घेतले आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ नुसार कलम १९ व २५ नुसार शाळेचा दर्जा, शिक्षकांचे पदे आणि विद्यार्थी-शिक्षक प्रमाण याबाबत निर्देश दिलेले आहेत.

या कलमान्वये विहित करण्यात आलेल्या परिशिष्टामध्ये १ ते ५ चा वर्ग या प्राथमिक आणि ६ ते ८ उच्च प्राथमिक वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या तरतुदींनुसार विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखण्याबाबत निर्देश आहेत.

दिनांक २१ एप्रिल २०१४ चे शासन निर्णयानुसार RTE २००९ बाबतच्या तक्रारीचे निवारण करणेसाठी तालुकास्तर, जिल्हास्तर, राज्यस्तर अशा तक्रार निवारण समित्यांचे गठन करणेत आलेले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना

माननीय उपमुख्यमंत्री यांनी सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणांमध्ये राज्यात १५०० शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचे जाहीर केले होते.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या (८१) शाळा, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, शासकीय विद्यानिकेतन व नागरी भागातील शाळा यांच्या समावेशाने प्रथम टप्प्यात ४८८ शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यास मान्यता देण्यात आली.

**या अंतर्गत खालील प्रमाणे सुविधा अनुज्ञेय आहेत --**

(१) विद्यार्थीसंख्येनुसार वर्गखोल्या.

(२) मुला-मुलींकरिता व CWSN (Child With Special Need) साठी स्वतंत्र व पुरेशी स्वच्छतागृहे.

(३) पेयजल सुविधा व हँडवॉश स्टेशन.

(४) ग्रंथालय / वाचनालय.

(५) संगणक कक्ष.

(६) व्हर्च्युअल क्लासरूमची सुविधा.

(७) शाळेला संरक्षक भिंत

शासन निर्णय, दिनांक ४ फेब्रुवारी २०२२ नुसार सदर योजनेसाठी प्रथम ३५५ आदर्श शाळांना लहान बांधकामाकरिता रुपये ५३.९७ कोटी अनुदान उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

सन २०२२-२०२३ मध्ये ३२८ आदर्श शाळांना मोठ्या बांधकामांसाठी रुपये १८३.६४ कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला आहे.

सन २०२३-२०२४ मध्ये मागील वर्षातील अपूर्ण निधी मिळालेल्या शाळांना व कोणत्यही निधी न मिळालेल्या शाळांना एकूण रुपये १८८.२५ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे.

सन २०२४-२०२५ मध्ये योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी रुपये २०० कोटी इतका निधी प्रस्तावित आहे.

**आधार -** (१) प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे.

(२) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई (MPSP).

(३) राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, पुणे (SCERT)

# महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

## विभागनिहाय संरचना

**संचालक**

**सहसंचालक**

**मुख्य व उपविभाग**

| मुख्य विभाग | उपविभाग |
|---|---|
| मानव संसाधन विकास | आस्थापना लेखा, वसतिगृह, सीपीडी, ग्रंथालय, SSS/ RMSA |
| समन्वय | अभ्यासक्रम विकसन, मूल्यमापन, संशोधन, संकीर्ण, विज्ञान, इंग्रजी, गणित, व्यवसाय मार्गदर्शन व प्रशिक्षण |
| आय. टी. व प्रसार माध्यम | |
| भाषा | मराठी, उर्दू, इतर भाषा |
| सामाजिक शास्त्र, कला व क्रीडा | कला विभाग व क्रीडा विभाग, सामाजिकशास्त्र (इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र) |
| सेवापूर्व शिक्षण | सेवापूर्व शिक्षण, बालशिक्षण मानसशास्त्र |
| समता | लैंगिक परस्परावलंबन, धार्मिक परस्परावलंबन, जातीय परस्परावलंबन, CWSN, शाळाबाह्य मुले, शालेय व्यवस्थापन समिती |
| आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष | |

**उपविभाग**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक १७/१०/२०१६ व दिनांक ३१/०७/२०१७ व दिनांक ०७/१२/२०१८ नुसार परिषदेची व परिषदेच्या अधिनस्त कार्यालयांची पुनर्रचना करण्यात येऊन नव्याने निश्चित केलेल्या संरचनेनुसार पदांचा तपशील.

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे व अधिनस्त प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व) व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)**

| अनुक्रमांक | पदनाम | पे मॅट्रिक्स (सातव्या वेतन आयोगानुसार) | पदांचा तपशील | |
|---|---|---|---|---|
| | | | आवश्यक पदसंख्या | प्रत्यक्ष उपलब्ध पदसंख्या |
| | **गट— अ** | | | |
| १ | संचालक | एस-२९ (१३११००-२१६६००) | १ | १ |
| २ | सहसंचालक | एस-२५ (७८८००-२०९२००) | २ | १ |
| ३ | प्राचार्य | एस-२३ (६७७००-२०८७००) | ४३ | ४२ |
| ४ | प्रशासन अधिकारी (आस्थापना) / सहायक संचालक (प्रशासन) / वरिष्ठ अधिव्याख्याता / सहायक संचालक (लेखा). | एस-२० (५६१००-१७७५००) | १६४ | १६४ |
| | **गट— ब** | | | |
| १ | कार्यक्रम अधिकारी (प्रशासन) / प्राध्यापक / अधीक्षक (म.शि.से.) | एस-१७ (४७६००-१५११००) | ८० | ७८ |
| २ | लेखाधिकारी / स्वीय सहायक | एस-१६ (४४९००-१४२४००) | ७ | २ |
| ३ | अधिव्याख्याता | एस-१५ (४१८००-१३२३००) | १९८ | १९८ |
| ४ | अधीक्षक (सा.रा.से.) | एस-१४ (३८६००-१२२८००) | ३८ | ३८ |
| | **गट— क** | | | |
| १ | विषय सहायक / समुपदेशक | एस-१५ (४१८००-१३२३००) | ५९५ | १५० |
| २ | सहायक अधीक्षक / लघुलेखक (निम्नश्रेणी) / कार्यशाळा सहायक / ग्रंथपाल | एस-१४ (३८६००-१२२८००) | ७१ | ७१ |
| ३ | मुख्य लिपिक / लेखापाल / तंत्रज्ञ | एस-१३ (३५४००-११२४००) | ७१ | ७१ |
| ४ | सांख्यिकी सहायक / ग्रंथपाल | एस-१० (२९२००-९२३००) | ६९ | ६९ |
| ५ | वरिष्ठ लिपिक | एस-८ (२५५००-८११००) | १६ | १५ |
| ६ | सहायक ग्रंथपाल | एस-७ (२१७००-६९१००) | १ | १ |
| ७ | कनिष्ठ लिपिक / वाहनचालक | एस-६ (१९९००-६३२००) | १०६ | १०६ |
| | **गट— ड** | | | |
| १ | नाईक | एस-३ (१६६००-५२४००) | ४ | ४ |
| २ | शिपाई | एस-१ (१५०००-४७६००) | ११४ | ११४ |
| | | **एकूण ..** | **१५८०** | **११२५** |

**टीप :** १. परिषदेची व अधिनस्त कार्यालयांची शासन निर्णय, दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ अन्वये पुनर्रचना करण्यात आलेली आहे. पुनर्रचनेअंतर्गतपरिषदेची व परिषदेच्या अधिनस्त कार्यालयातील पदांची संरचना नव्याने निश्चित केलेली आहे. या पुनर्रचनेमध्ये परिषदेची व अधिनस्त कार्यालयांची काही पदे नव्याने आवश्यक ठरविण्यात आलेली आहेत. तर, मूळ आकृतीबंधातील काही पदांची आवश्यकता राहिलेली नसल्याने अशी पदे कमी करण्यात आलेली आहेत.

२. पुनर्रचने अंतर्गत जी पदे नव्याने निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यापैकी जी पदे समकक्ष स्तरावर उपलब्ध आहेत अशी पदे शासन निर्णय दि. ३१ जुलै २०१७ व दि. ७ डिसेंबर २०१८ अन्वये समान वेतनश्रेणीमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

३. शासन निर्णय, दिनांक २३ ऑगस्ट २०१८ अन्वये १. शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष, वरळी, मुंबई, २. महाराष्ट्र राज्य दृकश्रवण शिक्षण संस्था. ३. विभागीय व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था (एकूण-७) अशा एकूण ९ संस्थांचे विलीनीकरण करण्यात आलेले आहे.

४. शासन निर्णय, दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ अन्वये जि. शै सा. व्या. वि. संस्थेमध्ये विषय सहायक पदांची नव्याने आवश्यकता निश्चित करण्यात आलेली आहे.

५. यामध्ये परिषदेतील व अधिनस्त कार्यालयातील शासन निर्णय दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ अन्वये नव्याने आवश्यक ठरविण्यात आलेली एकूण पदे ही सुधारित आकृतीबंधासाठी प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. सद्या शासनस्तरावरून सुधारित आकृतिबंध अंतिम करण्याचे काम सुरू असून अद्याप अंतिम झालेला नाही. सबब वरील पदांमध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## संकीर्ण विभाग

## वार्षिक कार्यक्रम अंदाजपत्रक सन २०२३-२४

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक -डाएट-४५ १६ / (४० १६) / प्रशिक्षण, दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे ची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार संकीर्ण विभागाची स्थापना करण्यात आली.

**✶ संकीर्ण विभागाची कामे**

(१) माहिती अधिकार अहवाल संकलन करणे व एकत्रित अहवाल मा. शासनास व मा. जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणे.

(२) राज्यस्तरीय विषय शिक्षक संघटनांचे प्रस्ताव प्रशासकीय व आर्थिक मान्यतेसाठी शासनास पाठविणे.

(३) शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेस अभ्यासभेटी देतात त्यांना विविध विषयांची माहिती व प्रमाणपत्र देणे.

(४) संकीर्ण स्वरुपाचा पत्रव्यवहाराचा निपटारा करणे.

(५) विधानमंडळाचे तिन्ही अधिवेशन कालावधीत तारांकित / अतारांकित प्रश्नांच्या उत्तराचा अहवाल नियमितपणे शासनास पाठविणे.

(६) मा. वरिष्ठांच्या सूचनानुसार विविध बैठकांचे आयोजन करणे इतिवृत्त तयार करणे.

(७) सर्व विभागाच्या वार्षिक अंदाजपत्रक पुस्तकांचे संकलन करणे.

(८) परिषदेमध्ये राष्ट्रीय सण / उत्सव, राष्ट्रीय पुरुषांची जयंती व पुण्यतिथी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी सेवापूर्ती कार्यक्रमांचे आयोजन करणे.

(९) परिषदेची नागरिकांची सनद तयार करणे.

(१०) माहिती अधिकारांतर्गत परिषदेतील जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी घोषित करणे.

---

**अशासकीय अनुदानित अध्यापक विद्यालयांना जोडलेल्या सराव पाठशाळांना सहाय्यक अनुदाने**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | .. | अशासकीय अनुदानित अध्यापक विद्यालयांना जोडलेल्या सराव पाठशाळा (लेखाशीर्ष-२२०२०१६४) |
| २. | योजनेचा उद्देश | .. | अशासकीय अध्यापक विद्यालयांतील डी. टी. एड प्रशिक्षणार्थ्यांना सराव पाठ घेण्यासाठी सराव पाठशाळेची निर्मिती. |
| ३. | योजनेचा तपशील | .. | कनिष्ठ अध्यापक विद्यालये सुरू करताना पूर्वी प्रशिक्षणांतर्गत प्रायोगिक कामासाठी व अध्यापन सरावासाठी त्या त्या अध्यापक विद्यालयांची स्वत:ची एक सराव पाठशाळा (प्राथमिक शाळा) असणे अपेक्षित होते. परंतु जेव्हा सेवांतर्गत शिक्षणाचा विस्तार होऊ लागला तेव्हा या धोरणात बदल करून अन्य स्थानिक प्राथमिक शाळांचाही प्रामुख्याने सरावासाठी समावेश करून घेण्याचे ठरविण्यात आले. परंतु ज्या अशासकीय अध्यापक विद्यालयांच्या सराव पाठशाळा अस्तित्वात होत्या, त्या बंद करण्यात आल्या नाहीत, त्या सराव पाठशाळांच्या मान्य खर्चावर शासन १०० टक्के अनुदान देते. |
| ४. | योजनेचे उद्दिष्ट व साध्य | .. | जेव्हा सेवांतर्गत शिक्षणाचा विस्तार होऊ लागला तेव्हा या धोरणात बदल करून अन्य स्थानिक प्राथमिक शाळांचाही प्रामुख्याने सरावासाठी समावेश करून घेण्याचे ठरल्याने ज्या प्रशासकीय अध्यापक विद्यालयांच्या सराव पाठशाळा अस्तित्वात होत्या त्या बंद करण्यात आल्या नाहीत, अशा सराव पाठशाळांच्या मान्य वेतन खर्चावर १०० टक्के अनुदान दिल्याने प्रशिक्षणांतर्गत प्रायोगिक कामात व अध्यापनाच्या सरावात प्रगती झाल्याचे दिसून येते. |
| ५. | योजनेची व्याप्ती | .. | पश्चिम महाराष्ट्रातील अशासकीय अनुदानित अध्यापक विद्यालयांना एकूण २२ सराव पाठशाळा जोडण्यात आल्या आहेत. |
| ६. | राज्याची एकूण अनुदानाची आकडेवारी प्रत्यक्ष / अपेक्षित / अंदाजित सराव पाठशाळांना दिलेले अनुदान | .. | २०१९-२० प्रत्यक्ष .. १,०८,१६७ (रुपये हजारांत)<br>२०२०-२१ प्रत्यक्ष .. १,१२,४७० (रुपये हजारांत)<br>२०२१-२२ प्रत्यक्ष .. १,२०,१९८ (रुपये हजारांत)<br>२०२२-२३ प्रत्यक्ष .. १,३६,१०० (रुपये हजारांत)<br>२०२३-२४ अपेक्षित .. १,६४,०९९ (रुपये हजारांत)<br>२०२४-२५ अंदाजित .. २,०६,४३१ (रुपये हजारांत)<br>शिक्षक लाभार्थी .. १७६ |
| ७. | कमी खर्चाची कारणे | .. | |
| ८. | निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती | .. | सदर योजना कार्यान्वित झाल्यामुळे अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांना सराव पाठ घेण्यासाठी सराव पाठशाळेची निर्मिती झाली. सदर सराव पाठशाळेतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सदर योजनेमधून १०० टक्के वेतन अनुदान वितरित केले जाते. |

## अशासकीय अनुदानित अध्यापक विद्यालयांना सहाय्यक अनुदाने

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव | .. | अशासकीय अनुदानित अध्यापक विद्यालये. (लेखाशीर्ष-२२०२००८४) |
| २. | योजनेचा उद्देश | .. | प्राथमिक स्तरावर शिक्षक म्हणून नेमणुकीसाठी कमीतकमी शैक्षणिक पात्रता इयत्ता १२वी उत्तीर्ण व महाराष्ट्र राज्याची शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (डी.टी.एड.) उत्तीर्ण होणे व प्रशिक्षित प्राथमिक शिक्षण सेवक शिक्षक म्हणून नियुक्ती करणे. |
| ३. | योजनेचा तपशील | .. | खाजगी / अशासकीय अध्यापक विद्यालयांमार्फत सेवापूर्ण व सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय राज्यात केली जाते. |
| ४. | योजनेचे उद्दिष्ट व साध्य | .. | दर्जेदार प्राथमिक शिक्षणासाठी प्राथमिक शाळांमधून प्रशिक्षित शिक्षक असणे नियमानुसार आवश्यक आहे. ज्यांच्यामार्फत राष्ट्रीय व राज्यस्तरीय निर्माण केलेल्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य होऊ शकतात.<br><br>इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना परिपूर्ण व सर्वकष शिक्षण (अध्यापन) देणे, अशा क्षमतेचे शिक्षक तयार करणे. |
| ५. | योजनेची व्याप्ती | .. | सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात राज्यात अशासकीय अनुदानित तत्त्वावर ९५ अध्यापक विद्यालये कार्यरत आहेत. सदरच्या अनुदानित अध्यापक विद्यालयांना शासनामार्फत १०० टक्के वेतन अनुदान देण्यात येते.<br><br>दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाबरोबरच सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी या अध्यापक विद्यालयांतील तुकड्यांचा वापर करण्यात येतो. दोन्ही प्रशिक्षणार्थ्यांची संख्या एन. सी. टी. ई., भोपाळ यांच्यामार्फत निश्चित केली जाते. |

६. राज्याची एकूण अनुदानाची आकडेवारी ..

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष खर्च | २०१९-२० | .. | ७,२३,९५२ (रुपये हजारांत) |
| प्रत्यक्ष खर्च | २०२०-२१ | .. | ७,३३,१५० (रुपये हजारांत) |
| प्रत्यक्ष खर्च | २०२१-२२ | .. | ७,९९,८१२ (रुपये हजारांत) |
| प्रत्यक्ष खर्च | २०२२-२३ | .. | ८,९५,७१० (रुपये हजारांत) |
| अपेक्षित खर्च | २०२३-२४ | .. | १०,०४,७१२ (रुपये हजारांत) |
| अंदाजित खर्च | २०२४-२५ | .. | १०,८७,८८३ (रुपये हजारांत) |
| शिक्षक लाभार्थी | | .. | १५०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | कमी खर्चाची कारणे, अडचणी / सूचना. | .. | -- -- |
| ८. | निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती | .. | ही योजना कार्यान्वित झाल्यामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध होते. सेवापूर्ण व सेवांतर्गत प्रशिक्षण, प्रशिक्षणाच्या माध्यमातून नवीन शैक्षणिक संकल्पना, विचारप्रवाह प्रशिक्षणार्थींना अवगत होतात. |

## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था

## (केंद्रपुरस्कृत योजना)

१. योजनेचे नाव .. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (केंद्रपुरस्कृत योजना) (योजनांतर्गत योजना)

२. योजनेचा उद्देश .. प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्यांच्यात संशोधनात्मक वृत्ती विकसित करणे.

३. योजनेचा तपशील .. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण लक्षात घेता, शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना अद्ययावत ज्ञान व सातत्यपूर्ण सेवांतर्गत प्रशिक्षण देण्याची नितांत आवश्यकता आहे, हे लक्षात घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ मध्ये शिक्षकांच्या प्रशिक्षणाला प्राधान्य देण्यात आले व या धोरणानुसारच शिक्षकांचे सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमार्फत उपलब्ध करून देण्यात आले आहे. शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी व त्याचबरोबर कृती संशोधनाच्या माध्यमातून संशोधनात्मक व मूल्यमापनात्मक कृती शिक्षकांनी जोपासावी असे प्रयत्न संस्थांच्या विविध उपक्रमांतून केले जातात. सदर संस्था शासकीय अध्यापक विद्यालयांचे उच्चीकरण करून सुरू करण्यात आलेल्या आहेत. राज्यात एकूण ३५ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. परंतु बृहन्मुंबई व पालघर जिल्ह्यात अद्याप जमीन उपलब्ध न झाल्यामुळे त्या सुरू करण्यात आलेल्या नाहीत म्हणून बृहन्मुंबई व पालघर जिल्हा सोडून इतर ३३ जिल्ह्यांत सध्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कार्यान्वित झाल्या असून २९ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांसाठी प्रत्येकी २६ पदे मंजूर आहेत व उर्वरित ४ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांसाठी प्रत्येकी २५ पदे मंजूर आहे. या योजनेसाठी एकूण ८५४ पदे मंजूर आहेत. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून या योजनेकरिता केंद्र शासनाचे ६० टक्के व राज्य शासनाचे ४० टक्के या प्रमाणात अनुदान मंजूर करण्यात येते.

एन. सी. टी. ई. ॲक्ट, १९९३ नुसार जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांना मान्यता देण्याचे अधिकार राष्ट्रीय शिक्षण शिक्षक परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, भोपाळ यांना आहेत. त्यांच्याकडूनच प्रवेश क्षमता दरवर्षी निश्चित केली जाते.

सन २०१३-१४ अखेर या योजनेची तरतूद General Head अंतर्गत मंजूर करण्यात येत होती. तथापि सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासून या योजनेसाठी राज्य शासनाने SCSP व STSP साठी नव्याने लेखाशीर्ष तयार केले आहे. त्यामुळे सन २०१४-१५ पासून General Head, SCSP व STSP या लेखाशीर्षांतर्गत तरतूद वितरित करण्यात येत आहे. केंद्र शासन या योजनेच्या एकूण मंजूर तरतुदीनुसार General Head साठी ७३.८८ टक्के, SCSP Head साठी १४.५० टक्के व STSP Head साठी ११.६२ टक्के या टक्केवारीनुसार तरतूद वितरित करीत आहे.

४. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्यांच्यात संशोधनात्मक वृत्ती विकसित करणे. शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी त्याचबरोबर कृती संशोधनाच्या माध्यमातून संशोधनात्मक व मूल्यमापनात्मक वृत्ती शिक्षकांनी जोपासावी, म्हणून असे प्रयत्न संस्थेच्या विविध उपक्रमातून करणे.

५. योजनेची व्याप्ती .. सध्या महाराष्ट्रात ३३ जिल्ह्यांमध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. बृहन्मुंबई व पालघर जिल्ह्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था प्रस्तावित आहे. राज्य शासनाने नवनिर्मित पालघर जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे. तथापि, जागे अभावी बृहन्मुंबई व पालघर येथे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांची स्थापना झालेली नाही.

६. राज्याची एकूण अनुदानाची आकडेवारी. ..

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | २०१९-२० | .. | ४९५४.६३ (रुपये लाखांत) |
| प्रत्यक्ष | २०२०-२१ | .. | ४४३२.८७ (रुपये लाखांत) |
| प्रत्यक्ष | २०२१-२२ | .. | ५३१३.४१ (रुपये लाखांत) |
| प्रत्यक्ष | २०२२-२३ | .. | ६४२०.१३ (रुपये लाखांत) |
| अपेक्षित | २०२३-२४ | .. | ८३२२.६२ (रुपये लाखांत) |
| अंदाजित | २०२४-२५ | .. | ९१५४.८९ (रुपये लाखांत) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | आर्थिक तरतूद व झालेला खर्च | .. | सन २०२२-२३ | आर्थिक तरतूद .. | १०,१२०.५५ (रुपये लाखांत) |
| | | | | झालेला खर्च .. | ६,४२०.१३ (रुपये लाखांत) |
| | | | | लाभार्थी .. | ३३ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था |
| ८. | कमी खर्चाची कारणे अडचणी / सूचना. | .. | केंद्र शासनाकडून तरतूद वितरित झाल्याशिवाय राज्य शासन या योजनेची तरतूद वितरित करीत नाही. त्यामुळे खर्च कमी दिसून येत आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत मानकानुसार कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी पदे पूर्ण भरलेली नसल्याने खर्च कमी दिसतो.<br>मंजूर पदे : ८५४<br>रिक्त पदे : ३८४<br>भरलेली पदे : ४७० | | |
| ९. | निष्कर्ष, विश्लेषण, फलनिष्पत्ती | .. | राज्यात या संस्थांच्या स्थापनेमुळे शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत झाली आहे. त्याचबरोबर संगणक प्रशिक्षण/माहिती तंत्रज्ञानासारखे नवीन विषयांची ओळख शिक्षकांना करून दिली जात आहे. | | |

## मूल्यमापन विभाग

**मूल्यमापनासाठी आवश्यक दृष्टी (Vision)**

बालकाच्या जन्मजात व निसर्गदत्त अंतर्गत शक्तींना किंवा गुणांना जागृत करून त्याचा सर्वांगीण विकास करणे म्हणजे शिक्षण. प्रत्येक व्यक्तीमध्ये उपजत गुण व सुप्त शक्ती आहे. परिस्थितीनुसार त्यांचा कमी-अधिक प्रमाणात विकास होत असतो. शिक्षण प्रक्रियेद्वारे हा विकास योग्य दिशेने व अपेक्षित गतीने होताना दिसत आहे.

प्रत्येक मूल स्वत:च्या पद्धतीने व गतीने शिकत आहे. त्याचे पूर्वानुभव व नव्याने मिळालेले अनुभव याची सांगड घालून तो ज्ञानाची निर्मिती करत आहे. त्यासाठी आवश्यक त्या सुविधा, तसेच कृती व विचार करण्यासाठी संधी व वेळ शाळांमधून दिला जात आहेत. अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत बालक सक्रिय दिसत आहे, त्याचा विकास दिसत आहे.

(१) अध्ययन-अध्यापन प्रक्रिया चालू असताना विविध साधन तंत्राच्या मदतीने बालकाच्या विकासाचे मूल्यमापन व्यापक, बहुपदरी आणि विविधांगी पद्धतीने करणे.

(२) बालकांच्या अध्ययनातील उणिवा, त्यांना लागणाऱ्या मदतीचे स्वरूप, त्यांची शक्तिस्थळे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास सर्वांगाने अजमावून वेळीच उपाययोजना करून शैक्षणिक प्रक्रियेला योग्य दिशा देणे.

(३) ही प्रक्रिया औपचारिक व अनौपचारिक पद्धतीने अध्ययन-अध्यापन प्रक्रिया चालू असताना तसेच संपल्यानंतर विविध साधनतंत्राच्या मदतीने सतत करत राहणे.

(४) या सर्व प्रक्रियेसाठी शिक्षक व पर्यवेक्षकीय यंत्रणा यांना सक्षम करणे.

(५) विद्यार्थ्यांचे ज्ञान, आकलन व परिस्थितीनुरूप त्याचा उपयोग करण्याची पात्रता यांचे सातत्याने मूल्यमापन करणे.

(६) राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील मूल्यांकनानुसार प्रश्नांचा नियमित मूल्यमापनात समावेश करणे, विद्यार्थ्यांना त्या स्तरावरील चाचण्यांसाठी तयार करणे.

**मूल्यमापन विभागाचे ध्येय**

(१) बालकाचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ कलम २९ अन्वये बालकांचे ज्ञान व त्यांचे उपयोजन करण्याची क्षमता यांचे मूल्यमापनासाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट २०१० अन्वये राज्यामध्ये लागू केली आहे. त्याची अंमलबजावणी करणे व शिक्षण प्रक्रियेला योग्य दिशा देणे.

(२) सर्व विद्यार्थ्यांची वयानुरूप अपेक्षित अध्ययन क्षमता प्राप्त होण्यासाठी अध्ययन संपादणुकीची चाचणी घेणे व सर्वेक्षण करणे.

( ३ ) विविध सर्वेक्षण अहवालाचे विश्लेषण करणे. सर्वेक्षणातील प्राप्त निकषाचा उपयोग करणे. (राज्यस्तरावर धोरण व उपाययोजना ठरविण्यासाठी) निष्कर्ष सर्व जिल्हा / तालुका / शिक्षक यांचेपर्यंत पोहचविणे व उपाययोजना ठरविण्यासाठी साहाय्य करणे.

( ४ ) नवनवीन मूल्यमापन पद्धती / तंत्रे तसेच इतर राज्यांच्या पद्धती यांची माहिती घेणे. अध्ययन निष्पत्तींचा सातत्यपूर्ण सर्वंकष पद्धतीमध्ये समावेश करणे.

( ५ ) मूल्यमापन पद्धतीमध्ये येणाऱ्या अडचणी उणिवा लक्षात घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे व शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

( ६ ) राज्यातील विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक देशातील पहिल्या तीन राज्यांमध्ये आणणे

( ७ ) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत विषयनिहाय चाचणींची निर्मिती करून आयोजन करणे.

**मूल्यमापन विभागाचे कार्य**

( १ ) विषयनिहाय प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र चाचण्यांचे आयोजन करणे.

( २ ) मागील वर्षापर्यंतची मूलभूत क्षमतांमधील विद्यार्थी संपादणूक व यावर्षीची संपादणूक यांची तुलना करणे, अहवाल तयार करणे.

( ३ ) विविध संपादणूक सर्वेक्षण अहवाल विषय विभागाशी विविध संस्था, जिल्हे यांचेशी अहवालावर चर्चा करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करणे (कारणे, उपाययोजना इत्यादी).

( ४ ) नवनवीन मूल्यमापन तंत्रे / पद्धती तसेच इतर राज्यांच्या पद्धती यांची माहिती घेणे, अभ्यास करणे.

( ५ ) विषय विभागांनी तयार केलेल्या अध्ययन निष्पत्तीचा सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनशी संबंध जोडणे

( ६ ) वरील मुद्द्यांबाबत वापराचे शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

( ७ ) नोंदवही / प्रगतीपत्रकात अध्ययन निष्पत्तीचा समावेश करणे. चेकलिस्ट तयार करणे.

( ८ ) अध्ययन निष्पत्ती व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या अंमलबजावणीचा वर्षअखेर आढावा घेणे / अनुधावन करणे.

( ९ ) विविध सर्वेक्षणांचे आयोजन करणे (विद्यार्थी संपादणुकीबाबत).

( १० ) विविध संपादणूक सर्वेक्षण अहवाल विषय विभागांशी, विविध संस्था, जिल्हे यांचेशी चर्चा करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करणे (कारणे, उपाययोजना इत्यादी).

( ११ ) मूल्यमापन, तंत्रे, पद्धती यांच्या वापराबाबत शिक्षकांच्या अडचणी पाहून, मागणीनुसार प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

( १२ ) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र चाचणीच्या आधारे विषयनिहाय, क्षमतानिहाय विद्यार्थी संपादणूक नोंदीची प्रणालीचा (APP) वापर करणे / प्रणालीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करणे.

## मूल्यमापन विभाग

सन १९६३ साली शिक्षण संचालनालयात मूल्यमापन विभागाची स्थापना झाली. सन १९६८ मध्ये हा विभाग परिषदेत समाविष्ट करण्यात आला.

प्राथमिक शाळांतील (इयत्ता १ ली ते ८ वी) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मूल्यमापनाच्या कार्यपद्धतीमध्ये योग्य सुधारणा घडवून आणणे हे या विभागाचे मुख्य कार्य आहे.

प्राथमिक शिक्षक आणि पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांसाठी मूल्यमापन यासंदर्भात मार्गदर्शक साहित्य निर्मितीचे आणि प्रशिक्षणाचे काम मूल्यामापन विभागामार्फत करण्यात येते. आर.टी.ई.-२००९ व एनसीएफ-२००५ नुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दती दिनांक २० ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयानुसार लागू करण्यात आली असून तिची यशस्वी व परिणामकारक अंमलबजावणी सुरू आहे.

**उद्दिष्टे –**

( १ ) शाळांतर्गत शैक्षणिक मूल्यमापन प्रक्रियेमधील समस्यांचा अभ्यास करून त्यात सुधारणा सुचविणे.

( २ ) सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापनासाठी मार्गदर्शक साहित्य व साधनांची निर्मिती करणे.

( ३ ) शाळांतर्गत मूल्यमापनासाठी क्षमता, अध्ययन, निष्पत्ती व कौशल्यावर आधारित चाचण्यांची निर्मिती करणे.

( ४ ) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत गुणात्मकदृष्ट्या सुधारणा घडवून आणण्यासाठी मार्गदर्शक साहित्याची निर्मिती करणे.

( ५ ) नवीन अभ्यासक्रम क्षमताधिष्ठित अध्ययन-अध्यापन व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीबाबत राज्य विभाग आणि जिल्हा पातळीवरील मार्गदर्शकांसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणे.

( ६ ) अध्ययन-अध्यापन प्रक्रिया व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन याबाबत धोरण आखण्यासाठी किंवा योग्य दिशा देण्यासाठी विविध चाचण्यांद्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे.

**सन २०२२-२३ मधील कार्यक्रम :**

**१) उपक्रमाचे नाव - अध्ययन निष्पत्तीवर आधारित राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) २०२१**

भारत सरकारच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), CBSE केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, नवी दिल्ली व राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे (SCERT) यांच्यावतीने संपूर्ण राज्यात राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) चाचणी संपूर्ण देशामध्ये दिनांक १२ नोव्हेंबर २०२१ रोजी आयोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने इयत्ता ३ री, ५ वीमधील भाषा, गणित, परिसर अभ्यास व ८ वी व इयत्ता १० वीमधील भाषा, गणित, परिसर अभ्यास, सामाजिक शास्त्र या विषयाच्या प्रश्नपत्रिका विकसनाचे काम NCERT, नवी दिल्ली यांच्या समन्वयाने SCERT, पुणे यांनी केले.

● **उपक्रमाची उद्दिष्टे** -

१) शासकीय, शासकीय अनुदानित आणि खाजगी शाळांमधील इयत्ता ३ री, ५ वी व ८ वी व इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांची इंग्रजी, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र आणि मराठी इत्यादी विषयांमधील संपादणूक स्तराचा अभ्यास करणे.

२) क्षेत्र, लिंग, सामाजिक प्रवर्ग, परीक्षा मंडळ आणि शाळेच्या व्यवस्थापन इत्यादींच्या संदर्भाने विद्यार्थ्यांच्या संपादणूक स्तरातील फरक अभ्यासणे.

**उपक्रमाची परिणामकारकता (सध्य:स्थिती)** -

**NAS २०२१ आणि २०१७ तुलनात्मक तक्ता**

(Average Performance Percentage)

| Grade | NAS Cycle Year | Language | | Maths | | EVS/SCI | | Social Science | | English | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | State | National | State | National | State | National | State | National | State | National |
| 3 | 2021 | 67 | 62 | 61 | 57 | 62 | 57 | -- | -- | -- | -- |
| | 2017 | 70 | 68 | 65 | 64 | 69 | 65 | -- | -- | -- | -- |
| 5 | 2021 | 59 | 55 | 45 | 44 | 51 | 48 | -- | -- | -- | -- |
| | 2017 | 61 | 58 | 52 | 53 | 56 | 57 | -- | -- | -- | -- |
| 8 | 2021 | 57 | 53 | 34 | 36 | 39 | 39 | 40 | 39 | -- | -- |
| | 2017 | 63 | 57 | 40 | 42 | 40 | 44 | 42 | 44 | -- | -- |
| 10 | 2021 | 44 | 41 | 29 | 32 | 34 | 35 | 38 | 37 | 46 | 43 |
| | 2017 | 49 | 49 | 33 | 34 | 34 | 34 | 40 | 39 | 37 | 36 |

**In all grades and subjects performance is below in NAS 2021 compare to NAS 2017**

**२) उपक्रमाचे नाव - पायाभूत अध्ययन साक्षरता सर्वेक्षण (FLN - NAS)**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत शालेय शिक्षणासंदर्भात विविध प्रकारची सर्वेक्षणे घेऊन येणाऱ्या निष्कर्षावर आधारित विद्यार्थ्यांची संपादणूक वाढ करण्यासाठीचे विविध धोरणे, अभियान, उपक्रम, कार्यक्रम, योजना हाती घेण्यात येतात. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यावर भर देण्याबाबत नमूद करण्यात आलेले आहे. त्याकरिता भारत सरकारमार्फत निपूण भारत हे अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत इयत्ता तिसरी पर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्याने सन २०२६-२७ पर्यंत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्याचे लक्ष्य ठेवलेले आहे. या अनुषंगाने शिक्षण मंत्रालय, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, नवी दिल्ली यांचेमार्फत इयत्ता ३ रीच्या विद्यार्थ्यांचे पायाभूत अध्ययन अभ्यास हे नमुना सर्वेक्षण एकूण ७८८ शाळांमध्ये दिनांक २३ ते २६ मार्च २०२२ या कालावधीत घेण्यात आले.

पायाभूत अध्ययन अभ्यास (Foundational Learning Study)-राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणासाठी साहित्य छपाई, साहित्य वितरण, राज्य समन्वयक, जिल्हा समन्वयक, क्षेत्रीय अन्वेषक यांचे मानधन, प्रवास भत्ता, वाहतूक/वितरण खर्च, साहित्य संकलन व वितरण खर्च इत्यादीसाठी सर्वेक्षणासाठीचा बाबनिहाय खर्च करणेत आलेला आहे.

● **उपक्रमाची उद्दिष्टे** -

विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी तपासणे व त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने कृतिकार्यक्रम तयार करणे.

**उपक्रमाची अंमलबजावणी/सद्य:स्थिती -**

पायाभूत अध्ययन अभ्यास हे नमुना सर्वेक्षण एकूण ७८८ शाळांमध्ये दिनांक २३ ते २६ मार्च २०२२ या कालावधीत घेण्यात आले. पायाभूत अध्ययन अभ्यास (FLS) साठी राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय अहवाल दिनांक ६ सप्टेंबर २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

सदर सर्वेक्षणासाठी ड्राय रन व मुख्य सर्वेक्षण साहित्य छपाई, साहित्य वितरण व संकलन, जिल्हा समन्वयक व क्षेत्रीय अन्वेषक प्रशिक्षण व सर्वेक्षण मानधन, सर्वेक्षण कीट निर्मितीसाठी आवश्यक साहित्य, जिल्हा समन्वयक व क्षेत्रीय अन्वेषक प्रवास खर्च, राज्य समन्वयक मानधन, इत्यादीसाठी एकूण ३६,५५,२६१ (छत्तीस लाख पंचावन्न हजार दोनशे एकसष्ट रुपये) इतका निधी खर्च झाला आहे. मात्र MPSP, मुंबई यांचेकडून अद्याप निधी प्राप्त झालेला नाही.

**३) उपक्रमाचे नाव - सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (CCE) घटक संच विकसन व शिक्षक प्रशिक्षण -**

- **उपक्रमाची उद्दिष्टे -**

(१) राज्यातील तज्ज्ञ शिक्षकांचा कार्यबळ गट तयार करणे.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य तो बदल करणे.

(३) राज्यासाठी केंद्राच्या सुचनेनुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती विकसित करणे.

(४) राज्यस्तर तज्ज्ञांमार्फत विकसित सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीचे राज्यातील सर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे.

(५) विद्यार्थ्यांचे नियतकालिक व सातत्यपूर्ण मूल्यमापन करणेसाठी शिक्षकांना सक्षम बनविणे.

- **सांख्यकीय तपशील -**

STAR प्रकल्पांतर्गत ९६.०३ लक्ष रक्कम प्राप्त झालेली आहे (सन २०२१-२२ मधील निधी जुलै २०२२ मध्ये प्राप्त).

- **उपक्रमाची अंमलबजावणी/सद्य:स्थिती :** सदर उपक्रमांतर्गत सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (CCE) घटक संच विकसन व बदल च्या पाच कार्यशाळा पूर्ण झालेल्या आहेत. या कार्यशाळांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (CCE) घटक संचमध्ये बदल करण्यात येणार आहेत.

**५) उपक्रमाचे नाव -** मा. पंतप्रधान महोदय यांचेसमवेत इयत्ता ९ वी ते १२ वी चे विद्यार्थ्यांशी परीक्षा पे चर्चा

- **उपक्रमाची उद्दिष्टे -**

(१) विद्यार्थ्यांवर परीक्षांचा असलेला ताणतणाव कमी करणे.

(२) विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेणे.

मा. पंतप्रधान महोदय नरेंद्र मोदी हे "परीक्षा पे चर्चा-५" या कार्यक्रमांतर्गत इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचे समवेत Virtual Mode द्वारे फेब्रुवारी २०२२ मध्ये संवाद साधला. विजेत्यांना मा. संचालक, NCERT, नवी दिल्ली यांचेमार्फत एक विशेष PPC कीट देण्यात आले, की ज्यामध्ये मा. पंतप्रधान महोदयांनी लिहिलेल्या हिंदी व इंग्रजीमधील परीक्षा योद्धा पुस्तकाचा समावेश आहे, ते प्रदान करण्यात आले.

सदर कार्यक्रमात मा. पंतप्रधान महोदय यांचेसमवेत संवाद साधण्यासाठी विद्यार्थी पालक व शिक्षक यांनी त्यांचे प्रश्न तयार केले. त्यानंतर NCERTमार्फत प्रश्नांची निवड केली गेली. राज्यातील सर्व अनुदानित शाळा, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ संलग्न शाळा व राज्यातील इतर बोर्डाशी संलग्न शाळा (CBSE, ICSE, केंब्रिज इत्यादी) शाळेतील विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सहभाग नोंदविता आला.

**सन २०२२-२०२३ मधील कार्यक्रम -**

**१. उपक्रमाचे नाव -** निपुण भारत अध्ययन अभ्यास चाचणी

"प्रत्येक विद्यार्थ्याने पूर्वीच्या/पाठीमागील इयत्तेच्या अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त/संपादित केलेल्या आहेत हे पहाणे, तसेच तो कोणत्या अध्ययन निष्पत्तीमध्ये कमी आहे हे समजून घेऊन शिक्षकांनी विद्यार्थी कृती-कार्यक्रमाची अंमलबजावणी हा निपुण भारत अध्ययन अभ्यास सर्वेक्षणाचा मुख्य हेतू आहे."

वरील हेतूस अनुसरून सन २०२३-२४ मध्ये पायाभूत अध्ययन अभ्यास चाचणी घेण्याचे नियोजन समग्र शिक्षा अंतर्गत AWP मध्ये मान्य करणेत आलेला आहे.

- **उपक्रमाची वैशिष्टे -**

प्रत्येक विद्यार्थ्याने पूर्वीच्या/मागील अध्ययन निष्पत्ती/अध्ययन क्षमता प्राप्त केली आहे किंवा नाही तसेच ती/त्या किती प्रमाणात प्राप्त केलेली/केलेल्या आहेत, याची तपासणी केल्यास विद्यार्थ्यांना ज्या विषयामध्ये/अध्ययन निष्पत्तीमध्ये/अध्ययन क्षमतेमध्ये अडचणी असतील त्यासाठी कृती कार्यक्रम आखून अंमलबजावणी करणे सोपे होईल आणि प्रत्येक विद्यार्थी प्रभुत्व पातळीकडे वाटचाल करू शकेल. सदर चाचण्या शिक्षक व विद्यार्थी यांना अध्यापनास मदत करण्याच्या हेतूने घेण्यात येणार आहे.

| अ. क्र. | इयत्ता | विषय | माध्यम |
|---|---|---|---|
| १ | २ री ते ५ वी | प्रथम भाषा | मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, कन्नड, तमीळ, तेलगू, गुजराती, बंगाली, सिंधी |
| २ | २ री ते ५ वी | गणित | मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, कन्नड, तमीळ, तेलगू, गुजराती, बंगाली, सिंधी |
| ३ | २ री ते ५ वी | तृतीय भाषा | इंग्रजी |
| ४ | ४ थी ते ५ वी | परिसर अभ्यास भाग १ व २. | मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, कन्नड, तमीळ, तेलगू, गुजराती, बंगाली, सिंधी |

**२. संकलित चाचणी २ -** माहे मार्च २०२३ मध्ये आयोजन करणे समग्र शिक्षा अंतर्गत मान्य उपक्रम.

"प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्तेच्या आधीच्या सत्रात अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त/संपादित केलेल्या आहेत हे पाहणे, तसेच तो कोणत्या अध्ययन निष्पत्तीमध्ये कमी आहे हे समजून घेऊन शिक्षकांनी विद्यार्थी कृती-कार्यक्रमाची अंमलबजावणी हा पायाभूत अध्ययन अभ्यास चाचणीचा मुख्य हेतू आहे".

वरील हेतूस अनुसरून सन २०२३-२४ मध्ये पायाभूत अध्ययन अभ्यास चाचणी घेण्याचे नियोजन समग्र शिक्षाअंतर्गत AWP मध्ये मान्य करणेत आलेले आहे.

- **उपक्रमाची वैशिष्टे -**

प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्तेच्या आधीच्या सत्रात अध्ययन निष्पत्ती/अध्ययन क्षमता प्राप्त केली आहे किंवा नाही तसेच ती/त्या किती प्रमाणात प्राप्त केलेली/केलेल्या आहेत, याची तपासणी केल्यास विद्यार्थ्यांना ज्या विषयामध्ये/अध्ययन निष्पत्तीमध्ये/अध्ययन क्षमतेमध्ये अडचणी असतील त्यासाठी कृती कार्यक्रम आखून अंमलबजावणी करणे सोपे होईल आणि प्रत्येक विद्यार्थी प्रभुत्व पातळीकडे वाटचाल करू शकेल. सदर चाचण्या शिक्षक व विद्यार्थी यांना अध्यापनास मदत करण्याच्या हेतूने घेण्यात येणार आहे.

**३. उपक्रमाचे नाव -** समग्र प्रगतीपुस्तक (HPC) कार्ड तयार करणे -

विद्यार्थी शिक्षणाच्या प्रक्रियेत सहभागी झाल्यानंतर त्याला औपचारिक शिक्षणाचे सर्व कौशल्य प्राप्त होणे अपेक्षित आहे. मात्र विद्यार्थ्यांच्या समग्र विकासासाठी केवळ तेवढेच कौशल्य आत्मसात करणे पुरेसे नाही. शिक्षणाची उद्दिष्टे शारीरिक, मानसिक व भावनिक विकास घडवून आणणे तसेच उत्तम नागरिक घडविणे अपेक्षित आहेत. याकरिता अभ्यासक्रम, उद्दिष्टे, मूल्ये, गाभाघटक, जीवन कौशल्ये २१ व्या शतकातील कौशल्ये मुलांमध्ये रुजणे गरजेचे आहे, त्यासाठी सहशालेय उपक्रमातून नव्याने देण्यात आलेल्या अध्ययन निष्पत्तीचा विचार होणे अनिवार्य आहे. त्यासाठी शिक्षकांनी पाठ्यपुस्तकाच्या पलीकडे जाऊन (Out of Box) अध्ययन अनुभव देण्याची गरज आहे.

सहशालेय उपक्रम, कृती, अभ्यासपूरक कार्यक्रम, क्षेत्रभेटी, प्रयोग/प्रात्यक्षिक, प्रकल्प यासारख्या विविध साधन तंत्राच्या द्वारे अध्ययन अनुभवांचे नियोजन करणे अपेक्षित आहे. अशा विविध अध्ययन अनुभवाच्याद्वारे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू साकारण्यास मदत होईल. मात्र शिक्षकांनी दिलेल्या अध्ययन अनुभवाच्या आधारे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकासाबरोबर मानसिक, भावनिक, क्रियात्मक स्वरूपात झालेला विकास मोजणे आवश्यक आहे, त्यादृष्टीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये ३६० अंश समग्र प्रगती पत्रक सूचित केले आहे. त्या संदर्भाने प्रगती पुस्तकामध्ये सर्वांगीण व्यापक, भावात्मक, बोधात्मक, क्रियात्मक क्षेत्रातील प्रगती अतिशय तपशीलवार असणे आवश्यक आहे.

**उपक्रमाची वैशिष्टे -**

- सहभागी आणि अध्ययनार्थी केंद्रित
- सर्वसमावेशक
- प्रगतीबद्दल गुणात्मक अभिप्राय
- कौशल्य आणि क्षमतांचा सतत मागोवा
- स्वजाणीव व आत्मसन्मान यावर आधारित निर्मिती
- केवळ संख्यात्मक बाबीऐवजी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक प्रगती अहवाल

- लवचिक
- विद्यार्थी शिक्षणाच्या प्रक्रियेत सहभागी झाल्यानंतर त्याला औपचारिक शिक्षणाचे सर्व कौशल्य प्राप्त होणे.
- शिक्षणाची उद्दिष्टे शारीरिक, मानसिक व भावनिक विकास घडवून आणणे तसेच उत्तम नागरिक घडविणे अपेक्षित आहेत.
- अभ्यासक्रम, उद्दिष्टे, मूल्ये, गाभाघटक, जीवन कौशल्ये २१ व्या शतकातील कौशल्ये मुलांमध्ये रुजणे गरजेचे आहे.

**४. उपक्रमाचे नाव -** राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षण (SLAS) -

राज्यातील सर्व जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे अध्ययन संपादणूक पातळी कोणत्या स्तरापर्यंत आहे व अध्ययन संपादणूक वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील हे ठरविण्यासाठी सन २०२०-२१ मध्ये राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षणाचे परिषदेमार्फत नियोजित करण्यात आलेले होते. त्यासाठी इयत्ता तिसरी, पाचवी व आठवी करिता प्रश्नपत्रिकांची निर्मिती करण्यात आली होती. मात्र कोविड-१९ मुळे शाळा बंद ठेवण्यात आलेल्या होत्या. तसेच इयत्ता तिसरी, पाचवी व आठवी करिता छपाई करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिका गोपनियतेच्या कारणास्तव जिल्हास्तरावर अद्याप पाठविण्यात आलेल्या नव्हत्या. त्यामुळे सर्वेक्षण करण्यात आलेले नव्हते. त्याचबरोबर सन २०२२-२३ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत दिनांक १२ नोव्हेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण घेण्यात आले होते, त्यामुळे सन २०२२-२३ मध्ये राज्यात एकाच वर्षी दोन सर्वेक्षण करणे योग्य नव्हते या कारणास्तव राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षणाचे नियोजन करण्यात आलेले नव्हते.

स्टार प्रकल्पांतर्गत सन २०२२-२३ मधील राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षणासाठी रुपये ३६० लक्ष इतका निधी सन २०२३-२४ मध्ये प्राप्त झालेला आहे. पूर्वी तयार असलेल्या प्रश्नपत्रिकांचा उपयोग करून चालू शैक्षणिक वर्षात सर्वेक्षण करण्याचे व त्याचबरोबर स्टार प्रकल्पांतर्गत प्राप्त निधीचा विनियोग उर्वरित इयत्ता (दुसरी, चौथी, सहावी व सातवी) मधील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याकरिता नियोजन करण्यात येत आहे. एकंदरीत दुसरी ते आठवी मधील विद्यार्थ्यांचे नमुना सर्वेक्षण करण्याचे परिषदेमार्फत नियोजन करण्यात येत आहे.

**उपक्रमाचे उद्दिष्टे** -

१. इयत्ता २ री १० वीमधील विद्यार्थ्यांची मराठी व गणित या विषयातील मूलभूत अध्ययन क्षमता संपादणूक पातळी तपासणे.

२. अध्ययनातील कठीण क्षेत्रांचा शोध घेणे.

३. लिंग, ग्रामीण व क्षेत्र, सामाजिक गट यानुसार विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणुकीतील फरक पाहणे.

४. सर्वेक्षण निष्कर्षानुसार आवश्यक क्षेत्रांमध्ये सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

५. पुढील वर्षीच्या संपादणुकीचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी तसेच वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक तयार करण्यासाठी सर्व्हेक्षण निष्कर्षाचा वापर करणे.

- **सांख्यिकीय तपशील** -

सन २०२१-२२ मधील निधी रक्कम रुपये ३६० लक्ष असे २०२२-२३ मध्ये प्राप्त झालेला आहे.

- **सन २०२३-२४ मधील कार्यक्रम** -

**१. उपक्रमाचे नाव -** नियतकालिक मूल्यांकन चाचणी -

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि खाजगी अनुदानित शाळांमधील इयत्ता ३ री ते ८ वीच्या सर्व माध्यमांच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी तीन चाचण्यांचे नियोजन करण्यात आलेले आहे.

"प्रत्येक विद्यार्थ्याने पूर्वीच्या/पाठीमागील इयत्तेच्या क्षमता/अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त/संपादित केलेल्या आहेत हे पाहणे, तसेच तो कोणत्या अध्ययन निष्पत्तीमध्ये कमी आहे हे समजून घेऊन शिक्षकांनी विद्यार्थी कृती-कार्यक्रमाची अंमलबजावणी हा नियतकालिक मूल्यांकन चाचणीचा मुख्य हेतू आहे".

वरील हेतूस अनुसरून सन २०२३-२४ मध्ये नियतकालिक मूल्यांकन चाचणी घेण्याचे नियोजन STARS प्रकल्प अंतर्गत करण्यात आलेले आहे.

- **उपक्रमाची वैशिष्ट्ये** -

प्रत्येक विद्यार्थ्याने पूर्वीच्या/मागील इयत्तेची अध्ययन निष्पत्ती/अध्ययन क्षमता प्राप्त केली आहे किंवा नाही, तसेच ती/त्या किती प्रमाणात प्राप्त केलेली/केलेल्या आहेत, याची तपासणी केल्यास विद्यार्थ्यांना ज्या विषयामध्ये/अध्ययन निष्पत्तीमध्ये/अध्ययन क्षमतेमध्ये अडचणी असतील त्यासाठी कृती कार्यक्रम आखून अंमलबजावणी करणे सोपे होईल आणि प्रत्येक विद्यार्थी प्रमुख पातळीकडे वाटचाल करू शकेल. सदर चाचण्यांमुळे शिक्षक व विद्यार्थी यांना अध्यापनास मदत होईल.

- **उपक्रम तपशील** -

| अ. क्र. | चाचणी तपशील | कालावधी | विषय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पायाभूत चाचणी (इयत्ता ३ री ते ८ वी) | दिनांक १७ ते १९ ऑगस्ट २०२३ | प्रथम भाषा (सर्व माध्यम), गणित (सर्व माध्यम), तृतीय भाषा |
| २ | संकलित मूल्यमापन-१ (इयत्ता ३ री ते ८ वी) | दिनांक ३० व ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर २०२३. | प्रथम भाषा (सर्व माध्यम), गणित (सर्व माध्यम), तृतीय भाषा |
| ३ | संकलित मूल्यमापन-२ (इयत्ता ३ री ते ८ वी) | मार्च/एप्रिल २०२३ | प्रथम भाषा (सर्व माध्यम), गणित (सर्व माध्यम), तृतीय भाषा |

**अ. पायाभूत चाचणी (इयत्ता ३ री ते ८ वी) -**

इयत्ता ३ री ते ८ वी मधील विद्यार्थ्यांच्या मागील इयत्तेच्या क्षमतांवर आधारित.

**आ. संकलित मूल्यमापन-१ (इयत्ता ३ री ते ८ वी) -**

इयत्ता ३ री ते ८ वी मधील विद्यार्थ्यांच्या पायाभूत क्षमता तसेच प्रथम सत्रातील अभ्यासक्रम व त्यावर त्यावरील अध्ययन निष्पत्तीवर आधारित.

**इ. संकलित मूल्यमापन-२ (इयत्ता ३ री ते ८ वी) -**

इयत्ता ३ री ते ८ वी मधील विद्यार्थ्यांच्या पायाभूत क्षमता तसेच द्वितीय सत्रातील अभ्यासक्रम व त्यावर त्यावरील अध्ययन निष्पत्तीवर आधारित.

- **आर्थिक तरतूद -**

या उपक्रमासाठी STARS प्रकल्प अंतर्गत रक्कम रुपये ५,३३७.९८ लक्ष निधी मान्य झालेला आहे.

**२. उपक्रमाचे नाव -** सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (CCE) शिक्षण प्रशिक्षण -

- **उपक्रमाची उद्दिष्टे -**

१. राज्यातील तज्ज्ञ शिक्षकांचा कार्यबळ गट तयार करणे.

२. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य तो बदल करणे.

३. राज्यासाठी केंद्राच्या सूचनेनुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती विकसित करणे.

४. राज्यस्तर तज्ज्ञांमार्फत विकसित सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीचे राज्यातील सर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे.

५. विद्यार्थ्यांचे नियतकालिक व सातत्यपूर्ण मूल्यमापन करण्यासाठी शिक्षकांना सक्षम बनविणे.

- **सांख्यिकीय तपशील** -

STARS प्रकल्पांतर्गत रक्कम रुपये १,१५४.४६ लक्ष रक्कम मान्य झालेली आहे.

- **उपक्रमाची अंमलबजावणी/सद्य:स्थिती** -

सदर उपक्रमांतर्गत सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (CCE) चे राज्यस्तरीय प्रशिक्षण पूर्ण झालेले असून नोव्हेंबरमध्ये विभागस्तरीय प्रशिक्षण नियोजित आहे, तसेच त्यानंतर इयत्ता १ ली ते ८ वीच्या एकूण ३,५९,०३२ शिक्षकांना तालुका स्तरावर प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे.

---

## संशोधन विभाग

## अंदाजपत्रक २०२४-२०२५

## (अ) शैक्षणिक कृती संशोधनासाठी मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य योजना

१. योजनेचे नाव .. (अ) शैक्षणिक कृती संशोधनासाठी मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य योजना.

२. योजनेचे उद्दिष्टे .. (१) प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांनी आपआपल्या अध्यापन क्षेत्रात जाणवणाऱ्या समस्यांवर आधारित कृतिसंशोधन प्रकल्प हाती घ्यावेत.

(२) सदर कृतिसंशोधनाचे निष्कर्ष इतर शाळा व शिक्षकांना मार्गदर्शक ठरणे. शाळांनाही मार्गदर्शक ठरावीत.

(३) शिक्षक व केंद्रप्रमुखांमध्ये संशोधन अभिवृत्ती विकसित होणे.

(४) लाभार्थ्यांना विविध शैक्षणिक संशोधन पद्धतीचा परिचय होणे.

३. योजनेचा तपशील .. (१) या योजनेअंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना ५ दिवसांच्या प्रथम कृतिसत्रात आमंत्रित करण्यात येत. पहिल्या कृतिसत्रात समस्या निश्चित करून आराखडा तयार करून संशोधनाची दिशा ठरविली जाते. दुसऱ्या कृतिसत्रात योजनेचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले जाते व तिसऱ्या कृतिसत्रात अहवाल लेखनासाठी मार्गदर्शन केले जाते. कृतिसंशोधन पूर्ण करणाऱ्या शिक्षकांना प्रत्येकी रुपये ३,००० इतके आर्थिक सहाय्य देण्यात येते. राज्य शासनाच्या निधीतून २००८-०९ पासून ३ कृतिसत्रांसाठी रुपये ३,००,००० व आर्थिक सहाय्यासाठी रुपये १,५०,००० तरतूद उपलब्ध करून दिली जात होती. कृतिसंशोधन प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण करून परिषदेकडे सादर केले जातात.

(२) सन २०१७-२०१८ पासून राज्यातील कृतिसंशोधन करू इच्छिणाऱ्या शिक्षकांकडून लिंकद्वारे कृतिसंशोधनाचे विषय मागवून घेतले जातात. त्यातून शालेय विषयांच्या अनुषंगाने SCERT तील संबंधित विभागाकडून शैक्षणिकदृष्ट्या आवश्यक विषयांचा प्राधान्यक्रम विचारात घेतला जातो. त्यातून निवडक कृतिसंशोधन विषय मान्य करण्यात येऊन संबंधित शिक्षकांना कृतिसंशोधन मार्गदर्शन कार्यशाळेत बोलाविले जाते. प्रत्येक शिक्षकास रुपये ३,००० इतके आर्थिक सहाय्य देण्यात येते. कृतिसंशोधन प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण करून परिषदेकडे सादर केले जातात.

(३) सदर शिक्षकांसाठी वरीलप्रमाणे तीन कृतिसत्राकरिता राज्यस्तरावर ५० प्रशिक्षणार्थीसाठी (५ दिवस + ३ दिवस + २ दिवस) अशा एकूण दहा दिवसांच्या कृतिसत्रासाठी कार्यालयीन खर्चातून ७,५०,००० व आर्थिक सहाय्यासाठी सहाय्यक अनुदानातून १,५०,००० इतकी तरतूद अपेक्षित आहे.

(४) सादर करण्यात आलेली कृतिसंशोधनाची कार्यपद्धती व निष्कर्ष यांचे सार्वत्रिकरण करणे, इतर शिक्षकांना कृतीसंशोधन कार्य हाती घेण्यास प्रेरणा मिळावी यासाठी किमान संबंधित जिल्ह्यातील इतर शिक्षकांना कळावीत यासाठी या कृतिसंशोधनाचे शिक्षण परिषदांमध्ये सादरीकरण करण्याचे नियोजित आहे.

४. योजनेचे उद्दिष्ट व साध्य .. या योजनेअंतर्गत ५० प्राथमिक व माध्यमिक शिक्षक/केंद्रप्रमुखांना प्रतिवर्षी लाभ द्यावयाचा आहे.

| वर्ष | | लाभार्थींची संख्या | खर्च रुपये | |
|---|---|---|---|---|
| २०१९-२० | .. | -- | -- | |
| २०२०-२१ | .. | -- | -- | |
| २०२१-२२ | .. | -- | -- | |
| २०२२-२३ | .. | -- | ७,५०,००० | (कार्यालयीन खर्चातून तरतूद मंजूर परंतु अद्याप अप्राप्त) व |
| | | = | १,५०,००० | (सहायक अनुदानातून तरतूद मंजूर, परंतु अद्याप अप्राप्त, त्यामुळे उपक्रमाची कार्यवाही सुरू नाही). |
| २०२३-२४ | .. | | | तरतूद उपलब्ध नाही. |

२०२४-२५ .. ५० × ३,००० = १,५०,००० (अपेक्षित)(एकूण १० दिवसांच्या कृतिसत्रासाठी कार्यालयीन खर्चातून ७,५०,००० व आर्थिक सहाय्यासाठी सहाय्यक अनुदानातून १,५०,००० इतकी तरतूद अपेक्षित आहे).

५. योजनेची व्याप्ती .. या योजनेअंतर्गत खालील घटकांना लाभ होतो.

यापूर्वी —

(१) निबंध स्पर्धेत राज्यस्तरावर प्रथम क्रमांक व उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविलेले प्राथमिक व माध्यमिक शिक्षक.

(२) सदर शिक्षकांची संख्या पुरेशी नसल्यास परिषदेच्या प्रयोगशाळेअंतर्गत असलेल्या शाळेतील प्राथमिक शिक्षक, तसेच कृति-संशोधनासाठी लेखी इच्छा प्रकट करणाऱ्या शिक्षकांनाही या योजनेचा लाभ दिला जातो.

सन २०१७-२०१८ पासून

(१) राज्यातील कृतिसंशोधन करू इच्छिणारे प्राथमिक व माध्यमिक शिक्षक.

(२) शिक्षण परिषदेच्या माध्यमातून राज्यातील संबंधित जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना झालेल्या संशोधनाची माहिती मिळावी हा या योजनेचा हेतू आहे.

(३) एकूणच महाराष्ट्र राज्यातील सर्व शिक्षक व केंद्रप्रमुखांना या योजनेचा लाभ मिळावा हा या योजनेचा हेतू आहे.

१. योजनेचे नाव

## (ब) राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

२. योजनेचा तपशील

महाराष्ट्र राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये झपाट्याने शाळा प्रगत होताना दिसू लागल्या आहेत. शाळा-शाळांमध्ये अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक आनंददायी व सुलभ होण्यासाठी काही नवोपक्रम राबवले जात आहेत. त्यांनी राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमाची माहिती राज्यातील सर्व शिक्षकांना व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र मार्फत सन २०१७-१८ या वर्षापासून राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत. समग्र शिक्षानुसार MSCERT च्या कार्याची व्याप्ती पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक अशी झाली असल्याने या वर्षापासून ही स्पर्धा पुढील पाच गटात आयोजित करण्यात येत आहे.

(१) पूर्व प्राथमिक स्तरावरील अंगणवाडी कार्यकर्त्या/सेविका व पर्यवेक्षिका.

(२) प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक.

(३) माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व मुख्याध्यापक.

(४) विषय सहायक व विषय साधन व्यक्ती.

(५) अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकारी (केंद्रप्रमुख ते शिक्षणाधिकारी व अधिव्याख्याता व वरिष्ठ अधिव्याख्याता) ही स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे.

३. योजनेचे उद्दिष्ट .. (१) प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील अध्ययन-अध्यापनात सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षक व अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देणे.

(२) शिक्षक व अधिकाऱ्यांनी दैनंदिन कामकाजात नावीन्यता आणण्यासाठी प्रोत्साहन देणे.

(३) प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तर तसेच डी.एल.एड. विद्यालय ते प्रशासन यामध्ये गुणवत्तेच्या दृष्टीने शिक्षण क्षेत्रात नवनवीन संकल्पना, विचारप्रवाह, तंत्रे आणि अध्ययन-अध्यापन पद्धती यांचा निरंतर शोध घेणाऱ्या शिक्षक व अधिकाऱ्यांना उत्तेजन देणे.

(४) शिक्षक, अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांमधील सृजनशीलता व संशोधक वृत्ती वाढीस लावणे.

(५) शिक्षण क्षेत्रामध्ये विविध विषयांवर केलेले उपयुक्त नावीन्यपूर्ण नवोपक्रम इतर शिक्षकांच्या व शैक्षणिक प्रशासनाच्या माहितीसाठी online प्रकाशित करणे.

४. तरतूद

| क्रमांक | स्तर | नवोपक्रम स्पर्धेसाठीचे अनुदान (रुपये) | एकूण | लेखाशीर्ष |
|---|---|---|---|---|
| अ | जिल्हा-३६ | ६,००० | २,१६,००० | सहायक अनुदान |
| ब | प्रादेशिक विद्या प्राधिकरण-५ व पुणे विभाग. | ४,००० | २४,००० | सहायक अनुदान |
| क | राज्यस्तर | | १,५०,००० | कार्यालयीन खर्च |
| | | एकूण.. | ३,९०,००० | |

राज्यातील सर्व जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था प्रत्येकी रुपये ६,००० प्रमाणे तर प्रादेशिक विद्या प्राधिकरण यांस प्रत्येकी रु. ४,००० अनुदान वितरित करणे अपेक्षित आहे. यामध्ये संबंधित जिल्हा व प्रादेशिक विद्या प्राधिकरण स्तरावर मूल्यमापन प्रक्रिया व अनुक्रमे ३ व २ गटातील पहिल्या पाच क्रमांक मिळविलेल्या विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन छोटेखानी कार्यक्रमात सन्मानित करण्यात येणार आहे. या प्रमाणे एकूण २,४०,००० रुपये इतकी तरतूद परिषदेच्या सहायक अनुदानातून करणे अपेक्षित आहे.

प्रत्येक जिल्ह्यातून ३ गटातील व प्रादेशिक विद्या प्राधिकरण स्तरावरील २ गटांतील प्रत्येकी पहिल्या पाच क्रमांकाचे नवोपक्रम राज्यस्तरीय स्पर्धेसाठी मागविण्यात येतात. राज्यस्तरावरील मूल्यमापनासाठी परिक्षकांचे मानधन व एकूण पाच गटातील प्रत्येकी पाच क्रमांकांच्या नवोपक्रमांना सन्मानचिन्ह पुस्तक व प्रमाणपत्र तर प्रत्येक गटातील उत्तेजनार्थ व सादरीकरण करणाऱ्या उर्वरीत ५ स्पर्धकांना प्रमाणपत्र तसेच सहभागी स्पर्धकांना प्रवास व दैनिक भत्ता देण्यासाठी रुपये १,५०,००० तरतूद परिषदेच्या कार्यालयीन खर्चातून करणे अपेक्षित आहे.

एकूण रुपये ३,९०,००० अपेक्षित आहे.

| वर्ष | खर्च |
|---|---|
| २०१९-२० | १,०९,१८२ (कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनमुळे पारितोषिक वितरण करता आले नाही, तसेच प्रादेशिक विद्या प्राधिकरण यांना अनुदान वितरण करता आले नाही.) |
| २०२०-२१ | ८१,७७१ (कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनमुळे ऑनलाईन पारितोषिक वितरण करून पारितोषिके संबंधित जिल्ह्यांना डायट कार्यालयास पोस्ट व कुरियरद्वारे पाठविण्यात आली. तसेच प्रादेशिक विद्या प्राधिकरण यांना अनुदान वितरण करता आले नाही.) |

| | |
|---|---|
| २०२१-२२ | १,५३,०९६ |
| २०२२-२३ | २,०४,४३७ |
| २०२३-२४ | तरतूद उपलब्ध नाही. |
| २०२४-२५ | २,४०,०००+१,५०,०००=३,९०,००० (अपेक्षित) |

१. योजनेचे नाव **(क) रिसर्च बुलेटिन (ISSN)**

२. योजनेचा तपशील .. संशोधन विभागामार्फत रिसर्च बुलेटिन हे त्रैमासिक १९७३ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. या बुलेटिन मार्फत पीएच.डी. / एम्. फील पदवी प्राप्त केलेल्या व्यक्ती, तसेच शिक्षणतज्ज्ञ यांचे शैक्षणिक शोधनिबंध प्रकाशित करण्यात येतात.

मात्र यापुढे हे रिसर्च बुलेटिन ISSN सह Online प्रसिद्ध करण्यात येणे अपेक्षित आहे.

३. योजनेची उद्दिष्टे .. (१) शिक्षणशास्त्रातील संशोधन कार्याला प्रसिद्धी देणे.

(२) शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व अभ्यासू व्यक्तींना मार्गदर्शन व प्रेरणा देणे.

४. तरतूद .. या योजनेअंतर्गत परिषदेच्या कार्यालयीन खर्चातून वर्षातून २ वेळा अंक प्रकाशित होणे अपेक्षित आहे. एका आवृत्तीसाठी लेख मागविण्यासाठीचा पत्रव्यवहार, संपादक मंडळाच्या बैठका, तज्ज्ञ व्यक्तींचे मानधन, प्रमाणपत्र छपाई व वितरण इत्यादींचा अंदाजे खर्च रुपये १,००,००० अपेक्षित आहे.

वर्षातील २ आवृत्त्यांसाठी रुपये २,००,००० इतका खर्च अपेक्षित आहे.

सन २०१७-१८ ते २०१८-१९ पर्यंत रिसर्च बुलेटीन छपाई करण्यात आलेली नाही. त्यापूर्वीचा खर्च तपशील उपलब्ध नाही.

| **वर्ष** | **खर्च (रुपये)** | |
|---|---|---|
| २०२०-२१ | -- | |
| २०२१-२२ | १,८०,७०५ | (मार्च २०२२ या अंकाचे देयक अदा) |
| २०२२-२३ | २,००,००० | निधी उपलब्धतेच्या अधीन राहून कार्यालयीन खर्चातून सदर तरतूद मार्च अखेरपर्यंत खर्च करणे प्रस्तावित आहे. |
| २०२३-२४ | | तरतूद उपलब्ध नाही. |
| २०२४-२५ | २,००,००० | (अपेक्षित) |

१. योजनेचे नाव **(ड) वार्षिक अहवाल**

२. योजनेचा तपशील .. सन २००१-२००२ पासून परिषदेचा कार्यअहवाल मराठीबरोबरच इंग्रजी भाषेमधूनही प्रकाशित करण्यात येतो. कार्यअहवालाचे वाटप राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना आणि शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना करण्यात येते. परिषदेच्या कार्यालयातून कार्यअहवाल छपाईच्या खर्चाची तरतूद करण्यात येते.

३. योजनेची उद्दिष्टे .. (१) परिषदेच्या शैक्षणिक कार्याची ओळख मराठी भाषिक व्यक्ती व संस्थांना होणे.

(२) इतर राज्यातील शैक्षणिक संस्थांशी समन्वय साधणे.

(३) एन. सी. ई. आर. टी., नवी दिल्ली व इतर केंद्र शासकीय संस्थांना परिषदेच्या कार्याची ओळख करून देणे.

४. तरतूद .. या योजनेअंतर्गत परिषदेच्या कार्यालयीन खर्चातून वर्षातून एक वेळा मराठी व इंग्रजी या दोन भाषेतून प्रकाशित करण्यात येतो. याकरिता परिषदेच्या विभागांकडून माहिती मागविण्यासाठीचा पत्रव्यवहार, प्रुफ रीडिंग, मानधन, छपाई व वितरण इत्यादींचा अंदाजे खर्च रुपये १,००,००० अपेक्षित आहे.

सन २०१७-१८ ते २०१८-१९ पर्यंत वार्षिक कार्यअहवाल याची छपाई करण्यात आलेली नाही. त्यापूर्वीचा खर्च तपशील उपलब्ध नाही.

| **वर्ष** | **खर्च (रुपये)** | |
|---|---|---|
| २०२०-२१ | ५०,००० | (मंजूर व प्राप्त), परंतु शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांचेकडून देयक अद्याप अप्राप्त असल्याने अदा करण्यात आलेले नाही. |
| २०२१-२२ | ९२,८०० | (सन २०१९-२० या अंकाचे देयक अदा) |
| २०२२-२३ | १,००,००० | |
| २०२३-२४ | तरतूद उपलब्ध नाही. | |
| २०२४-२५ | १,००,००० | (अपेक्षित) |

# राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम (NPEP)

N. C. E. R. T. नवी दिल्ली यांच्या सूचनांनुसार आवश्यकतेनुसार या विभागातून N. C. E. R. T. ला कृती आराखडा सादर केला जातो. हा कृती आराखडा N. C. E. R. T. कडून मंजुरी मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी केली जाते.

लोकसंख्येच्या गुणात्मक विकासासाठी विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्यात जाणीव, जागृती करण्याच्या दृष्टीने N. C. E. R. T., नवी दिल्ली यांचेमार्फत राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प (N. P. E. P.) देशभर राबविण्यात येतो. महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक १६ जुलै १९८५ पासून लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम कार्यान्वित झाला. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून N. C. E. R. T., नवी दिल्ली यांच्या मार्फत आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली जाते.

**लोकसंख्या शिक्षणाची उद्दिष्टे**

१. लोकसंख्या वाढ आणि सामाजिक व आर्थिक विकासाची प्रक्रिया यामधील अनन्य संबंधाविषयीचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये विकसित होण्यास मदत करणे.

२. देशातील लोकसंख्येच्या सद्य:स्थितीची विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जाणीव निर्माण करणे.

३. औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणामध्ये लोकसंख्या शिक्षणाचे महत्त्व पटविणे.

४. चांगल्या जीवनमानाकडे वाटचाल करण्यासाठी प्रवृत्त करणे.

५. जबाबदार पालकत्वाच्या गुणांची जोपासना करणे.

६. किशोरवयीन समस्या, एडस्, व्यसनाधीनता इत्यादींबाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण करणे.

७. शाश्वत विकास ही संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे व त्यानुसार कृती कार्यक्रम करणे.

**लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम**

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | योजनेचा तपशील | आर्थिक तरतूद झालेला खर्च (२०२२-२३) | आर्थिक तरतूद चालू आर्थिक वर्ष (२०२३-२४) | आर्थिक तरतूद अपेक्षित खर्च (२०२४-२५) |
|---|---|---|---|---|
| १. | साहित्य निर्मिती | ९५२१ | १०,००० | २०,००० |
| २. | सहविचार सभा | १,४५,०८१ | १,९२,००० | १,९२,००० |
| ३. | प्रशिक्षण कार्यक्रम | ० | ३,९८,००० | ३,९८,००० |
| ४. | सहशालेय उपक्रम | १०,४०,१०० | १४,२३,००० | १४,२३,००० |
| ५. | संशोधन व मूल्यमापन | १,००,००० | १,००,००० | १,००,००० |
| ६. | प्रकाशन व छपाई | ० | १०,००० | २०,००० |
| ७. | संनियंत्रण व भेटी | ९,८११ | ९०,००० | ९०,००० |
| ८. | संकीर्ण | १७,४३५ | २०,००० | ४०,००० |
| ९. | संगणक | ० | ३०,००० | ४०,०००० |
| | **एकूण** | १३,२१,९४८ | २२,७३,००० | २३,२३,००० |

## ग्रंथालय विभाग

परिषदेचे ग्रंथालय समृद्ध आणि संगणकीकृत आहे. परिषदेच्या उद्दिष्टानुसार आवश्यक ते ग्रंथ व शैक्षणिक नियतकालिके खरेदी करणे. ग्रंथालय विभाग अभ्यासक्रम निर्मितीसाठी व प्रशिक्षण कार्यशाळेसाठी संदर्भसाहित्य वेळोवेळी उपलब्ध करून देते.

ग्रंथालयातील ग्रंथसंपदा --

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | ग्रंथ / पुस्तके | .. | २६,५०० (साधारण) |
| (२) | नियतकालिके व साप्ताहिके | .. | ०८ |
| (३) | पी. एच. डी. प्रबंध | .. | ४५ |

सन २०२३-२४ या वर्षात उपलब्ध रुपये ५०,००० (रुपये पन्नास हजार) आर्थिक तरतुदीतून विविध शिक्षणविषयक संदर्भ-शैक्षणिक ग्रंथ व नियतकालिके खरेदी करण्यात आली. सन २०२४-२५ या पुढील आर्थिक वर्षात रुपये १,००,००० (रुपये एक लक्ष) तरतूदीतून शैक्षणिक ग्रंथ व शैक्षणिक नियतकालिके खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

---

## राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रवीनगर, नागपूर

राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रवीनगर, नागपूर ही संस्था महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे सोबत संलग्न आहे. या राज्यस्तरीय संस्थेची स्थापना केंद्रपुरस्कृत शालेय शिक्षण सुधार योजनेअंतर्गत सन १९६८ साली पुणे येथे झाली. परिषदेशी संलग्न संस्थांच्या विकेंद्रीकरणामुळे या संस्थेचे स्थलांतर १९८० साली नागपूर येथे करण्यात आले. या राज्यस्तरीय संस्थेमध्ये रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र आणि गणित विभाग असून सुसज्ज असे एक ग्रंथालय आहे.

संस्थेचे संचालक हे शिक्षण उपसंचालक या दर्जाचे असून संस्थेमध्ये महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग-१ मधील ४ पदे, वर्ग-२ ची ११ पदे, विज्ञान पर्यवेक्षकांची ६ पदे, प्रयोगशाळा सहाय्यकाची ३ पदे, अधीक्षक वर्ग-२ (साप्रसे) १ पद, लिपिकवर्गीय कर्मचारी १३ पदे (वर्ग-३) आणि वर्ग-४ कर्मचाऱ्यांची ७ पदे मान्य आहेत.

मात्र दिनांक १७-१०-२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे पूर्वीच्या राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूरचे नामाभिकरण प्रादेशिक विद्या प्राधिकरण असे करण्यात आले. विभागीय विद्या प्राधिकरण, नागपूर या संस्थेस सन २०१३ च्या आकृतिबंधानुसार मंजूर पदे, पुनर्रचित प्राधिकरणासाठी व संस्थांसाठी आवश्यक पदे व समान वेतनश्रेणीमधून स्थानांतरित करावयाची पदे पुढीलप्रमाणे आहेत.

प्राचार्य १ पद, वरिष्ठ अधिव्याख्याता (वर्ग-१) ४ पदे, प्राध्यापक (वर्ग-२) ११ पदे, अधीक्षक १ पद, लेखाधिकारी १ पद, विषय सहायक ११ पदे, मुख्य लिपिक १ पद, ग्रंथपाल १ पद, वरिष्ठ लिपिक १ पद, कनिष्ठ लिपिक २ पदे, शिपाई/फर्रास ६ पदे याप्रमाणे पदे मान्य करण्यात आलेली आहेत.

**संस्थेची उद्दिष्टे**

(१) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यंत अध्यापन करणाऱ्या विज्ञान व गणित शिक्षकांच्या अध्यापनामध्ये प्रशिक्षणाद्वारे सुधारणा घडवून आणणे.

(२) प्रत्येक जिल्ह्यात इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान मंच प्रवेशपूर्व चाचणी परीक्षा घेऊन शहरी व ग्रामीण भागातील अनुक्रमे ३० व ४० विद्यार्थ्यांसाठी सुट्ट्यांच्या कालावधीत शिबिरांचे आयोजन करणे.

(३) प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेचे पूर्व तयारी म्हणून राज्यस्तरीय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करणे.

(४) विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तथा विज्ञानविषयक सृजनशीलता वाढीस लावण्याच्या दृष्टीने सुप्त गुणांचा शोध घेऊन विज्ञान मेळावे, छंद मंडळे, विज्ञान प्रदर्शने, विज्ञान नाट्योत्सव यासारख्या उपक्रमाचे तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर आयोजन करणे.

(५) युनिसेफ/एनसीईआरटीच्या आर्थिक सहाय्याने कृतिसत्राचे तथा राज्यस्तरीय विज्ञान उपक्रमाचे आयोजन करणे.

(६) आदर्श प्रयोगशाळा तयार करण्यासाठी प्रयोगशाळा सहाय्यक व गणित/विज्ञान शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करणे.

(७) विज्ञान व तंत्रज्ञान यांचा जनसामान्यांपर्यंत प्रचार व प्रसार करणे.

(८) विज्ञान व गणित विषयक उपक्रम राबविणे.

(९) समग्र शिक्षा अभियानअंतर्गत विज्ञान व गणित विषयांच्या प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

(१०) ग्रामीण विज्ञान छंद मंडळांचा गुणगौरव करणे.

**संस्थेमार्फत राबविण्यात येणारे महत्त्वाचे उपक्रम —**

| अ.क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर |
|---|---|---|
| १. | विज्ञान प्रदर्शन | तालुका/जिल्हा/राज्य |
| २. | विज्ञान मंच | जिल्हा |
| ३. | अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा | तालुका/जिल्हा/विभाग/राज्य |
| ४. | विज्ञान नाट्योत्सव | तालुका/जिल्हा/विभाग/राज्य |
| ५. | राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर | राज्यस्तर |
| ६. | ग्रामीण विज्ञान छंद मंडळ | शाळास्तर |
| ७. | इन्स्पायर ॲवार्ड योजना | जिल्हा/राज्य |
| ८. | प्रशिक्षणे (समग्र शिक्षा अभियान) | तालुका/जिल्हा/राज्य |

**संस्थेचा अन्य उपक्रमात सहभाग —**

(अ) पश्चिम भारत विज्ञान जत्रा.

(ब) राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन.

(क) पश्चिम क्षेत्रीय विज्ञान नाट्योत्सव.

(ड) अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा (राष्ट्रीयस्तर)

(इ) केंद्रपुरस्कृत शालेय विज्ञान शिक्षण सुधार योजनेअंतर्गत उच्च प्राथमिक शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांना अनुक्रमे एकात्मिक विज्ञान साहित्य पेटी, विज्ञानविषयक उपकरणे व विज्ञानविषयक पुस्तकांचा पुरवठा करणे.

**नवोक्रमांतर्गत विविध शैक्षणिक व सामाजिक प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करणे.**

(१) विज्ञान कट्टा.

(२) विज्ञान नाटिका.

(३) विज्ञान सहलीचे आयोजन.

(४) वृक्षारोपण.

(५) पर्यावरणविषयक जाणीव जागृतीकरिता विविध व्याख्यानांचे आयोजन.

**संस्थेची प्रकाशने —**

(१) संस्थेमार्फत आयोजित होणाऱ्या उपक्रमांची माहिती पुस्तिका.

(२) विज्ञान प्रदर्शन पुस्तिका.

**समस्या —**

राज्य विज्ञान शिक्षण संस्था विविध उपक्रमांचे प्रस्ताव दरवर्षी सादर करीत असते. प्रस्तावानुसार अनुदान उपलब्ध होत नसल्यामुळे दरवर्षी विद्यार्थी हिताच्या योजना पूर्णपणे राबविल्या जात नाहीत. शासनाने दरवर्षी मे महिन्यात प्रस्तावित अनुदान पूर्णत: उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थी व शिक्षक हिताच्या विविध विज्ञान विषयक योजना/उपक्रम विहित कालावधीत तालुका/जिल्हा/ विभाग व राज्यस्तरावर राबविणे सुकर होईल.

## छपाई व प्रकाशने इत्यादी दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | कार्यक्रम / प्रकाशने | प्रत्यक्ष २०१९-२०२० | | प्रत्यक्ष २०२०-२०२१ | | प्रत्यक्ष २०२१-२०२२ | | प्रत्यक्ष २०२२-२०२३ | | अपेक्षित २०२३-२०२४ | | अंदाजित २०२४-२०२५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उद्दिष्ट | | उद्दिष्ट | | उद्दिष्ट | | उद्दिष्ट | | उद्दिष्ट | | उद्दिष्ट | |
| | | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | विज्ञान मंच प्रवेशपूर्व परीक्षा प्रश्नपत्रिका. | १,२४० | १,२४० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | २,६०० | निरंक | ११,१०० | ११,१०० | १३,३२० | १३,३२० |
| २ | विद्यार्थ्यांकरिता विज्ञानमंच प्रमाणपत्र. | २,५०० | २,५०० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | ३,५०० | निरंक | ११,२०० | ११,२०० | १३,४४० | १३,४४० |
| ३ | राज्यस्तरीय प्रदर्शन पुस्तिका व अध्यापक निर्मिती, शैक्षणिक साहित्य, प्रदर्शन पुस्तिका (एकत्र) आणि प्रदर्शनाचा अहवाल. | २,००० | २,००० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | २,५०० | २,५०० | ३,००० | ३,००० | ३,६०० | ३,६०० |
| ४ | उपक्रमाची अहवाल पुस्तिका | निरंक | निरंक | -- | -- | निरंक | निरंक | निरंक | निरंक | १,००० | १,००० | १,२०० | १,२०० |
| | एकूण .. | ५,७४० | ५,७४० | निरंक | निरंक | निरंक | निरंक | ८,६०० | २,५०० | २६,३०० | २६,३०० | ३१,५६० | ३१,५६० |

## राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचे इतर कार्यक्रम दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नाव | प्रत्यक्ष २०१९-२०२० उद्दिष्ट अपेक्षित लाभार्थी | प्रत्यक्ष लाभार्थी | प्रत्यक्ष २०२०-२०२१ उद्दिष्ट अपेक्षित लाभार्थी | प्रत्यक्ष लाभार्थी | प्रत्यक्ष २०२१-२०२२ उद्दिष्ट अपेक्षित लाभार्थी | प्रत्यक्ष लाभार्थी | अपेक्षित २०२२-२०२३ उद्दिष्ट अपेक्षित लाभार्थी | प्रत्यक्ष लाभार्थी | अंदाजित २०२३-२०२४ उद्दिष्ट अपेक्षित लाभार्थी | प्रत्यक्ष लाभार्थी | प्रत्यक्ष २०२४-२०२५ उद्दिष्ट अपेक्षित लाभार्थी | प्रत्यक्ष लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | माध्यमिक शाळातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी जिल्हा विज्ञान मंचाची स्थापना. | ३७ | ३७ | ३७ | निरंक | ३७ | निरंक | ३७ | निरंक | ३७ | ३७ | ३७ | ३७ |
| | खर्च .. | १४,२४,००० | १४,२४,००० | १,५०,००० | निरंक | १७,११,५०० | निरंक | १७,०९,००० | निरंक | २०,५१,००० | २०,५१,००० | २४,६१,२०० | २४,६१,२०० |
| २ | (अ) जिल्हास्तरावरील विज्ञान मेळावे | ३७ | ३७ | ३७ | निरंक | ३७ | निरंक | ३७ | ३७ | ३७ | ३७ | ३७ | ३७ |
| | खर्च .. | ७४,००० | ७४,००० | ८०,००० | निरंक | ७४,००० | निरंक | ८९,००० | ७४,००० | १,०६,५६० | १,०६,५६० | १,२७,८७२ | १,२७,८७२ |
| | (ब) विभागस्तरीय विज्ञान मेळावे | ०८ | ०८ | ०८ | निरंक | ०८ | निरंक | ०८ | ०८ | ०८ | ०८ | ०८ | ०८ |
| | खर्च .. | २४,००० | २४,००० | ३२,००० | निरंक | २४,००० | निरंक | २९,००० | २४,००० | ३४,५६० | ३४,५६० | ४१,४७२ | ४१,४७२ |
| | (क) राज्यस्तरीय विज्ञान मेळावे | ०१ | ०१ | ०१ | निरंक | ०१ | निरंक | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | खर्च .. | २,७९,००० | २,७९,००० | २,८७,००० | निरंक | २,२४,५२० | निरंक | २,१८,००० | ९०,७५५ | २,५७,७८४ | २,५७,७८४ | ३,०९,३४१ | ३,०९,३४१ |
| ३ | जिल्हा विज्ञान प्रदर्शने | ३७ | ३७ | ३७ | निरंक | ३७ | निरंक | ३७ | ३७ | ३७ | ३७ | ३७ | ३७ |
| | खर्च .. | ९,९१,००० | ९,९१,००० | ९,९१,००० | निरंक | ९,९१,००० | निरंक | ११,९०,००० | निरंक | ११,८९,९२० | ११,८९,९२० | १४,२७,९०४ | १४,२७,९०४ |
| ४ | राज्य विज्ञान प्रदर्शने | ०१ | ०१ | ०१ | निरंक | ०१ | निरंक | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | खर्च .. | ५९,२२,००० | ५९,२२,००० | ६४,००,००० | निरंक | ६०,२२,७८० | निरंक | ७०,६२,००० | निरंक | ९१,७५,६०४४ | ९१,७५,६०४४ | १,८३,५१,२०९ | १,८३,५१,२०९ |
| ५ | राज्यस्तरीय अध्यापकनिर्मित शैक्षणिक साहित्य, प्रदर्शन व स्पर्धा (प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी) | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | ०१ | ०१ | निरंक | निरंक | ०१ राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनीत समावेशित आहे | ०१ राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनीत समावेशित आहे |
| | खर्च .. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | | |

**राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचे इतर कार्यक्रम दर्शविणारा तक्ता**--चालू

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नाव | प्रत्यक्ष २०१९-२०२० उद्दिष्ट | | प्रत्यक्ष २०२०-२०२१ उद्दिष्ट | | प्रत्यक्ष २०२१-२०२२ उद्दिष्ट | | अपेक्षित २०२२-२०२३ उद्दिष्ट | | अंदाजित २०२३-२०२४ उद्दिष्ट | | प्रत्यक्ष २०२४-२०२५ उद्दिष्ट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या | प्रसिद्धी संख्या | लाभार्थी संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| ६ | प्रयोगशाळा सहायक/परिचर यांच्यासाठी प्रायोगिक साधनांचे राज्यस्तरीय प्रदर्शन व स्पर्धा. | ०१ | ०१ | ०१ | निरंक | ०१ | निरंक | ०१ | ०१ | निरंक | निरंक | ०१ राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनीत समावेशित आहे. | ०१ राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनीत समावेशित आहे. |
| | खर्च .. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | | |
| ७ | राष्ट्रीय प्रज्ञाशील परीक्षा विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय मार्गदर्शन शिबिर. | ०१ | ०१ | ०१ | निरंक | ०१ | निरंक | ०१ | निरंक | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | खर्च .. | १३,७८,००० | १३,७८,००० | १५,००,००० | निरंक | १४,५०,३४० | निरंक | २०,३१,००० | निरंक | २२,५७,१०० | २२,५७,१०० | ३१,५९,९४० | ३१,५९,९४० |
| ८ | राज्यस्तरीय विज्ञान नाट्य महोत्सव | १(६४) | १(६४) | १(६४) | निरंक | १(६४) | निरंक | १(६४) | १(६४) | १(६४) | १(६४) | १(६४) | १(६४) |
| | खर्च .. | ५,८१,००० | ५,८१,००० | ७,००,,००० | निरंक | ४,९३,२८० | निरंक | ६,७४,००० | १,७५,२४२ | ७,९१,४२४ | ७,९१,४२४ | ९,४९,७०९ | ९,४९,७०९ |
| ९ | ग्रामीण विज्ञान छंद मंडळ गुणगौरव कार्यक्रम | १६ | १६ | १६ | निरंक | १६ | निरंक | १६ | निरंक | १६ | १६ | १६ | १६ |
| | खर्च .. | १,९२,००० | १,९२,००० | २,००,००० | निरंक | २,२५,३८० | निरंक | २,३१,००० | निरंक | २,७७,७७४ | २,७७,७७४ | ३,३३,२९६ | ३,३३,२९६ |
| १० | पश्चिम भारत विज्ञान जत्रा (विद्यार्थ्यांसाठी) | १ (१८) | १ (१८) | १ (१८) | निरंक | १ (१८) | निरंक | १ (१८) | १ (१८) | १ (३७) | १ (३७) | १ (३७) | १ (३७) |
| | खर्च .. | ५०,००० | ५०,००० | ६०,००० | निरंक | ६६,००० | निरंक | ७०,००० | निरंक | ८,०७,१०० | ८,०७,१०० | ९,६८,५२० | ९,६८,५२० |
| १० (अ) | पश्चिम भारत विज्ञान जत्रा (शिक्षकांसाठी) | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | ५१ | ५१ |
| | खर्च .. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | २,७०,००० | २,७०,००० |

टीप : (१) अ.क्र. ५ व ६ मध्ये नमूद योजनांवरील खर्च अ.क्र. ४ मध्ये समाविष्ट आहे.

(२) सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वर्षात कोरोना / लॉकडाऊनमुळे उपक्रम घेण्यात आले नाही, खर्च निरंक आहे.

# प्रादेशिक विद्या प्राधिकरण
# छत्रपती संभाजीनगर (आंग्लभाषा तज्ञत्व)

## १. स्थापना व उद्दिष्टे

महाराष्ट्र राज्य आंग्लभाषा अध्यापन संस्थेची स्थापना सन १९६५ साली झाली. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एसटीसी-२२३६४ जी दिनांक २९ मे १९६५ अन्वये संस्था अस्तित्वात आली. माहे नोव्हेंबर, १९६५ पासून संस्थेचे कार्य नियमितपणे सुरू झाले.

इंग्रजी विषयाच्या अध्ययन अध्यापनाचा प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील दर्जा सुधारणे हा संस्थेच्या स्थापनेमागील प्रमुख हेतू होता. माहे नोव्हेंबर १९६५ पासून ३१ मार्च १९८६ पर्यंत ही संस्था मुंबई येथे कार्यान्वित होती.

महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिकदृष्ट्या मागास व दुर्गम भागात अध्यापकांना या संस्थेच्या विविध उपक्रमांचा लाभ घेणे सहज शक्य व्हावे, या जाणीवेतून ही संस्था मुंबई येथून छत्रपती संभाजीनगर येथे स्थलांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठवाडा विकासाचा अनुशेष भरून काढण्याचा एक भाग म्हणून शासन निर्णय क्रमांक एसटीसी-२८५/२९३८०/(६१४/८५)/माशि-४, दिनांक ११ डिसेंबर १९८५ अन्वये मराठवाडा विकासाचा कालबद्ध कार्यक्रम या योजनेमध्ये प्रस्तुत संस्थेचे मुंबई येथून छत्रपती संभाजीनगर येथे स्थलांतर करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथे संस्थेचे कार्य १ एप्रिल १९८६ पासून सुरू झाले. त्याच शासन निर्णयान्वये या संस्थेचे नामाभिधान 'राज्य आंग्लभाषा अध्यापन संस्था, छत्रपती संभाजीनगर' असे करण्यात आले.

शासन निर्णय क्रमांक डायट-४५१६/(४०/१६)/प्रशिक्षण, दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ अन्वये संस्थेची पुनर्रचना होऊन संस्थेचे नाव "प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर (आंग्लभाषा तज्ञत्व)" छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) असे करण्यात आले.

## २. नियंत्रण

प्रस्तुत प्रादेशिक विद्या प्राधिकरण हे 'महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्याप्राधिकरण) पुणे' यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहे.

## ३. संस्थेतील मंजूर पदांचा तपशील

सन २००३ च्या आकृतीबंधानुसार राज्य आंग्लभाषा अध्यापन संस्थेमधील संबंधित वेतनश्रेणीतील मंजूर पदे पुढीलप्रमाणे आहेत

| अ.क्र. | पदनाम | गट | ग्रेड पे (६ व्या वेतन आयोगानुसार) | सन २००३ च्या आकृतीबंधानुसार मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | संचालक | अ | रु. ६६०० | ०१ |
| २ | प्राध्यापक | अ | रु. ५४०० | ०५ |
| ३ | अधिव्याख्याता | ब | रु. ४८०० | ०६ |
| ४ | अधिक्षक, सा.रा.से. | ब | रु. ४३०० | ०१ |
| ५ | लघुलेखक | क | रु. ४३०० | ०२ |
| ६ | ग्रंथपाल | क | रु. २८०० | ०१ |
| ७ | वरिष्ठ लिपिक | क | रु. २४०० | ०१ |
| ८ | कनिष्ठ लिपिक | क | रु. १९०० | ०३ |
| ९ | वाहनचालक | क | रु. १९०० | ०१ |
| १० | वर्ग-४, नाईक | ड | रु. १६०० | ०१ |
| ११ | वर्ग-४, शिपाई | ड | रु. १३०० | ०७ |
| | एकूण पदे .. | | | २९ |

शासन निर्णय क्रमांक डायट-४५१६/(४०/१६)/प्रशिक्षण, दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ अन्वये पदांची पुनर्रचना होऊन नवीन पदसंरचना पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

| अ. क्र. | विभागीय विद्या प्राधिकरण | समाविष्ट विभाग | उपसंचालक | वर्ग-अ | वर्ग-ब | लेखाधिकारी/अधीक्षक (वर्ग-ब) | लिपिक/डाटा एंट्री ऑपरेटर | वर्ग-क:विषय सहायक/ प्रतिनियुक्तीद्वारा शाळा/क्षेत्रीय कार्यालयाकडून | कंत्राटी नियुक्तीने शासनाबाहेरील लोकांना CSR च्या मदतीने | वर्ग-४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विभागीय विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर (राज्य आंग्लभाषा संस्था) | इंग्रजी | १ | २ | ३ | १ | ३ | ३ | २ | ६ |
| २. | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| ३. | | गणित | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| ४. | | विज्ञान | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| ५. | | सा.शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| ६. | | उर्दू | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| ७. | | आय.टी. | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | **एकूण** | | **१** | **२** | **९** | **१** | **३** | **९** | **२** | **६** |

शासन निर्णय क्रमांक -आबंध २०१७/प्र.क्र.४१/१७/प्रशा-५, दिनांक ३१ जुलै २०१७ नुसार विभागातील आवश्यक नसलेल्या पदांमधून समान वेतनश्रेणीतील समकक्ष पदे विद्या प्राधिकरण, विभागीय विद्या प्राधिकरण आणि जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (आताच्या 'जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था') यामधील समकक्ष पदांवर स्थानांतरीत करण्याबाबत निर्णय करण्यात आला आहे. त्यानुसार प्रस्तावित पदसंरचना पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | गट | ग्रेड पे (६ व्या वेतन आयोगानुसार) | एकूण आवश्यक पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | अ | रु. ६६०० | ०१ |
| २ | वरिष्ठ अधिव्याख्याता | अ | रु. ५४०० | ०२ |
| ३ | प्राध्यापक | ब | रु. ४८०० | ०९ |
| ४ | लेखाधिकारी | ब | रु. ६६०० | ०१ |
| ५ | विषय सहाय्यक | क | रु. ४४०० | ०९ |
| ६ | अधिक्षक, सा.रा.से. | ब | रु. ४३०० | ०१ |
| ७ | ग्रंथपाल | क | रु. २८०० | ०१ |
| ८ | वरिष्ठ लिपिक | क | रु. २४०० | ०१ |
| ९ | कनिष्ठ लिपिक | क | रु. १९०० | ०२ |
| १० | वर्ग-४, नाईक | ड | रु. १६०० | ०१ |
| ११ | वर्ग-४, शिपाई | ड | रु. १३०० | ०५ |
| | एकूण पदे .. | | | ३३ |

## ४. संस्थेतील कार्याचे स्वरूप

शासन निर्णय दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ नुसार प्रस्तुत संस्थेच्या पूर्वीच्या इंग्रजी विषयाच्या राज्यव्यापी कार्यासोबतच मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यांसाठी (छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड व उस्मानाबाद) मराठी, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, उर्दू व आय.टी. या विषयांचाही समावेश करण्यात आला आहे. या विषयांसाठी विभागातील सर्व जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (District Institute of Educational Continuous Professional Development-DIECPD) शासन निर्णय क्र. डायट-२०१९/प्र. क्र. ९२/प्रशिक्षण, दिनांक २८ नोव्हेंबर २०१९ नुसार जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि तालुका व केंद्रस्तरावरील साधन व्यक्ती तसेच शिक्षक सक्षमीकरणाच्या सर्व घटकांची क्षमता समृद्धी करणे, अशी नवीन जबाबदारी प्रस्तुत प्रादेशिक विद्या प्राधिकरणाकडे सोपविण्यात आली आहे.

प्रस्तुत शासन निर्णयानुसार विद्या प्राधिकरणाची जबाबदारी पुढीलप्रमाणे असेल —

(अ) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुणवत्तेच्या परिभाषेचा अभ्यास करून राज्यातील शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी (Benchmark) निश्चित करणे. या बेंचमार्कमध्ये कालपरत्वे वेळोवेळी आवश्यकतेनुसार बदल करणे.

(आ) निश्चित केलेल्या बेंचमार्कच्या प्राप्तीसाठी —

- अभ्यासक्रम विकसन
- पाठ्यक्रम विकसन
- पाठ्य व इतर साहित्य विकसन
- शिक्षक व अधिकारी यांचे सातत्यपूर्ण व्यावसायिक विकसन
- मूल्यमापन प्रक्रिया विकसन
- अडचणींवर मात करण्यासाठी संशोधन करणे
- वरील सर्व बाबींसाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञान/संगणक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे.

(इ) बेंचमार्क प्राप्तीसाठी सर्व स्तरावर स्पष्टता यावी यासाठी स्पष्ट क्षमता संपादणूक पातळी (Learning Indicators) परिभाषित करून त्यांचे Continuous and Comprehensive Evaluation (CCE) किंवा अन्य मूल्यमापन प्रक्रियेशी सहसंबंध स्पष्ट करणे.

(ई) अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्य व इतर साहित्य विकसित करत असताना तसेच शिक्षक व अधिकारी व्यावसायिक विकसन कार्यक्रम आखत असताना समतामूलक विचारांकडे लक्ष देणे. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत १००% मुलांना शिक्षण द्यावयाचे आहे. परंतु ते राबवत असताना बरेचसे शिक्षक व अधिकाऱ्यांना १००% मुले शिकू शकतात यात विश्वास नसल्याचे जाणवले. त्याच्या मुळाशी क्षमता बद्दलचे समज अपुरे असणे, असेही जाणवले. त्यामुळे माणसाचे चार शरीर प्रकार, विविध धर्म प्रकार, विविध जाती प्रकार, विविध आर्थिक वर्ग, विविध भौगोलिक जन्म स्थान व राहण्याचे ठिकाण तसेच, शहरी व ग्रामीण रहिवास इत्यादी असल्यावर ही माणसे समान असतात हे पटणे सक्षमीकरणाचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. यासाठी विद्या प्राधिकरणाने निरंतर कार्य करणे. या सर्व प्रकारच्या माणसांचे परस्परावलंबनाची संकल्पना समजल्याने क्षमतेची संकल्पना अधिक स्पष्ट होईल, हे ध्यानात ठेवणे

(उ) अध्ययन व विकासाच्या विविध संधीसाठी साहित्य तयार करणे. उदा. मुक्त दूरस्थ अध्ययन, स्वयं-अध्ययन, गट आणि केंद्रस्तरावर चर्चा, online स्वयं-अध्ययन आणि चर्चा, प्रमाणपत्र प्रदान किंवा या सर्वांचे विविध combination करणे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून केंद्राने ‘समग्र शिक्षा’ ला सुरुवात केली आहे. समग्र शिक्षा अंतर्गत पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण हे शालेय शिक्षणात अंतर्भूत झाले आहे. त्यामुळे या सर्व स्तरांवर गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षक शिक्षण व शिक्षक तसेच इतर संबंधित घटक यांना आधार देण्याची प्रस्तुत प्राधिकरणाची जबाबदारी निश्चित झाली आहे. त्यानुसार प्रस्तुत प्राधिकरणाने सन २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षांचा यथार्थदर्शी आराखडा तयार केला आहे.

**A Perspective Plan : 2020-21 to 2024-25**

| Sr. No. | Tasks/Stakeholders | Target | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 2020-21 | 2021-22 | 2022-23 | 2023-24 | 2024-25 |
| **A** | **TEJAS (Elementary level)** | | | | | |
| I | Number of TAGs | 6,170 | 6,170 | 6,170 | 6,170 | 6,170 |
| II | Number of TAG Coordinators | 2,056 | 2,056 | 2,056 | 6,170 | 6,170 |
| III | No. of TAG Teachers | 1,54,250 | 1,54,250 | 1,54,250 | 1,54,250 | 1,54,250 |
| IV | No. of Targeted Learners | 53,40,000 | 53,42,000 | 53,45,000 | 53,47,000 | 53,50,000 |
| **B** | **Training of Resource Persons (All interventions)** | | | | | |
| I | Spoken English | KRPs : 100 Teachers 816. | KRPs : 100 Online ELAS : 816 | Online ELAs : 816 | Online ELAs : 816 | Online ELAs : 816 |
| II | TAG Coordinators (TEJAS) Online | 2056 | 2056 | 2056 | 2056 | 2056 |
| II | DARPs (TEJAS) | 6 | 65 | 65 | 65 | 65 |
| IV | LEP : English Language Kit (Online) | 545 | 854 | 1254 | 2544 | 5245 |

**A Perspective Plan : 2020-21 to 2024-25**

| Sr. No. | Tasks/Stakeholders | Target | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 2020-21 | 2021-22 | 2022-23 | 2023-24 | 2024-25 |
| **C** | **Training of Teacher Educators (All inerventions)** | | | | | |
| I | DIET : Principal / Lecturer (English) (Online Mode). | 68 | 68 | 68 | 68 | 68 |
| II | English Subject Assistants (Online Mode). | 68 | 68 | 68 | --- | --- |
| III | Block Resource Persons (Online Mode). | 816 | 816 | 816 | 816 | 816 |
| **D** | **Training of DIET Faculty As Master Trainers (Read To Me)** | | | | | |
| I | RAA and DIET Faculties (Online Mode) | 156 | 156 | 156 | 156 | 156 |
| **(E)** | **Non-budgeted Activities (C.S.R.)** | | | | | |
| **1** | **Right to Read** | | | | | |
| I | Coverage (Schools) | – | 12,322 schools | 27,500 schools | 56,000 | – |
| II | Coverage (Classes) | – | Grade I-XII | Grade I-XII | Grade I-XII | – |
| II | Teacher Orientation | – | 49,000 | 84,585 | 1,15,585 | – |
| IV | Beneficiary Learners | – | 1,10,000 | 4,25,000 | 7,64,113 | |
| **2** | **English Symposium** | | | | | |
| I | DIET faculties and teacher | – | – | 450 | 845 | 1000 |

सन २०१९-२० मध्ये प्रस्तुत प्राधिकरणास तेजस, चेस, स्पोकन इंग्लिश (इयत्ता १ ते ५), स्पोकन इंग्लिश (इयत्ता ६ ते ८) या कार्यक्रमांना राज्याकडून मान्यता मिळाली आहे. याशिवाय प्रादेशिक विद्या प्राधिकरण तीन बिनखर्चिक उपक्रमही संपूर्ण राज्यात राबवित आहे. त्यामध्ये इंग्लिश ई-टीच, कॉम्पिटंसीज असेसमेंट प्रोग्राम (CAP) व १००% स्पोकन इंग्लिश केंद्र नवोपक्रम यांचा समावेश आहे. सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर शिक्षणाची अर्थसंकल्पीय तरतुदीत कपात करण्यात आली होती. या काळात इंग्रजी करणारे सॉफ्टवेअर मोफत पुरविण्याची तयारी दर्शविली आहे.

प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर द्वारे इंग्रजी विषयासाठी सध्या राज्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी पुढील कार्यक्रम सुरू आहेत.

**(अ) TEJAS (Technology Enabled Education through Joint Action and Strategic Initiatives)**

दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी महाराष्ट्र शासन, टाटा ट्रस्ट आणि ब्रिटिश कौन्सिल यांचेमध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार महाराष्ट्रातील नऊ जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून इंग्रजी भाषा शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी Teachers Activity Group (TAG) च्या माध्यमातून एक नवीन CPD प्रतिमान समोर आणले आहे. त्याअंतर्गत छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, नाशिक, नंदुरबार, अमरावती, यवतमाळ, नागपूर व गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये ७५० TAGs कार्यरत आहेत. या प्रकल्पाचे यश लक्षात घेऊन राज्याने दिनांक २७ एप्रिल २०१८ रोजी ब्रिटीश कौन्सिल व टाटा ट्रस्टसोबत सामंजस्य करार केला आहे. सदर करारान्वये 'तेजस' प्रकल्पाचे upscaling करण्यात येत आहे. राज्यातील ६१७० ग्रामीण व शहरी केंद्रांमधील इंग्रजी विषयाच्या शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी २०५६ TAG समन्वयकांची (TAG-Co-ordinators) गरज आहे. त्यातील १२५० TAG समन्वयकांना प्रशिक्षण दिलेले असून त्यांचेमार्फत एकूण ९३,७५० इंग्रजीच्या शिक्षकांना तेजस प्रकल्पाचा लाभ देण्यात येत आहे. हे इंग्रजी भाषेचे शिक्षक राज्यातील ८४,३७,५०० बालकांना अधिक सक्षमपणे इंग्रजी भाषेचे शिक्षण देत आहेत.

TEJAS प्रकल्पाचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे —

(१) केंद्रस्तरावर इंग्रजी भाषेच्या प्राथमिक शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी TAG ची स्थापना.

(२) माहे ऑक्टोबर, २०१६ पासून TAGs मधील शिक्षकांची दरमहा एक बैठक याप्रमाणे केंद्रांमध्येच बैठका होत असतात.

(३) TAG मधील विविध कृती घटक पुढीलप्रमाणे —

- मागील TAG मधील नियोजित कृती कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर चर्चा
- Language Study
- Discussion on the read articles (Related to pedagogy)
- Discussion on the watched video clip (Related to pedagogy)
- Reflection and Development of Action Plan
- कृतीकार्यक्रमाची (Action Plan) अंमलबजावणी
- सामाजिक माध्यमातून (Social Media) विचार, यश, चिंता, इ. चे आदान-प्रदान

महाराष्ट्र शासन, ब्रिटीश कौन्सिल आणि टाटा ट्रस्ट यांच्यातील तेजस संदर्भातील करार मार्च २०२१ मध्ये संपुष्टात आला. मात्र प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर प्राथमिक शिक्षकांचा इंग्रजी भाषेतील सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास होत राहावा यासाठी प्रयत्नरत आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न सुरू आहेत. लॉकडाऊनच्या काळातही TAG समन्वयक ऑनलाइन पद्धतीने TAG बैठक घेत असल्याचे दिसून आले. तसेच चौथ्या वर्षातील TAG साठी घटक निर्मितीचे काम सुरू आहे.

**(ब) इंग्रजी भाषा संकल्पनात्मक संसाधन शिक्षण साहित्य :**

प्रादेशिक शैक्षणिक प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांनी राज्यात इंग्रजी भाषेचे स्वयंशिक्षण सुलभ करण्याच्या उद्देशाने इंग्रजी भाषा संकल्पनात्मक संसाधान शिक्षण साहित्य विकसित केले आहे. एमपीएसपी, मुंबईने या साहित्याची मोठ्या प्रमाणावर निर्मिती केली आहे आणि ती सर्व सरकारी आणि स्थानिक संस्थांच्या शाळांमध्ये वितरित केली आहे. या प्राधिकरणामार्फत सर्व लाभार्थी शाळांमधील प्रत्येकी एका शिक्षकाचे प्रधिक्षण पूर्ण केले जात आहे. आम्ही प्रत्येक जिल्ह्यातून ५ मास्टर ट्रेनर्सना प्रशिक्षण दिले असून राज्यस्तरावर एकूण १७५ मास्टर ट्रेनर्सनी प्रत्येक बीटमधून दोन संसाधन व्यक्तींना प्रशिक्षण दिले आहे. सुमारे ६५.३८७ शिक्षकांचे प्रशिक्षण या संसाधन व्यक्तींद्वारे बीट स्तरावर पूर्ण झाले आहे.

इंग्रजी भाषा संकल्पनात्मक संसाधन शिक्षण सामग्रीमध्ये ४३ विविध प्रकाराच्या सामग्रीचा समावेश आहे ज्यांचे ३ गटांमध्ये वर्गीकरण केले आहे. (१) स्वयं-शिक्षण साहित्य, (२) सरावासाठी वापरण्यात येणारे साहित्य, (३) शिक्षकांच्या देखरेखीखाली आणि मार्गदर्शनाखाली वापरण्यात येणारे साहित्य. या सामग्रीसह एक वापरकर्ता पुस्तिका प्रदान करण्यात आली आहे. प्राधिकरणाने इंग्रजीच्या सर्व शिक्षकांना प्रसारित केल्या जाणाऱ्या सामग्रीच्या वापराविषयी लहान व्हिडिओ (३ ते ४ मिनिटे कालावधी) विकसित केले आहेत.

**साहित्याची यादी**

| Sr. No. | Particulars | Size in cm | | |
|---|---|---|---|---|
| | | Length | Width | Quantity |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | Actions Words - Pictures and Words (Jigsaws) | 26 | 5.5 | 15 |
| 2. | Instructions - Pictures and Instructions (Jigsaws) | 26 | 5.5 | 15 |
| 3. | Sentence Building Tense | 38.5 | 4 | 10 |
| | Supplementary Cards | Composite | | 148 |
| 4. | Singulars and Plurals (Jigsaws) | 15.75 | 5.5 | 50 |
| 5. | Sentence Completion | 26 | 5.5 | 30 |
| | Supplementary Cards | 6 | 3 | 30 |
| 6. | Professionals -- Introduction | 26 | 5.5 | 15 |
| 7. | Word Building -- SLM | 16. | 5.5 | 15 |
| | Supplementary Cards | 7 | 4.25 | 55 |
| 8. | Puzzle | 19.5 | 14.5 | 16 |
| 9. | Story Cards (Back to Back) | 19.5 | 29 | 4 |
| 10. | Colouring Letters of Alphabets (A To Z) | 19.5 | 14.5 | 26 |

**साहित्याची यादी--*चालू***

| . No. | Particulars | Size in cm | | |
|---|---|---|---|---|
| | | Length | Width | Quantity |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 11. | Find The Correct Places For The Letters -- Maze | 19.5 | 14.5 | 8 |
| 12. | Reading Word Charts | 29 | 19.5 | 8 |
| 13. | Picture Reading (Rhyming) | 9.5 | 6 | 40 |
| 14. | Word Reading (Rhyming) | 9.5 | 2 | 40 |
| 15. | Assciation of Letters and Sounds | 26 | 5.5 | 50 |
| 16. | Word Chain | 9.8 | 4 | 70 |
| 17. | Four lines sheets | 29 | 19.5 | 2 |
| 18. | Reading Pictorial Paragraphs | 19.5 | 14.5 | 4 |
| 19. | Linguistic Items -- Verbal Questions | 26 | 3 | 15 |
| 20. | Linguistic Items -- Wh Word | 38 | 5.5 | 16 |
| 21. | Linguistic Items -- Wh Questions | 26 | 3 | 15 |
| 22. | Linguistic Items -- Prepositions | 26 | 3 | 25 |
| | Supplementary Cards | 5 | 3 | 17 |
| 23. | Linguistic Items -- Pronouns | 21 | 3 | 11 |
| | Supplementary Cards | 6.5 | 3 | 11 |
| 24. | Linguistic Items -- Adjectives with Nouns (Without Pictures) | 5.4 | 2.1 | 72 |
| 25. | Linguistic Items -- Adverbs with Verbs | 8.5 | 3.5 | 67 |
| 26. | Linguistic Items -- Conjunctions (Practice) | 26 | 3 | 10 |
| | Supplementary Cards | 5 | 3 | 9 |
| 27. | Labeling | 13 | 4.5 | 36 |
| 28. | Reading Picture Descriptions | 58 | 39 | 4 |
| 29. | Capital and Small Letters | 19.5 | 29 | 2 |
| 30. | Linguistic Items -- Riddles | 19.5 | 14.5 | 4 |
| 31. | Smart Hand Writing | 14 | 20 | 15 |
| 32. | Magic of Numbers | 10 | 15 | 2 |
| 33. | Associations of Letters | 6 | 2.5 | 26 |
| | Supplementary Cards | 2.5 | 2.5 | 52 |
| 34. | Vocabulary Word | 9.5 | 8.5 | 180 |
| 35. | Linguistic Items -- Groove Slate and Noun Strips | 29.7 | 21 | 1 |
| | Supplementary Cards | 8.25 | 2 | 27 |
| 36. | Linguistic Items -- Adjectives with Nouns (Pictures) | 7.5 | 5 | 16 |
| | Supplementary Cards | 7.5 | 2 | 43 |
| 37. | Linguistic Items -- Pictures and Phrases (Matching Exercise) | 10 | 6 | 16 |
| | Supplementary Cards | 10 | 2 | 16 |

**साहित्याची यादी--**_चालू_

| . No. | Particulars | Size in cm | | |
|---|---|---|---|---|
| | | Length | Width | Quantity |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 38. | Frequently used words | 6 | 3 | 135 |
| 39. | Tenses -- SLM | 29.7 | 21 | 6 |
| | Supplementary Cards | 7 | 21 | 9 |
| 40. | Making Sentences with the help of Tiles - 301 No. | 7.5 | 2.5 | 73 |
| | | 5 | 2.5 | 57 |
| | | 3.75 | 2.5 | 112 |
| | | 1.87 | 2.5 | 26 |
| | | 1.25 | 2.5 | 33 |
| 41. | Word Building - Tiles - 244 No. | 1.87 | 2.5 | 142 |
| | | 1.25 | 2.5 | 102 |
| 42. | Dias | 2 | 2 | 6 |
| 43. | Cubes | 5 | 7 | 4 |
| 44. | A Box for keeping material | 66 | 46 | 1 |

**(क) इंग्रजी भाषेसाठी इतर उपक्रम :**

इंग्रजी भाषेचे स्वअध्ययन सुलभ व्हावे या उद्देशाने प्रस्तुत प्राधिकरणाने एका English Language Self-learning kit चे देखील विकसन केले आहे.

याशिवाय इंग्रजी भाषा विकासासाठी विविध उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणी, सनियंत्रण, आधार व मूल्यमापनासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये DIET मध्ये एका इंग्रजी भाषा कक्षाची (English Language Cell) स्थापना करण्यात आली आहे. त्यांचेमार्फत सर्व शिक्षकांना आधार तसेच इंग्रजी भाषेची भीती दूर करून आत्मविश्वासपूर्वक इंग्रजी भाषेचा दैनंदिन जीवनात वापर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

Maharashtra Read to Me Installation Update as on 30th September 2023

| Sr. No. | Name of the District | Total No. of Schools | No. of Read to Me School Edition Installations | % of Schools Installed Read to Me School Edition |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | Chhatrapati Sambhajinagar | 3229 | 3152 | 98% |
| 2. | Akola | 1485 | 965 | 65% |
| 3. | Latur | 2266 | 1443 | 64% |
| 4. | Mumbai Suburban | 1609 | 975 | 61% |
| 5. | Amravati | 2516 | 1473 | 59% |
| 6. | Pune | 5541 | 2944 | 53% |
| 7. | Mumbai City | 866 | 384 | 44% |
| 8. | Osmanabad | 1584 | 651 | 41% |
| 9. | Kolhapur | 3116 | 1273 | 41% |
| 10. | Nagpur | 2913 | 977 | 34% |
| 11. | Hingoli | 1122 | 350 | 31% |

| Sr. No. | Name of the District | Total No. of Schools | No. of Read to Me School Edition Installations | % of Schools Installed Read to Me School Edition |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 12. | Sindudurg | 1613 | 501 | 31% |
| 13. | Satara | 3473 | 1062 | 31% |
| 14. | Washim | 1162 | 335 | 29% |
| 15. | Chandrapur | 2120 | 584 | 28% |
| 16. | Sangli | 2554 | 660 | 26% |
| 17. | Parbhani | 1648 | 425 | 26% |
| 18. | Gondia | 1419 | 347 | 24% |
| 19. | Ahmednagar | 4655 | 1120 | 24% |
| 20. | Thane | 2894 | 652 | 23% |
| 21. | Solapur | 4143 | 921 | 22% |
| 22. | Bhandara | 1162 | 258 | 22% |
| 23. | Buldhana | 2068 | 444 | 21% |
| 24. | Jalna | 1919 | 377 | 20% |
| 25. | Ratnagiri | 2914 | 534 | 18% |
| 26. | Yavatmal | 2956 | 539 | 18% |
| 27. | Jalgaon | 2894 | 513 | 18% |
| 28. | Wardha | 1280 | 214 | 17% |
| 29. | Dhule | 1797 | 294 | 16% |
| 30. | Nanded | 3231 | 527 | 16% |
| 31. | Gadchiroli | 1897 | 297 | 16% |
| 32. | Nashik | 4733 | 708 | 15% |
| 33. | Palghar | 2528 | 354 | 14% |
| 34. | Raigad | 3160 | 419 | 13% |
| 35. | Beed | 3247 | 405 | 12% |
| 36. | Nandurbar | 1918 | 225 | 12% |
| | **Grand Total** | **89632** | **27302** | **30%** |

| Sr. No. | Name of the District | Total No. of Students | No. of Read to Me Student Edition Installations | % of Student Installed Read to Me School Edition |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | Solapur | 765888 | 106043 | 14% |
| 2. | Chhatrapati Sambhajinagar | 713980 | 94945 | 13% |
| 3. | Sangli | 456348 | 77375 | 17% |
| 4. | Thane | 784773 | 51200 | 7% |
| 5. | Pune | 1225309 | 47283 | 4% |
| 6. | Dhule | 411049 | 41019 | 10% |
| 7. | Kolhapur | 587708 | 33766 | 6% |
| 8. | Mumbai Suburban | 697220 | 32024 | 5% |
| 9. | Ahmednagar | 773665 | 31977 | 4% |
| 10. | Nashik | 1068864 | 22702 | 2% |
| 11. | Satara | 428813 | 20939 | 5% |
| 12. | Buldhana | 431799 | 20585 | 5% |
| 13. | Amravati | 422247 | 20077 | 5% |
| 14. | Mumbai City | 470347 | 15822 | 3% |
| 15. | Nanded | 600875 | 13758 | 2% |
| 16. | Latur | 469539 | 15182 | 3% |
| 17. | Jalgaon | 761694 | 13325 | 2% |
| 18. | Nagpur | 556870 | 12424 | 2% |
| 19. | Jalna | 365974 | 9347 | 3% |
| 20. | Sindhudurg | 104554 | 9042 | 9% |
| 21. | Washim | 315036 | 8701 | 3% |
| 22. | Osmanabad | 284711 | 8108 | 3% |
| 23. | Parbhani | 355715 | 6866 | 2% |
| 24. | Chandrapur | 289552 | 6751 | 2% |
| 25. | Gondia | 201405 | 6434 | 3% |
| 26. | Akola | 263722 | 5322 | 0% |
| 27. | Higoli | 212283 | 4968 | 2% |
| 28. | Nandurbar | 215277 | 4940 | 2% |
| 29. | Yavatmal | 443947 | 3522 | 1% |
| 30. | Ratnagiri | 208228 | 2821 | 1% |
| 31. | Wardha | 159199 | 2678 | 2% |
| 32. | Palghar | 447581 | 2543 | 1% |
| 33. | Beed | 526067 | 4617 | 1% |
| 34. | Gadchiroli | 171349 | 2507 | 1% |
| 35. | Raigad | 311231 | 2288 | 1% |
| 36. | Bhandara | 181478 | 2212 | 1% |
| | **Grand Total** | **16684297** | **764113** | **5%** |

**(ड) गणित विभाग :**

प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगरमध्ये मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांतील शिक्षकांसाठी या विभागाच्यावतीने कार्य केले जाते. प्रसिद्ध गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिवस २२ डिसेंबर 'राष्ट्रीय गणित दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनानिमित्त प्राधिकरणाच्यावतीने १६ ते २२ डिसेंबर या कालावधीत गणित सप्ताह साजरा करण्यात येतो. त्याचा एक भाग म्हणून या काळात २०१९ मध्ये ऑनलाईन गणित चाचणी घेण्यात आली. इयत्ता ४ थी ते ८ वी साठी स्वतंत्र लिंक तयार करण्यात आली. या चाचणीत ७० टक्के पेक्षा अधिक गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात आले. मराठवाडा विभागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी या चाचणीला उत्तम प्रतिसाद दिला. विभागातील आठ जिल्ह्यांतील ११४१० विद्यार्थ्यांनी ही चाचणी सोडविली.

यात मराठवाडा विभागातील उर्दू माध्यमाच्या ३ री व ४ थी तील ३०१२ विद्यार्थ्यांनी ही चाचणी सोडविली.

**कार्य :** (१) विभागातील गणित शिक्षकांना मदत करणे. (२) विभागातील सर्व जिल्हे आणि SCERT यात समन्वय साधणे.

**ध्येय :** मराठवाडा विभागातील १०० टक्के विद्यार्थ्यांना गणित विषयात ७५ टक्के क्षमता प्राप्त करण्यास मदत करणे.

**प्रस्तावित नियोजन :**

**समस्या-१ :** ३ री व ५ वी तील सरासरी ५५ टक्के विद्यार्थ्यांना भागाकार येत नाही. (NAS- ३ री : विभागाची सरासरी ४२.७२ टक्के, ५ वी : विभागाची सरासरी ५५.५८ टक्के).

**समस्या-२ :** ६ वी व ८ वी तील विद्यार्थ्यांत अपेक्षेप्रमाणे गणितीय क्षमता विकसित हो शकल्या नाही. (NAS- ८ वी : विभागाची सरासरी ४२.७ टक्के, ASER- ६ वी ते ८ वी विभागाची सरासरी ३५ टक्के).

**समस्या-३ :** ९ वी आणि १० वी तील विद्यार्थ्यांत अपेक्षेप्रमाणे या क्षमता विकसित झाल्या नाहीत. (NAS- १० वी : विभागाची सरासरी ३३.१ टक्के).

**समस्या-४ :** आपल्या इयत्तेप्रमाणे ७५ टक्के गणितीय क्षमता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अल्प आहे. (NAS- २०२१).

| ७५ टक्के अधिक गुण प्राप्त करणारे विद्यार्थी | ३ री | ५ वी | ८ वी | १० वी |
|---|---|---|---|---|
| | ३८.१% | २३.६% | ९.४% | १.०% |

उपरोक्त परिस्थितीचा विचारा करता RAA छत्रपती संभाजीनगरवतीने शिक्षकांच्या CPD साठी नियोजन करण्यात आले आहे. (२०२३-२४).

२०२३--मूलभूत गणितीय संकल्पना अध्यापन आधारित ऑनलाईन प्रशिक्षण हे मराठवाड्यातील १ ली ते ५ वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी.

२०२३-- विभागातील ६ वी ते ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना गणितीय संकल्पनाचे अध्यापन यावर आधारित ऑनलाईन प्रशिक्षण.

२०२३-- विभागातील ९ वी ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांना गणितीय संकल्पनाचे अध्यापन यावर आधारित ऑनलाईन प्रशिक्षण.

या उपक्रमासाठी ३ वर्षांचा ऑनलाईन Application साहित्य निर्मिती व मार्गदर्शन यांचे मानधन असा ६०,००० रुपये खर्च अपेक्षित आहे.

**सामाजिक शास्त्र विभाग :** या विभागाच्यावतीने मराठवाडा विभागातील शिक्षकांना ऑनलाईन आणि ऑफलाईन स्वरूपात मार्गदर्शन करण्यात येते. सामाजिक शास्त्र विषयातील घटकांवर आधारित व्हिडिओ तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. SCERT च्या वतीने घेण्यात आलेल्या KPLP व महकरिअर पोर्टल संदर्भात वेबिनारमध्ये शिक्षकांना सहभागी करून घेण्यात आले. NAS २०१७ वर आधारित मुद्यांचा विचार करून सन २०२१ साठी आशय समृद्धी कार्यक्रम तयार करण्यात आला.

कार्यक्रमाचा Pilot Study छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यातील खुलताबाद केंद्रात करण्यात येणार आहे. या केंद्रातील १५ शाळांतील २०६ विद्यार्थ्यांवर हा कार्यक्रम राबविला जाणार आहे., तसेच त्याचा कालावधी एक महिन्याचा असणार आहे. त्यानंतर पुढच्या टप्प्यात मराठवाडा विभागातील 'एक जिल्हा, एक तालुका व एक केंद्र' असा हा कार्यक्रम राबविला जाणार आहे.

**विज्ञान विभाग :** प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली Science Teacher's forum (STF) हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहे. या प्रकल्पा अंतर्गत ६ वी ते ८ वी च्या शिक्षकांना मदत पुरविण्यात येणार आहे.

**प्रकल्पाचा मुख्य उद्देश :**

(१) विविध अध्यापन पद्धतींचा उपयोग करण्यास विज्ञान शिक्षकांना मदत करणे.

(२) शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी CPD२१ व्या शतकातील कौशल्य उपयोगात आणणे.

(३) नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्राचा प्रभावी वापर करण्यास शिक्षकांना मदत करणे.

सद्य:स्थितीत दूरध्वनीवरून मुलाखत घेऊन १३ विज्ञान मार्गदर्शकांची निवड करण्यात आली. त्यांना अगस्त्या फाउंडेशनच्यावतीने प्रशिक्षण देऊन प्रकल्पाची व्याप्ती वाढविण्यात येणार आहे.

**मराठी विभाग : इयत्ता ३ री ते ५ वी साठी वाचन क्षमता विकास कार्यक्रम सन २०२३-२४**

**कार्यक्रमाची गरज :**

प्रत्येक विषय समजून घेण्यासाठी मुलांची वाचनक्षमता विकसित होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्याला एकदा वाचता आले की, आपोआपच त्याची इतर विषय समजून घेण्याची गती वाढते. ज्या मुलांना समजपूर्वक वाचता येते. त्यांची इतर विषयातील प्रगती ही समाधानकारक असते. राष्ट्रीय संपादणूक सर्व्हेचा विचार केल्यास विद्यार्थ्याच्या वाचन क्षमतेचा विकास होण्यासाठी आणखी प्रयत्न वाढविणे गरजेचे आहे.

सदर कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून इयत्ता ३ री ते ५ वी च्या विद्यार्थ्यांची वाचन क्षमता विकसित करण्यास मदत होईल.

**कार्यक्रमाची उद्दिष्टे :**

१. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ३ री ते ५ वी मध्ये शिकत असलेल्या मुलांच्या वाचनाच्या सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.

२. वाचन क्षमतेत मागे पडलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे (पूर्व चाचणी).

३. इयत्ता ३ री ते ५ वी ची मुले वाचती होण्यासाठी कृती कार्यक्रम तयार करणे.

४. कृती कार्यक्रम तयार करताना कार्यक्रमाची परिणामकारक तपासण्यासाठी उत्तरचाचणी विकसित करणे.

५. मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यांतून एका तालुक्यातील एका केंद्राची पथदर्शी कार्यक्रमासाठी निवड करणे.

सदर कृती कार्यक्रम सन २०२३-२४ मध्ये इयत्ता ३ री च्या विद्यार्थ्यांवर प्रायोगिक तत्त्वावर राबविला जाणार आहे. सदर कृती कार्यक्रमातील जमेच्या बाजू व राहिलेल्या उणिवा या सर्वांचा विचार करून, कृती कार्यक्रमाचे उच्चीकरण करून पुढील शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ३ री ते ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाईल.

**इंग्रजी विभागातील उपक्रमनिहाय खर्च (५ वर्षांतील) :**

| Sr. No. | Year | Interveation | Expenses (In Lac Rs.) |
|---|---|---|---|
| 1. | 2018-19 | Tejas, | 50.00 |
| | | Chess | 123.00 |
| | | Spoken English | 84.46 |
| 2. | 2019-20 | Tejas, | 200.00 |
| | | Chess | 136.00 |
| | | Spoken English | 50.00 |
| 3 | 2020-21 | Tejas, | 80.00 |
| | | Chess | 95.51 |
| | | Spoken English | 40.00 |
| | | Elcrlm | 80.00 |
| 4. | 2021-22 | Tejas, | -- |
| | | Spoken English | -- |
| | | Elcrlm | -- |
| 5. | 2022-23 | Tejas, | -- |
| | | Spoken English | -- |
| | | Elcrlm | -- |

**२०२३-२४ या वर्षासाठी अर्थिक तरतूद :**

| Sr. No. | Interveation | Provision (In Lac Rs.) |
|---|---|---|
| 1. | Spoken English | 50.00 |
| 2. | Tejas | 100.00 |
| 3. | Chess | 50.00 |

## महाराष्ट्र राज्य दृक्श्रवण शिक्षण संस्था, पुणे - ३०

अध्ययन करताना विविध संबोध, संकल्पना आणि प्रक्रिया विद्यार्थ्यांना स्पष्ट होण्यासाठी व त्यांचे सुलभतेने आकलन होण्यासाठी परिसरातून प्रत्यक्ष अनुभव घेता येतात. परंतु प्रत्यक्ष अनुभव देणे शक्य नसते त्यावेळी शैक्षणिक साधनांचा वापर करणे आवश्यक असते. शैक्षणिक संस्थांना, शिक्षकांना या साधनांचे महत्त्व पटवून देण्यासाठी व त्यांचा प्रभावीपणे वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी या संस्थेची स्थापना सन १९१८ मध्ये मुंबईत झाली. १९७१ मध्ये ही संस्था पुणे येथे स्थलांतरित करण्यात आली व १९८४ पासून ही संस्था महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या अधिपत्याखाली राज्यस्तरीय संस्था म्हणून काम करीत आहे.

## संस्थेची उद्दिष्टे

(१) अध्ययन-अध्यापन प्रभावी करण्यासाठी शैक्षणिक साधनांचे महत्त्व पटवून देणे.

(२) सुधारित अभ्यासक्रमानुसार विविध शैक्षणिक साधनांची निर्मिती व त्यांचा परिणामकारक वापर करण्यासंबंधी प्राथमिक व शिक्षक प्रशिक्षक यांना प्रशिक्षण देणे.

(३) ज्ञानरचनावादावर आधारित आनंददायी प्रशिक्षणावर भर देणे.

(४) विद्यार्थी केंद्रित व विद्यार्थ्यांचा सहभाग यातून स्वनिर्मिती, प्रत्यक्ष कृती व नवनिर्मिती विकसित करणे.

(५) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत माहिती व तंत्रज्ञान याचा वापर करण्यासाठी प्रशिक्षण देणे.

**तज्ञ मार्गदर्शक निवड, अनुधावन व फलश्रुती**

● **तज्ञ मार्गदर्शक निवड -** प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थ्यांनी विविध नमुन्यातील आवेदन पत्र योग्य त्या अधिकाऱ्यांमार्फत या संस्थेस मागविले जातात. राज्यातील इच्छूक शिक्षकांची गटशिक्षणाधिकारी यांच्या शिफारशीने निवड केली जाते. शैक्षणिक साहित्य निर्मितीचा छंद असलेल्या शिक्षकांची निवड केली जाते. राज्यस्तरावर प्रशिक्षित शिक्षक तालुका व केंद्र पातळीवर मार्गदर्शक तज्ञ म्हणून काम करून तालुक्यातील, केंद्रातील शिक्षकांना मार्गदर्शन करतात. त्यामुळे तालुक्यातील केंद्रातील शिक्षक अध्ययन-अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर करतात.

● **अनुधावन -** दरवर्षी कार्यालयातील प्रत्येक अधिकारी किमान १० शाळांना भेटी देऊन अनुधावन केले जाते. यात प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांच्या शाळांना भेटी देऊन दिलेल्या प्रशिक्षणाचा उपयोग अध्ययन-अध्यापनात केला जातो का त्यानुसार शैक्षणिक साहित्य तयार करून वापरली जातात का या बाबी पाहिल्या जातात.

● **फलश्रुती -** आरेखन, बाहुलीनाट्य आणि छायाचित्रण या विविध प्रशिक्षणामुळे शिक्षकांना शैक्षणिक साहित्य निर्मितीचा छंद जोपासला जातो. त्याचबरोबर अध्ययन-अध्यापनात याचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होते. अध्ययन-अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर केल्यामुळे अध्यापन हे बालकेंद्रित बालस्नेही पद्धतीने दिले जाते. त्यामुळे नवीन अभ्यासक्रमातील ज्ञानरचनावादाचा वापर केला जातो व शिक्षक फॅसिलेटर म्हणून काम पाहतो.

**शासन निर्णय :**

शासन निर्णय दिनांक २००२-०३ च्या मंजूर आकृतिबंधानुसार बाहूलीनाटककार, छायाचित्रकार, चित्रकार व सहाय्यक बाहूलीनाटककार ही ४ पदे मंजूर आहेत.

शासन निर्णय दिनांक १७.१०.२०१६ तसेच शासन निर्णय दिनांक ३१.०७.२०१७ मध्ये चित्रकार, बाहूलीनाटककार व सहाय्यक बाहूलीनाटककार या तांत्रिक व एकाकी स्वरूपाच्या पदांचा समावेश करण्यात आलेला नाही.

शासन निर्णय दिनांक २३.०८.२०१८ अन्वये संस्थेचे विलीनिकरण महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील आय.टी. विभागात करण्यात आले आहे व संबंधित संस्थेमधील अधिकारी व कर्मचारी यांचे समायोजन समकक्ष पदावर पदस्थापना करण्यात यावे असे सूचित केले आहे तथापि तांत्रिक पदांचे अद्यापही समकक्ष पदावर समायोजन झालेले नाही.

## संस्थेचे ध्येय / कार्य

● आनंददायी व कृतीयुक्त प्रशिक्षणावर भर देणे.

● प्रशिक्षण वर्गामध्ये आधुनिक तंत्रज्ञान व कृतीयुक्त साधनांचा प्रभावीपणे वापर करणे.

● माहिती व तंत्रज्ञान साधनांचा प्रशिक्षणामध्ये जास्तीत जास्त वापर करणे.

● अल्पखर्च, अल्पश्रम व अल्पवेळ या सुत्राचा वापर करून शैक्षणिक साहित्य निर्मिती करणे.

● अल्पमुदतीची कृतिसत्रे घेणे.

● शैक्षणिक साधनांचे प्रदर्शन भरविणे.

---

## महाराष्ट्र राज्य दृक्श्रवण शिक्षण संस्था, पुणे-शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर प्रशिक्षण

**१. योजनेचे नाव (Name of the Scheme) :** शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर प्रशिक्षण.

**२. योजनेचा उद्देश (Aims and Objectives) :**

१. अध्ययन, अध्यापन प्रभावी करण्यासाठी शैक्षणिक साधनांचे महत्त्व पटवून देणे.

२. विविध शैक्षणिक साधनांची निर्मिती व त्यांचा परिणामकारक वापर करण्यासंबंधी प्रशिक्षण देणे.

३. राज्याच्या विविध जिल्ह्यांसाठी व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांसाठी साधन निर्मितीची कृतिसत्रे घेणे.

**३. योजनेचा तपशील (Contents I. C. Outlay and Expenditure)**

संस्थेत आरेखन, छायाचित्रण, बाहुलीनाट्य व यांत्रिकी या चार विभागामार्फत स्वतंत्रपणे वर्षातून प्रत्येकी २ प्रमाणे एकूण ८ प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येतात. सदरहू प्रशिक्षणवर्ग प्रामुख्याने प्राथमिक शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक, केंद्रप्रमुख, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिव्याख्याते यांच्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित केले जाते. याशिवाय दरवर्षी २१ दिवस कालावधीचा दृक्श्रवण शिक्षण प्रमाणपत्राचा एक प्रशिक्षणवर्ग आयोजित केला जातो.

तसेच संस्थेमार्फत अल्पमुदतीची कृतिसत्रे, चर्चासत्रे व प्रदर्शने यांचेही आयोजन करण्यात येते. उपरोक्त प्रशिक्षण वर्गामधून दृक्श्रवण शिक्षणावरील विविध अप्रक्षेपित साधनांची निर्मिती, शैक्षणिक चित्रपट दर्शन, विविध प्रक्षेपित साधनांची ओळख व वापर इत्यादी स्वरूपाची कामे पार पाडली जातात.

शासनाच्या मंजूर तरतुदीनुसार संस्थेत प्रशिक्षण वर्ग घेण्यात येतात. काही स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शैक्षणिक संस्था यांच्यामार्फत आयोजित कृतिसत्र यासाठीही संस्थेतील अधिकारी व तंत्रज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन व साहित्य निर्मिती करतात.

**४. योजनेची व्याप्ती (Coverage)**

**योजनेचे उद्दिष्ट व साध्य (Target and Achievements)**

| वर्ग | शिक्षक, प्रशिक्षक व अधिव्याख्याते यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण | | | सेवापूर्व शिक्षकांसाठी कृतिसत्रे, चर्चासत्रे व प्रदर्शन यांची संख्या | | | संस्थेला भेट देणाऱ्यांना मार्गदर्शन | | | राज्य चित्रपट संग्रहालय | | शैक्षणिक चित्रपट दाखविल्याची संख्या | पुस्तकांची निर्मिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रशिक्षण वर्ग संख्या | प्रशिक्षणार्थी संख्या | खर्च | कृतिसत्रे वर्ग संख्या | प्रशिक्षणार्थी संख्या | खर्च | भेट देणाऱ्या संस्थांची संख्या | भेट देणाऱ्यांची संख्या | खर्च | सभासद संख्या | भाग घेणारे विद्यार्थी संख्या | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| २०१८-२०१९ प्रत्यक्ष | -- | -- | -- | -- | -- | निरंक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २०१९-२०२० | -- | -- | -- | -- | -- | निरंक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २०२०-२०२१ | -- | -- | -- | -- | -- | निरंक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २०२१-२०२२ | -- | -- | -- | -- | -- | निरंक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २०२२-२०२३ | -- | -- | -- | -- | -- | निरंक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २०२३-२०२४ | -- | -- | -- | -- | -- | निरंक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २०२४-२०२५ | -- | -- | -- | -- | -- | निरंक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

**लेखाशीर्ष-२२०२१११५** **रक्कम रुपये हजारात**

| अ.क्र. | तपशील | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०१-वेतन | ३८०७ | १५७०७ | ३६७२ | २३०७ | ३३० | ० |
| २ | ०६-दूरध्वनी वीज व पाणी शुल्क | ८६ | ८० | ४२ | ० | ० | ० |
| ३ | ११-देशांतर्गत प्रवास खर्च | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | १३-कार्यालयीन खर्च | २० | १२ | १५ | १५ | ० | ० |
| ५ | १६-प्रकाशने | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | ३४-शिष्यवृत्ती | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | ५२-यंत्रसामग्री व उपकरणे | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **३९१३** | **१५७९९** | **३७२९** | **२३२२** | **३३०** | **०** |

## महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

## जीवन शिक्षण (प्रसार माध्यम) विभाग

१. योजनेचे नाव .. 'जीवन शिक्षण' मासिकाचे दरमाह प्रकाशन करून राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांना वितरण करणे.

२. योजनेचा उद्देश .. (१) 'जीवन शिक्षण' मासिक व इतर प्रकाशनाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील नवीन तंत्रे, विचार, कल्पना, संशोधन इत्यादीबाबत प्राथमिक शिक्षकांमध्ये जाणीव निर्माण करणे.

(२) दैनंदिन अध्यापनातील समस्यांबाबत प्राथमिक शिक्षकांना सहाय्य करून मार्गदर्शन करणे.

(३) शिक्षक करत असलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांना राज्यात सर्वदूर पोहचविणे.

(४) बदलती शिक्षणाची धोरणे, मूल्यमापन पद्धती, शिक्षणातील नावीन्यपूर्ण उपक्रम इत्यादी बाबतची माहिती शाळा व शिक्षकांपर्यंत पोहचविणे.

३. कार्यपद्धती .. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद कडून दरमाह ३ तारखेला जीवन शिक्षण मासिक प्रकाशित होते. या मासिकाला १५० वर्षांची गौरवशाली परंपरा लाभली आहे. शिक्षणाची गुणवत्ता वाढविणाऱ्या घटकाची माहिती सर्वदूर पोहचविण्यामध्ये जीवन शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते, म्हणून यास शालेय शिक्षण विभागाचे मुखपत्र म्हणून ओळखले जाते. हे मासिक राज्यातील सर्व प्राथमिक शाळांना वितरित केले जात असून मासिकाची वार्षिक वर्गणी ३०० रुपये तर एका अंकाची किंमत ३० रुपये दिनांक १० डिसेंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार केली आहे. त्यामुळे जानेवारी २०१९ पासून अंकाची वार्षिक वर्गणी रुपये ३०० तर एका अंकाची किंमत रुपये ३० करण्यात आली आहे.

४. योजनेची व्याप्ती .. दरमहा जीवन शिक्षण मासिक राज्यांमधील सर्व जिल्हा परिषद शाळांना पोस्टाद्वारे वितरित केले जाते.

५. आर्थिक तरतूद .. जीवन शिक्षण मासिक राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांना मोफत वितरित केले जाते. यासाठी दिनांक ३ डिसेंबर २००३ च्या शासन निर्णयानुसार ४ टक्के सादिलवार खर्चातून प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून हा निधी विभागास उपलब्ध करून दिला जातो.

.. ४ टक्के सादिलवार अनुदानाच्या तरतुदीतून सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, व २०२२-२३ चा अर्थिक वर्षात झालेला खर्च भागविण्यासाठी जीवन शिक्षण मासिकासाठी रक्कम रुपये ३,१५,५१,१२३/-- (अक्षरी रुपये तीन कोटी पंधरा लाख एकावन्न हजार एकशे तेवीस फक्त) एवढी रक्कम उपलब्ध करून देण्यात आली आहे. परंतु अनुदान मागणीनुसार उपलब्ध निधीमधून सन २०१९-२० च्या सर्व अंकांचा तर २०२०-२१ मधील पहिल्या ९ अंकांचा असा दोन्ही वर्षातील मिळवून फक्त २१ महिन्यांचा खर्च भागविला जात आहे. यापुढील खर्च भागविण्यासाठी आवश्यक अनुदानाची मागणी प्राथमिक संचालनालयाकडे करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ साठी आर्थिक तरतूद .. खालील तपशीलप्रमाणे सन २०२१-२२ ते २०२३-२४ साठीचे असे एकूण ५,४६,१९,५००/-- अनुदान हे अप्राप्त आहे व २०२४-२५ साठी रुपये १,८०,०५,१००/-- निधीची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | वर्ष | शाळांची संख्या | अपेक्षित रक्कम रु. | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १. | २०२१-२२ | ६१,०२४ | (वार्षिक वर्गणी रु. ३०० नुसार माहे एप्रिल २०२१ ते मार्च २०२२) रुपये १,८३,०७,२००. | १,८३,०७,२०० |
| २. | २०२२-२३ | ६१,०२४ | (वार्षिक वर्गणी रु. ३०० नुसार माहे एप्रिल २०२२ ते मार्च २०२३) रुपये १,८३,०७,२००. | १,८३,०७,२०० |
| ३. | २०२३-२४ | ६०,०१७ | (वार्षिक वर्गणी रु. ३०० नुसार माहे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४) रुपये १,८०,०५,१००. | १,८०,०५,१०० |
| ४. | २०२४-२५ | ६०,०१७ | (वार्षिक वर्गणी रु. ३०० नुसार माहे एप्रिल २०२४ ते मार्च २०२५) रुपये १,८०,०५,१००. | १,८०,०५,१०० |

## संकीर्ण विभाग

### (१) विषय शिक्षक संघटनांना अनुदान

शासन निर्णय क्र. पीटीसी १०९४/(१३५/९२) माशि-५, दिनांक १० मे १९९६ नुसार राज्यस्तरावर शैक्षणिक कामे करणाऱ्या मान्यताप्राप्त राज्यस्तरीय विषय संघटनांना शासनातर्फे वार्षिक अनुदान वितरित करण्यात येते. राज्यात एकूण १२ विषय संघटनांना शासन मान्यता आहे. पैकी एकूण १० विषय संघटना कार्यरत असून त्यांच्यामार्फत शिक्षकांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम, चर्चासत्रे आयोजित केली जातात. शिक्षकांसाठी नियमितपणे संबंधित विषयाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन केले जाते. तसेच प्रकल्प राबविले जातात.

प्रत्येक शिक्षक संघटनेला रुपये २०,००० इतके सहायक अनुदान या योजनेमधून वितरित केले जाते. या योजनेचा लाभ राज्यातील मराठी, हिंदी, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, कला, संगीत, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण इ. विषयांच्या शिक्षकांना होतो.

## राज्यस्तरीय विषय शिक्षक संघटनांना अनुदान वाटप

### मागील ५ वर्षांचा सत्रनिहाय व निकषनिहाय खर्चाचा तपशील

| अ. क्र. | सन | विषय | | अनुदान रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | शिक्षक संघटना अनुदान (१० संघटना)<br>अनुदान विनियोग विगतवारी खालीलप्रमाणे<br>१) त्रैमासिक काढणे<br>२) शैक्षणिक शिबीर व कृतिसत्राचे आयोजन<br>३) शैक्षणिक प्रकल्प | <br><br>रु. १५,०००<br>रु. २,५००<br>रु. २,५००<br>एकूण रु. २०,००० | १,५०,००० | ८ संघटनांना प्रत्येकी रु. २०,००० व २ संघटनांना प्रत्येकी रु. १०,००० (महाराष्ट्र राज्य विज्ञान अध्यापक महामंडळ, पुणे व महाराष्ट्र राज्य क्रिडा व शारीरिक शिक्षक महासंघ, पुणे या संघटनेचा अनुदान स्वीकारण्यास नकार). |
| २ | २०१९-२० | शिक्षक संघटना अनुदान (८ संघटना)<br>अनुदान विनियोग विगतवारी खालीलप्रमाणे<br>१) त्रैमासिक काढणे<br>२) शैक्षणिक शिबीर व कृतिसत्राचे आयोजन<br>३) शैक्षणिक प्रकल्प | <br><br>रु. १०,५००<br>रु. १,७५०<br>रु. १,७५०<br>एकूण रु. १४,००० | १,०५,००० | ७ संघटनांना प्रत्येकी रु. १४,००० व १ संघटनेला रु. ७,००० (महाराष्ट्र राज्य विज्ञान अध्यापक महामंडळ पुणे व महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षक महासंघ पुणे या संघटनांचा अनुदान स्वीकारण्यास नकार). |

**मागील ५ वर्षांचा सत्रनिहाय व निकषनिहाय खर्चाचा तपशील--*चालू***

| अ. क्र. | सन | विषय | अनुदान रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ३ | २०२०-२१ | | | सदर ट्रँझॅक्शन क्रमांक १०३-०८/०२/२०२१ ला आहरण व संवितरण अधिकारी यांचे डी.डी.ओ. लॉगिनवरून देयकाची बी.डी.एस. जनरेट करण्यासाठी सबमीट केले असता बील पोर्टल प्रणालीवर खालील संदेश प्राप्त होत आहे. "Authorization is restricted by Finance Depart ment". अशा प्रकारे देयक प्रतिबंधित करण्यातआले असल्याने अनुदान वितरित करण्यात आले नाही. |
| ४ | २०२१-२२ | -- | -- | अनुदान वितरित करण्यात आले नाही. |
| ५ | २०२२-२३ | शिक्षक संघटना अनुदान (०९ संघटना)<br>अनुदान विनियोग विगतवारी खालीलप्रमाणे<br>१) त्रैमासिक काढणे रु. . १५,०००<br>२) शैक्षणिक शिबीर व कृतिसत्राचे आयोजन करणे रु. २,५००<br>३) शैक्षणिक प्रकल्प रु. २,५००<br>एकूण रु. २०,००० | १,७०,०००<br>(मागणी करण्यात आलेली आहे.) | ८ संघटनांना प्रत्येकी रु. २०,००० व १ संघटनेला रु. १०,०००<br>(महाराष्ट्र राज्य विज्ञान अध्यापक महामंडळ पुणे या संघटनेचा अनुदान स्वीकारण्यास नकार)<br>(सदर अनुदान प्रक्रिया सुरू आहे.) |
| ६ | २०२३-२४ | शिक्षक संघटना अनुदान (९ संघटना)<br>अनुदान विनियोग विगतवारी खालीलप्रमाणे<br>१) त्रैमासिक काढणे रु. १२,८३०<br>२) शैक्षणिक शिबीर व कृतिसत्राचे आयोजन करणे रु. २,१३८<br>३) शैक्षणिक प्रकल्प रु. २,१३८<br>एकूण रु. १७,१०६ | १,३६,८५० | ७ संघटनांना प्रत्येकी रु. १७,१०६ व २ संघटनांना प्रत्येकी रु. ८,५५४ असा एकूण रुपये १,३६,८५० एवढा निधी वितरित करण्यात आला. |

---

## प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई

### सन २०२२-२३ कार्यअहवाल

शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या १७ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या अंतर्गत प्रत्येक महसुली विभागामध्ये विभागीय प्रादेशिक विद्या प्राधिकरणची स्थापना करण्यात आली होती. विद्या प्राधिकरणाच्या संकल्पनेतून कमीत कमी मनुष्यबळ वापरून व कमीत कमी आर्थिक व्यय करून अधिकाअधिक शैक्षणिक लाभ घेण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले होते. या अंतर्गत व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई या संस्थेची पुनर्रचना करून प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई या संस्थेत येथे रूपांतर करण्यात आले. मुंबई जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नसल्यामुळे त्याचे ही कार्य प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई यांनी करणे अपेक्षित आहे. प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई अंतर्गत मार्गदर्शन, कार्यानुभव, इंग्रजी, मराठी, गणित, विज्ञान, समाजशास्त्र, उर्दू, आय.टी. या विभागाची प्रादेशिक स्तरावर संरचना करण्यात आली व प्रत्येक विभागासाठी संबंधित पदे ही त्या-त्या विषयामध्ये तज्ज्ञ असलेल्या व्यक्तीमधून प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत सूचना शासन निर्णयात देण्यात आल्या होत्या शिक्षक विद्यार्थी यांच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी निरंतर कार्यरत राहणे हे प्राधिकरणाचे मुख्य उदिष्ट शासन निर्णयाद्वारे नमूद करण्यात आले आहे.

प्रादेशिक विद्या प्राधिकरण या संस्थेमध्ये व्यावसायिक मार्गदर्शन आणि निवड संस्थेच्या विलिनीकरणानंतर समुपदेशन व मार्गदर्शन करण्याचे कार्य प्रादेशिक विद्या प्राधिकरणच्या नेतृत्वाखाली पार पडत आहे.

**मानसशास्त्रीय कसोट्या आधारित व कसोट्या विरहित समुपदेशन व मार्गदर्शन**

(१) करोना संक्रमण काळात हे कार्य ऑनलाईन चालत होते.

(२) विद्यार्थ्यांसाठी webinar व ऑनलाइन मार्गदर्शन सत्र आयोजित केली गेली.

(३) तत्कालीन मा. पालकमंत्री, रायगड जिल्हा यांनी रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी कसोट्यांवर आधारित समुपदेशन मागणीनुसार माहे मे २०२२ मध्ये रायगड मधील ७ तालुक्यांत साधारण ३५० विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष मार्गदर्शन व २००० विद्यार्थ्यांसाठी करिअर टॉकद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

(४) २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात मार्च २०२२ माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील परीक्षा पार पडल्यानंतर पालकांच्या मागणीनुसार व वरिष्ठ कार्यालय महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदे (SCERT) च्या मार्गदर्शक सूचनेनुसार माहे जून २०२२ मध्ये ७० विद्यार्थ्यांसाठी एक मानसशास्त्रीय कसोट्या सत्र पार पडले.

(५) व्यावसायिक वाटा प्रगतीच्या दिशा या यू-ट्यूब कार्यक्रमाद्वारे असंख्य विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्यरत यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती घेऊन मार्गदर्शन करण्यात आले.

(६) प्रादेशिक विद्या प्राधिकरण मध्ये प्रत्यक्ष कार्यरत समुपदेशक फोनद्वारे तसेच ऑफलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

(७) २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात कसोटी विरहित व कसोटी सहित प्रत्यक्ष समुपदेशन केलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ८३९ आहे, तसेच फोन द्वारे म्हणजेच ऑनलाइन पद्धतीने समुपदेशन केलेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ५४३ इतकी आहे.

(८) व्यवसाय मार्गदर्शन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे पुनरावलोकन करण्यात आले. यात संबंधित विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक यांची समिती गठित करून ऑनलाइन व ऑफलाइन सभा घेऊन अभ्यासक्रमातील मुद्देनिहाय अभिप्राय SCERT यांना सादर करण्यात आले.

(९) इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना उपयोगी अशी शालेयविषय निहाय ऑनलाइन मार्गदर्शन मालिका घेण्यात आली. यात विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक निर्मितीत सहभागी असणाऱ्या सदस्यांनी मार्गदर्शन केले.

(१०) महा करिअर पोर्टलच्या प्रचार व प्रसाराकरिता सभेचे आयोजन तसेच विद्यार्थ्यांनी या पोर्टलचा लाभ करून घेण्याकरिता त्यांना प्रोत्साहित केले. प्राधिकरणातील कर्मचारी शाळाभेटी करून पोर्टलची माहिती देतात. विद्यार्थ्यांना प्रक्रियेची माहिती सांगतात.

(११) प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई म्हणजेच व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्थेमार्फत पूर्वीपासून इयत्ता १० वी व १२ वी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना समुपदेशन करत आहे.

(१२) सदर समुपदेशनाचा लाभ आजपर्यंत हजारो विद्यार्थी पालक यांनी घेतला आहे, त्यामुळे मानसशास्त्रीय कसोट्यांसहित मार्गदर्शनासाठी पालक नावनोंदणी करतात.

(१३) कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये तर त्याला योग्य ते मार्गदर्शन मिळाले तर तो आपल्या आवडीच्या क्षेत्रात सहजपणे गरूड झेप घेतो यासाठी संस्था अविरतपणे कार्यरत आहे.

(१४) मुंबई व विभागातील इतर जिल्ह्यातील विविध टप्प्यांवर येऊन मार्गदर्शनाअभावी बरेच विद्यार्थी भरकटताना दिसतात. जर त्यांना योग्यवेळी योग्य ते मार्गदर्शन मिळाले तर विद्यार्थी राष्ट्र हितासाठी घडू शकतो यासाठीच शिखर संस्था म्हणून प्रादेशिक विद्या प्राधिकरण कार्यरत आहे.

(१५) Covid महामारीच्या काळात संस्थेचे ऑनलाइन पद्धतीने समुपदेशन सुरूच होते याचा हजारो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

(१६) सर्व माध्यमिक शाळांमध्ये समुपदेशक हे अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडतात. हे समुपदेशक घडविण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था म्हणजेच प्रादेशिक विद्या प्राधिकरणमार्फत सन २०१७ पर्यंत व्यवसाय विज्ञान व पदविका अभ्यासक्रम हे उपक्रम राबविले जात होते. आज पुन्हा ते सुरू झाल्यास समुपदेशनाने शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून येतील.

(१७) समुपदेशनाच्या दृष्टिकोनातून विविध क्षेत्रातील आवड व विद्यार्थ्यांस आकर्षित करणारे विविध अभ्यासक्रम लक्षात घेता अनेक विषयावर संशोधनात्मक कार्य समुपदेशकाच्या साहाय्याने आजपर्यंत केले गेले.

(१८) संस्थेने माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत भरारी पथकासाठी उत्तम कार्य केले आहे.

(१९) परीक्षेअंती ग्रामीण भागातील विद्यार्थी हा मार्गदर्शनाअभावी करिअर क्षेत्रातून बाहेर पडताना दिसतो मात्र कोविड १९ महामारीनंतर २०२२ परीक्षा पार पडल्यानंतर विद्यार्थ्यांना करिअर टॉकद्वारे तसेच मानसशास्त्रीय कसोट्यांद्वारे मार्गदर्शन करण्यात संस्थेने अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. भविष्यातही भरीव मार्गदर्शन करण्यासाठी प्रादेशिक विद्या प्राधिकरण प्राधान्याने कार्य करीत राहील मात्र याकरिता आवश्यक समुपदेशक संख्या व मानसशास्त्रीय कसोट्यांसहित मार्गदर्शनासाठी संस्थेची अतिशय मोठ्या प्रमाणात गरज आहे.

**सन २०२२-२३ कार्यअहवाल**

| विषय | कामाचे स्वरूप | तपशील |
|---|---|---|
| एक भारत श्रेष्ठ भारत | सहविचार सभा | एक भारत श्रेष्ठ भारत कार्यक्रमांतर्गत मुंबई शहर व मुंबई उपनगरमधील सर्व अधिकारी व सर्व मुख्याध्यापक आणि शिक्षकांची सदर कार्यक्रमाविषयी ओळख, रूपरेषा, नियोजन आणि करावयाची कार्यवाही याविषयी कार्यशाळा घेण्यात आल्या. |
| | अहवाल व कार्यक्रमाचे व्हिडिओ पाठविणे. | एक भारत श्रेष्ठ भारत कार्यक्रमांतर्गत मुंबई शहरामधील अधिकारी व सर्व माध्यमिक मुख्याध्यापक आणि शिक्षक तसेच सलाम बॉम्बे फाउंडेशनचे सदस्य यांच्या समवेत आढावा बैठक घेण्यात आली आणि उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. |
| | ओडिसा दिन साजरा करणेबाबत पूर्व तयारी. | एक एप्रिल रोजी असणाऱ्या ओडिसा दिनानिमित्त सदरच्या कार्यक्रमात सहभागी असणाऱ्या शाळांकडून व्हिडिओ निर्मिती, प्रदर्शने दिलेल्या नियोजनानुसार ची सर्व कार्यवाही यांचा आढावा घेणे तसे अहवाल scert पुणे यांच्याकडे पाठविणे. |
| आजादी का अमृत महोत्सव | | सहभागी असणाऱ्या शाळांकडून वेळापत्रकानुसार विषयनिहाय व्हिडिओनिर्मिती, प्रदर्शने दिलेल्या नियोजनानुसारची सर्व कार्यवाही यांचा आढावा घेणे मासिक अहवाल scert पुणे यांच्याकडे पाठविणे. |
| बालरक्षक | शाळाबाह्य मुलांसंदर्भात कार्यवाही. | शाळाबाह्य मुलांसंदर्भात वेळोवेळी कार्य शाळा घेणे, शिक्षक बालरक्षक यशोगाथा SCERT ला पाठवणे. बालरक्षक शोध मोहीम राबविणे विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करणे. त्यांचे समुपदेशन व आढावा घेणे. बालरक्षक शिक्षकाना प्रेरणा देणे. जिल्हा, विभागापलीकडे राज्यातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांना मदत करून शाळेच्या प्रवाहात आणणे. |
| | | उदा. लॉकडाउनच्या काळात नागपूरमधील एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. सदर व्हिडिओ करोनायोद्धा असलेल्या काही तरुणांनी चित्रित केला होता. (एकूण चार मुले होते सर्वात मोठा बारा वर्षांचा आणि सर्वात लहान अडीच वर्षांचा, वडील वारले होते आणि आई सोडून गेली होती) त्याची दखल रायगडमधील खोपोलीतील एका महिलेने घेतली आणि त्यांनी प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईशी संपर्क साधला प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईने राज्याच्या ग्रुपवर आणि समता विभागातील अधिकारी यांच्याशी संपर्क साधला ग्रुपच्या माध्यमातून नागपूरमधील बालरक्षक व काही संघटना पोलीस कर्मचारी कमिशनर यांच्या मदतीने मुलांची पुढील शैक्षणिक निवास व भोजनाची सोय झाली. या कामाची दखल वर्तमान पत्रांनीदेखील घेतली तसेच प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईचे आभारदेखील मानले आणि अभिनंदन पत्र देखील मिळाले. |
| कार्यानुभव | शिक्षक मार्गदर्शन वेबिनार | कार्यानुभव विषयांतर्गत झूम मिटिंगचे आयोजन<br>विषय-ताण तणावाचे व्यवस्थापन, सहभागी जिल्हा रायगड, ठाणे, पालघर, मुंबई. लाभार्थी संख्या १२३५ |
| | व्हिडीओ निर्मिती शिक्षक पालक विद्यार्थी मार्गदर्शन वेबिनार | कार्यानुभव विषयांतर्गत जिल्हा रायगड, जिल्हे ठाणे, जिल्हा पालघरअंतर्गत कार्यानुभव नवोपक्रम स्पर्धेत जे सहभागी झाले होते अशा शिक्षकांना दीक्षापसाठी व्हिडिओ बनवण्याचे आवाहन केले. व्हिडिओ निर्मितीबद्दल शिक्षकांना ग्रुपच्या माध्यमातून मार्गदर्शन केले त्यामुळे एकूण १०० व्हिडिओंची निर्मिती झाली. सदर व्हिडिओ एस.सी.आर.टी., पुणे येथे पाठवले. सदर व्हिडिओतील काही निवडक व्हिडिओचा शाळाबंद पण शिक्षण सुरू या अंतर्गत अभ्यासमालेमध्येदेखील समावेश करण्यात आला आहे. लाभार्थी - महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळा.<br>संवाद कौशल्य कसे आत्मसात करावे, संवाद म्हणजे काय ?<br>लाभार्थी ११६५. |
| | नवोपक्रम कार्यशाळा | कार्यानुभव नवोपक्रम कार्यशाळा विभागातील ठाणे, रायगड, पालघर येथे शिक्षकांना व्यासपीठ लिंकद्वारे ३९४ शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. प्रत्येक जिल्ह्यामधून ३० शिक्षकांना सादरीकरणाची संधी मिळाली (Paper Presentetion - कार्यानुभव विषयाचा इतर विषयांशी समन्वय आणि माझा वेगळा उपक्रम) एकूण ९० शिक्षकांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. सदर उपक्रम हा संबंधित जिल्ह्यात राबवला. प्रसंगी त्या जिल्ह्याचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणं विभागातील अधिकारी उपस्थित होते. |

**सन २०२२-२३ कार्यअहवाल--*चालू***

| विषय | कामाचे स्वरूप | तपशील |
|---|---|---|
| सगुण कार्यक्रम | सगुण कार्यक्रम यशोगाथा परीक्षण. | सगुण कार्यक्रम यशोगाथा परीक्षण महाराष्ट्रातून १५ परीक्षकांची झूम मीटिंगद्वारे माहिती घेऊन यशोगाथाच्या पीडीएफ पाठवल्या होत्या. प्रत्येक गटात तीन परीक्षकांनी एकूण नऊ जिल्ह्यांचे प्रत्येकी किमान तीन व कमाल पाच या पद्धतीने यशोगाथाची छाननी करून रूब्रिक्सप्रमाणे प्रत्येक यशोगाथेला गुण देऊन त्यांची लिंकद्वारे गुणदान व ऑनलाइन अभिप्राय द्यायचा होता. एकूण ३३ यशोगाथांचे मूल्यमापन गुगल लिंकद्वारा करून दिले. |
| | फ्लिपबुक निर्मिती | सगुण कार्यक्रम फ्लिपबुक निर्मिती<br>महाराष्ट्रातील काही निवडक यशोगाथा (ज्यांचे परीक्षण केले होते त्यापैकी उत्कृष्ट) फ्लिम्बुकसाठी विचारात घेता त्यातील शब्दालंकार, ओघवती लेखनशैली, गोष्टीरूप वर्णनात्मक लेखन आवश्यक होते. त्यासाठी संबंधित शिक्षकांना वारंवार संपर्क साधून (अपेक्षित बदल होत नाहीत तोपर्यंत) मार्गदर्शन केले प्रसंगी स्वत: सुचवले, लेखन केले. अशा एकूण नऊ यशोगाथा फ्लिपबुकसाठी SCERT संशोधन विभागाकडे पाठवल्या. |
| बालरक्षक | बालरक्षक ओळखपत्र | बालरक्षक ओळखपत्र<br>(१) जिल्हाबदली, इच्छुक नसलेले, रिटायर्ड झालेले, वर्षभरात रिटायर्ड होऊ घातलेले व संपर्क होत नसलेल्या बालरक्षक शिक्षकांऐवजी इतर बालरक्षक शिक्षकांची नेमणूक करणे.<br>(२) मुंबई शहर ३५ व. मुंबई उपनगर ६० एकूण ९५ बालरक्षक ओळखपत्र लिंक SCERT कडे पाठवण्यात आल्या. |
| | बालरक्षक यशोगाथा फेसबुक लाइव्ह | राज्यातील शिक्षकांना प्रेरणा व मार्गदर्शन तसेच येणाऱ्या अडचणी त्यावरील मात या संदर्भात फेसबुक लाइव्हद्वारे व्याख्यान व चर्चा सदर live चा ३००० पेक्षा जास्त लोकांनी सहभाग घेतला. |
| मराठी | वाचन अभियान | १०० दिवसांचे १४ आठवड्यांचे वाचन अभियान यशस्वीरीत्या राबवण्यात आले. मुंबई उपनगर-मधील सर्व शाळांचा सहभाग होता. |
| | मराठी प्रशिक्षण | महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी आणि तद्संबंधी किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता केलेला दिनांक ९ मार्च २०२० रोजी प्रसिद्ध केलेला अधिनियम - २०२०. |
| | वाचू आनंदे Webinar | पाठ्यपुस्तक समजून घेताना.<br>ठाणे, मुंबई नाशिक, सातारा जिल्हा,<br>लाभार्थी - १५३२. |
| | गोष्टींचा शानिवार | विद्यार्थ्यांचे वाचनकौशल्य विकसनासाठी गोष्टींचा शनिवार कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. सन २००२१-२२ मध्ये प्रस्तुत कार्यालयाकडून युनिसेफ आणि प्रथमबुक्स स्टोरीविवर यांच्या सहकार्याने गोष्टींचा शनिवार हा कार्यक्रम घेण्यात आला होता. सदर कार्यक्रमास शाळा शिक्षक विद्यार्थी यांचा लाभलेला प्रतिसाद पाहता २०२२-२३ ह्या शैक्षणिक वर्षासाठी सदर कार्यक्रम दिनांक १३ ऑगस्ट २०२२ ते ३० एप्रिल २०२३ (एकूण ३० आठवडे) राबविण्यात येणार आहे. सदर उपक्रमासाठी SCERT समवेत प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई राज्यस्तरावर काम पाहणार आहे. |
| | मराठी राजभाषा दिन | मराठी राजभाषा दिनानिमित्त १ ली ते १२ वी छात्राध्यापक आणि शिक्षकांसाठी विविध स्पर्धाचे यशस्वी-रीत्या आयोजन करण्यात आले. लाभार्थी-६६८. |
| | NEP Webinar Series | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणसंदर्भात राज्यातील व राज्याबाहेरील तज्ज्ञांद्वारे १४ लाइव्ह वेबिनारचे यशस्वी आयोजन.<br>लाभार्थी - मुंबई शहर व मुंबई उपनगर मधील सर्व शिक्षण विभाग.<br>नॅशनल एज्युकेशन पॉलिसी अंतर्गत विविध वेबिनारमध्ये सहभाग पालघर जिल्ह्यामध्ये शालेय नेतृत्व या विषयावर आधारित मार्गदर्शन. |

**सन २०२२-२३ कार्यअहवाल--*चालू***

| विषय | कामाचे स्वरूप | तपशील |
|---|---|---|
| राष्ट्रीय शैक्षणिक धोरण. | Zoom, Facebook Live | Lock down उपक्रमांमध्ये बालरक्षक प्रतिष्ठानमार्फत आठवड्यातून चार दिवस विविध राष्ट्रीय देशातील राज्यातील विविध उपक्रमशील शिक्षकांशी वेबिनारद्वारा चर्चा संवाद मुलाखती सहभागी राज्य हरियाणा, पंजाब उत्तर प्रदेश गुजराथ हिमाचल प्रदेश, झारखंड, उत्तराखंड केरळ, कर्नाटक या राज्यांतील शिक्षक प्रत्येक वेबिनारसाठी मर्यादित ५०० संख्या. |
| | MHM Workshop | मुंबई शहर व मुंबई उपनगर मधील सर्व शाळांमध्ये मुलींच्या कार्यशाळांच्या माध्यमातून समुपदेशन. |
| समता | प्रत्यक्ष भेटी | समता रेड लाईट एरियातील मातांच्या मुलांचे शिक्षण याविषयी विशेष प्रयत्न सदर शाळांना भेटी सदर वस्तीना भेटी तेथील शिक्षकांना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजना यावर यशोगाथा सादरीकरणामध्ये सहभाग (MIEPA SLA औरंगाबाद ) शाळा कामठी पुरा. |
| | राज्यस्तरीय व्याख्यान | महिला सबलीकरण - राजमाता जिजाबाई व सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ<br>राज्यातील सर्व जिल्हे - निवडक ५०० शिक्षण प्रेमी zoom live इतर फेसबुक Live माध्यमातून. |
| | शास्त्रीय - नृत्य, गायन वादन, चित्रकला, द्विमीती, त्रिमीती<br>पारंपरिक - नृत्य, गायन, वादन. | वार्षिक कला महोत्सवामध्ये नऊ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत मुंबईमधील विद्यार्थ्यांचा सर्वाधिक २९६ विद्यार्थी सहभाग आणि सर्वात जास्त २३ पारितोषिकांचे मानकरी मुंबई शहर व उपनगर मधील विद्यार्थी. |
| | Online/offline उपक्रम | शिकू आनंदे<br>देखो अपना देश<br>स्वाध्यायमाला<br>अभ्यासमला<br>विज्ञानाचा गुरुवार<br>गोष्टींचा शनिवार<br>इतर विषयांसोबत वरील विषयांचे सनियंत्रण, आढावा SCERT ला पाठवणे. |
| कला महोत्सव | घटकसंच निर्मिती सहभाग | बालरक्षक, MOT<br>सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन. |
| शाळा बंद पण शिक्षण सुरू. | प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई आयोजित मुंबई विभागातील जिल्ह्यामध्ये विज्ञानकृतीयुक्त कार्यशाळा.<br>पालघर :- माध्यमिक शिक्षक (४०२ प्रशिक्षणार्थी),<br>रायगड :- प्राथमिक शिक्षक (६१० प्रशिक्षणार्थी). | प्रत्यक्ष वर्ग अध्यापनात विद्यार्थ्यांच्या सहभागातून ज्ञानरचना कशी करावी, ' सुलभक ' म्हणून शिक्षकाने वर्गात नेमके काय करावे, वर्गात एखादा घटक शिकविताना नेमक्या कोणत्या कृती व्याव्यात, अशा अनेक बाबींवर प्रत्यक्ष कृतींमधून श्री. हेमंत लागवणकर यांनी मार्गदर्शन केले. |
| घटकसंच निर्मिती | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई आयोजित मुंबई शहर व उपनगरमधील विज्ञान शिक्षकांसाठी विज्ञान परिषद.<br>सहभागी शिक्षक - २३०. | (१) भाभा आटोमीक अणुसंशोधन केंद्रातील संशोधक श्री. संतोष टकले शहर यांचे व्याख्यान.<br>(२) परिसंवाद :-- विज्ञान विषयातील येणाऱ्या समस्या<br>३) प्रश्नमंजुषा : सहभागी व विजयी स्पर्धकांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. |
| (१) पालघर, रायगड जिल्हा विज्ञान कृतीयुक्त कार्यशाळा (ऑफलाईन). | (१) प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई व अगस्त्या फाउंडेशन संयुक्त विद्यमाने विज्ञान शिक्षकांसाठी ३ दिवसीय online प्रशिक्षण. | मुंबई विभागातील मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नवी मुंबई या जिल्ह्यांसाठी प्रत्येकी ३ दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. यात एकूण ३९२ शिक्षक सहभागी झाले होते. भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र अशा सर्व विषयांवर घरगुती सोप्या सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्यातून विज्ञान संकल्पना कशा स्पष्ट कराव्यात याचे प्रशिक्षण दिले गेले. |

**सन २०२२-२३ कार्यअहवाल--*चालू***

| विषय | कामाचे स्वरूप | तपशील |
|---|---|---|
| (२) विज्ञान दिन निमित्त शिक्षण परिषद (ऑफ-लाईन). स्थळ :-खालसा महाविद्यालय. | (२) विज्ञानाच्या नवीन वाटा (प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई आयोजित) सहभागी शिक्षक :- ६० सहभागी विद्यार्थी :- ३० | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, विज्ञान विभागामार्फत मुंबई जिल्ह्यातील शिक्षक व विद्यार्थी यांच्याकरिता विज्ञानविषयबाबत वेबिनार घेण्यात आले. याकरिता (१) डॉ. जयंत जोशी (संशोधक BARC) - खेळणीतून विज्ञान, (२) श्री. विश्वास भावे (संस्थापक, न्यास संस्था) online अध्यापन तोटे व विज्ञान शिक्षक समस्या, (३) श्री. नचिकेत नितसुरे (युवक विभाग प्रमुख, ज्ञान प्रबोधिनी) कौशल्य विकसित करणे, यांनी मार्गदर्शन केले. |
| (३) करोना कालावधीतील online उपक्रम | (३) विज्ञान दिनानिमित्त खगोलशास्त्रज्ञ यांचे मुंबई जिल्ह्यातील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी वेबिनार सहभागी शिक्षक व विद्यार्थी :-- १३०. | २८ फेब्रुवारी विज्ञान दिनानिमित्त प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्री. प्रकाश डे (खगोलशास्त्रज्ञ) यांचे वेबिनार आयोजित केले गेले. विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राविषयी आवड निर्माण होणे, खगोल शास्त्राविषयी शिक्षकांना अधिक मार्गदर्शन हा या वेबिनार चा उद्देश होता. जवळपास १३० शिक्षक व विद्यार्थी यांचा सहभाग होता. |
| (४) विद्यांजली २.० | मुंबई शहर व उपनगर मधील शाळांची विद्यांजली २.० पोर्टल वर नोंदणी करून घेणे. मुंबई उपनगर एकूण शाळा १७०२ पैकी १०१५ शाळा नोंदणी पूर्ण. मुंबई शहर ९९७ पैकी ११० शाळा नोंदणी पूर्ण. | (१) दिनांक १२ जुलै २०२२ रोजी मुंबई उपनगर व शहर मधील सर्व अधिकारी वर्ग व साधन व्यक्ती याकरिता उद्‌बोधन सभा घेण्यात आली.<br>(२) त्यानुसार प्रत्येक urc तील संबंधित साधन व्यक्तिंना रोजच्या नोंदणी आकडेवारी दिली जात आहे, जेणेकरून नोंदणी जलदगतीने होण्यास मदत होईल.<br>(३) विद्यांजली २.० पोर्टलबाबत अधिक माहिती करिता व संभाव्य अडचणी लक्षात घेऊन प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई च्या you tub channel वर मार्गदर्शन पर व्हिडिओ अपलोड करण्यात आला आहे, तसेच ppt सुद्धा प्रत्येक मुख्याध्यापक, साधन व्यक्ती, शिक्षक यांच्यापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला आहे.<br>शाळा नोंदणी १०० टक्के नोंदणी होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. |

प्रादेशिक विद्या प्राधिकरण इंग्रजी विषयाबाबतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. CHESS TEJAS हे उपक्रम सुरू असून त्याचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. ब्रिटिश काउन्सिल मार्फत आयोजित इंग्लिश भाषा व उच्चार शास्त्र तसेच right to read अंतर्गत R.T.M. अर्थात READ TO ME हा प्रकल्प चालू असून मुंबई विभागातील १२५ शाळांमध्ये हा प्रकल्प २०१४ पासून राबविण्यात येत आहे. ज्यामध्ये ५० टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती झाल्याचे दिसून येते. ३२ हजार शिक्षक आणि ४५ हजार विध्यार्थ्यानी RTM हा अँप INSTALL केला असून १०० टक्के शाळा व विद्यार्थी पर्यंत पोहचण्यासाठी संस्था कार्यरत आहे. इंग्लिश SIMPOSIUM वेळोवेळी संस्था आयोजित करून इंग्लिश शिक्षकांकरिता मार्गदर्शन करीत आहे.

NAS FLN २०२२ शाळांकरिता ११९ मुंबई उपनगर जिल्ह्यातील इयत्ता तिसरीच्या - NAS FLN सर्वे घेण्यात आला.

**नवोपक्रम** - नवोपक्रम सादरीकरणाबाबत कार्यशाळा घेण्यात आल्यात. या कार्यशाळेचा शिक्षकांना खूप उपयोग झाला. शिक्षकांनी नवोपक्रम सादर केले आहेत. राज्यस्तरीय विजयी स्पर्धकांमध्ये प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई क्षेत्रातील शाळेतील शिक्षकांचा समावेश आहे.

प्रसार माध्यम विषयांतर्गत जीवन शिक्षण मासिकाकरिता राज्यस्तरावरून आलेल्या सूचनेनुसार कविता, लेख शाळांकडून घेण्यात आलेत, त्याचे संकलन करून समितीद्वारे निवडलेले लेख व कविता राज्यस्तरावर पाठविण्यात आल्या.

निष्ठा प्रशिक्षण २.० व ३.०

- NAS सर्व्हेक्षण / प्रशिक्षण
- SMC राज्यस्तरीय प्रशिक्षण
- शाळापूर्व तयारी अंभियान - पाऊल पाहिले - राज्यस्तरीय
- विद्याप्रवेश
- विद्यांजली ३.०

- मुख्याध्यापक सक्षमीकरण मोड्युल विकसन व राज्यस्तरीय प्रशिक्षण देणे
- KPALP मोड्युल विकसन
- CRC BRC राज्यस्तरीय प्रशिक्षण
- CCE मोड्युल विकसन
- शाळाबाह्य विद्यार्थी सर्व्हेक्षण
- Online वेबिनार मार्गदर्शन सत्र
- महाकरिअर पोर्टल कार्यशाळा
- मानसशास्त्रीय समुपदेशन कार्यशाळा
- व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा
- विद्यार्थी समुपदेशन - २४४८
- राज्यस्तरीय समुपदेशन कार्यशाळा
- निपुण भारत अभियान कार्यशाळा
- FLN अनुषंगिक शाळाभेट
- वीरगाथा
- Inspire Award सहभाग
- नवभारत साक्षरता अभियान
- विज्ञान नाटयोत्सव कार्यक्रम
- अधिकारी कर्मचारी गुणवत्ता कक्ष बैठकांचे / आयोजन
- मुख्याध्यापक शिक्षक गुणवत्तापूर्ण / विषय सादरीकरण कार्यशाळा, सभा, बैठकांचे आयोजन
- अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षण

मुंबई शहर व मुंबई उपनगर * जिल्हा अंतर्गत अनुक्रमे * ७ व १२ URC मधील विविध प्राथमिक, माध्यमिक मनपा, अनुदानित, विना अनुदानित, कायम विना अनुदानित, स्वयं अर्थसाहाय्यित, ICSE बोर्ड, CBSE बोर्ड, IB बोर्ड, केंद्रीय शाळा व विशेष विद्यार्थ्यांच्या शाळांच्या अनुषंगाने शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक संबंधित विविध प्रशिक्षणाचे राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय आयोजन NCERT, SCERT व MEIPA यांच्याद्वारे केले जाते सदरच्या प्रशिक्षणामध्ये राज्यस्तरीय सुलभक किंवा प्रशिक्षणार्थी किंवा नोडल ऑफिसर म्हणून भूमिका पार पाडावी लागते.

यानंतर विशेष म्हणजे तालुका अर्थात URC स्तरीय केंद्र अर्थात CRC स्तरीय व नंतर शालेय स्तरावरील प्रशिक्षणाचे स्थानिक पातळीवर सूक्ष्म नियोजन व नंतर त्याची प्रत्येक स्तरावर प्रभावी अंमलबजावणी केली जाते. यानंतर विशेष म्हणजे उपक्रमादरम्यान व उपक्रमानंतरची सांख्यिकीय माहिती जमा करणे व त्याचा एकत्रित गोषवारा करून आवश्यकतेनुसार निवडक फोटोसहित अहवाल वरिष्ठ कार्यालयाला पाठवणे व तद्अनुषंगिक बैठकांना उपस्थित राहून जिल्ह्याचा आढावा देणे क्रमप्राप्त असते.

**उदाहरण :--**

शाळापूर्व तयारी अभियान पहिले पाऊल -

या विषयाचे राज्यस्तरीय प्रशिक्षण घेतल्यानंतर विभागस्तरावर ३८ CRC चे प्रशिक्षण घेतले यानंतर १२ URC मध्ये URC प्रमुख यांचेमार्फत URC निहाय प्रशिक्षणाचे आयोजन करून २५२ प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देण्यात आले यानंतर २५२ सुलभकामार्फत १४६ CRC मधील प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण घेऊन २४६१ मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक यांना प्रशिक्षित करून शालेय स्तरावर ३०४१ शिक्षकांना प्रशिक्षित केले यानंतर दोन टप्प्यात शाळापूर्व तयारी मेळाव्याचे यशस्वी आयोजन केले. ५४१५ शिक्षक, ९८३० पालक, १६५०९ विद्यार्थी, ४२१ लोक प्रतिनिधी, ४११७ अंगणवाडी सेविका १४४ मुख्य सेविका यांनी सहभागी होऊन शाळापूर्व तयारी अभियान यशस्वी केले. यानंतर या उपक्रमाची सर्व सांख्यिकीय माहिती व निवडक फोटोसहित अहवाल वरिष्ठ कार्यालयाला सादर केला गेला.

अशा प्रकारचे नियोजन आयोजन व संनियंत्रण प्रत्येक विषयाचे करून प्रत्येक विद्यार्थी व शिक्षक यांचेपर्यंत उपक्रम पोहचवणे या अनुषंगाने RAA कार्यालयातील मा. प्राचार्य, मा. व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी, मा. अधीक्षक, नोडल ऑफिसर, विषय साहाय्यक, विषय साधन व्यक्ती विशेष साधन व्यक्ती, IED समन्वयक, IED शिक्षक, व कार्यालयीन इतर कर्मचारी प्रयत्न करीत असतात ज्याचा परिणाम वरिष्ठ कार्यालयामार्फत आयोजित केलेल्या उपक्रमाचे प्रशिक्षणाचे संनियंत्रण गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते.

**समावेशित शिक्षण साधन व्यक्तींची भूमिका**

(१) समाज जागृती - दिव्यांग विद्यार्थी हक्क व त्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक वैद्यकीय सोयी-सवलतीच्या संदर्भात जनमानसात जागृती करण्याकरता पालक सभा वर्ग शिक्षकांना मुख्याध्यापक, शालेय समितींना माहिती देण्यात आलेली आहे. त्यांचा सक्रिय सहभाग घेतलेला आहे येणाऱ्या अध्ययन अध्यापनात अडचणी सोडवण्याकरिता मोबाईलवर ग्रुप तयार करून पालकांना वेळोवेळी मार्गदर्शन केलेले आहे.

(२) शाळेच्या वातावरणात समावेशित शिक्षण अंतर्गत विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग सवंगड्यांच्या मदतीने अध्ययन अध्यापनात सुलभीकरण करण्याकरता मदत.

(३) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांचे सक्षमीकरण करताना विद्यार्थ्यांना पालकांना शाळेत, शाळेच्या बाहेर येणाऱ्या अडचणींवर कशी मात करावी त्यात कुटुंब नातेवाईक थेरपीस वर्गशिक्षक समाज यांचा सक्रिय सहभाग कसा घ्यावा याचं मार्गदर्शन वेळोवेळी करण्यात आले आहे. शाळेत अडथळा विरहित वातावरण निर्मितीसाठी कार्य करण्यात आले आहे.

(४) वैयक्तिक शिक्षणात मार्गदर्शन करणे, वर्तणुकीच्या समस्या वर्गामध्ये घरामध्ये सोडवण्याचा प्रयत्न करणे.

**कामाची व्याप्ती**

(१) समाज जागृती शाळेत होणाऱ्या प्रत्येक उपक्रमातील दिव्यांगाचा सहभाग व त्यातून समाजाला अशा विद्यार्थ्यांच्या यशस्वी होता आले.

(२) यशोगाथा

(३) विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी दिव्यांग विद्यार्थ्यांचा शोध घेणे गरजेनुरूप साहित्य साधनांची मागणी व वाटप करणे . उदा. क्रचेस, कलीपर, wheelchair, tricycles इत्यादी रजिस्ट्रेशन करणे. दिव्यांगाचे प्रमाणपत्र प्राप्त करून देणे त्यांना लेखनिक, वाचन उपलब्ध करण्याकरता शाळेतून लेखनिक बँक तयार करणे. १६ ऑक्टोबर २०१८ शासन निर्णयामुळे एसएससी, एचएससी बोर्ड परीक्षेमध्ये विद्यार्थी मोठ्या प्रमाणात लाभ घेऊन यशस्वी झालेले आहेत. शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना नियमित शाळेत सहभागी केलेले आहे. शाळा प्रवेश उत्सव माध्यमातून साजरा करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांना मदतनीस भत्ता, प्रवास भत्ता, वाचनिक व लेखनिक भत्ता देण्यात आलेला आहे. संसाधन कक्ष निर्मितीसाठी प्रस्ताव पाठवलेला आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमकरिता इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना आय.टी.आय औद्योगिक प्रशिक्षण संस्था द्वारे विविध अभ्यासक्रमांची माहिती याची कार्यशाळा घेण्यात आली व या माध्यमातून दिव्यांग मुलांनी ITI मध्ये प्रवेश घेतलेला आहे. यशोगाथा वर्तमानपत्रात प्रसिद्धी व्हाट्सॲप च्या माध्यमातून पब्लिक अभ्यास गटांमध्ये सादर केलेले आहेत. त्यामुळे इतरांनाही त्याची प्रेरणा मिळते येणाऱ्या आव्हानावर उपाय शोधणे व ते प्रत्यक्ष कृतीत आणणे सुलभ झाले आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैलीनुसार अध्ययन, अध्यापन प्रक्रिया मूल्यमापन प्रक्रिया सुलभीकरण करणे असे शैक्षणिक साहित्य तयार केलेले आहेत अनुकूलित अभ्यासक्रमाची गरज ओळखून शिक्षक शिक्षकांना त्याची माहिती देऊन वर्गात राबविले जातात. अभ्यासक्रम अनुकूलनबाबत वर्ग शिक्षकांना अध्यापन तंत्राबद्दल समुपदेशन करण्यात आले. मूल्यमापन पद्धतीबद्दल अवलंब केलेला आहे. शाळेतील शिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यासंबंधी अध्यापन करताना येणाऱ्या आव्हानांवर उपाययोजना केलेले आहेत. सवंगड्यांचा सहभाग ठेवून दिव्यांग विद्यार्थी शाळेत कसा टिकून राहील यासाठी मदत घेतलेली आहे.

करोना कालावधीत आलेल्या अडचणी जसे आर्थिक अडचणी सेवांमध्ये खंड अशा आलेल्या आव्हानांमुळे होणारी गळती थांबवण्याकरता उपाययोजना केल्या आहेत.

यू डायस पोर्टलमध्ये शाळेनुसार दिव्यांगाची विद्यार्थ्यांची नोंद करण्यात आली आहे. नवीन विद्यार्थ्यांची नोंद दर्शविलेली आहे त्यांना कोणत्या सोयी-सवलती मिळतात याचा आढावा करिअर गायडन्स करता कार्यशाळा घेण्यात आलेली आहे. नवीन विद्यार्थ्यांची नोंद दर्शविण्यात आलेली आहे. वैयक्तिक शैक्षणिक आराखडे तयार केलेले आहेत.

३१ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईसाठी एकूण ३९ अधिकारी व कर्मचारी यांचा आकृतिबंध मंजूर करण्यात आला होता यापैकी मार्गदर्शन कार्यानुभव, विज्ञान विषय वगळता उर्वरित विभागाचे कामकाज बघण्यासाठी विषय साहाय्यकांची पदे रिक्त आहेत. विभागांचे सर्व कामकाज या हे मार्गदर्शन, कार्यानुभव व विज्ञान विषयाचे विषय साहाय्यक यांना वाटून देण्यात आले आहे.

**त्याचा तपशील खालीलप्रमाणे**

| पदनाम | गट | दिनांक ३१ जुलै २०१७ च्या शासन निर्णयानुसार पदसंख्या | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्राचार्य | अ | १ | १ | ० |
| वरिष्ठ अधिव्याखाता | अ | २ | २ | ० |
| प्राध्यापक | ब | १० | १० | ० |
| लेखाधिकारी | ब | ०१ | ०१ | ० |
| विषय साहाय्यक | क | १४ | ०३ | ०७ |
| अधीक्षक, सारासे | ब | ०१ | ०१ | ० |
| ग्रंथपाल | क | ०१ | ०१ | ० |
| वरिष्ठ लिपिक | क | ०१ | ०१ | ० |
| कनिष्ठ लिपिक | क | ०२ | ०२ | ० |
| वर्ग - ४ शिपाई | ड | ०६ | ०६ | ०१ |
| **एकूण सर्व** | | **३९** | **२८** | **०८** |

स्वतःच्या विभागाचे कामकाज सांभाळून इतर विभागाचा कार्यभार सांभाळताना विषय साहाय्यकांकडून अपेक्षित असलेल्या प्रभावी कामकाजावर मर्यादा येत आहेत. आकृतिबंधाप्रमाणे सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद उपलब्ध करून दिल्यास प्रादेशिक विद्या प्राधिकरणाकडून शैक्षणिक गुणवत्ता व सक्षमीकरणाचे काम अधिक गतीमान होईल.

---

**प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई.**


**सन २०२३-२४ कार्ययोजना व अंदाजपत्रक**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव / तपशील | लाभार्थी संख्या | अनुदान /विना अनुदान | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | एक भारत श्रेष्ठ भारत | ३५०० | -- | -- |
| २. | आझादी का अमृत महोत्सव | ३५०० | -- | -- |
| ३. | कला महोत्सव | ६४ | २२००० | ५ दिवस |
| ४. | भूमिका अभिनय लोकनृत्त स्पर्धा | ४० | ३८५६५ | ८ दिवस |
| ५. | अमराठी शाळांसाठी प्रशिक्षण | ४६ | ९२००० | २ दिवस |
| ६. | योगा ऑलिम्पियाड़ | ९५ | -- | २ दिवस |
| ७. | राज्य अध्ययन संपादणूक चाचणी | ४४१७ | १४३०६२ | ८ दिवस |
| ८. | Post NAS Workshop | २०० | २०००० | १९ दिवस |
| ९. | राष्ट्रीय अविष्कार अभियान २०२२-२३ उपक्रम- | | | |
| | १. विज्ञान जत्रा - | ३६४ | ५०००० | १५ दिवस |
| | २. अभ्यास सहल- | ५४ | २५००० | |
| | ३. प्रश्न मंजूषा - | ७५ | २५००० | |
| | ४. प्राथमिक विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण - | १९० | ७५००० | |
| | ५. माध्यमिक विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण - | २१५ | ७५००० | |
| १०. | BRC/CRC सक्षमीकरण- | ७० | -- | ४५ दिवस |
| ११. | मुख्याध्यापक सक्षमीकरण- | ७४३ | -- | ४५ दिवस |
| १२. | निष्ठा - ४.० | ४२०० | -- | ६० दिवस |

**सन २०२३-२४ कार्ययोजना व अंदाजपत्रक--*चालू***

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव / तपशील | लाभार्थी संख्या | अनुदान /विना अनुदान | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १३. | अंगणवाडी सेविका ऑनलाईन प्रशिक्षण- | १७७ | -- | ६० दिवस |
| १४. | विद्या प्रवेश - | ३५०० | -- | ९० दिवस |
| १५. | विद्यांजली - | ३५०० | -- | ३० दिवस |
| १६. | शाळा पूर्व अभियान - | पालक - ६१, ५२<br>शाळा -८५० | २००००० | ६० दिवस |
| १७. | बालरक्षक प्रशिक्षण - | ३६ | ५१६२० | ३ दिवस |
| १८. | P.L.C. | १४० | १४०००० | ३ दिवस |
| १९. | बॅड कॉम्पिटिशन- | १२६ | ९०० | १५ दिवस |
| २०. | नवोपक्रम - | ३८ | २०१००० | ४ दिवस |
| २१. | (अ) व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग- | | | |
| | (१) इयत्ता १० वी व १२वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या | ११०<br>११० | | |
| | वेबिनारची संख्या- | २२३ | १०००० | ८ दिवस |
| | (२) समाविष्ट शाळा संख्या- | १६५४० | | |
| | (३) समाविष्ट शिक्षक संख्या- | ५११५ | | |
| | (४) समाविष्ट विद्यार्थी संख्या- | | | |
| | (५) समाविष्ट पालक संख्या- | | | |
| | (ब) मानसशास्त्रीय कसोटीद्वारे इ. १०वी व १२वी च्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन व समुपदेशन विद्यार्थी- | २४८<br>४४२ | १०००० | ३० दिवस |
| | पालक- | ६५२ | | |
| | कसोटी विरहित मार्गदर्शन प्रत्यक्ष कार्यालयात आलेले विद्यार्थी- | | | |


## शिक्षण संचालनालय (योजना) -- संरचना




गट - अ ते गट - ड
एकूण मंजूर पदे ७१

एकूण मंजूर पदे २२
(प्रपोनि)

## शिक्षणाधिकारी (योजना) -- संरचना




एकूण मंजूर पदे १०

## १. योजनेचे नाव : नव भारत साक्षरता कार्यक्रम

(१) योजना : नव भारत साक्षरता कार्यक्रम

(२) लेखाशीर्ष :

: (१) मागणी क्रमांक टी-०५-२२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०४-प्रौढ शिक्षण, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०६) नव भारत साक्षरता कार्यक्रम (राज्य हिस्सा ४०%) (२२०२ K ७५८).

(२) मागणी क्रमांक टी-०५-२२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०४-प्रौढ शिक्षण, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०४) नव भारत साक्षरता कार्यक्रम (केंद्र हिस्सा ६०%) (२२०२ K ७४९).

(१) मागणी क्रमांक एन-०३-२२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०४-प्रौढ शिक्षण, ७८९-अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना, (०१) अनुसूचित जाती उपयोजना (०१) (०२) नव भारत साक्षरता कार्यक्रम (राज्य हिस्सा ४०%) (२२०२ K ७३१).

(२) मागणी क्रमांक एन-०३-२२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०४-प्रौढ शिक्षण, ७८९-अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना, (०१) अनुसूचित जाती उपयोजना (०१)(०२) नव भारत साक्षरता कार्यक्रम (केंद्र हिस्सा ६०%) (२२०२K७२२)

(१) मागणी क्रमांक ई-२-२२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०४-प्रौढ शिक्षण, २००- इतर प्रौढ शिक्षण कार्यक्रम, (००) (०७) नव भारत साक्षरता कार्यक्रम (राज्य हिस्सा ४०%) (२२०२ J३२१).

(२) मागणी क्रमांक ई-२-२२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०४-प्रौढ शिक्षण, २००- इतर प्रौढ शिक्षण कार्यक्रम, (००)(०८) नव भारत साक्षरता कार्यक्रम (केंद्र हिस्सा ६०%) (२२०२ J३३२).

प्रस्तावना : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील शिफारशी आणि UNESCO चे शाश्वत विकास ध्येये (SDG) लक्षात घेता केंद्र शासनाने सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीसाठी रुपये १०३७.९० कोटी ( केंद्रीय हिस्सा रुपये ७००.०० कोटी आणि राज्य हिस्सा ३३७.९० कोटी) इतक्या खर्चाची (Outlay) “ नव भारत साक्षरता कार्यक्रम” या केंद्र पुरस्कृत योजनेस मंजुरी दिली आहे. केंद्र शासनाच्या सूचनांनुसार राज्यात सन २०२२-२३ ते सन २०२३-२७ या कालावधीत “नव भारत साक्षरता कार्यक्रम ” राबविण्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय / जिल्हास्तरीय / गटस्तरीय / शाळा स्तरावरील समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

योजनेची उद्दिष्टे : राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० च्या अनुषंगाने या योजनेची पाच व्यापक उद्दिष्टे आहेत :—

(१) देशातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटांतील निरक्षर व्यक्तींना पायाभूत साक्षरता व ससंख्यता (वाचन, लेखन आणि ससंख्यता) प्रदान करणे.

(२) देशातील १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटांतील शिकावू व्यक्तींना महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये प्रदान करणे. या कौशल्यांमध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरुकता, बाल संगोपन आणि शिक्षण, कुटुंबकल्याण, इत्यादी बाबींचा समावेश आहे.

(३) देशातील १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटांतील शिकावू व्यक्तींना मूलभूत शिक्षण देणे. यामध्ये पूर्वतयारी (इयत्ता तिसरी ते पाचवी), मध्य स्तर (इयत्ता सहावी ते आठवी) आणि माध्यमिक स्तर (इयत्ता नववी ते बारावी) समतुल्यता एनसीईआरटी / एससीईआरटीएस आणि NIOS / SIOS यांच्या सहकार्याने राबविण्यात येईल.

(४) स्थानिक रोजगार, पुन:कुशलता आणि उच्च कौशल्य प्राप्त करण्याच्या दृष्टिकोनातून प्रौढ नव-साक्षरांसाठी निरंतर शिकण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून देशातील १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटांतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये प्रदान करणे. त्याची अंमलबजावणी केंद्र आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावरील संबंधित मंत्रालये/विभागांच्या साहाय्याने केली जाईल.

(५) देशातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटांतील विद्यार्थ्यांना निरंतर शिक्षण देणे, ज्यामध्ये कला, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, क्रीडा, मनोरंजन, तसेच स्थानिकांना स्वारस्य असेलेले विषय यांचा समावेश असेल. उच्च शिक्षण विभाग आणि केंद्र आणि राज्य / केंद्रशासित प्रदेश स्तरावरील इतर संबंधित मंत्रालय / विभागांच्या साहाय्याने निरंतर शिक्षणावरील उत्तम प्रतीचे आणि प्रगत साहित्य उपलब्ध करून देणे.

योजनेचे कार्यक्षेत्र : ही योजना राज्ये / केंद्रशासित प्रदेशांतील सर्व जिल्ह्यांमधील ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत लागू केली जाईल. तथापि, राज्य सरकार / केंद्रशासित प्रदेश प्रशासन योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यांना / क्षेत्रांना प्राधान्य देईल. या योजनेत सर्व जिल्हे, उपजिल्हे, गट, शहर, ग्रामपंचायती, वॉर्ड आणि गावे समाविष्ट असू शकतात. थोडक्यात, १५ वर्षे वा त्यावरील वयोगटांतील निरक्षर असतील तेथे ही योजना लागू केली जाईल.

योजनेचे लक्ष्य : ५ कोटी निरक्षरांना पाच वर्षांत, म्हणजे २०२२-२७ मध्ये १ कोटी प्रतीवर्ष या दराने महत्त्वपूर्ण जीवन कौशल्यांसह मूलभूत साक्षरता आणि ससंख्यता प्रदान करण्याचे योजनेचे लक्ष्य आहे. मूलभूत शिक्षण घटकांतर्गत, प्रतीवर्ष १ लाख नव साक्षरांना त्यांची साक्षरता पातळी वाढवण्यासाठी आणि योजनेच्या कालावधीत त्यांना समकक्षता प्रदान करण्याचे लक्ष्य ठेवण्यात येईल.

निधी उपलब्धता व वितरण प्रक्रिया :

- उत्तर पूर्वेकडील राज्ये व हिमालयीन राज्ये वगळता अन्य सर्व राज्यांसाठी केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा यांचे प्रमाण ६०:४० असे राहील.
- निधी वितरण प्रक्रिया PFMS आणि राज्याच्या कोषागारांद्वारे करण्यात येईल.

केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या योजनेच्या दिशा निर्देशांनुसार (Road Map) सदर योजनेचे स्वरूप खालीप्रमाणे आहे :---

योजनेचा कालावधी : सदर योजना १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबविण्यात येईल. या योजनेसाठीचा कालावधी पाच वर्षे (६० महिने) आहे.

अंमलबजावणी धोरण : योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धती असेल :---

१. ही योजना स्वयंसेवकांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. या योजनेत साहाय्य करणारे/ सहभागी असलेले स्वयंसेवक खऱ्या अर्थाने "स्वयंसेवक" असतील आणि त्यांना योजनेअंतर्गत त्यांच्या सेवांसाठी कोणतेही वेतन / मासिक मानधन दिले जाणार नाही.

२. स्वयंसेवक इयत्ता पाचवी आणि त्यावरील शालेय विद्यार्थी असतील जे त्यांच्या स्वत:च्या कुटुंबातील अशिक्षित सदस्यांना शिक्षित होण्यासाठी मदत करतील. ज्या शालेय विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील कोणीही निरक्षर नाही त्यांनासुद्धा प्रोत्साहन दिले जाईल. NCTE अंतर्गत TEIs (M.Ed./ B.Ed. D.EL.Ed./B.T.C/J.B.Tetc. अभ्यासक्रम) मधील सेवापूर्व विद्यार्थी दरवर्षी ३-४ निरक्षरांना शिकवतील, ज्यासाठी आराखडा (क्रेडिट फ्रेमवर्क) तयार केला जाईल. समाजातील विविध घटक जसे की, उच्च शिक्षण संस्था (HEIs), NYKS, NSS, NCC, इ., CSOs चे स्वयंसेवक. समुदाय, गृहिणी, अंगणवाडी सेविका, शिक्षक, पंचायत राज संस्था आणि इतर संस्थांनाही प्रोत्साहन दिले जाईल. स्वयंसेवकांची ओळख पटवण्यासाठी विद्यांजली प्लॅटफॉर्मचाही वापर केला जाईल.

३. ही योजना ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, दिशानिदेशन (orientation), कार्यशाळा प्रत्यक्षपणे (face-to-face mode) आयोजित केल्या जाऊ शकतील. सर्व साहित्य आणि संसाधने नोंदणीकृत स्वयंसेवकांना डिजिटल पद्धतीने सहज उपलब्ध असलेल्या डिजिटल मोड, उदा. टीव्ही, रेडिओ, सेल फोन-आधारित मोफत / ओपन सोर्स ॲप्स/पोर्टल इ. द्वारे प्रदान केली जातील. विद्यमान ICT आणि शाळा आणि उच्च शिक्षण संस्थांमधील इतर पायाभूत सुविधा, कॉमन सर्व्हिस सेंटर्स (सीएससी), कम्युनिटी सेंटर्स, इत्यादींचा वापर केला जाईल.

४. नव भारत साक्षरता कार्यक्रम २०२२-२७ अंतर्गत, UDISE अंतर्गत नोंदणीकृत सुमारे ७ लाख शाळांमधील ३ कोटी विद्यार्थ्यांसह शासकीय, अनुदानित आणि खाजगी शाळांमधील सुमारे ५० लाख शिक्षक तसेच शिक्षक प्रशिक्षण संस्था व उच्च शिक्षण संस्थांमधील सुमारे २० लाख

विद्यार्थी यांचा सक्रिय सहभाग असेल. पंचायत राज संस्था, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या आणि अंदाजे ५० लाख NYKS, NSS आणि NCC स्वयंसेवकदेखील सहभागी होतील. योजनेमध्ये समुदाय सहभाग असेल, विद्यांजली पोर्टलच्या माध्यमातून लोकहितकारी / CSR संस्थांचा ऐच्छिक सहभाग असेल. योजनेसाठी फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, व्हॉट्सअॅप, यूट्यूब, टीव्ही चॅनेल, रेडिओ इ. सारख्या सामाजिक माध्यमांसह सर्व प्रकारची माध्यमे-इलेक्ट्रॉनिक, प्रिंट, लोककथा इ. चा वापर केला जाईल.

५. योजनेच्या अंमलबजावणीसाठी शाळा हे एकक असेल.

६. योजनेंतर्गत लाभार्थी आणि स्वयंसेवी शिक्षक यांचे सर्वेक्षण राज्य / केंद्रशासित प्रदेशांच्या शाळांद्वारे मोबाइल अॅप / सर्वेक्षण अॅपद्वारे ऑनलाइन पद्धतीने केले जाईल.

७. कोणताही निरक्षर OTLAS द्वारे कोणत्याही ठिकाणी थेट नोंदणी करून योजनेचा लाभ मिळू शकतो आणि कोणताही स्वयंसेवी शिक्षक ऑनलाइन साक्षरता वर्ग किंवा प्रत्यक्ष एकास एक या सूत्रानुसार निरक्षरांना शिकवण्यासाठी आपली सेवा देऊ शकतो.

८. महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये आणि Online Teaching Learning and Assessment System (OTLAS ) च्या माध्यमातून १५ वर्षे व त्यावरील वयोगटांतील सर्व निरसाक्षरांसाठी पायाभूत साक्षरता आणि ससंख्यता प्रदान करण्यात येईल.

९. योजनेच्या सुरळीत आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी, विविध मंत्रालये आणि विभागांसोबत सुसूत्रता साधण्यात येईल.

१०. ही योजना तंत्रज्ञानावर आधारित असेल आणि प्रामुख्याने ऑनलाइन पद्धतीने लागू केली जाईल. विविध प्रकारच्या डिजिटल माध्यमांद्वारे जसे की, टीव्ही, रेडिओ, सेल फोन आधारित मोफत / ओपन सोर्स अॅप्स / पोर्टल्स इ. द्वारे अभ्याक्रम / पाठ्यक्रम (content) डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येईल.

११. राष्ट्रीयस्तरावर NCERT मध्ये एक समर्पित घटक संस्था नॅशनल सेंटर फॉर लिटरसी (NCL) आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावरील SCERTs मध्ये राज्य साक्षरता केंद्र (SCL) निर्माण केले जाईल.

१२. वेगवेगळ्या वयोगटांतील लोकांसाठी वेगवेगळी कार्यपद्धती अवलंबिण्यात येणार आहे. राज्ये/ केंद्रशासित प्रदेशांना नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यासाठी लवचिकता प्रदान केली जाईल. प्रौढ शिक्षणाच्या संधींचाही मोठ्या प्रमाणावर प्रचार केला जाईल.

१३. योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आउटकम-आउटपुट मॉनिटरिंग फ्रेमवर्क (OOME) आणि ऑनलाइन MIS असेल. ऑनलाइन पद्धतीने राष्ट्रीय, राज्य, जिल्हा आणि शाळास्तरावर प्रगतीचे निरीक्षण केले जाईल. शाळानिहाय नोंदणीकृत निरसाक्षरांच्या संख्येवर प्रगतीचे निरीक्षण केले जाईल.

१४. NIC द्वारे योजनेचे केंद्रीय पोर्टल विकसित केले जाईल ज्याद्वारे सुसज्ज एकत्रित माहिती (Data) जमा करण्यात येईल.

१५. बदलत्या परिस्थितीनुसार योजनेच्या सुधारणेसाठी आणि प्रगतीसाठी योग्य वाटल्यास योजनेच्या अंमलबजावणीमध्ये बदल करण्याच्या अनुषंगाने केंद्रीय शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या पूर्व परवानगीने, योग्य ती कारवाई करू शकते. यामध्ये राष्ट्रीय स्तरावर किंवा / राज्य / केंद्रशासित प्रदेशांच्या स्तरावरील बदलांचा समावेश असू शकतो. तथापि, कोणत्याही आर्थिक पुनर्रचनेबाबतचा बदल केंद्रीय व्यय विभागाच्या पूर्व मान्यतेने करता येईल.

योजनेची सद्य:स्थिती : नवभारत साक्षरता कार्यक्रम (New India Literacy Programs ) अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने शाळा हे एकक (Unit) निश्चित केले असल्याने शाळेचे मुख्याध्यापक व शालेय व्यवस्थापन समिती यांच्यावर शाळास्तरावरील जबाबदारी देण्यात आली आहे. सर्व शिक्षक संघटनांनी सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सर्वेक्षण व प्रशिक्षणावर सुर्वानुमते बहिष्कार टाकला असल्यामुळे नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी येत आहेत.

---

## १. योजनेचे नाव : साक्षर भारत कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| (१) | योजना : साक्षर भारत योजना | |
| (२) | लेखाशीर्ष : | |
| | : | मागणी क्रमांक टी-५,२२०२-- सर्वसाधारण शिक्षण, ०४-प्रौढ शिक्षण, ७९६ जाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (०१) साक्षर भारत योजना (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२२०२/६९३) ३१ सहायक अनुदान. |
| | : | मागणी क्रमांक टी-५,२२०२-- सर्वसाधारण शिक्षण, ०४-प्रौढ शिक्षण, ७९६ जाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (०१) साक्षर भारत योजना (राज्य हिस्सा ४० टक्के) (२२०२-७०१) ३१ सहायक अनुदान. |
| (३) | योजनेचे स्वरूप : | साक्षर भारत योजना महाराष्ट्रात २००९ च्या जनगणनेनुसार ज्या जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण ५० टक्केपेक्षा कमी अशा महाराष्ट्र राज्यातील १० जिल्ह्यांचा समावेश या योजनेअंतर्गत करण्यात आला आहे. ही योजना राज्य, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत या चार स्तरावरून राबविण्यात आली. |
| (४) | उद्दिष्टे : | १. निरक्षरांना कार्यात्मक साक्षरता व मूलभूत सांख्यिकी क्रियाबाबतची क्षमता प्राप्त करून देणे.<br>२. नवसाक्षरांना मूलभूत साक्षरतेच्या पलीकडे शिकण्यास प्रवृत्त करणे आणि समकक्षता कार्यक्रमामार्फत औपचारिक शिक्षण प्राप्त करण्याची संधी मिळवून देणे.<br>३. निरक्षर व नवसाक्षरामध्ये त्यांच्या दैनंदिन जीवनाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कौशल्य विकास करणे.<br>४. नवसाक्षरांना निरंतर शिक्षणाची संधी उपलब्ध करून साक्षर समाज निर्माण करणे. |
| (५) | योजनेची व्याप्ती : | साक्षर भारत कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्रातील खालील दहा जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. लातूर, उस्मानाबाद, बीड, हिंगोली, नांदेड, गडचिरोली, परभणी, नंदुरबार, जालना, गोंदिया. |
| (६) | लाभार्थी निकष : | १. १५ वर्षांपेक्षा अधिक वयातील सर्व निरक्षर<br>२. महिला साक्षरतेवर भर देणे<br>३. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अल्पसंख्याक इत्यादी वंचित घटक यांना प्राधान्य देण्यात येईल.<br>४. किशोरवयीन मुलां-मुलींमध्ये जबाबदार पालकत्त्वाची जाणीव होण्यासाठी प्रयत्न करणे<br>५. ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये सन २००१ च्या जनगणनेनुसार ज्या जिल्ह्याचे स्त्री साक्षरतेचे प्रमाण ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी आहे. असे जिल्हे नक्षलवादाने प्रभावित झालेले जिल्हे म्हणून समाविष्ट करण्यात आलेले आहेत. |
| (७) | आर्थिक सूत्र : | साक्षर भारत योजना राबविण्यासाठी संभाव्य खर्चाचा भार केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामध्ये ७५:२५ असा होता. सन २०१६-१७ पासून तो ६० : ४० असा करण्यात आला आहे. साक्षर भारत कार्यक्रमात लोकशिक्षण केंद्राची स्थापना करणे, मूलभूत साक्षरता, पायाभूत कुटुंब सर्वेक्षण आणि वातावरण निर्मिती, व्यवस्थापन संनियंत्रण व मूल्यमापन इत्यादी बाबींसाठी खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे. |

**टीप :** साक्षर भारत योजना माहे मार्च २०१८ अखेरपर्यंतच कार्यान्वित होती. सद्य:स्थितीत सदर योजना सुरू नाही. साक्षर भारत योजना कार्यक्रमांतर्गत अनुदानाची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| लेखाशीर्ष प्रकार | | लेखाशीर्ष निहाय अनुदान | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | राज्य हिस्सा (४० टक्के) | केंद्र हिस्सा (६० टक्के) | साक्षर भारत योजना माहे मार्च २०१८ अखेरपर्यंतच कार्यान्वित होती. सद्य:स्थितीत सदर योजना सुरू नाही. राज्यातील १० जिल्ह्यांमधील प्रेरक व समन्वयक यांचे प्रलंबित मानधन (केंद्र हिस्सा - रुपये ३३,००,३९,०००/- व राज्य हिस्सा रुपये २२,००,२६,०००) असे एकूण रुपये ५५,००,६५,०००/- इतके आहे. |
| आदिवासी घटक | लेखाशीर्ष (२२०२ I ७०१) | लेखाशीर्ष (२००२ I ६९३) | |

## अल्पसंख्याक योजना

संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अल्पसंख्याकाशी संबंधित कार्यभार शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक एसएओ-१००९/प्र.क्र. २८९/प्रशा-२/ मुंबई-४०० ०३२, दिनांक १३ ऑगस्ट २००९ अन्वये देण्यात आला होता. अल्पसंख्याकविषयक सर्वबाबी संचालक (अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण), संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेमार्फत राबविण्यात येत होत्या. परंतु शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई क्र. आढावा २०२२/प्र.क्र.४७/प्रशा-५, दि. २२ जून २०२२ अन्वये संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे या संचालनालयाचे नामांतर शिक्षण संचालनालय (योजना) असे करण्यात आलेले असून सद्य:स्थितीत अल्पसंख्याकविषयक सर्व योजना शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे.

### अल्पसंख्याक कार्यालय मंत्रालय, नवी दिल्ली व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई अंतर्गत अल्पसंख्याकाकरिता राज्यामध्ये शिक्षण संचालनालय (योजना ) पुणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रपुरस्कृत योजना

(अ) योजनेचे नाव : **अल्पसंख्यांक समाजाच्या संस्था/शाळांसाठी पायाभूत विकास योजना ( IDMI-Scheme for Infrastructure Development of Minority Institutions/Schools)**
(१०० टक्के केंद्रपुरस्कृत योजना ).

(१) शासन निर्णय : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई क्र. आयडीएम-२००८/(३७८/०८)/असंक, दिनांक १० फेब्रुवारी २००९.

(२) लाभार्थी : अल्पसंख्यांक समाजाच्या स्वयंसेवी संस्थाद्वारे संचलित अनुदानित / विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा.

(३) अर्थसाहाय्य : शाळांच्या पायाभूत सुविधा विकासाकरिता खालील प्रयोजनासाठी एकूण खर्चाच्या ७५ टक्के इतकी, तथापि जास्तीत जास्त रुपये ५० लक्ष इतकी मर्यादित रक्कम उपलब्ध करून देण्यात येईल.

(१) अस्तित्त्वात असलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकरिता शैक्षणिक पायाभूत सुविधा, भौतिक सुविधांमध्ये वाढ करण्याकरिता, अतिरिक्त वर्गखोल्या, विज्ञान प्रयोगशाळा / संगणक कक्ष, वाचनालय खोल्या, प्रसाधनगृहे, पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादींचे बांधकाम.

(२) अल्पसंख्याक समाजाच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांसाठी विशेषत: मुलींसाठी वसतिगृह इमारतींचे बांधकाम.

(३) उपरोक्त १ व २ मध्ये अंतर्भूत नसलेल्या इतर शैक्षणिक पायाभूत सुविधा.

(४) संस्था/शाळेला केंद्रशासनाकडून मंजूर एकूण अनुदानाच्या रकमेच्या २५ टक्के रक्कम (संस्थेचा हिस्सा ) संस्था / शाळेस प्राप्त होणाऱ्या पहिला हप्ता अनुदानासोबत खर्च करणे बंधनकारक राहिल.

(५) संस्था / शाळेस पहिला हप्ता अनुदान प्राप्त झाल्यानंतर एक वर्षाच्या आत उपयोगिता प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक असेल. तद्नंतर शासनाकडून दुसरा हप्ता अनुदान उपलब्ध करून दिले जाईल.

(४) उद्दिष्ट्ये : (१) अल्पसंख्याक समाजाच्या-स्वयंसेवी संस्थेद्वारे संचलित अनुदानित / विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकरिता पायाभूत सुविधा देणे.

(२) अत्यंत दुर्लक्षित व शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या अल्पसंख्याक समाजातील मुलांच्या विशेष गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने या योजनेद्वारे शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे.

(३) सदर योजनेंतर्गत २० टक्क्यांपेक्षा जास्त अल्पसंख्याक लोकसंख्या असलेल्या जिल्हा, शहर व तालुक्यातील खाजगी अनुदानित/विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना प्राधान्य देणे.

(५) पात्रता व अटी : (१) शाळा चालविणाऱ्या केंद्र/राज्य शासन मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था/सोसायटी/विश्वस्त संस्था या योजनेच्या अर्थसाहाय्यासाठी अर्ज करू शकतात.

(२) ज्या शाळेसाठी अर्थसाहाय्याची मागणी करण्यात आली आहे, ती शाळा/संस्था किमान तीन वर्षांपासून कार्यरत असणे आवश्यक आहे. तसेच संस्थेची सुयोग्य घटना अथवा आर्टिकल ऑफ असोशिएशन असणे आवश्यक आहे.

(३) नियमानुसार आवश्यक अल्पसंख्याक समाजाच्या मुलांचा हजेरीपट असणे आवश्यक असून सदर संस्था/शाळा भरमसाठ/जादा शुल्क आकारणारी धंदेवाईक स्वरुपाची असता कामा नये.

(४) शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद यांनी पडताळणी/तपासणी केलेल्या (District Scrutiny Committee Level) प्रस्तावांची तसेच संचालनालय स्तरावर पडताळणी/तपासणी केलेल्या प्रस्तावांपैकी निकषानुसार पात्र ठरणाऱ्या संस्था/शाळांचे प्रस्ताव राज्य अनुदान समितीमार्फत केंद्रीय अनुदान समितीस अनुदान मंजुरीस्तव सादर करण्यात येईल.

(५) लाभार्थी संस्था/शाळेने लेखापरीक्षण केलेला खर्चाचा तपशील विहित नमुन्यामध्ये चार्टर्ड अकौटंट/ सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित सादर करणे आवश्यक राहील तसेच सर्व हिशोब/रेकॉर्डस केंद्र/राज्य शासनास अथवा नियंत्रक अथवा महालेखापाल यांच्या तपासणीसाठी उपलब्ध ठेवावे लागेल.

(६) सद्य:स्थिती : सदर योजनेअंतर्गत सन २०१६-१७ या वर्षामध्ये प्रस्ताव सादर करण्यासाठी वर्तमानपत्रांत दिनांक ८ एप्रिल २०१६ रोजी जाहिरात देण्यात आली होती. सदर जाहिरातींच्या अनुषंगाने संचालनालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून पात्र प्रस्ताव व सन २०१५-१६ मधील त्रुटी पूर्ण केलेले पात्र १७७ प्रस्ताव आणि दिनांक ६ मार्च २०१७ च्या बैठकीमध्ये मंजूर ४८ असे एकूण २२५ प्रस्ताव राज्य अनुदान समितीच्या मान्यतेने केंद्रीय अनुदान समिती (एम.एच.आर.डी. न्यू दिल्ली) यांचेकडे मंजुरीस्तव पाठविण्यात आले होते. त्यापैकी १५ प्रस्तावांना तत्त्वत: मान्यता देण्यात आलेली होती. त्यापैकी १४ प्रस्तावांचे पहिल्या हप्त्याचे अनुदान सन २०१७-१८ मध्ये संबंधित संस्था/ शाळा यांना वितरण करणेस्तव शिक्षणाधिकारी (निरंतर) यांना वितरण करण्यात आले. दि. २८ नोव्हेंबर २०१७ रोजी समिती कक्ष, दालन क्र. ४२१, ४ था मजला, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पार पडलेल्या राज्य अनुदान समितीच्या १५ व्या बैठकीमध्ये IDMI योजनेंतर्गत १२ प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव केंद्रीय अनुदान समिती (MHRD), नवी दिल्ली यांना पाठविण्यात आले आहेत. सन २०१९-२० मध्ये दुसरा हप्ता अनुदानासाठी ५१ त्रुटी पूर्तता प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आले त्यापैकी सन २०२१-२२ मध्ये १० संस्था / शाळांना अनुदान मंजूर होऊन वितरित करण्यात आले. सन २०२१-२२ मध्ये प्रथम हप्ता अनुदानासाठी ०७ संस्था/ शाळांचे प्रस्ताव व दुसरा हप्ता अनुदानासाठी ०४ संस्था/शाळांचे प्रस्ताव केंद्रशासनास अनुदान मंजुरीस्तव सादर करण्यात आलेले आहेत.

(७) योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी :

१. संस्था व्यवस्थापनातील वाद.
२. प्रस्तावित मागणीपेक्षा कमी अनुदान प्राप्त होणे.
३. संस्था तक्रारी/कोर्ट केस इ.
४. निधी प्राप्त होण्यास लागणारा विलंब.
५. संस्थांकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त होण्यास लागणारा विलंब.
६. प्रस्ताव सादरीकरणास संस्थेमार्फत होणाऱ्या त्रुटी.

(८) अधिनस्त : मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.

## वर्षनिहाय स्थिती

## अल्पसंख्याक समाजातील शाळा/संस्थांसाठी पायाभूत विकास योजना (IDMI)

| सन | तपशील | प्राप्त निधी | वितरित निधी | लाभार्थी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २०१९-२० | दुसरा हप्ता अनुदानासाठी ५१ संस्था/शाळांची त्रुटी पूर्तता प्रस्ताव अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात आले आहे. | -- | -- | -- | अनुदान अप्राप्त |
| २०२०-२१ | -- | -- | -- | -- | अनुदान अप्राप्त |
| २०२१-२२ | प्रथम हप्ता अनुदानासाठी ७ संस्था/शाळांचे प्रस्ताव व दुसरा हप्ता अनुदानासाठी ४ संस्था/शाळांचे प्रस्ताव केंद्रशासनास सादर करण्यात आले आहेत. | -- | -- | -- | दुसरा हप्ता अनुदानासाठी केंद्र शासनास पाठविलेल्या ५१ संस्था / शाळांची त्रुटी पूर्तता प्रस्तावांपैकी १० संस्था/शाळांना अनुदान मंजूर होऊन वितरित करण्यात आले. |
| २०२२-२३ | -- | -- | -- | -- | अनुदान अप्राप्त |
| २०२३-२४ | -- | -- | -- | -- | अनुदान अप्राप्त |
| २०२४-२५ | -- | -- | -- | -- | सन २०२३-२४ या वर्षासाठी सदर IDMI योजनांतर्गत रुपये २० कोटी रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. |

(ब) योजनेचे नाव : **मदरसांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे योजना ( SPQEM-Scheme Providing Quality Education to Madarsas ) (१०० टक्के केंद्रपुरस्कृत योजना.)**

(१) शासन निर्णय : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक मदर-२००८/(३४८/०८) असंक, दिनांक १० फेब्रुवारी २००९.

(२) लाभार्थी : ज्या मदरसांची नोंदणी केंद्र अथवा राज्य अधिनियमानुसार अथवा वक्फ किंवा मदरसा बोर्डाकडे झालेली आहे, अशा सर्व मदरसा.

(३) अर्थसाहाय्य :

**(१) शिक्षक मानधन** - पूर्णवेळ पदवीधर शिक्षकास रुपये ६,००० प्रतिमाह व पदव्युत्तर पदवीधारक/ बी.एड. शैक्षणिक अर्हता असलेल्या शिक्षकास रुपये १२,००० प्रतिमाह वेतन अनुज्ञेय राहील. मदरसांमधून आधुनिक विषय शिकविण्याकरिता कमीत कमी १० विद्यार्थ्यांमागे ०१ शिक्षक नियुक्त करण्यात येईल.

**(२) ग्रंथालय व बुक बँक** - सुविधा पुरविणे - प्राथमिक/माध्यमिक स्तरावर अध्ययन-अध्यापनाचे साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी एकदाच रुपये ५०,००० अनुदान व प्रतिवर्षी रुपये ५,००० अनुदान या कामी मिळेल.

**(३) सायन्स/मॅथेमॅटिक किट्स व अध्यापनविषयक साहित्य** - या कामी रुपये १५,००० पर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

**(४) सायन्स लॅब/काम्प्युटर लॅब/वर्कशॉपसाठी अनुदान** - माध्यमिक/उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी असलेल्या मदरसाकरिता रुपये १ लाखांपर्यंत अनुदान मिळेल व त्यांच्या देखभालीसाठी/ कंझ्युमेबल खरेदीसाठी प्रतिवर्षी रुपये ५,००० इतके अनुदान दिले जाईल.

(५) **शिक्षक प्रशिक्षण** - माध्यमिक दर्जाच्या विद्यार्थ्यांकरिता आधुनिक विषय शिकविण्याकरिता नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांना किमान १५ दिवसांकरिता प्रशिक्षण देण्यासाठी एस.सी.ई. आर.टी./डी.आय.ई.टी./एस.आर.एल.एस. मार्फत प्रशिक्षण आयोजित करण्यात येतील व त्यासाठी प्रशिक्षण संस्थेस प्रतिदिन रु.१००/- याप्रमाणे प्रतिशिक्षक वाहतूक/आहार भत्यासाठी अनुदान मंजूर करण्यात येईल.

(६) राज्य मदरसा बोर्डाकरिता रुपये ५ लक्ष इतके प्रतिवर्षी अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

(४) उद्दिष्टे : (१) मदरसांमधील पारंपरिक शिक्षणाबरोबर शास्त्र, गणित, समाजशास्त्र, हिंदी व इंग्रजी हे आधुनिक विषय शिकविणे.

(२) मदरसांतील विद्यार्थांना पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांप्रमाणे (नियमित शाळांतील) शैक्षणिक गुणवत्ता/योग्यता प्राप्त होईल, मदरसांच्या विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेण्यासाठी संधी उपलब्ध होईल तसेच नोकरीच्या अधिक चांगल्या संधी उपलब्ध होतील या कामी प्रयत्न करणे.

(५) पात्रता व अटी : (१) मदरसांची नोंदणी किमान ३ वर्षांपूर्वी केंद्र अथवा राज्याच्या अधिनियमानुसार वक्फ किंवा मदरसा बोर्डाकडे झालेली आहे.

(२) शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद यांनी पडताळणी/तपासणी केलेल्या (District Serutiny Committee Level) प्रस्तावांची तसेच संचालनालय स्तरावर पडताळणी/तपासणी केलेल्या प्रस्तावांपैकी निकषानुसार पात्र ठरणाऱ्या संस्था/शाळांचे प्रस्ताव राज्य अनुदान समितीमार्फत केंद्रीय अनुदान समितीस अनुदान मंजुरीस्तव सादर करण्यात येईल.

(३) लाभार्थी संस्था/शाळेने लेखा परीक्षण केलेल्या खर्चाचा तपशील विहित नमुन्यामध्ये चार्टर्ड अकौंटंट सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित सादर करणे आवश्यक राहील. तसेच सर्व हिशोब/रेकॉर्डस हे केंद्र/राज्य शासनास अथवा नियंत्रक अथवा महालेखापाल यांच्या तपासणीसाठी उपलब्ध ठेवावे लागेल.

(६) सद्य:स्थिती : सदर योजनेअंतर्गत सन २०१६-१७ या वर्षामध्ये प्रस्ताव सादर करण्यासाठी वर्तमानपत्रांत दिनांक ४ एप्रिल २०१६ रोजी जाहिरात देण्यात आली होती. सदर जाहिरातींच्या अनुषंगाने संचालनालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून पात्र प्रस्ताव व सन २०१५-१६ मधील त्रुटी पूर्ण केलेले पात्र प्रस्ताव असे एकूण १२८ प्रस्ताव आणि सन २०१६-१७ मधील १६ प्रस्ताव असे एकूण १४४ प्रस्ताव राज्य अनुदान समितीच्या मान्यतेने केंद्रीय अनुदान समिती ( एम.एच.आर.डी. नवी दिल्ली ) यांचेकडे मंजुरीस्तव पाठविण्यात आले आहे. दिनांक २८-११-२०१७ रोजी शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पार पडलेल्या राज्य अनुदान समितीच्या १५ व्या बैठकीमध्ये SPEMM योजनेंतर्गत २३ प्रस्तावांना मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव केंद्रीय अनुदान समिती (एम.एच.आर.डी., नवी दिल्ली) यांना पाठविण्यात आले आहे.

(७) विशेष : मदरसांनी NIOS शी संलग्न असण्याची अट केंद्र शासनाचे पत्र दिनांक १६-०२-२००९ व राज्य शासनाचे पत्र दिनांक ०७-०४-२०१० अन्वये शिथिल करण्यात आलेली आहे.

(८) योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी :

१. अर्धवेळ मदरसा.

२. अभिलेख उपलब्ध नसणे.

३. योजनेबाबत अनास्था.

४. निधी प्राप्त होण्यास लागणारा विलंब.

५. मदरसांकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त होण्यास लागणारा विलंब.

६. प्रस्ताव सादरीकरणास संस्थांमार्फत होणाऱ्या त्रुटी.

७. मदरसामधील विद्यार्थी हे नियमित शाळेतील विद्यार्थी.

(९) अधिनस्त : मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.

**वर्षनिहाय स्थिती**

**मुद्दा क्रमांक ५ (ब)**

**मदरसांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची योजना (SPQEM)**

| सन | केंद्रीय अनुदान समितीने मंजूर केलेला निधी व बैठक दिनांक | प्राप्त निधी | वितरित निधी | लाभार्थी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २०२०-२१ | -- | -- | -- | -- | अनुदान अप्राप्त |
| २०२१-२२ | -- | -- | -- | -- | अनुदान अप्राप्त |
| २०२२-२३ | -- | -- | -- | -- | अनुदान अप्राप्त |
| २०२३-२४ | -- | -- | -- | -- | अनुदान अप्राप्त |
| २०२४-२५ | -- | -- | -- | -- | सन २०२४-२५ या वर्षासाठी सदर SPQEM योजनांतर्गत रुपये २ कोटी रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. |

**अल्पसंख्याक समाजाच्या संस्था/मदरसांकरिता शिक्षण देणेबाबत योजना (S.P.E.M.M. - Scheme for Providing Education in Madarsa/Minorities.).**

केंद्र शासन मानव विकास संसाधन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक D. O. No. 11-2016-EE.19 / दिनांक १६-०७-२०१८ अन्वये I.D.M.I व S.P.Q.E.M. या योजनांचे एकत्रिकरण करून S.P.E.M.M. ( Scheme for Providing Education in Madarsa / Minoritires ) ही नवीन योजना सुरू करण्यात आलेली आहे सदर योजनेस मार्च २०२० पर्यंत मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर S.P.E.M.M. योजनांतर्गत संचालनालयस्तरावर प्राप्त पात्र प्रस्ताव M.I.S. प्रणालीद्वारे ऑनलाईन www.spemm.mhrd.gov.in या संकेतस्थळावर सादर करणेबाबत सुचविण्यात आलेले होते. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात S.P.E.M.M. अंतर्गत S.P.Q.E.M. योजनेचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत सुविधा केंद्र शासनामार्फत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने संचालनालय स्तरावरून ४१ मदरसांची माहिती (यु डायस प्राप्त) ऑनलाईन पध्दतीने भरून सादर करण्यात आलेली आहे.

S.P.E.M.M. योजना ही I.D.M.I व S.P.Q.E.M. या दोन योजनांचे एकत्रिकरण करून राबविण्यात येत आहे.

१. S.P.Q.E.M. या योजनेकरिता केंद्र व राज्य शासनाचा अनुदान मंजूर हिस्सा ६० : ४० इतका असेल.

२. I.D.M.I. या योजनेकरिता यापूर्वीप्रमाणेच केंद्र व संस्था यांचा अनुदान मंजूर हिस्सा ७५ : २५ इतका असेल.

३. S.P.E.M.M. योजनेची अंमलबजावणी करताना ती पारदर्शक व वेगवान पद्धतीने करण्यासाठी सदर योजनेंतर्गत प्रस्ताव विहित कालावधीत प्राप्त होण्यासाठी M.I.S. ( Management Information System ) प्रणालीचा वापर करण्यात आला आहे.

४. सदर योजनेंतर्गत राज्यस्तरावर मा. सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली स्थापित समितीमार्फत प्राप्त प्रस्तावांची तपासणी करून व प्रस्तावांना मान्यता घेऊन ते केंद्र शासनास सादर करणे आवश्यक असेल. या समितीमध्ये मा. सचिव, अल्पसंख्याक विभाग यांचा सहभाग असणे गरजेचे असेल.

५. राज्य मदरसा बोर्ड व राज्य शासन यांचेमार्फत सदर योजनेचे लाभार्थी वाढविण्यासाठी योग्य प्रचार व प्रसार करणे आवश्यक असेल.

६. सदर योजनेंतर्गत मदरसांचे यु-डायस कोड बंधनकारक करण्यात आलेला आहे.

विशेष : १. S.P.E.M.M. ही केंद्रपुरस्कृत योजना (I.D.M.I. व S.P.Q.E.M.) शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि. १०-०८-२०२१ रोजीच्या पत्रान्वये अल्पसंख्याक विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

२. S.P.E.M.M. ही केंद्रपुरस्कृत योजना (I.D.M.I. व S.P.Q.E.M.) शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण), जिल्हा परिषद या कार्यालयाकडून शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद या कार्यालयाकडे शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ०४-०४-२०२२ अन्वये वर्ग करण्यात आलेले आहे.

३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक २२-०६-२०२२ अन्वये अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालयाचे नामांतर शिक्षण संचालनालय (योजना) या संचालनालयाकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे.

## मंत्रालय

**प्रस्तावना**

मंत्रालय पातळीवर सामान्य शिक्षण या क्षेत्रातील विषयाचा प्रशासनिक विभाग म्हणून काम पाहिले जाते. इयत्ता १२ वी पर्यंतच्या अभ्यासक्रमापर्यंत, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-१९८६ ची अंमलबजावणी करणे, शिक्षणविषयक शासकीय धोरण ठरविणे, त्याबाबत शैक्षणिक संस्थांना मान्यता, मार्गदर्शन व मदत करणे व शिक्षणाचा दर्जा वाढविणे ही या विभागाची प्रमुखे कामे आहेत. त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तकांचा दर्जा वाढविणे, स्थानिक स्वराज्य संस्था व इतर स्वयंसेवी संघटना यांना शैक्षणिक कामांसाठी व प्रौढ शिक्षणाच्या कामासाठी अनुदान देणे व त्यांना उत्तेजन देणे आणि अनौपचारिक शिक्षण क्षेत्रातील कार्यक्रमांना चालना देणे इ. या विभागाची जबाबदारी आहे. विभागातील काम पाहण्याकरिता आय. ए. एस. श्रेणीतील प्रधान सचिवांची नियुक्ती करण्यात आली आहे. या विभागातील सचिवांना साहाय्य करण्याकरिता विभागामध्ये १ सहसचिव, ४ उपसचिव, ११ अवर सचिव, १ सहसचिव (विधी), १ उपसंचालक (सांख्यिकी), २१ कक्ष अधिकारी व इतर सहाय्यक कर्मचारीवृंद अशी पदे मंजूर आहेत. या विभागाच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली (१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), पुणे, (२) शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे, (३) शिक्षण संचालक (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण), पुणे, (४) संचालक, विद्या प्राधिकरण (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद) पुणे, (५) संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, (६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, (७) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे, (८) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, (९) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई हे प्रमुख विभाग आहेत.

---

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रशासकीय मुख्य कार्य म्हणजे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या कार्यक्रमांचे कार्यान्वय, संबंधित विभाग प्रमुख किंवा कार्यालय प्रमुखांद्वारे केले जाते. कार्यक्रमाच्या कार्यभाराचा सारांश प्रत्येक कार्यक्रमाची कामगिरी व लक्ष्य दर्शवितो.

हे विभाग अनुदानाद्वारे राबविण्यात येणारे कार्यक्रम संचालनालयीन स्तरावर घेतलेल्या धोरणविषयक निर्णयानुसार कार्यान्वित केले जातात. मंत्रालयीन विभागातर्फे विकासाची कामे प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यात येत नाहीत. त्यामुळे या विभागासाठी जी निधीची मागणी केली जाते, ती मुख्यत्वेकरून खालील बाबींसाठी असते :—

(अ) आस्थापना अधिकारी वर्ग व इतर कर्मचारी यांचा पगार, भत्ता व आकस्मिक खर्च.

(ब) विभागातील कर्मचारीवृंदांना कर्जे व अग्रिम धन.

याकरिता संचालनालयीन विभागांना कार्यक्रमाच्या कारभाराचा गोषवारा देण्यासाठी कोणतीही मानके विहित करणे योग्य व सुसंबद्ध ठरणार नाही. ही मानके फक्त प्रत्येक कार्यात्मक कार्यक्रमाच्या प्रगतीचा अंदाज घेण्यासाठी उपयुक्त आहेत.

---

## ठेव संलग्न विमा योजना

**भविष्य निर्वाह निधी.**— वर्गणीदारांच्या कुटुंबीयांना अधिक सामाजिक सुरक्षितता लाभावी म्हणून राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना अधिक बचत करण्यास प्रोत्साहन मिळावे, म्हणून ही योजना शासनाने सुरू केली आहे. कर्मचाऱ्याला कोणतीही मासिक वर्गणी न देता विम्याची सुरक्षितता लाभते. काही अटींच्या अधीन या योजनेखाली राज्य शासनाच्या कर्मचाऱ्याला जास्तीत जास्त रुपये ६०,००० मिळू शकतील, मात्र मृत्यूसमयी त्याची कमीतकमी ५ वर्षे सेवा झाली असली पाहिजे व भविष्य निर्वाह निधीत कमीतकमी शेवटच्या ३ वर्षांकरिता नियमाप्रमाणे आवश्यक शिल्लक असली पाहिजे.

---

## शासकीय कर्मचाऱ्यांना कर्जे

शासकीय कर्मचाऱ्यांना, निधीच्या उपलब्धतेनुसार खालील बाबींसाठी कर्जे मंजूर करण्यात येतात :—

(१) घर बांधणीसाठी अगर विकत घेण्यासाठी. घर बांधणीसाठी जो निधी उपलब्ध करण्यात येतो, त्यातील ५० टक्के निधी अनुसूचित जाती व जमाती आणि मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना राखून ठेवण्यात येतो.

(२) वाहने विकत घेण्यासाठी.

(३) संगणक यंत्रे विकत घेण्यासाठी.

(४) राष्ट्रीय व धार्मिक सण साजरे करण्यासाठी.

---

तक्ता १

TABLE I

## विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी

## शासन परिपत्रक क्रमांक वित्त विभाग, संकीर्ण-२०१४/प्र. क्र.-४/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी २०१४

(रुपये हजारांत)

| अ. क्र. S. No. | Head and Scheme Name | प्रत्यक्ष खर्च २०२१-२०२२ Actuals for 2021 - 2022 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेतर | | | | |
| | | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103, Assistance to Local Bodies for Primary Education, (01)(01) Purposive grants to Zilla Parishad, under Section 182 of the Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samiti's Act, 1961 (22020173). | 60596172 | 52185178 | 119078626 | 0 | 231859976 |
| 2 | 2202-General Education, 01 Elementary Education, (02) Establishment grants to Zilla Parishads under Section 183 of the Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samiti's Act, 1961, (02)(01)Establishment grants to Zilla Parishads under Section 183 of the Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samiti's Act, 1961 (22020182). | 75864 | 86000 | 123708 | 0 | 285572 |
| 3 | 2202-General Education, 01 Elementary Education, (03) Grants to other Local Bodies (03)(01) Mumbai Municipal Corporation (2202 0191). | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | 2202-General Education, 01 Elementary Education, (03) Grants to other Local Bodies, (03) (02) Other Local Bodies (2202 0208). | 10515647 | 11017041 | 26724656 | 0 | 48257344 |
| 5 | 2202-General Education , 01 Elementary Education 103, Assistance to Local Bodies for Primary Education, (01) (02) Book Banks in Primary Schools (2202 3637). | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103 Assistance to Local Bodies for Primary Education, (01) (06) Grants to Zilla Parishads for attendance Allowance of Girls from Weaker Section (2202 3691). | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103 Assistance to Local Bodies for Primary Education, (01)(07)Establishment of Kendriya Primary Schools (22023708). | 591185 | 442141 | 1413128 | 0 | 2446454 |
| 8 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103 Assistance to Local Bodies for Primary Education,(01)(08) Block Residency Primary Schools (22023717). | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

## विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी

## शासन परिपत्रक क्र. वित्त विभाग संकीर्ण-२०१४/प्र. क्र.-४/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी २०१४

| प्रत्यक्ष खर्च २०२२-२३ Actuals for 2022-2023 | | | | (रुपये हजारांत) | लेखाशीर्ष व योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण | |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 66742594 | 63345674 | 142151335 | 0 | 272239603 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणाकरिता स्थानिक संस्थांना सहाय्य, (०१) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२२०२०१७३). |
| 78711 | 99351 | 135086 | 0 | 313148 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य, (०२) (००) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान (२२०२०१८२). |
| 0 | 0 | 322240 | 0 | 322240 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य, (०३) इतर स्थानिक संस्थांना अनुदाने (०३) (०१) बृहन्मुंबई महानगरपालिका (२२०२ ०१९१) |
| 7971655 | 11747337 | 18398360 | 0 | 38117352 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३, प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना अनुदाने, (०३) (०२) इतर स्थानिक संस्था (२२०२ ०२०८). |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य, (०१) (०२) प्राथमिक शाळेतील पुस्तक पेढी (२२०२३६३७). |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य, (०१) (०६) समाजातील दुर्बल घटकांमध्ये मुलींना उपस्थिती भत्ता (२२०२३६९१). |
| 657922 | 417364 | 1317889 | 0 | 2393175 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य, (०१) (०७) केंद्रीय प्राथमिक शाळा (२२०२३७०८). |
| 0 | 2470 | 0 | 0 | 2470 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य, (०१) (०८) गट निवासी प्राथमिक शाळा (२२०२३७१७). |

(रुपये हजारांत)

| अ. क्र. S. No. | Head and Scheme Name | प्रत्यक्ष खर्च २०२१-२०२२ Actuals for 2021-2022 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेतर | | | | |
| | | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 9 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103 Assistance to Local Bodies for Primary Education,(01)(09) Opening of Balwadies in Primary Schools (22023726). | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103 Assistance to Local Bodies for Primary Education,(01)(11) Awards to Outstanding Primary Schools in Rural Areas (22023744). | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103 Assistance to Local Bodies for Primary Education,(01)(12) Establishment of Zilla Parishad Shikshan Mandal (22023753). | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 12 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103 Assistance to Local Bodies for Primary Education,(01)(13) Arrears to Zilla Parishads according to Assessment (22023762). | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 13 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103 Assistance to Local Bodies for Primary Education,(01)(14) Maintenance grant to Non-Government Aided Primary Schools (22023771). | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 14 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103 Assistance to Local Bodies for Primary Education,(01)(15) School Nutrition Programme other than Mumbai Mahanagar Palika (Centrally Sponsered Scheme) (Central Share) 22023806. | 793187 | 844821 | 2023983 | 0 | 3661991 |
| 15 | 2202-General Education, 01 Elementary Education, 103 Assistance to Local Bodies for Primary Education,(01)(16) School Nutrition Programme other than Mumbai Mahanagar Palika (Centrally Sponsered Scheme) (State Share) 22023815. | 821867 | 875367 | 2097163 | 0 | 3794397 |
| 16 | 2202-General Education, 01 Elementary Education, (03) Grants to other Local Bodies, (03)(03) School Nutrition Programme for Mumbai Mahanagar Palika (Centrally Sponsered Scheme) (Central Share) 22023824. | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३
Actuals for 2022-2023

(रुपये हजारात)

| विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण | लेखाशीर्ष व योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य, (०१) (०९) प्राथमिक शाळांमध्ये बालवाड्या उघडणे (२२०२३७२६). |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य, (०१) (११) ग्रामीण भागातील आदर्श प्राथमिक शाळांना पुरस्कार (२२०२३७४४). |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य, (०१) (१२) जिल्हा परिषद शिक्षण मंडळांची स्थापना (२२०२३७५३). |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य, (०१) (१३) अनुदान निर्धारणामुळे जिल्हा परिषदांना द्यावयाची थकबाकी (२२०२३७६२). |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य, (०१) (०८) मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित प्राथमिक शाळांना परि. अनुदान (२२०२३७७१). |
| 2121446 | 2259546 | 5413311 | 0 | 9794303 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य, (०१) (०८) शालेय पोषण आहार (मुंबई वगळून) केंद्र हिस्सा (२२०२३८०६). |
| 1345165 | 1432731 | 3432468 | 0 | 6210364 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य, (०१) (०८) शालेय पोषण आहार (मुंबई वगळून) राज्य हिस्सा (२२०२३८१५). |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य, (०१) (०८) शालेय पोषण आहार (मुंबई म.न.पा.) केंद्र हिस्सा (२२०२३८२४). |

(रुपये हजारांत)

| अ. क्र. S. No. | Head and Scheme Name | प्रत्यक्ष खर्च २०२१-२२ Actuals for 2021-22 योजनेतर विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 17 | 2202-General Education, 01 Elementary Education, (03) Grants to other Local Bodies, (03)(04) School Nutrition Programme for Mumbai Mahanagar Palika (Centrally Sponsered Scheme)(State Share) 22023833. | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 18 | 2202-General Education, 80 General, 001 Direction and Administration (00) (04) Director of Primary Education (2202 3038). | 0 | 0 | 0 | 40308 | 40308 |
| 19 | 2235-Social Security and Welfare, 02 Social Welfare, (00) (02) Welfare of aged, infirm and destitutes-Integrated Education for the Handicapped (22352976). | 4643 | 0 | 16949 | 0 | 21592 |
| 20 | 2235-Social Security and Welfare, 02 Social Welfare, 60 Other Social Securities and Welfare Programmes, 104 Payment against Deposit Linked Insurance Scheme, (00) (01) Deposit Linked Insurance Scheme-Government Provident Fund (22350481). | 180 | 120 | 300 | 0 | 600 |
| 21 | 2235-Social Security and Welfare, 02 Social Welfare, 60 Other Social Securities and Welfare Programmes, 104 Payment against Deposit Linked Insurance Scheme, (00) (04) Payment against Deposit Linked Insurance Scheme-The Staff of the Aided Non Government Primary Schools (2235A 222). | 300 | 180 | 420 | 0 | 900 |
| 22 | 2049-Interest Payments, 03 Interest on Small Savings, Provident Funds, etc. (02) Interest on the Provident Fund of the Staff of Private Primary Schools (20490299). | 385895 | 559691 | 1102564 | 0 | 2048150 |

प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३
Actuals for 2022-2023

(रुपये हजारात)

| विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण | लेखाशीर्ष व योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना साहाय्य, (०१) (०८) शालेय पोषण आहार (मुंबई म.न.पा.) राज्य हिस्सा (२२०२३८३३). |
| 0 | 0 | 0 | 48617 | 48617 | २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण प्रशिक्षण, ००१ संचालन व प्रशासन, (००) (०४) प्राथमिक शिक्षण संचालनालय (२२०२३०३८). |
| 3899 | 0 | 16063 | 0 | 19962 | २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, (००) (०२) वृद्ध, अपंग आणि निराधारांचे कल्याण—अपंगांकरिता एकत्रिकृत शिक्षण (२२३५२९७६). |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, (६०) इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४ ठेव संलग्न विमा योजनेबद्दल प्रदान, (००) (०१) ठेव संलग्न विमा योजना-शासकीय भविष्य निर्वाह निधी (२२३५०४८१). |
| 60 | 239 | 180 | 0 | 479 | २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, (६०) इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४ ठेव संलग्न विमा योजनेबद्दल प्रदान, (००) (०४) ठेव संलग्न विमा योजना-अनुदानित अशासकीय प्राथमिक शाळातील कर्मचारी (२२३५ ए २२२). |
| 0 | 0 | 0 | 0 | 2298595 | २०४९-व्याज प्रदाने, ०३ अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी इत्यादीवरील व्याज, (०२) (०३) अनुदानित अशासकीय प्राथमिक शाळातील कर्मचारी वर्गाच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याज २०४९०२९९ या लेखाशिर्षा खाली बीम्स प्रणालीद्वारे बी.डी.एस. काढणे बंद झाल्याने चालू वर्षाचे तसेच मागील वर्षाचे जिल्हा निहाय खर्चाची माहिती उपलब्ध होत नसून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार प्रत्यक्ष खर्चाची एकूण रक्कम नमूद करण्यात येत आहे. |

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६